19-04-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A

VVK/ 10:30

19-04-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) A-1

VVK/ MHM/ KGS/ 10:30

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**सभागृहातील कामकाजासंबंधी**

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझे अधिकृतपणे असे म्हणणे आहे की, काल विधेयकावर जी चर्चा झाली, त्यावेळी माननीय सभापती किंवा माननीय उपसभापती उपस्थित असते तर बरे झाले असते, कारण काही निर्णय घेण्याचे अधिकार तालिका सभापतींना नसतात. सभागृहाच्या कामकाजासंदर्भात काही निर्णय घेतले जातात, खास करुन विधेयकावर या सदनामध्ये चर्चा व्हावी, चर्चेच्या माध्यमातून कायदा मंजूर होत असतांना त्या कायद्याचा विविध अंगानी विचार व्हावयास पाहिजे. त्या कायद्याबाबत सर्वसामान्य प्रतिनिधींना काय वाटते, त्या कायद्याबद्दल त्यांच्या काही सूचना असतील, त्यात काही सुधारणा असतील या सर्व बाबींची चर्चा होऊन तो कायदा मंजूर व्हावा. कामकाज सल्लागार समितीमध्ये असे ठरले होते की, एका दिवशी दोन विधेयके मंजूर करावी, त्याचा अर्थ असा नाही की, ते विधेयक आजच्या आज मंजूर करावे, आताच्या आता मंजूर करावे. आपण ते विधेयक ऑनलेग ठेवू शकतो, काल आम्ही एक विधेयक मंजूर केले, दुसरे विधेयक मुद्रांक शुल्काचे होते. रात्रीचे तेव्हा 10 वाजले होते, तालिका सभापती यांनी कामकाज चांगले हाताळले, काही बाबतीत तालिका सभापती निर्णय घेऊ शकत नाहीत, त्यावेळी मी अशी विनंती केली होती की, मुद्रांक शुल्क हे विधेयक ऑनलेग ठेवा, आम्हाला या विधेयकावर चर्चा करावयाची आहे, मुद्रांक शुल्काच्या संदर्भात विविध कार्यालयामध्ये काय घडले आहे व काय घडत आहे हे सर्वांना माहिती आहे. माननीय मंत्री महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नतिकोद्दिन खतिब यांच्याकडे पाहून म्हणाले हे विधेयक आपणाला पास करावयाचे आहे. हे विधेयक खालच्या सभागृहात मंजूर झ ालेले होते, विधेयक या सभागृहात सुध्दा मंजूर होणार होते. परंतु कायदा करतांना त्यावर चर्चा होणे आवश्यक आहे, कारण एकदा कायदा पास झाल्यावर तो 10 कोटी जनतेवर लादला जातो. कायद्याची अंमलबजाणी करतांना काही अडचणी येऊ नयेत म्हणून विधेयकांवर सर्वकंष चर्चा होणे आवश्यक आहे. हे विधेयक जर मताला टाकले असते तर मी ते विधेयक नापास करु शकलो असतो, कारण विरोधी पक्षाचे सदस्य जास्त होते, परंतु आम्हाला तसे करावयाचे नव्हते, तसा आमचा उद्देश नव्हता, विरोधी पक्ष व सत्तारुढ पक्षांनी कामकाजात सहभागी होतांना प्रत्येक कायद्यावर चर्चा होणे अत्यंत आवश्यक आहे.

.....2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

सभापती महोदय, याबाबत आम्हाला संरक्षण मिळावयास पाहिजे. काही विधेयके पुढील अधिवेशनामध्ये घेतली तरी काही फरक पडत नाही. याच अधिवेशनामध्ये 4 विधेयके पास होण्यापेक्षा दोन विधेयके पास झाली तरी चालतील, परंतु ती विधेयके पूर्ण विचाराअंती चर्चा करुन त्यामध्ये काही सदस्यांचा सूचना व सुधारणा असतील त्यांचा विचार करुन पास होणे आवश्यक आहे. बऱ्याच विधेयकांवर 10 ते 15 तास चर्चा झालेली आहे. एखादा कायदा पास करीत असतांना त्यावर बोलण्यासाठी किती वेळ द्यावा असा नियम आहे काय ? विधेयकावर सदस्य अभ्यास करुन बोलतात, त्याबाबत माननीय सभापती व माननीय उपसभापती यांनी त्यांचे कौतुक करावयास पाहिजे, ते आपणाला गौरवास्पद ठरणारे आहे. म्हणून माझी आपल्या माध्यमातून विनंती आहे की, विधेयकावर चर्चा न थांबविता ती चालू ठेवावयास पाहिजे होती. विधेयकावर मुक्तपणाने चर्चा व्हावी असे मला म्हणावयाचे आहे. एवढे बोलून मी माझे बोलणे संपवितो.

----------------

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अशासकीय कामकाज**

**पृ.शी.**: राज्यातील दहा लाख लोकवस्ती असलेल्या
शहरांमध्ये कौटुंबिक न्यायालये स्थापन करणे

**मु.शी.**: राज्यातील दहा लाख लोकवस्ती असलेल्या
शहरांमध्ये कौटुंबिक न्यायालये स्थापन करणे
या विषयावरील डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स.
यांचा ठराव.

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री अनंत तरे यांनी त्यांचा पहिल्या क्रमांकावरील ठराव नंतर घ्यावा असे विनंती पत्र आपणाकडे दिले आहे. तेव्हा आपण कृपया माझा दुसऱ्या क्रमांकावरील ठराव प्रथम घ्यावा अशी विनंती करते.

**उपसभापती** : ठीक आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील ठराव मांडते.

"राज्यातील दहा लाख लोकवस्ती असलेल्या शहरांमध्ये कौटुंबिक न्यायालये स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनस करीत आहे".

महाराष्ट्रामध्ये 14 सप्टेंबर 1964 रोजी 66 क्रमांकाचा कौटुंबिक न्यायालये कायदा अस्तित्वात आला. त्यानुसार मुंबईमध्ये 1 कोर्ट आणि त्यामध्ये 8 न्यायाधीश, पुणे येथे 1 कोर्ट आणि त्यामध्ये 5 न्यायाधीश, नागपूरमध्ये 1 कोर्ट आणि त्यामध्ये 2 न्यायाधीश, औरंगाबाद येथे 1 कोर्ट आणि 2 न्यायाधीश अशाप्रकारे न्यायाधीशांची संख्या आहे. प्रामुख्याने प्रलंबित दाव्यांना लागणारा वेळ पाहिला तर तुम्ही विसंवादातून पती-पत्नी यांना व इतर घटकांना या त्रासाला सामरे जावे लागते. त्यातील विलंब कमी व्हावा आणि वाद मिटविण्यास डावपेचापेक्षा समुपदेशकामधून समझौता घडवून यावा हे कौटुंबिक न्यायालयामागचा हेतू होता. त्याबरोबर वेगवेगळे प्रोसिजर आहे, त्यामध्ये सुटसुटीत पध्दत अंमलात याव्यात आणि केसेसचा लवकर निपटारा व्हावा हा कौटुंबिक न्यायालये स्थापन करण्यामागचा हेतू होता. सद्या सर्व तालुका, जिल्हा व शहरांमध्ये दिवाणी न्यायालये आहेत. त्याठिकाणी स्त्रीयांच्या कौटुंबिक प्रश्नावर केसेस चालतात. त्यामध्ये पोटगी, घटस्फोटे, मुलांचा

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे.....

ताबा, पतीने नांदवणे म्हणजेच मेंटेनन्स, डिव्होर्स, custody of children, restriction of conjugal rights, या चार विषयांवरील दावे कौटुंबिक न्यायालयामध्ये वर्ग करण्यात आले.. मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद अशा चार शहरांमध्ये कौटुंबिक न्यायालये आहेत. हा कायदा करण्यात आला त्यावेळी त्यामध्ये म्हटले होते की, 10 लाख लोकवस्तीच्या शहरामध्ये कौटुंबिक न्यायालये स्थापन करण्यात यावीत. 1984 मध्ये हा कायदा प्रत्यक्षात आणला गेला तरी देखील 1984 ते 2006 पर्यंत 22 वर्षाच्या काळात महाराष्ट्रामध्ये अत्यल्प म्हणता येईल अशी चार कौटुंबिक न्यायालये देण्यात आली. आज महाराष्ट्रामध्ये 33 जिल्हयाच्या ठिकाणी तसेच नवीन तयार झालेल्या सर्व महानगरपालिका व इतर महानगरपालिकांमध्ये कौटुंबिक न्यायालयांची अत्यंत आवश्यकता आहे. हजारो दावे चारही शहरामध्ये आज प्रलंबित आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने कोल्हापूर, सांगली, नगर व विदर्भामध्ये सर्व जिल्हयाच्या ठिकाणी मराठवाडयामध्ये औरंगाबाद वगळता कोणत्याही ठिकाणी कौटुंबिक न्यायालये नाहीत. आजच्या परिस्थितीत कोकणातील सर्वच जिल्हयाच्या ठिकाणी 10 लाखापेक्षा जास्त लोकवस्ती असलेल्या सर्व ठिकाणी सातत्याने 22 वर्षापासून कौटुंबिक न्यायालयांची तरतूद व्हावी अशाप्रकारची मागणी झालेली आहे. त्याचप्रमाणे नव्याने अस्तित्वात आलेल्या महानगरपालिकांमध्ये म्हणजेच मीरा-भाईंदर, कल्याण-डोंबिवली, पिंपरी-चिंचवड, नवी मुंबई-भिवंडी, उल्हासनगर या ठाणे जिल्हयातील महानगरपालिका व पुण्याजवळच्या महानगरपालिकांमधील आणि तालुक्यामधील लोकसंख्या 10 लाखाच्या जवळपास जाऊन पोहोचली आहे. . विशेषत: महाराष्ट्राच्या ग्रामीण भागामधून शहराकडे ज्या वेगाने स्थलांतरण होत आहे. त्यावरुन आपल्याला कल्पना येईल की, इतर राज्यांच्या तुलनेत आपल्या राज्यामध्ये स्थलांतरणाचा वेग जास्त आहे. त्याचप्रमाणे इतर राज्याशी संबंधित असलेला कामगार वर्ग आज पिंपरी-चिंचवड मध्ये येऊन राहात आहे त्यावेळी त्यांचे देखील कौटुंबिक न्यायालयांचे दावे दाखल होणे अपेक्षित आहे. त्यामुळे `पुण्यामध्ये असलेले एक कौटुंबिक न्यायालय पुरेसे नाही. पिंपरी-चिंचवड हे पुण्याजवळ असल्यामुळे त्या जिल्हयामध्ये एकच कौटुंबिक न्यायालय अस्तित्वात आहे.त्या ठिकाणी पक्षकारांची फार मोठी गैरसमज होते. मला वाटते की, शासनामध्ये, अधिकारी वर्गामध्ये आणि निर्णय प्रक्रियेमध्ये जी नेते मंडळी आहेत त्यांची अशी गैरसमजूत आहे की, कौटुंबिक

..3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे.....

न्यायालयामध्ये जाणे म्हणजे कौटुंबिक वादाला प्रोत्साहन देणे. तशी परिस्थिती नाही. कौटुंबिक न्यायालयात महाराष्ट्रातील स्त्रीया जातात त्यामधून नेमके काय साध्य होते. याबाबतची वस्तुस्थिती अभ्यासाव्दारे मांडली जाणे आवश्यक आहे. म्हणून मी हा ठराव विधानपरिषदेत मांडला आहे. Legal status of women in Maharashtra राष्ट्रीय महिला आयोगाच्या विद्यमाने मी एक अभ्यास केलेला आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (पुढे सुरु...

आम्हाला असे दिसले की, कुटुंबातील छळामुळे, आणि तणावामुळे आत्महत्या करणाऱ्या स्त्रियांची संख्या सातत्याने वाढत आहे. आत्महत्येचा मार्ग न चोखाळता दिल्ली न्यायालयाने यावर प्रकाश टाकलेला आहे. कौटुंबिक न्यायालयामध्ये विशेषत: एक वर्षाच्या आत दाव्याचा निकाल लागला तर काही प्रमाणात स्त्रियांना दिलासा मिळू शकतो. कल्पना अशी आहे की 1990 सालामध्ये परितक्ता स्त्रियांचे आंदोलन झाले. समाजातील काही घटकांमध्ये पत्नीला घटस्फोट दिला जातो परंतु तिला दुसऱ्या विवाहाला परवानगी दिली जात नाही. विशेषत: बहुजन समाजामध्ये मोठ्या प्रमाणावर अशा स्त्रियांना टाकून दिलेले असले तरीसुध्दा कुटुंब स्वीकारते, परंतु त्यांना घटस्फोटाची मागणी मान्य नसते. पश्चिम महाराष्ट्रामध्ये कौटुंबिक न्यायामध्ये पोटगीचे दावे प्रलंबित आहेत. सांगली-कोल्हापूरमध्ये श्रीमती निशा शिवरकर, नागपूरमधून श्रीमती रुपा कुलकर्णी यांच्या सामाजिक संघटना या संदर्भाने काम करतात. परितक्ता स्त्रियांनी मोर्चा काढलेला होता. त्याचाच एक भाग म्हणून पोटगी विषयक कायद्यामध्ये 1998 मध्ये सुधारणा झालेली आहे. या सगळया प्रकरणाची साक्ष मी आहे. एक वर्षामध्ये दाव्याचा निकाल लावला जाईल. कमीत कमी 500 रुपये पोटगीची रक्कम होती, त्यामध्ये वाढ करुन 1500 केलेली आहे. पती तारखांना वारंवार हजर न राहिल्यास एकतर्फी निकाल कौटुंबिक न्यायालय देऊ शकते. पत्नीला यासाठी दहा-दहा वेळा कोर्टामध्ये चकरा माराव्या लागत होत्या. त्यातून त्यांची सुटका होण्यास मदत झालेली आहे. या पार्श्वभूमीवर शासनाकडे मानव विकास अहवाल 2002 सादर झालेला आहे. याबाबतीतील ताळेबंद पाहिला तर महाराष्ट्रातील स्त्री कुटुंब प्रमुखांची संख्या सतत वाढत चाललेली आहे. अशा स्त्रियांची संख्या मोठी आहे. या अहवालानुसार ही संख्या 8.8 मिलियन म्हणजेच 88 लाख आहे. या विषयावरील मार्च 1991 साली शासनास अहवाल प्राप्त झाला. त्यानंतर 2002 नंतर पुन्हा ही संख्या वाढलेली आहे. या संदर्भाने अनेक सर्व पक्षीय समित्या झाल्या. महाराष्ट्रामध्ये माननीय श्री.शरद पवार मुख्यमंत्री असतांना, 1991 साली अशाप्रकारची समिती नेमलेली होती. त्यामध्ये श्रीमती इंदिरा जयसिंग, श्रीमती विद्या बेलोसे,श्रीमती सुधा चुरी आणि माझाही त्या समितीमध्ये समावेश केलेला होता. कौटुबिक न्यायालयांची संख्या वाढविली गेली पाहिजे. 1994 साली महिला धोरण जाहीर झाले त्यावेळेला देखील मी प्रत्येक तालुक्यामध्ये, जिल्ह्यामध्ये कौटुबिक न्यायालय असले पाहिजे अशाप्रकारची मागणी केलेली आहे. दुर्दैवाने ही बाब प्रलंबित आहे. द्रुतगती न्यायालयावर निर्बंध आहेत. पोटगीच्या प्रश्नावर फार थोडी लोक न्यायालये झालेली दिसतात.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/

डॉ.नीलम गोऱ्हे (पुढे सुरु.....

तालुक्यामध्ये 10-10 वर्षे पोटगीचे दावे प्रलंबित आहेत. फार मोठ्या प्रमाणात या मुली करुण अवस्थेत कोर्टामध्ये फेऱ्या मारताना दिसतात. त्यानंतर 1998 मध्ये पोटगी विषयक कायद्यामध्ये बदल करण्यात आला. त्याचा फायदा कोर्टामार्फत सर्वच स्त्रियांना होऊ शकणार आहे. मुलांचा ताबा, घटस्फोट या दाव्यातही पती-पत्नीं या दोधांनाही समजून घेऊन तोडगा काढण्यासाठी कोर्टाने स्वत: समुपदेशक नेमले आहेत ते तीन वेळा तसा प्रयत्न करतात. कस्टडी ऑफ चिड्रेनसाठी न्यायालयाने समुपदेशक नेमलेले आहेत. मुलाची देखील काय इच्छा आहे,या विषयी त्याचे म्हणणे ऐकून घेतले जाते. एक दुसऱ्याचे कोठेतरी संबंध गुतलेले असतात, त्यामुळे त्यांना मूल नको असते. काही पुरुष अहंकारापोटी मुलाच्या जीवनावर हे करत असतात.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ....

महाराष्ट्रातील कोर्टातील परिस्थिती पाहिली तर मुलांच्या कस्टडीचा दावा ज्यावेळी चालतो त्यावेळी त्या ठिकाणी न्यायाधीश स्वत: संवेदनशील असतील तर ते एकटे स्वत: त्या मुलांशी बोलतात. नाही तर त्या मुलांच्या ताब्याबद्दल कोर्टामध्ये त्या बालकांचे धिंडवडे निघालेले असतात. यामध्ये जसे कौटुंबिक न्यायालयामध्ये केसेस घेऊन जाणारे लोक जबाबदार आहेत त्याचप्रमाणे अशी परिस्थिती का निर्माण झाली याची कारणे आपण शोधली पाहिजेत. या बाबतीत धोरणकर्ते म्हणून आपण अपुरे पडतो असे मला वाटते. बऱ्याचवेळा अनेक लोकांचा गैरसमज होतो की, अनेकदा एकांगीपणे सगळया महिला पुरुष पक्षकारांना कोंडीत पकडण्याचा प्रयत्न करीत असतात. राष्ट्रीय महिला आयोगाचा अहवाल स्त्री आधार केंद्राच्या माध्यमातून चारही कौटुंबिक न्यायालयांच्या बाबतीत सादर केला होता. तो अहवाल आपल्याला सादर करते. दरवर्षी आम्ही अहवाल सादर करतो. त्यामध्ये असे दिसून आले की, मराठी भाषेचा वापर अजूनही कौटुंबिक न्यायालयामध्ये होत नाही. त्या ठिकाणी इंग्रजीमध्ये फॉरमॅट तयार केलेला आहे. मुळातच या कौटुंबिक न्यायालयांचा हेतू असा होता की, वकिलांचा काही ना काही पैशासाठी तारखा घेण्याचा प्रयत्न चालतो त्यातून सुटका मिळावी. त्याशिवाय यातून मार्ग निघणार नाही. तो फॉरमॅट इंग्रजीमध्ये आहे. दुसरे असे होते की, कौटुंबिक न्यायालयामध्ये स्त्री पक्षकार शेकडोच्या संख्येने जमा होतात. त्यांच्यासाठी स्वच्छतागृह नसते. त्या महिला छोट्या बाळांना घेऊन येतात. ती मुले जमिनीवर बसलेली असतात. कौटुंबिक न्यायालयांमध्ये अशा सोयीसुविधा असल्या पाहिजेत. स्त्री पक्षकार मोठ्या संख्येने येतात. त्यांच्यासाठी पोलीस प्रोटेक्शन अशा गोष्टी सुध्दा सध्या कौटुंबिक न्यायालयामध्ये नाहीत. मुंबईच्या कौटुंबिक न्यायालयामध्ये असा निर्णय घेतला की, पोटगीची रक्कम चेकने दिली पाहिजे. नाही तर पूर्वी असे होत होते की, कोर्टासमोर पोटगीची रक्कम द्यावयाची आणि कोर्टाच्या बाहेर गेल्यानंतर पत्नीला मारुन तिच्याकडील रक्कम घेऊन पळून जावयाचे असे दिसून आले. त्यामुळे कौटुंबिक न्यायालयाने कोर्टाच्या आत बँक काढलेली आहे. त्या ठिकाणी जाऊन पतीला ड्राफ्ट भरावा लागतो. तो ड्राफ्ट पत्नीच्या हातामध्ये देण्यात येतो. याला कारण असे आहे की, कौटुंबिक न्यायालये थोड्याफार प्रमाणात महिलांच्या प्रश्नांच्या बाबतीत संवेदनशील असण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

थोडाफार न्याय मिळण्याची त्यांना आशा असते. आम्ही या कौटुंबिक न्यायालयाच्या पाहणीतून असे दिसले की, लोकांचा जो गैरसमज आहे की, भांडण झाले की स्त्री सरसकट वकिलांकडे जाते आणि केस घालते. परंतु तशी परिस्थिती नाही. सरासरी 3 ते 17 वर्षे वाट पाहिल्यानंतर स्त्रियांनी कौटुंबिक न्यायालयामध्ये धाव घेतलेली होती. एका स्त्रिने लग्नाला 50 वर्षे झाल्यानंतर न्यायालयाचा दरवाजा ठोठावला होता. तिच्या पतीने या वयात दुसरे लग्न केले म्हणून ती न्यायालयात गेली होती. गरीब घरातील स्त्रिया, ज्यांना शिक्षण नाही, नोकरी नाही अशा 13 ते 50 हजार रुपये उत्पन्नातील स्त्रियांना या कौटुंबिक न्यायालयाचा फायदा झाल्याचे दिसून आले. दुसरे म्हणजे लग्नानंतर 3 ते 8 महिने शारीरिक मारहाण झाल्यानंतर स्त्रियांनी कौटुंबिक न्यायालयाचा आधार घेतलेला होता. पतीचे परस्त्रीशी संबंध, दारु पिणे, मुलगा न होणे व हुंडा हीच मुख्य कारणे विसंवादाच्या पाठी दिसून आली. हुंडा व हुंडाबळी यांचा देखील शेतकऱ्यांच्या दुरावस्थेशी संबंध असल्याने दिपाली कोल्हे यांच्यासारख्या घटना दिसून आल्या. अशा परिस्थितीमध्ये तीन मुलींना जन्म दिल्यानंतर तीन नंबरच्या मुलीने आत्महत्या करण्याची घटना घडली. या न्यायालयात दावे प्रलंबित असलेल्या वा निकाली काढलेल्या स्त्रियांचा पुनर्विवाहाचा इरादा दिसून आला नाही. एक लग्न मोडल्यानंतर त्या मुलीला आवश्यक वाटले तर पुनर्विवाह होतो. नामदार आगरकर आणि इतर लोकांनी याबाबतीत निर्णय घेतलेला होता. समाजामध्ये पुरुषांचा पुनर्विवाह सहज स्वीकारला जातो. परंतु परित्यक्त्यांच्या बाबतीत तशी परिस्थिती नाही. कोर्टामध्ये तारखा पडत असल्या तरी काही वकिलांचा वाईट अनुभव आलेला आहे. कोर्टामध्ये वकील चांगलेपणाने या केसेस चालवत असले तरी पाच ते सात वर्षे केसेस प्रलंबित राहतात. पूर्वी अशी अट होती की, पोटगीची रक्कम मिळण्यासाठी सुध्दा वकिलाची सही लागावयाची. त्यासाठी देखील अडवणूक होत होती. परंतु या सर्व पोटगीच्या केसेस कौटुंबिक न्यायालयामध्ये गेल्या तर त्यामध्ये आज ना उद्या आपण विचार करु शकतो. विशेषत: रिस्ट्रीक्शन ऑफ कंजुगल राईट यामध्ये काही ठिकाणी कौटुंबिक समझोता झ ाल्यामुळे पती पत्नी एकत्र येण्याचा निर्णय घेतात. अशा केसेस कौटुंबिक न्यायालयामध्ये चालविल्या जातात. कौटुंबिक न्यायालय त्यांना दर सहा महिने कोणत्या ना कोणत्या संस्थेशी

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ KGS

डॉ. नीलम गोऱ्हे ....

जोडून देतात. त्या संस्थेचे लोक त्या ठिकाणी जाऊन त्यांचा संसार नीट चालला आहे की नाही हे जाऊन पाहतात. नाही तर कोर्टासमोर एक सांगावयाचे आणि घरी गेल्यानंतर प्रत्याक्षात तसे काही घडत नाही, असे होऊ नये म्हणून असे केले जाते. कौटुंबिक न्यायालयाबाबत सांगत असताना रिस्ट्रीक्शन ऑफ कंजुगल राईटच्या संदर्भात मला सांगावयास पाहिजे.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 10:50

(डॉ. नीलम गो-हे पुढे सुरु...)

सभापती महोदय, पतीने पत्नीला नांदवावे यासाठी केसेस चाललेल्या असतात. याबाबतीत कायद्यामध्ये त्रुटी आहेत. जर पती-पत्नी दोघांची इच्छा नसेल तर अशा वेळेला कोणत्याही कायद्याने सक्ती करता येत नाही. उद्या पत्नीला नांदवल्यानंतर तिचा छळ झाला आणि काही बरे वाईट झ ाले तर त्याला कोण जबाबदार ? म्हणून रेस्टिट्यूशन ऑफ कॉन्ज्युगल राईटचे दावे फार समजूतदारपणे आणि संवेदनशीलतेने हाताळले पाहिजेत. जेथे कौटुंबिक न्यायालये नाहीत अशा ठिकाणी स्त्रियांच्या फार समस्या असतात. कोर्टामध्ये दोन-तीन वर्षे केसेस प्रलंबित राहातात. आज ना उद्या समझोता होईल, काही तरी मार्ग निघेल. असे कोर्टाला वाटत असते. या काळामध्ये ही कुटुंबे अक्षरश भरडली जातात. दत्तक विधान किंवा घटस्पोटाच्याबाबतीत कौटुंबिक न्यायालयामध्ये निकाल दिला जातो. ज्या प्रमाणे बलात्काराच्या केसेसमध्ये इन कॅमेरा ट्रायल चालते त्याप्रमाणे कौटुंबिक न्यायालयामध्ये घटस्पोटाचे दावे इन कॅमेरा चालले पाहिजेत जेणे करुन जगासमोर त्याची चर्चा होणार नाही आणि निकालही ब-या पध्दतीने लागू शकतील. कौटुंबिक न्यायालये हे आदर्श आहे असे मी म्हणणार नाही. परंतु महाराष्ट्रामध्ये इतर राज्यांच्या तुलनेत स्थलांतराचा वेग हा 13 टक्क्या पेक्षा जास्त आहे. या संदर्भात राष्ट्रीय महिला आयोगाने आमच्याकडून अभ्यास करुन घेऊन आमच्या शिफारशी विचारल्या. सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये जी 4 कौटुंबिक न्यायालये अस्तित्वात आहेत त्यांच्या संदर्भात उच्च न्यायालयातर्फे रिव्ह्यू घेतला जातो. पारदर्शकता आणि जबाबदारीचा कितीही भाग असला तरी न्यायालयाच्या संदर्भातील माहिती सहजगत्या मिळू शकत नाही. सभापती महोदय, औरंगाबाद जिल्हयातील सर्व केसेस ह्या औरंगाबाद येथील कौटुंबिक न्यायालयामध्ये वर्ग करण्याचा निर्णय 5 वर्षापूर्वी घेण्यात आला होता. याचा परिणाम असा झाला की, लिटिगण्टस्ना औरंगाबाद येथे येण्यासाठी 150 ते 200 रु. खर्च येत होता. त्यामुळे पुन्हा कौटुंबिक न्यायालयाचे ज्युरिस्डिक्शन हे औरंगाबाद शहरापुरतेच मर्यादित ठेवावे अशा प्रकारची विनंती उच्च न्यायालयाकडे करण्यात आली. या कौटुंबिक न्यायालयाचे काम चांगले चालले आहे किंवा कसे हे राज्य महिला आयोगा मार्फत पाहिले जाईल असे शासन सांगते. मी सांगू इच्छिते की, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षांचे पद गेल्या दोन वर्षापासून रिक्त आहे. यामधील अनेक अधिकारी सातत्याने बदलले जातात. राज्य महिला आयोगावर अनेक जबाबदा-या

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 10:50

(डॉ. नीलम गो-हे...)

आहेत. त्यामुळे कौटुंबिक न्यायालयामध्ये जाणा-या पक्षकारांना खरंच मदत मिळते की नाही, त्यामध्ये करप्शन होते की नाही, हे बघण्यास पुरेसा वेळही मिळत नाही. याबाबतीत दोन गोष्टी आपणास करता येतील. केसेस लवकरात लवकर निकाली निघाव्यात यासाठी द्रुतगती न्यायालयाच्या बाबतीत आपण निर्णय घ्यावयास पाहिजे. दुसरा प्रश्न असा आहे की, हिंसाचार आणि बलात्काराच्या ज्या केसेस आहेत त्यांचा द्रुतगती न्यायालयामध्ये समावेश केला लवकरात लवकर न्याय मिळण्यास मदत होईल. जुन्नर, सांगली अशा ठिकाणी तीन-तीन हजार केसेस 90 सालापासून प्रलंबित आहेत. किती केसेस किती वर्षापासून प्रलंबित आहेत याचे असेसमेंट करायला पाहिजे. अशा प्रकारच्या असेसमेंटच्या बाबतीत जेव्हा मुख्यमंत्री बैठक बोलावतात त्यावेळी अधिकारी जेथे केसेस प्रलंबित नाहीत अशा तालुक्यांची माहिती देतात. तेव्हा तालुक्यामध्ये, जिल्हयामध्ये पोटगीच्या, घटस्पोटाच्या किती केसेस प्रलंबित आहेत याचा आढावा घेऊन उच्च न्यायालयाकडे तशी शिफारस करावयास पाहिजे. हा विषय मी सातत्याने दोन वर्षे पुरवणी मागण्यावरील चर्चेच्या वेळी मांडत आले आहे. 22 वर्षामध्ये केवळ 4 कौटुंबिक न्यायालये महाराष्ट्रामध्ये व्हावीत हे पुरोगामी महारारष्ट्राला शोभणारे नाही. तेव्हा प्रत्येक 10 लाख लोकवस्ती असणा-या शहरामध्ये कौटुंबिक न्यायालय असले पाहिजे. एखाद्या चांगले काम करणा-या संस्थेच्या बाबतीत ज्यावेळी टीका होते त्यावेळी त्या संस्थेची चौकशी एलआयव्ही मार्फत करावी असे सांगितले जाते. चांगल्या काम करणा-या संस्था आहेत. परंतु दुर्दैव असे आहे की, सरकार बोलावते असे म्हटले की, वेगळेच लोक सरकार समोर जाऊन बसतात आणि गैरफायदा घेतात.

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ....

जे कोणी 10 वर्षे या विषयावर काम करीत आहेत अशा संस्थांना बोलावून आणि त्यांचे मत विचारात घेऊन या कौटुंबिक न्यायालयांमध्ये सुधारणा झाली पाहिजे. अधिक कौटुंबिक न्यायालये सुरु झाली पाहिजेत. खऱ्या अर्थाने कुटुंबामध्ये स्त्रीला प्रतिष्ठा आणि कुटुंब समृध्दीचे काम मिळू शकेल. यासंदर्भातील " legal status of women in Maharashtra " हा जो रिपोर्ट आहे तो मी शासनाकडे सादर करु इच्छिते. माझी शासनाला यानिमित्ताने अशी विनंती आहे की कमीत कमी पुढील दोन महिन्यांच्या कालावधीमध्ये याचा अभ्यास करुन इतरही संबंधित संस्थांना बोलावून यासंदर्भात एखादी बैठक घेऊन कौटुंबिक न्यायालयांच्या संदर्भात शासनाने ठोस घोषणा करावी. समितीची एखादी बैठक झाल्याने हा विषय संपत नाही. ही On going system आहे. लोकांना आपल्या तक्रारी मांडता येतील आणि जेणेकरुन न्याय मिळेल अशी व्यवस्था निर्माण होणे आवश्यक आहे. एकीकडे शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. परंतु स्त्री आत्महत्यांच्या बाबतीत "रोज मरे त्याला कोण रडे" अशी परिस्थिती आहे. कौटुंबिक न्यायालये निर्माण करणे हा या समस्येवर एकमेव उपाय नसला तरी एक प्रमुख उपाय म्हणून कौटुंबिक न्यायालयांच्या माध्यमातून समझोता घडविण्याचा प्रयत्न होऊ शकेल आणि दावा लागण्याच्या अगोदर प्री लीगल केस चालविता येईल. धन्यवाद.

ठराव प्रस्तुत झाला.

------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, या विषयावर बोलण्याचा अधिकार डॉ. नीलम गोऱ्हे यांना अधिक आहे त्यांचा या विषयातील अभ्यासही आहे. या चर्चेच्या निमित्ताने एकच गोष्ट मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावीशी वाटते. काही दिवसापूर्वी मी आणि माझा एक मित्र गप्पा मारत होतो. गप्पांच्या ओघामध्ये तिसऱ्या मित्राचा आणि त्याच्या बायकोचा विषय निघाला. मित्र म्हणाला की आता काही दिवसांमध्ये त्यांचा घटस्फोट होईल. खरे म्हणजे आम्हांला दु:ख झाले की आमच्या एका जवळच्या मित्राचे अशा पध्दतीने जीवन उद्‌ध्वस्त होत आहे. या मित्राला कोण वकील मिळाला इथपर्यंत आमची चर्चा झाली. खरे म्हणजे यासाठी एक चांगला कौन्सिलर लागतो आणि त्यामधून अशा पध्दतीचे प्रश्न सुटू शकतात. नवरा बायकोच्या भांडणामध्ये कौन्सिलर काय करणार असा प्रश्न निर्माण होतो. माझे एक नातेवाईक होते. त्या दोघा नवरा-बायकोची टोकाची भांडणे होती. भांडणाचा विषय काय तर वांग्याची भाजी आवडते किंवा कांद्याचे वरण चालत नाही अशा प्रकारचे होते. आजकाल मिडियाचे आक्रमण पाहिले तर जो आघात होत आहे त्यातून कुटुंब व्यवस्था उध्वस्त होण्याकडे समाज चालला आहे असे दिसून येईल. माझ्या मित्राने काय केले तर 25000 रु. पुण्याला कौन्सिलरला दिले. पुण्याला एका चांगल्या कौन्सिलरला 25000 रु. दिल्यानंतर नवरा-बायकोचे भांडण मिटले सायकॉलॉजी ही केंद्रस्थानी आहे. या सगळया परिस्थितीचा नवरा-बायकोच्या मनावर होत असलेला परिणाम याचा विचार केला पाहिजे. महिलांवर 100 टक्के अत्याचार होत आहेत." Strength of India as compared to strength of USA" याचा विचार केला तर आपण 2020 साली युएसए च्या पुढे जाऊ शकू का अशी शंका निर्माण होते. सगळयात महत्वाचा घटक म्हणजे सोशल सिक्युरिटी बजेट सगळयाच कुटुंबाचे कमी आहे. सामाजिक सोशल सिक्युरिटी हा कुटुंब व्यवस्थेचा भाग आहे. समाजव्यवस्थेवर जे आघात होत आहे त्यावर परिपूर्ण बंधन आणणे गरजेचे आहे. तालुका स्तरावर खूप मोठया प्रमाणावर कौन्सिलरची गरज आहे. कौन्सिलर 10-15 मिनिटे कौन्सिलींगचे काम करतो आणि 25 हजार रु. मिळवितो. कौन्सिलरला त्या दोघांनी वेगवेगळी उत्तरे दिली. त्यांच्याकडून आल्यानंतर आमच्या मित्राच्या बायकोची वेषभूषा आणि केशभूषा बदलली तर मित्राच्या वागण्यात बदल झाला आणि सडनली तो चांगला वागू लागला. शहरातील मुले 25000 रु. देतील. मात्र ग्रामीण भागामध्ये कोण कौन्सिलरकडे जाणार आणि हे भांडण मिटविणार असा प्रश्न पडतो.

यानंतर भारवि

अधिकृत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी...

मूळात असे प्रकार ग्रामीण भागामध्ये कमी घडत असतात. असे जरी असले तरी सरकारने या विषयाचा गांभीर्याने अभ्यास केला पाहिजे. आपल्या देशाची संस्कृती बिघडली तरी तिचा बोजा सरकारवर येणार आहे. आपली जी संस्कृती आहे, तिचा ऱ्हास होणार नाही याचा विचार केला पाहिजे. मी आपल्याला एक माझ्याच एका इंजिनिअर मित्राचे उदाहरण देणार आहे. माझ्या इंजिनिअर मित्राच्या पत्नीने अमूक एक महाराज भंपक आहे. तो स्त्रियांवर अत्याचार करतो असे तिचे म्हणणे होते. पण तिच्या विरोधात माझा मित्र गेला. तो मला म्हाणाला की, माझी बायको कजाक आहे. मी महाराजांच्या चरणी गेल्यामुळे ती असा आरोप करीत आहे. मी भारतीय राज्य घटनेवर विश्वास ठेवणार आहे. जी पत्नी 10-11 वर्ष आदर्श होती ती कजाक एकदम कशी काय झाली ? अशी विचारणा मित्राकडे केली. जो कोणी देवाच्या निमित्ताने स्त्रियांवर अन्याय करणार,अत्याचार करणार असेल त्याला जेलमध्ये पाठविले पाहिजे असे मी सांगितले. तू जर बायकोवर अत्याचार करत असशील तुलासुध्दा जेलमध्ये पाठवावे लागेल. सहा महिन्यानंतर जेलमधून सुटल्यानंतर तुला तुझी बायको सुंदर वाटायला लागेल असे मी माझ्या मित्राला सांगितले. तेव्हा अशा सर्व गोष्टींचा वस्तुनिष्ट विचार करून कौन्सिलरची संख्या वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आज कुटुंब न्यायालयाची जरूर सुधारणा करावी. याचे कारण असे की, आज टी.व्ही.चे आक्रमण आपण थांबवू शकत नाही. टी.व्ही.चे आक्रमण हे येणाऱ्या व्यवस्थेला फार घातक असे आहे. त्यामुळे कौटुंबिक न्यायालयांबरोबर कौन्सिलरची देखील संख्या वाढविणे आवश्यक आहे. एवढेच मला यानिमित्ताने सांगावयाचे आहे. धन्यवाद.

...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी राज्यातील दहा लाख लोकवस्ती असलेल्या शहरांमध्ये कौटुंबिक न्यायालये स्थापन करण्यासंबंधीचा ठराव मांडल्याबद्दल मी त्यांचे मनापासून अभिनंदन करतो.

कुटुंब न्यायालयांची दिवसेंदिवस गरज वाढत चालली आहे. टाऊनशिपमध्ये कुटुंब न्यायालयांची गरज जाणवायला लागली आहे. आज छोटया छोटया गोष्टींवरून पती-पत्नींमध्ये भांडणे होतात. महिलांवर अत्याचार होतात. हुंडाबळी होतो. पैशासाठी महिलेला त्रास दिला जातो. असे अनेक प्रकार सातत्याने समाजामध्ये चालत असतात. पती-पत्नींमध्ये छोटया-छोटया गोष्टींवरून भांडण झाल्यामुळे वितुष्ट निर्माण होऊन फारकत घेण्यापर्यंत प्रकरणे जातात. कुटुंब न्यायालयाने कुटुंब तोडण्याऐवजी ते जोडता कसे येईल याचा कौन्सिलिंगच्या दृष्टिकोनातून विचार करावा असे मला वाटते. पती-पत्नींची छोटी-छोटी प्रकरणे पोलीस ठाण्यामध्ये जातात. त्यामुळे कोर्टामध्ये केस दाखल होते. अशाप्रकारची अनेक शेकडो प्रकरणे आज न्यायालयात प्रलंबित आहेत. तेव्हा माझी या निमित्ताने सूचना आहे की, पोलिसांनी देखील दोन्ही बाजूकडील लोकांना बोलावून योग्य प्रकारे संबंधितांची समजूत घातली तर अनावश्यक अशी प्रकरणे कोर्टात जाणार नाहीत. तेव्हा पोलिसांनी देखील कौन्सिलिंगचे काम केले पाहिजे अशी माझी या निमित्ताने सूचना आहे. असे जर केले तर न्यायालयातील कामकाजाचा भार काही प्रमाणात कमी करता येईल.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MHM/ KGS/ पूर्वी श्री.भारवि.... 11:05

प्रा.जोगेंद्र कवाडे....

आज आपल्या राज्यात कौटुंबिक न्यायालयाची नितांत गरज आहे. महिलांना न्याय मिळावा, त्यांच्यावरील अत्याचार-अन्याय थांबले जावेत आणि कौटुंबिक स्वास्थ्याच्या माध्यमातून सामाजिक स्वास्थ्य उत्कृष्ट राहावे या दृष्टिकोनातून कौटुंबिक न्यायालयांची नितांत आवश्यकता आहे, असे या ठिकाणी नमूद करावेसे वाटते. आज राज्यात अनेक प्रकारच्या एन.जी.ओ. आहेत. पीपल्स रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या महाराष्ट्रात जेवढया शाखा आहेत, त्या ठिकाणी महिलांची अनेक तक्रारींची प्रकरणे येत असतात. आम्ही दोन्ही बाजूंच्या लोकांना बोलावून, त्यांना समजाविण्याचा प्रयत्न करुन त्यांना एकत्रित आणण्याचा प्रयत्न करीत असतो. इतरही राजकीय पक्ष अशाप्रकारची कामे करीत असतील. स्वयंसेवी संस्थांकडे अशी प्रकरणे गेल्यानंतर एक्स्प्लॉईटेशन करण्याचा प्रयत्न केला जातो. त्यात अनेक प्रकारचे गैरप्रकार केले जातात, अशाही तक्रारी आहेत. स्वयंसेवी संस्था या बाबीशी निगडीत काम करीत आहेत. परंतु या व्यतिरिक्त कौटुंबिक न्यायालयाच्या माध्यमातून, महिलांना न्याय देण्यासाठी जास्त विलंब न लावता लवकरात लवकर त्यांच्याकडे आलेल्या महिलांच्या प्रकरणाच्या दृष्टिकोनातून इन्स्टंट निर्णय कसा देता येईल, या दृष्टिकोनातूनही प्रयत्न होणे आवश्यक आहे. कौटुंबिक न्यायालयामध्ये जशी प्रकरणे प्रलंबित असतात, तशी या ठिकाणी राहता कामा नये. या माध्यमातून कुटुंबांना जोडण्याचा प्रयत्न केला तर योग्य होईल असे मला वाटते.

महोदय, अलिकडच्या काळात चित्रपट आणि इलेक्ट्रॉनिक मिडीयाने कौटुंबिक व्यवस्थेवर प्रचंड आघात केला आहे. त्यांच्याकडून दाखविण्यात येत असलेल्या सिरिअल्समध्ये लफडयांशिवाय काहीच नसते. त्यामुळे अशा सिरिअल्सचा कुटुंबावर विपरित परिणाम होतो. महिला, पुरुष, लहान मुले, शाळा-कॉलेजमधील तरुण-तरुणी यांच्यावर अशा सिरिअल्सचा विपरित परिणाम होतो आहे. त्यामुळे आपल्या संस्कृतीशी सुसंगत अशा सिरिअल्स दाखविण्याची सक्ती मिडीयावर केली तर, आज जे काही कुसंस्कार होत आहेत, त्याला आळा बसेल. इडियट बॉक्समुळे समाज इडियट होऊ लागला आहे. त्यामुळे अशा प्रकारांवर अंकुश ठेवण्यासाठी शासनाने प्रयत्न करणे गरजेचे आहे.

..2..



SJB/ MHM/ KGS/ पूर्वी श्री.भारवि.... 11:05

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे....

महोदय, कौटुंबिक न्यायालयाच्या माध्यमातून महिला वर्गावरच नव्हे तर पुरुषांवर अत्याचार झाला तर, महिलांच्या संदर्भात अग्रक्रमाने विचार न करता, पुरुषांच्या संदर्भात देखील कौटुंबिक न्यायालयाने योग्य प्रकारे निर्णय करावा अशा प्रकारची कार्यवाही करावी असे माझे मत आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांनी हा ठराव मांडल्याबद्दल खरोखरच मी त्यांचे मनापासून अभिनंदन करतो. राज्यातील कौटुंबिक व्यवस्था, पारिवारिक व्यवस्था सुदृढ व्हावी, चांगली व्हावी यासाठी जेवढी कौटुंबिक न्यायालये वाढविणे आवश्यक आहे तेवढी वाढविण्यात यावीत, एवढीच या चर्चेच्या माध्यमातून मी विनंती करतो व माझे दोन शब्द पुरे करतो.

---------

..3..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ (विधी व न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी राज्यातील 10 लाख लोकवस्ती असलेल्या शहरांमध्ये कौटुंबिक न्यायालय स्थापन करावे, अशी शिफारस शासनाला केली आहे. या ठरावावर बोलतांना त्यांच्यासह, सन्माननीय सदस्य सर्वश्री श्रीकांत जोशी आणि प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी आपापली मते व्यक्त केली.

महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांचा या विषयातील अनुभव फार मोठा आहे. कुटुंबामध्ये असलेल्या वादा संदर्भात त्यांनी वस्तुस्थिती निदर्शनास आणून दिली आहे. हे खरे आहे की, कौटुंबिक न्यायालय कायदा -1984 मधील अनुच्छेद-3 (1) (अ) मधील तरतुदीनुसार राज्यातील ज्या शहरांची आणि नागरिकांची लोकसंख्या 10 लाखांपेक्षा जास्त असेल, त्या शहरात कौटुंबिक न्यायालयाची स्थापना करण्यात यावी असे नमूद करण्यात आले आहे.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ ....

आणि अनुच्छेद 3(1)(ब) नुसार, राज्याच्या कोणत्याही विशिष्ट भागासाठी राज्य शासनास आवश्यक वाटेल त्यानुसार कौटुंबिक न्यायालयाची स्थापना करता येते. सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगितले की, फक्त चारच ठिकाणी कौटुंबिक न्यायालये सुरु आहेत. सभापती महोदय, वरील तरतुदीनुसार सध्या राज्यात मुंबई येथे 7, पुणे येथे 5, नागपूर येथे 4 व औरंगाबाद येथे 2 अशाप्रकारे एकूण 18 कौटुंबिक न्यायालये कार्यरत आहेत. सभापती महोदय, केंद्र शासनाच्या महिला सक्षमिकरणाच्या संसदीय समितीने प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी एक कौटुंबिक न्यायालय स्थापन करावे अशी शिफारस केली आहे. त्यासाठी केंद्र शासनाने 50 टक्के हिस्सा दिलेला आहे. राज्यात नव्याने स्थापन करण्यात येणाऱ्या कौटुंबिक न्यायालयाच्या इमारतीच्या बांधकामासाठी व ती न्यायालये चालविण्यासाठी येणाऱ्या खर्चाच्या 50 टक्के रक्कम केंद्र शासनाकडून उपलब्ध होणार आहे. योजनांतर्गत खर्चापैकी कौटुंबिक न्यायालयाची इमारत बांधण्यासाठी रुपये 10 लाख तर योजनेतर खर्चापैकी न्यायालय चालविण्यासाठी रुपये 5 लाख इतका निधी प्राप्त होतो. राज्य शासनाने ठरविले आहे की, राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात प्रत्येक ठिकाणी एक कौंटुंबिक न्यायालय सुरु करावे. सभापती महोदय, अहमदनगर, अकोला, अमरावती, बीड, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, धुळे, जळगाव, जालना कोल्हापूर, लातूर, नाशिक, उस्मानाबाद, परभणी, रायगड, सांगली, सातारा, सोलापूर, ठाणे, वर्धा व यवतमाळ या 22 जिल्ह्यात कौटुंबिक न्यायालय स्थापन करण्यासंदर्भात उच्च न्यायालयाने शिफारस केली आहे. या शिफारशीनुसार एका न्यायालयासाठी एकूण 25 पदे याप्रमाणे 525 पदे निर्माण करणे प्रस्तावित आहे. यासाठी वार्षिक आवर्ती व अनावर्ती खर्च रुपये 7,42,14,987/- इतका अपेक्षित आहे. यासंबंधीचा प्रस्ताव सादर केला आहे. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी असा प्रश्न उपस्थित केला की, 10 लाख लोकसंख्येपेक्षा जास्त असेल त्या शहरात कौटुंबिक न्यायालयाची स्थापना करावी. त्या संदर्भात माझे म्हणणे असे आहे की, राज्य शासनाने प्रत्येक जिल्ह्यातील ठिकाणी कौटुंबिक न्यायालय स्थापन करावे, नंतर 10 लाख लोकसंख्या असेल तेथे ते वर्ग करु. सभापती महोदय, पिंपरी-चिंचवड, उल्हासनगर या ठिकाणीही





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ ....

न्यायालये स्थापन करु. अगोदर जिल्ह्याच्या ठिकाणी कौटुंबिक न्यायालये स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. सभापती महोदय, कुटुंबाचे वाद लवकर काढण्यासाठी, प्रोसिजर सुटसुटीत होण्यासाठी हा कायदा आहे. सभापती महोदय, दर वर्षी दोनदा माननीय मुख्यमंत्री आणि मुख्य न्यायाधीश यांनी भेट होते. त्यांना याची कल्पना दिली पाहिजे. या प्रश्नांसंदर्भातील केसेस लवकर काढण्यासंदर्भात माननीय मुख्यमंत्री माननीय मुख्य न्यायाधीशांशी चर्चा करतील. सभापती महोदय, खूप प्रकरणे पेंडींग आहेत. सन 1998 ला यासंबंधी कायदा करावा लागला. एका वर्षामध्ये पोटगीचा निकाल द्यावा, पती कोर्टात हजर राहत नाही अशा अनेक गोष्टी आहेत. पोलीस स्टेशमधून वॉरंट काढूनही पती हजर राहत नाही. पोटगीचा निकाल लागल्यानंतरही पैसे भरत नाही, यासाठी कायद्यामध्ये बदल करण्याचा प्रयत्न सुरु आहे. शोषण केले तर स्थावर मालमत्ता जप्त करण्यासंदर्भात कायद्यात बदल करुन त्यांना आधार मिळेल यासाठी शासन प्रयत्न करत आहे. सभापती महोदय, श्री. पवार यांनी सन 1991 मध्ये या संदर्भात एक समिती नेमली होती. त्या समितीच्या सर्व शिफारशी स्विकारल्या होत्या आणि तेव्हापासून आपण कौटुंबिक न्यायालये सुरु करीत आहोत. 18 कौटुंबिक न्यायालयामध्ये सोयी-सवलती नसल्याबाबत सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगितले. तरी, त्या संदर्भात मी त्यांना असे सांगू इच्छितो की, सुविधा देण्यासाठी शासन निश्चितप्रकारे प्रयत्न करील. सभापती महोदय, दारु पिऊन भांडणे अशाप्रकारचे पुरुषांचे अनेक वाद स्त्रियांशी होतात.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रिफ...

याचे परिणाम न्यायालयामध्ये होत असतात, हे खरे आहे की, सन्माननीय सदस्य श्री. जोगेंद्र कवाडे यांनी असे सांगितले की, ज्या तक्रारी येतात, कौटुंबिक भांडणे पोलीस स्टेशनमध्ये येतात, तर त्यांचे पोलीस स्टेशनमध्येच प्रबोधन करण्यात यावे. याबाबत सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी सुध्दा बोलले, सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी सुध्दा चांगले प्रबोधन करु शकातील असे मला वाटते. सुरुवातील जुन्या काळामध्ये भांडणे होत होती, तेव्हा न्यायालये नव्हती, गावातील पंचामार्फत त्याचा निवाडा लावण्यात येत होता. त्यामुळे भांडणे मिटत होती. सन्माननीय सदस्यांनी नवरा-बायकोच्या भांडणाची दोन-तीन प्रकरणे सांगितलेली आहेत, परंतु नवऱ्याला सुध्दा आता मदतीची गरज आहे, नवरा-बायकांची भांडणे काही क्षुल्लक कारणांवरुन होत आहे, काही वेळा तर ही भाजी का केली अशा छोटया-छोटया कारणावरुन भांडणे होत असतात. काही वेळा महिला सुध्दा महिलांवर अन्याय करतात, त्यामध्ये "सांस भी कभी बहू थी" हे आपणास माहिती आहेच. मी येथे कोणावरही आरोप करीत नाही, वस्तुस्थिती सांगत आहे, अनेक गोष्टी हया ग्रामीण भागामध्ये सुध्दा घडत असतात, एका घरामध्ये शेजारची बाई ताक मागण्यासाठी जाते, तेव्हा त्या घरची सून म्हणते की, घरामध्ये ताक नाही, तेव्हा ती बाई वापस येते, येतांना रस्त्यामध्ये तिला त्या सूनेची सासू दिसते, ती म्हणते कोठे गेली होती, ती सांगते तुझ्याच घरी गेली होती ताक आणायला, तुझी सून सांगते ताक नाही. ती बाई म्हणते चल माझ्या सोबत, ती घरी येते तर खरोखर ताक नसतेच. असे प्रकार होत असतात, ते सुध्दा कमी होण्याची गरज आहे, यामध्ये दोन्ही बाजूंनी समजूतदारपणाची गरज आहे, पुरूष व स्त्रियांच्याबाबतीत प्रबोधन करण्याची गरज आहे. ज्याप्रमाणे बलात्कार व हुंडाबळीच्या केसेस इनकॅमेरा होतात, त्याच प्रमाणे कुंटुब न्यायालये सुध्दा इनकॅमेरा केली पाहिजेत. म्हणून आपण कुटुंब न्यायालये ही प्रत्येक जिल्हयामध्ये करणार आहोत. तालुका न्यायालयाच्या धर्तीवर आपण कौटुंबिक जिल्हा न्यायालये करणार आहोत. सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गोऱ्हे यांना माझी विनंती आहे की, त्यांनी आपला ठरावा मागे घ्यावा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

........2.....

डॉ. निलम गोऱ्हे : सभापती महोदय, केंद्राची महिला सक्षमीकरण समिती आहे, त्यांनी आपणाला निधी दिलेला आहे महाराष्ट्रातील 22 जिल्हयामध्ये कौटुंबिक न्यायालये स्थापन होणार आहेत. त्याबद्दल मी राज्य सरकारचे व केंद्र सरकारचे अभिनंदन करते. सन्माननीय मंत्री महोदयांनी ताकाचे उदाहरण दिलेले आहे, ताकाला जाऊन भांडे लपविण्याचे काहीही कारण नाही. केंद्र शासनाकडून पैसा येत असतांना महिला सक्षमीकरणाला मर्यादा राहू नयेत, हे आपले वरचे सभागृह आहे, महिलांच्या न्यायालयाचा जेव्हा विषय निघतो तेव्हा सर्व सदस्यांना चेव येतो. याचे मला कौतुक वाटते, येथे प्रबोधन करण्याची ही जागा नाही.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी जे ताकाचे उदाहरण दिले आहे, ते गांभीर्याने घेण्याची गरज नाही.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझ्या सारखी एखादी महिला जेव्हा असा विषय मांडते तेव्हा पुरुषांनी घाबरण्याचे काहीही कारण नाही, पुरुषांवर अन्याय होईल असे महाराष्ट्र सरकार काहीही करणार नाही, ज्या पुरुषांवर अन्याय झाला त्यांनी सुध्दा कौटुंबिक न्यायालयात जाण्यास काहीही हरकत नाही. पुरुष व महिला यांचा विचार केला तर महिलांनाच जास्त प्रमाणात त्रास होत असतो, याचा सुध्दा महाराष्ट्र सरकारने विचार करावा. मी जात, पोटगी, तांत्रिक व कस्टडी ऑफ चाईल्ड या संदर्भात विषय मांडलेले आहेत.

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

शासनाने या संदर्भात 22 जिल्हयाच्या ठिकाणी कौटुंबिक न्यायालये करण्याचा निर्णय घेतला आहे त्याची अंमलबजावणी केव्हापर्यंत होईल? त्यासाठी सहा महिने, वर्ष दोन वर्षाचा कालावधी दिला तर स्पष्ट होईल. म्हणून मी आपणास विनंती करते की, रेकॉर्डवर येण्यासाठी आणि आम्हाला माहिती होण्यासाठी आपण 22 जिल्हयांची नावे सांगितली तर बरे होईल. त्यानंतर मी माझा ठराव मागे घेईन.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, अहमदनगर, अकोला, अमरावती, बीड, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, धुळे, जळगाव, जालना, कोल्हापूर, लातूर, नाशिक, उस्मानाबाद, परभणी, रायगड, सांगली, सातारा, सोलापूर, ठाणे, वर्धा आणि यवतमाळ या 22 जिल्हयांच्या ठिकाणी न्यायालये सुरु करावयाची आहेत. यामध्ये एका न्यायालयाच्या पाठीमागे 25 पदे या प्रमाणे 525 पदे निर्माण करण्यात यावयाची असून त्यासाठी 7 कोटींचा निधी वित्त विभागाकडे मागितला आहे. त्याला वित्त विभागाची मंजूरी मिळाल्यानंतर पुढील वर्षीच्या अंदाजपत्रकामध्ये त्याबाबत तरतूद करण्यात येईल.

श्री. धोंडीराम राठोड : सभापती महोदय, न्याय प्रक्रियेमध्ये न्याय मिळण्यास उशीर होतो. आपण न्यायाधीशांची पदे रिक्त ठेवणार, पोलीस प्रॉसिक्युटरची पदे रिक्त ठेवणार. तरमग न्यायालयीन निकाल केव्हां लागणार? तो निकाल लवकर लागण्यासाठी आपण ही रिक्त पदे केव्हां भरणार आहात?

श्री. हसन मुश्रीफ : ही पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत उच्च न्यायालयाच्या नियंत्रणाखाली भरण्यात येतात. किती न्यायालयामध्ये ही पदे रिक्त आहेत याबाबतची माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी माझा ठराव मागे घेण्यासाठी सभागृहाची अनुमती मागते.

सभागृहाच्या अनुमतीने ठराव मागे घेण्यात आला.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: पर्यटनाच्या दृष्टीने कोकणचा सर्वांगीण विकास करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम तयार करणे

**मु.शी.**: पर्यटनाच्या दृष्टीने कोकणचा सर्वांगीण विकास करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम तयार करणे या विषयावरील श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांचा ठराव

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील ठराव मांडतो.

"कोकण विभागातील किनारपट्टीवरील जिल्हयात भरपूर प्रमाणात असलेली नैसर्गिक साधनसंपत्ती, दळणवळणाची साधने, अतिप्राचीन किल्ले, मंदिरे व समुद्र किनाऱ्यावरील चौपाटया या सर्व घटकांमुळे पर्यटन व्यवस्थापनास अनुकूल वातावरण असणे, तथापि पर्यटकांना तेथे पर्यटनाच्या दृष्टीने आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध होत नसल्याने पर्यटक येण्याचे कमी प्रमाण लक्षात घेता पर्यटनाच्या दृष्टीने कोकणचा सर्वांगीण विकास करण्यासाठी एक कालबध्द कार्यक्रम आखून त्यासाठी पुरेशी तरतूद अर्थसंकल्पात करण्यात यावी अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

सभापती महोदय, कोकणच्या किनारपट्टीला एक नैसर्गिक रम्य असा समुद्र किनारा लाभला आहे. हा किनारा विकसित करण्याकडे शासन दुर्लक्ष करीत आहे. विशेषत: कोकणातील रायगड जिल्हा मुंबईजवळ आहे. मुंबईतील पर्यटक रायगड जिल्हयात मोठया प्रमाणात येतात. परंतु त्याठिकाणी त्यांना पाहिजे असलेल्या सुविधा मिळत नाहीत. प्रामुख्याने त्यांच्याकरिता दळणवळणाची सोय, राहण्याकरिता चांगल्या प्रकारचे हॉटेल्स मिळाले पाहिजेत, किनाऱ्यावर आवश्यक असलेल्या सुखसोयी त्यांना मिळाल्या पाहिजेत. त्या दृष्टीकोनातून बाकीच्या राज्यांमध्ये विशेषत: केरळ किंवा राजस्थानमध्ये त्या राज्याचे पर्यटन खाते ज्या पध्दतीने काम करीत आहे ते पाहिले तर आपले राज्य याबाबतीत खूप मागे आहे असे मला वाटते. सभापती महोदय, मी गेल्या महिन्यात उदयपूरला गेलो होतो. त्याठिकाणी पर्यटन खात्याने आणि पुराण वस्तू संशोधन खात्याने संयुक्तरित्या पर्यटनाचा विकास बी.ओ.टी. तत्वावर केल्याचे बघितले आहे. आपल्याकडे निधीची कमतरता आहे. परंतु राज्याच्या अखत्यारीत असलेले पुराणवस्तू संशोधन खाते व पर्यटन खाते या दोघांनी एकत्र येऊन राज्यातील किल्ले व मंदिरे बी.ओ.टी. तत्वावर विकसित केली. आणि त्या ठिकाणी सवलती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील....

दिल्या, किल्ले पहाण्यासाठी देखील चार्जेस लावले तरी फार मोठया प्रमाणात पर्यटक त्याठिकाणी येतील.आपल्या कोकणपट्टीच्या किनाऱ्यावर जे किल्ले आहेत त्याठिकाणी ही व्यवस्था केली पाहिजे. यादृष्टीने मी राज्य सरकारला विनंती करतो की, राजस्थानच्या पर्यटन खात्याने व पुराण वस्तू संशोधन खात्याने त्या राज्यामध्ये ज्या पध्दतीने पर्यटनाचा विकास केला आहे याची आपण पहाणी करावी. आणि त्यादृष्टीने रायगड जिल्हयामध्ये मोठया प्रमाणात असलेल्या ऐतिहासिक स्थळांचा विकास करावा व त्याठिकाणी आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध कराव्यात. तसे केले तर या जिल्हयामध्ये निश्चितपणे जास्त प्रमाणात पर्यटक येतील.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (पुढे सुरु..

सभापती महोदय, रायगड किल्ल्यावर जाण्यासाठी अत्याधुनिक पध्दतीने रोपवेची व्यवस्था केलेली असल्यामुळे त्या ठिकाणच्या पर्यटकांच्या संख्येमध्ये वाढ झाल्याचे दिसते. मुंबईच्या दक्षिण भागातील बोरिवलीपर्यन्त जाईपर्यन्त मधे पर्यटनाच्या दृष्टीने काहीच सोय नाही. फक्त गिरगाव चौपाटी आणि जुहू चौपाटी आहे, दादर येथील चौपाटीला मर्यादा आहेत. त्या दृष्टीने आमच्या अलिबाग तालुका जवळ आहे. अलिबागला समुद्र किनारा लाभलेला आहे. त्या ठिकाणी स्पीड बोटीने 30 मिनिटामध्ये पोहोचू शकतो. त्या दृष्टीने मुंबईमध्ये आलेले परदेशी पर्यटक अलिबागच्या किनाऱ्याकडे कसे जातील, या दृष्टीने पर्यटनाला चालना देण्याची आवश्यकता आहे. मी अनेक वेळेला मागणी केलेली आहे की, त्या ठिकाणी टुरिझमला मान्यता दिलेली आहे, आज त्या ठिकाणचे शेतकरी शिक्षित आहेत, त्याच बरोबर सुशिक्षित बेकार तरुणही आहेत, त्यांना ठिकाणी व्यवसाय मिळेल. शहरातील लोकांना खेडयामध्ये रहाण्याचे आकर्षण असते. म्हणून त्या ठिकाणी टॉयलेटची, पिण्याच्या पाण्याची सोय सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहेत. मला वाटते की, या बाबीकडे एम.टी.डी.सी.ने पाहिल्या पाहिजेत. त्यांनी व्यवसायाच्या दृष्टीने विचार न करता जे कोणी व्यावसायिक पुढे येतील त्यांना खऱ्या अर्थाने मार्गदर्शन केले पाहिजे. परंतु याबाबतीमध्ये पर्यटन विभाग अपुरा पडतो असे मला वाटते. पर्यटन विकास महामंडळ आपण निर्माण केलेले आहे. परंतु हे महामंडळ आपली स्वत:ची प्रॉपर्टी सांभाळू शकत नाहीत. किमान महामंडळाने व्यवसाय न करता तेथे येणाऱ्या व्यावसायिकाला योग्य प्रकारचे मार्गदर्शन कसे करता येईल, हे पहाण्याची गरज आहे. परंतु त्या ठिकाणी सोयी-सुविधा करण्यासाठी शासन पातळीवरुन येणारे अडथळे कारणीभूत आहेत. या बाबीकडे पर्यटन विभागाने पाहिले पाहिजे, अशी या निमित्ताने माझी मागणी आहे. नागांवच्या समुद्र किनाऱ्याजवळील 5 कि.मी.इतकी जागा 15-20 वर्षापूर्वी एम.टी.डी.सी.ने ॲक्वायर केलेली आहे. त्या जागेवर आता गवत वाढलेले आहे. खरे तर त्या जागेवर मोठमोठी हॉटेल्स उभी राहू शकतील, ऑबेरायसारखे हॉटेल त्या ठिकाणी उभे राहू शकते. त्या जागेवर प्रत्यक्षात काहीच काम केलेले नाही. त्या ठिकाणी जंगल वाढविण्याचेच काम झालेले आहे. मुंबईपासून केवळ हाकेच्या अंतरावर अलिबाग आहे. त्या ठिकाणी सात-आठ, सुंदर किनारे आहेत. मांडवा, सासोने, थळ, रेवदंडा, काशिद, नागाव इ. ठिकाणी किनारे आहेत. त्या ठिकाणी मच्छिमारांच्या वस्ती देखील नाहीत. त्या ठिकाणी सुंदर किनारा आहे. परंतु त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची सुविधा

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ MAP/ SBT/ KGS/

श्री.जयंत प्र.पाटील (पुढे सुरु...

नसल्यामुळे मुंबईचे पर्यटक त्या ठिकाणी येण्यास कुचंबतात. काशिद, नागावचा किनारा पाहिला तर पर्यटक आकर्षित होतील.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP/ KGS/ MHM/ प्रथम श्री. किल्लेदार 11:30 वा.

श्री. जयंत प्र. पाटील ....

त्या ठिकाणी दळणवळणाची सोय नाही. त्या किनारपट्टीवर धूप प्रतिबंधक बंधारे नाहीत. त्या ठिकाणी जे पूर्णपणे प्लॅनिंग व्हावयास पाहिजे ते शासनाकडून होत नाही. त्या ठिकाणी जे किल्ले आहेत, जी मंदिरे आहेत त्यामध्ये रामेश्वर मंदिर हे प्रसिध्द मंदिर आहे. शासकीय निधी भरपूर आहे असे सांगितले जाते. केंद्र सरकारकून पैसे येतात असे सांगितले जाते. प्रत्यक्षात परदेशी पर्यटकांना आपण या किनारपट्टीवर आणू शकलो तर परदेशी चलन सुध्दा त्या ठिकाणी मिळू शकते. त्या ठिकाणी 8 नॉटीकल मैलावर एलिफंटा आहे. त्या ठिकाणी पाण्याची सोय नाही. त्या ठिकाणी वीज पुरवठ्याचा प्रश्न आहे. विदेशी पर्यटक त्या ठिकाणी येतात आणि सायंकाळी 6.00 वाजल्यानंतर ते त्या ठिकाणी राहू शकत नाहीत. या सभागृहामध्ये यासंदर्भात वेळोवेळी मागणी केली. त्या ठिकाणी त्या सोयी देऊ शकतो असे उत्तर सरकारकडून आले. केबलव्दारे त्या ठिकाणी वीज देऊ शकतो. अनेकवेळा बैठका झाल्या परंतु त्याबाबतीत जी गती द्यावयास पाहिजे ती दिली गेली नाही. ॲग्रिकल्चर टुरिझमच्या बाबतीत मी सांगितले. ज्याप्रमाणे आपण कृषी धंद्याला विजेच्या बाबतीत तसेच बँकेच्या कर्जाच्या बाबतीत सवलती देतो त्याप्रमाणे ॲग्रिकल्चर टुरिझममध्ये घरगुती जेवण, घरगुती पध्दतीने राहणे यासंदर्भात विचार केला पाहिजे. मी ठामपणे सांगू शकतो की, अलिबाग तालुक्यामध्ये दर शनिवारी-रविवारी 3 ते 4 हजार पर्यटक मुंबईवरुन येतात. ते घरगुती पध्दतीने लोकांच्या घरी राहतात. हे पर्यटक शुक्रवारी, शनिवारी येतात आणि रविवारी परत जातात. त्यामुळे त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर व्यवसाय होतो. परंतु पर्यटकांची अशी तक्रार असते की, त्या ठिकाणी टॉयलेटची, पाण्याची म्हणावी तशी सुविधा नाही. झोपण्याच्या बाबतीत त्यांची तक्रार नाही. ते म्हणतात की, आम्ही वाळूवर झोपू परंतु किमान त्या ठिकाणी टॉयलेटची तरी व्यवस्था झाली पाहिजे. ग्रामपंचायतीमार्फत आम्ही किनारपट्टीवर टॉयलेट बांधावयास गेलो तर सीआरझेडचा प्रश्न येतो. त्या ठिकाणी एखादी झोपडी किंवा टॉयलेट बांधावयास घेतले तर सीआरझेडचे लोक त्या ठिकाणी आडवे येतात. नियोजनबद्द कार्यक्रम तयार करुन या किनारपट्टीवर पर्यटक येण्याच्या दृष्टीकोनातून पर्यटन खाते कशा प्रकारे काम करीत आहे हे पाहण्याचे काम शासनाने केले पाहिजे. सिंधुदुर्गमध्ये सुध्दा पर्यटक आले पाहिजेत. या किनारपट्टीवर येणाऱ्या

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP/ KGS/ MHM

श्री. जयंत प्र. पाटील ......

पर्यटकांना दोन दिवसानंतर लगेच परत जावयाचे असते. ज्या ठिकाणी मार्केट उपलब्ध आहे त्या मार्केटमध्ये स्थानिक लोकांना रोजगार मिळू शकतो. त्या ठिकाणी येणारे छोटे उद्योजक असतील किंवा जे स्थानिक सुशिक्षित बेरोजगार त्या ठिकाणी व्यवसाय करण्यास तयार आहेत त्यांना प्रोत्साहन कसे देता येईल आणि सरकारी लालफितीमुळे होणारा त्रास कसा वाचवता येईल यादृष्टीने एक खिडकी योजना पर्यटन विभागामार्फत कशी सुरु करता येईल यादृष्टीने सर्व प्रयत्न केले पाहिजे. सभापती महोदय, खांदेरी, मुंदेरी आणि कुलाबा हे तीन किल्ले समुद्रामध्ये आहेत. सरखेल कान्होजी आंग्रे यांची अलिबाग ही राजधानी होती. या किल्ल्यांमधील गवत काढण्याची सुध्दा परवानगी आम्हाला नाही.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 11:35

(श्री. जयंत प्र. पाटील पुढे सुरु...)

पुराणवस्तु संशोधन खात्याच्या अंतर्गत राज्यातील जे किल्ले किंवा ऐतिहासिक स्थळे आहेत त्यांचे पर्यटनाच्या दृष्टीने सुशोभिकरण केले पाहिजे. मी आणि माजी आमदार श्रीमती मिनाक्षी पाटील आम्ही दोघांनी रायगड येथील कान्होजी आंग्रेच्या समाधीचे सुशोभिकरण करण्याचे काम हाती घेतले आहे. तीन वर्षापासून हे काम आम्ही हाती घेतले असून त्यावर आता पर्यन्त जवळ जवळ दीड कोटी रुपयाचा निधी वेगवेगळया माध्यमातून उपलब्ध करुन खर्च केलेला आहे. मला हे सांगावयाचे आहे की, जर प्रयत्न केला तर हे होऊ शकते. कान्होजी आंग्रेच्या समाधीच्या सुशोभिकरणाचे काम आता 15-20 दिवसामध्ये पूर्ण होईल. कान्होजी आंग्रे यांच्या मालकीचा परिसर हा नगरपालिकेकडे हस्तांतरित केलेला आहे. त्या ठिकाणी लाईट ॲण्ड साऊंड देखावा करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. ज्या प्रमाणे लाल किल्ला, अंदमानमधील सावकरांचे स्मारक याठिकाणी जसे सुशोभिकरण करण्यात आलेले आहे त्याप्रमाणे राज्यातील ऐतिहासिक स्थळांचे सुशोभिकरण करण्याची आवश्यकता आहे. कान्होजी आंग्रेचा इतिहास नवीन पिढीने वाचला पाहिजे, त्याचा अभ्यास केला पाहिजे या दृष्टीने देखील व्यवस्था झाली पाहिजे. एकंदरीत पर्यटनाला चालना मिळू शकेल अशा गोष्टी पर्यटन स्थळांच्या ठिकाणी झाल्या पाहिजेत. सभापती महोदय, मुरुड याठिकाणी कर्नाटकातील एका माणसाने प्रकृती हॉटेल काढलेले आहे. त्या हॉटेलमध्ये प्रति रुम 5 ते 8हजार रुपये भाडे आहे. इतके भाडे असून देखील त्याठिकाणी रुम उपलब्ध होत नाहीत. त्याठिकाणी अशा प्रकारचे हॉटेल उभे करुन त्याद्वारे स्थानिक 300 ते 400 लोकांना रोजगार देखील उपलब्ध झालेला आहे. सभापती महोदय, पर्यटन स्थळांच्या बाबतीत शासनाकडून चांगले काम होण्याची अपेक्षा आहे. जल वाहतूक ही देखील आधुनिक पध्दतीने कशी होईल हे देखील पाहिले पाहिजे. त्याबाबतीत एमआयडीसीने पुढकार घेतला पाहिजे. पर्यटन स्थळांच्या ठिकाणी देशी विदेशी पर्यटकांना कसे आकर्षित करता येईल या दृष्टीने राज्य शासनाकडून प्रयत्न व्हावेत आणि त्यासाठी निधीची उपलब्धता व्हावी या दृष्टीकोनातून मी हा ठराव या ठिकाणी मांडलेला आहे, एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

ठराव प्रस्तुत झाला.

---

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी एक अतिशय चांगला ठराव या ठिकाणी आणलेला आहे. सभापती महोदय, पर्यटनाच्या जाहिरांतीसाठी मंत्री मंडळाने 15 कोटी रुपयांची तरतूद केली होती. अशा प्रकारच्या चर्चेमुळे आमच्या सारख्या नवीन आमदारांना खूप समाधान वाटते. जनतेच्या हिताच्या काही गोष्टी होतात, असे वाटते. मी पर्यटनाच्या बाबतीत लक्षवेधी सूचना, नियम 93 अन्वये सूचना आणि अर्धा-तासाची सूचना दिलेली असताना ही तिन्ही आयुधे अमान्य करण्यात आली.

**तालिका सभापती** : माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचना, नियम 93 अन्वयेची सूचना दिल्यानंतर ती स्वीकृत करावी की अस्वीकृत करावी हा माननीय सभापतींचा अधिकार आहे. तेव्हा माननीय सदस्यांनी कृपा करुन त्यासंदर्भात भाष्य करु नये. माननीय सदस्यांनी ठरावाचा जो विषय आहे त्यावर बोलावे.

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, हा विषय इतका महत्वाचा आहे म्हणून मी या गोष्टीचा उल्लेख केला. आपण जे म्हणाला ते मी नाकारीत नाही. सभागृहात लोकप्रतिनिधींनी एखादा प्रश्न मांडला की त्या गोष्टीची चर्चा होते. सभापती महोदय, मंत्रिमंडळाने 15 कोटी रु. पर्यटन विकासासाठी जाहिरात खर्च म्हणून मंजूर केले होते. प्रत्यक्षात अर्थसंकल्पामध्ये नोकरशहांनी केवळ 3 कोटी रुपयांची तरतूद केली आणि त्यातील फक्त 50 लाख रु. जाहिरातींसाठी दिले. केरळ राज्य पर्यटनासाठी 100 कोटी रु. खर्च करते. जाहिरातीमुळे पर्यटक तेथे जातात. इतर राज्यांच्या तुलनेने आपल्या राज्यात पर्यटनस्थळांची जाहिरात न केल्यामुळे दिवसेंदिवस देशी आणि परदेशी पर्यटकांची संख्या कमी होत आहे. राज्यामध्ये पर्यटन विकास करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. ऐतिहासिक वास्तूस्थळांचे जतन करणे,लोककला आणि हस्तकला यांचा वारसा जपणे त्याचप्रमाणे पर्यटनाच्या माध्यमातून रोजगार निर्मिती अशी उद्दिष्टे ठरविण्यात आली आहेत. नवनवीन किल्ले तसेच मोगलकालीन इतिहास हा लाईट शोच्या माध्यमातून दाखविला गेला पाहिजे. पर्यटन खात्यामध्ये कल्पनेचे दारिद्रय आहे. रायगड किल्ला म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास आहे. हा इतिहास 1/2 तासांचा शो करुन पर्यटकांना दाखविला पाहिजे. शिवाजी महाराज हा एकमेव राजा असा होता की ज्याने कधीही जातीभेद मानला नाही. स्त्री,पुरुष,साधू-संत अशा प्रकारे समाजातील प्रत्येक घटकाला स्थान दिले आणि त्याचा सन्मान केला. अतिशय चांगल्या प्रकारचे राज्य केले. लोक रायगड किल्ल्यावर जातात तेव्हा तेथे बिअर आणि दारुच्या बाटल्या जमा कराव्या लागतात. या पर्यटन स्थळांकडे नीटपणाने पाहिले जात नाही. शिवराज्याभिषेकाचे चित्र दाखविले गेले पाहिजे. पर्यटकांना आकर्षित करावयाचे असेल तर अशा महापुरुषांची चरित्रे दाखविणे अत्यावश्यक आहे. सभापती महोदय, मुंबई जवळ असलेल्या घारापुरी पर्यटन स्थळाला दरवर्षी 10 लाख पर्यटक भेट देत असतात. परंतु आजही तेथे वीज नाही,शौचालये नाहीत. 29.11.1999 रोजी इंटेक संस्थेने एलीफंटा विकासाकरिता कार्यक्रम आयोजित केला होता. या पर्यटन स्थळाच्या विकासाकरिता या संस्थेने काही कोटी रुपये गोळा केले होते. त्यांना असे वाटले की घारापुरी लेणी हे अतिशय चांगले पर्यटन स्थळ आहे आणि त्याचा विकास झाला पाहिजे . यासाठी काही कोटी रुपये जमा करण्यात आले परंतु त्यील 1 टक्का रक्कम सुध्दा खर्च झालेली नाही. शासनाकडे जर पैसे नसतील तर ज्या संस्था या लेण्यांच्या विकासासाठी पुढे येत असतील त्यांना मदत केली पाहिजे. पर्यटनस्थळे विकसित झाली पाहिजेत.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

19-04-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) O-2

SSK/ MAP/ SBT/ श्री. शिगम नंतर 11:40

श्री. मधुकर चव्हाण ....

आज पर्यटनाच्या क्षेत्रामध्ये गोवा आणि राजस्थान ही राज्ये आघाडीवर आहेत. महाराष्ट्रामध्ये अनेक ठिकाणे रम्य अशी आहेत. कोकणामध्ये तर अशी अनेक ठिकाणे आहेत. माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी त्यासंबंधीचा उल्लेख केला आहे. कोकणाला परमेश्वराने भरभरुन दिले आहे. कोकणात आंबा,काजू,कोकण,फणस,चिकू,नारळ अशा प्रकारची जवळजवळ 300-350 जातींची झाडे आहेत. पर्यटक येथे मोठया संख्येने येतात. पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी अनेक प्रकारच्या योजना सुरु झाल्या पाहिजेत. उदाहरण द्यावयाचे झाले तर कोकणामध्ये सर्वात मॉर्डन तालुका कोणता म्हटला तर गुहागर तालुक्याचे उदाहरण देता येईल. गुहागरला अप्रतिम असा सुंदर समुद्र किनारा आहे. स्वच्छ असे पाणी आहे. या समुद्र किनाऱ्यावर 2 फूट पाण्यात उभे राहिले तर खालची वाळू दिसते इतका स्वच्छ आणि सुंदर असा हा समुद्र किनारा आहे. रामेश्वरला अशा प्रकारचे चित्र आपल्याला दिसते.

नंतर भारवि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण...

गुहागर तालुक्यातील हेदवी, वेळणेश्वर, गुहागरची चौपाटी, अंजनवेलचा गोपाळगड इत्यादी गावे तर पर्यटकांना हमखास आकर्षीत करणारी नयनरम्य ठिकाणे आहेत. येथे पर्यटकांना आकृष्ट करण्यासाठी उद्योग उभे करू शकतो. मोटेल्स उभे करता येऊ शकतील. पर्यटक हा निसर्गप्रेमी असतो. त्याला अत्याधुनिक सुखसोयी उपलब्ध करून देणे गरजे आहे. सध्या कोकणात शेती किफायतशीर नाही. शेकडो एकर जमीन पडून आहे. आर्थिकदृष्टया हा भाग मागासलेला आहे. अशावेळी गुहागर तालुका एक उत्कृष्ट पर्यटन केंद्र बनू शकतो. पर्यटनाच्या दृष्टीने गुहागर हा तालुका अत्यंत फायदेशीर असून देशभरातून या तालुक्यास भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून पर्यटकांच्या सुखसोयींमध्ये वाढ करणे जरूरीचे आहे. तसेच पर्यटकांना पुरेशी माहिती मिळण्यासाठी माहिती फलक, रहण्या-जेवण्याची सोय, दळणवळणाची साधने, देशी-विदेशी पर्यटकांकरिता इंटरनेटची व्यवस्था, समुद्र किनाऱ्यावर बोटींग, पॅराग्लाईडींग, लोककलावंतांकडून मनोरंजनपर सांस्कृतिक कार्यक्रम अशा विविध करमणुकीच्या सोयी पर्यटकांकरिता शासनाने करून दिल्यास स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध होऊ शकतो. रत्नागिरी जिल्हयामध्ये चिपळूण, संगमेश्वर, गुहागर या तालुक्यांना सुंदर असा समुद्र किनारा लाभला आहे. असे जरी असले तरी आज शासन पर्यटनावर अर्धा टक्केसुध्दा निधी खर्च करीत नाही. तेव्हा येथे ज्या सूचना करण्यात आलेल्या आहेत, त्याचा विचार करून शासनाने कार्यवाही केली तर कोकणपट्टीचा चांगला विकास होईल. धन्यवाद.

...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत (नामनियुक्त) : सभापती सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी जो अशासकीय ठराव मांडला आहे, त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. योग्य वेळी हा ठराव सभागृहासमोर आलेला आहे. आज सभागृहामध्ये कोकणासंबंधीच्या प्रस्तावावर चर्चा होणार आहे. म्हणूनच हा ठराव योग्य वेळी आला असे म्हटले आहे. भारत आज आर्थिक क्रांतीवर उभा आहे. त्यातून कोकण वंचित राहू नये असे आम्हाला वाटते. निसर्गरम्य सौंदर्य हे कोकणाला वरदान आहे. त्यामुळे कोकणाचा पर्यटनाच्या माध्यमातून विकास झाला पाहिजे. कोकण म्हणजे सिंधुदुर्ग जिल्हा असे कृपा करून कोणी समजू नये. आज कोकणाला 720 कि.मी.लांबीचा विस्तीर्ण समुद्र किनारा लाभला आहे. याकडे दुर्लक्ष करता कामा नये. आज कोकणात जवळ जवळ पर्यटक हे मुंबईतून येतात. गोवा हे जागतिक पर्यटन स्थळ झाले आहे. मुंबई आणि गोव्यालासुध्दा किनारपट्टी लाभली आहे. ती विकसित करण्यासाठी फार मोठी संधी आहे. ते काम शासनाकडून चालू आहे. अजूनही त्याचा सर्वांगीण विकास झाल्याचे दिसून येत नाही. त्याकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे. टाटा कन्सलटींग रिपोर्टमध्ये कोकणातील पर्यटनाचा विकास झाला पाहिजे असे नमूद केले आहे. तेव्हा पर्यटनाचा विकास करत असताना आपण कुठे चुकीचे पाऊल टाकत आहोत का ? याचा देखील विचार केला पाहिजे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत....

गोव्यासारखे टुरिझम आपल्याला करावयाचे आहे काय की, वेगळे काही करावयाचे आहे ? माझी सूचना अशी आहे की, ग्रामीण पर्यटनाचा विकास होणे आवश्यक आहे. केंद्र सरकारने ग्रामीण पर्यटनाचा कार्यक्रम हाती घेतला आहे. हिमाचल प्रदेशातील 110 ग्रामीण पर्यटन स्थळांचा त्यामध्ये समावेश झालेला आहे. प्रत्येक स्थळाला 50 लाख रुपये केंद्र सरकारने विकासासाठी दिले आहेत. परंतु दुर्दैवाने महाराष्ट्रात एकाही ग्रामीण पर्यटन स्थळाची शिफारस एम.टी.डी.सी. ने केली नाही. आपली संस्कृती ही आपली शक्ती आहे हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे. म्हणून सांस्कृतिक पर्यटनावर आपण जास्तीत जास्त भर दिला पाहिजे.

महोदय, स्व.इंदिरा गांधी यांनी सी.आर.झेड. कायदा आणला. हा कायदा आणत असताना त्यांनी मोठा दृष्टिकोन समोर ठेवला होता. सी.आर.झेड. कायदा कोकणाला वरदान ठरलेला आहे. या कायद्याचा त्रास सामान्य नागरिकांना होत नाही असे नाही. परंतु या कायद्यामुळे किनारपट्टीचे संरक्षण झाले आहे. हा कायदा अस्तित्वात आला नसता तर मुंबई शेजारची किनारपट्टी उध्वस्त झ ाली असती आणि पाणी प्रदूषित होऊन मच्छिमार देशोधडीला लागले असते. त्यामुळे मुंबईच्या शेजारील आणि सिंधदुर्ग-गोव्याच्या शेजारील जी किनारपट्टीलगतची गावे आहेत त्यांचा समावेश केंद्राच्या ग्रामीण पर्यटन कार्यक्रमामध्ये करुन, जो निधी आपसुकच मिळतो आहे तो घेतला पाहिजे.

महोदय, आज पर्यटन विषयावर बोलत असताना, मुळात पर्यटकांना राहण्यासाठी जागा उपलब्ध नाही. परंतु तरीही आपण पर्यटन-पर्यटन असे बोलत राहतो. आज पर्यटन कोठे आहे ? फाईव्ह स्टार हॉटेल्स होतील तेव्हा होतील. परंतु "स्टे विथ इंडियन फॅमिली कन्सेप्ट" या कार्यक्रमाची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. आपल्या घरातून पर्यटकांच्या राहण्याची व्यवस्था होणे आवश्यक आहे. यासाठी शासनाने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. महोदय, आम्ही "नुरी-भोगे" हे गाव पर्यटन म्हणून जाहीर केले आहे. या ठिकाणी प्रत्येक व्यक्ती स्वत:च्या घरात पर्यटकांसाठी राहण्याची सोय करीत आहे. त्यामुळे अशा गावांमध्ये कम्युनिटी सेंटर, स्विमींगपूल, क्राफ्ट सेंटर, इंटेग्रिटी कार्यक्रम इ.सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. असे केले तर पर्यटकांची राहण्याची व्यवस्था सुटेल. त्यासाठी प्रायव्हेट सेक्टर आणि स्थानिक नागरिकांच्या सहभागाची आवश्यकता आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत....

महोदय, तिसरा मुद्दा हा मार्केटिंग बाबतचा आहे. एम.टी.डी.सी. ने गोव्याकडे लक्ष केंद्रीत केले पाहिजे. कारण असे केल्यास, गोव्यातील पर्यटकांचा लोंढा प्रचंड प्रमाणावर सिंधुदुर्गात येऊ शकतो.

महोदय, गोवा आणि सिंधुंदुर्ग यामध्ये मोठा फरक आहे. गोवा आणि दिव-दमण या भागातून जे मद्य आपल्याकडे येते त्यावर आळा घालण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी सरकारने ठोस प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यामुळे पर्यटनाच्या दृष्टिकोनातून सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये मद्यावरील कराचा वेगळा दर ठेवण्याची आवश्यकता आहे आणि तशा प्रकारचे शासनाने धोरण आखले पाहिजे.

तसेच सहयाद्री ॲडव्हेंटेज स्पोर्टसाठी जागा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. आंबोली च्या विकासासाठी कोकण पॅकेजमधून पैसा देण्याचे जाहीर केले. परंतु दोन वर्षे झाली तरीही तो पैसा तसाच पडून आहे. आयुर्वेद कॉलेजसाठी दिलेला पैसा सुध्दा पोहोचलेला नाही. सावंतवाडीच्या राजवाडयासाठी जो पैसा दिला होता तोही पोहोचला नाही. यामध्ये काय राजकारण आहे ? हे माननीय मंत्री महोदयांनी पहावे. त्यामुळे या कामांना लवकरात लवकर निधी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. आंबा-काजू हे कोकणाचे ॲम्बेसेडर आहे. आंबा महोत्सवच्या दृष्टिकोनातून सुध्दा चांगल्या प्रकारचे काम करण्याची आवश्यकता आहे.

महोदय, हेरिटेज च्या संदर्भात किल्ले-गड यांच्यावर सुध्दा लक्ष केंद्रीत करण्याची आवश्यकता आहे.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत ....

सभापती महोदय, प्रत्येक विभाग हात झटकून मोकळा होतो. सिंधुदुर्ग किल्ला हा छत्रपती शिवाजी महाराजांचा किल्ला आहे. आज त्या किल्ल्याची अवस्था काय आहे याकडे लक्ष देण्याची गरज आहे. ते मोठे पर्यटन स्थळ आहे. त्याची डेव्हलपमेंट केले पाहिजे व त्यासाठी नवीन प्लॅन आखला पाहिजे. सभापती महोदय, त्या संदर्भात कन्सल्टन्सी नेमण्याची गरज आहे. फक्त पैसे देऊन इंजिनिअर आणि पी.डब्ल्यू.डी. खाते काहीही करु शकत नाही. सभापती महोदय, दुसरी एक महत्वाची गोष्ट म्हणजे, दख्खन ओडीसी ही लक्झरी गाडी सर्व ठिकाणी जाते, परंतु सावंतवाडीतील राजवाड्याला जात नाही. सावंतवाडी हेरिटेज स्थळ आहे. तरी, ती गाडी राजवाड्यापर्यंत गेली पाहिजे. सभापती महोदय, ओडीसी दख्खनला आकर्षक कार्यक्रम केले पाहिजेत. पर्यटनाला गतिमान करण्याची गरज आहे. सभापती महोदय, केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात पर्यटनासंबंधीच्या गोष्टी होऊ शकतात. या संदर्भात महाराष्ट्र शासनाने पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे, एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

----

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी ( औरंगाबाद विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मला फक्त दोन स्पेसिफक प्रश्न मांडावयाचे आहेत. कोकणामध्ये पर्यटनासाठी आवश्यक असलेला काही हजार कोटींचा इंटिग्रेटेड कॉम्प्रॅहेन्सिव्ह प्लॅन तयार केला आहे का ? त्याचप्रमाणे बेसिक इन्फ्रास्ट्रक्चर म्हणजे रोड, वीज, पाणी याकरिता दोन ते अडीच हजार कोटी रुपये लागणार आहेत, त्या विषयी सरकारचे काही नियोजन केले आहे का ? त्याचप्रमाणे गव्हर्नमेंट सेक्टरमध्ये किती कॅपिटल इन्व्हेस्टमेंट होणार आहे ? व प्रायव्हेट सेक्टरमध्ये पार्टिसिपेटींग वाढावे म्हणून आपण कोणत्या इनसेंटिव्हज् देणार आहात ? त्याचप्रमाणे हे हजार कोटी रुपये किती वर्षामध्ये कोकणाला देण्यात येणार आहेत ? याचे माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर द्यावे.

----

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी कोकणातील पर्यटनासंदर्भात प्रस्ताव मांडलेला आहे. सभापती महोदय, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी या ठिकाणच्या किनारपट्टीच्या निसर्गसौंदर्याबाबत शासन उदासीन झालेले आहे. इतर राज्यांमध्ये ज्याप्रमाणे पयर्टनाच्या संदर्भात प्रचंड प्रमाणात कार्यक्रम राबविले जातात, त्याप्रमाणे आपल्या राज्यात राबविले जात नाहीत. या निमित्ताने पर्यटन विभागाचे ऑडीट करण्याची वेळ आलेली आहे. या विभागामध्ये असणाऱ्या मंडळींमध्ये सौंदर्यदृष्टीचा अभाव असावा . पर्यटनासाठी ज्या उत्कृष्ठ योजना लागतात, त्यासंबंधीच्या कल्पकतेचा त्यांच्यामध्ये अभाव असल्याचे यावरुन दिसत आहे. सभापती महोदय, आम्ही आमच्या अनुसूचित जाती कल्याण समितीबरोबर जम्मू-काश्मिरला गेलो असताना गुलमर्गला गेलो होतो. सभापती महोदय, त्या ठिकाणी पायथ्यापासून वरपर्यंत रोप-वेची व्यवस्था केलेली आहे. सभापती महोदय, अलिबागमध्ये समुद्राला ओहोटी असेल तर पायी जातात आणि भरती असेल तर तेथील रस्ता बंद होतो.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे...

अनेक लोक मृत्यूमुखी पडलेले आहेत. तेव्हा जमिनीपासून किल्ल्यावर जाण्यासाठी रोप वे ची व्यवस्था जर पर्यटकांसाठी अलिबाग येथे केली तर तेथे पर्यटकांची संख्या मोठया प्रमाणात वाढू शकते. मी संसदेचा सदस्य असतांना अंदमान व निकोबार येथे आम्ही गेलो होतो. तेथे सेल्युलर जेल आहे. तेथे वीर सावरकर यांना ठेवण्यात आले होते. तेथे व दिल्लीच्या लाल किल्ल्यामध्ये जो लाईट अँड साऊंडच्या कार्यक्रम दाखविण्यात येतो तो अत्यंत सुंदर आहे. तशाच प्रकारे गोव्यामध्ये कार्निव्हलचा कार्यक्रम होतो. तो कार्यक्रम पाहण्यासाठी लाखो लोक तेथे जातात. अशा प्रकारच्या सुविधा व कार्निव्हल सारखे फेस्टीवल जर आपण कोकणामध्ये केले तर पर्यटकांची मोठया प्रमाणात त्या ठिकाणी रिघ लागेल असे मला वाटते. पर्यटनाच्या माध्यमातून जास्तीत जास्त स्थानिक लोकांना तेथे मोठया प्रमाणात रोजगार उपलब्ध होऊ शकेल. पर्यटनस्थळांची जाहिरात करण्याच्या बाबतीत महाराष्ट्रापेक्षा अनेक राज्य पुढे गेलेली आहेत. केरळ, कर्नाटक, आंध्रप्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेश अलिकडेच निर्माण झालेले नवीन राज्ये त्यामध्ये छत्तीसगड, उत्तरांचल, झारखंड ही राज्य पर्यटनाच्या संदर्भात पुढारलेली आहेत. त्या तुलनेत महाराष्ट्र राज्य अत्यंत मागे राहिलेले आहे. इतर राज्य पर्यटन स्थळांच्या जाहिराती इलेक्ट्रानिक मीडयामार्फत मोठया प्रमाणात करतात. परंतु महाराष्ट्राची एकही जाहिरात इलेक्ट्रानिक मीडिमार्फत करण्यात येत नाही. आसाम, नागालँड, अरुणाचल प्रदेश या राज्यांच्या अनेक प्रकारच्या जाहिराती हया इलेक्ट्रानिक मीडियामार्फत करण्यात येत आहेत. विमानामध्ये प्रवासात जे मॅगेझिन देण्यात येतात, त्यामध्ये इतर राज्यांच्या पर्यटन स्थळांची जाहिरात असते परंतु महाराष्ट्रातील पर्यटन स्थळांची जाहिरात कधीही दिसत नाही. रत्नागिरीचा समुद्र किनारा हा प्रचंड मोठा असा आहे, तेथे नैसर्गिक वातावरण चांगले आहे, मुंबईच्या जुहू बीचवर ज्याप्रमाणे आवश्यक सोईसुविधांची व्यवस्था करण्यात आलेली आहे त्याचप्रमाणे रत्नागिरीच्या समुद्र किनाऱ्यावर जर व्यवस्था केली तर मोठया प्रमाणात पर्यटकांची संख्या तेथे वाढेल. पर्यटन स्थळांच्या संदर्भात रस्ते, वीज, पाणी, निवास व्यवस्था आणि इतर पायाभूत सोईसुविधा जर वाजवी दरामध्ये निर्माण करण्यात आल्या तर श्रीमंत लोक ज्याप्रमाणे निसर्गाचा आनंद उपभोगत आहेत त्याप्रामणे सर्वसामान्य माणसाला या पर्यटनस्थळांचा आनंद लुटता येईल. कोकणातील परिसर व निसर्ग सौदर्य पाहता जगामधील पर्यटनस्थळांमध्ये कोकणाचे नाव झ ाळकेल,या दृष्टीकोनातून शासनाने कोकणाचा विचार करावा एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

-------

...2

19-04-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) S-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक): सभापती महोदय, पर्यटनाच्या दृष्टीकोनातून कोकणाचा विकास व्हावा यासाठी अर्थसंकल्पामध्ये पुरेशी तरतूद करण्यात यावी अशा प्रकारचा ठराव सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी मांडलेला आहे, त्याला पाठींबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी येथे एक-दोनच मुद्दे मांडणार आहे. या ठिकाणी आर्थिक बाबीची अडचण असली तरी शासनाकडे जर प्रबळ इच्छाशक्ती असेल तर ती अडचण नक्कीच दूर होऊ शकते. खऱ्या अर्थाने कोकणाचा विकास करावयाचा असेल तर कोकणाला जो 720 किलोमीटरचा समुद्र किनारा लाभलेला आहे, त्याचा विकास झाला तर आपोआपच पर्यटनस्थळांचा विकास व त्यामाध्यमातून कोकणाचा विकास होईल, अशा प्रकारचे अनेक विषय व अनेक मुद्दे सभापती महोदय आपण सुध्दा मांडलेले आहेत.

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते...

त्यामुळे शासनाने आपली प्रबळ इच्छा दाखवावी आणि कोकणच्या किनारपट्टीचा पर्यटनाच्या विकासाच्या दृष्टीने काही तरी धोरणात्मक निर्णय घ्यावा.

सभापती महोदय, दुसरा महत्वाचा मुद्दा असा की, कोकण किनारपट्टीवर पर्यटनाच्या विकासाच्या संदर्भात प्रामुख्याने सी.आर. झेड.ची अडचण येते. माझ्या माहितीप्रमाणे या संदर्भात केंद्र सरकारचा कायदा असल्यामुळे त्या कायद्यातील तरतुदींची अडचण येत असते. त्यामुळे शासनाची त्या भागातील पर्यटनाचा विकास करण्यासाठी सोयी-सवलती व सुविधा उपलब्ध करुन देण्याची इच्छा असली तरीदेखील शासन ती कामे करु शकत नाही. या संदर्भात गोवा आणि केरळ या दोन राज्यांनी पर्यटनाचा विकास करतांना केंद्र सरकारच्या सी.आर. झेड. च्या कायद्यामधून सूट घेतली आहे, तशाप्रकारची सूट आपल्या राज्य सरकारने देखील मिळविली पाहिजे. मागील वर्षी एप्रिल 2005 मध्ये राज्याचे माननीय उपमुख्यमंत्री आदरणीय आबा साहेब हे स्वत: कोकणामध्ये आले होते. त्यावेळी त्यांनी कोकणातील पर्यटनाच्या विकासाच्या दृष्टीकोनातून सी.आर.झेड. कायद्याच्या येत असलेल्या अडचणीमधून सूट मिळविण्याचा प्रयत्न करु असे आश्वासन दिले होते. त्या दृष्टीकोनातून शासनाकडून केंद्र शासनाकडे पाठपुरावा होण्याची आवश्यकता आहे. अशाप्रकारचे दोन मुद्दे मांडून माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी मांडलेल्या ठरावाला पाठींबा देऊन माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे (रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी याठिकाणी अशासकीय ठरावाच्या माध्यमातून चर्चा उपस्थित केली आहे. त्या संदर्भात माननीय पर्यटन राज्यमंत्र्यांना विनंती करतो की, त्यांनी आपल्या मंत्रिपदाच्या कालखंडामध्ये कोकणातील पर्यटन स्थळांना भेट द्यावी व त्यांची अवस्था पाहून त्यामध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न करावा. पर्यटनाच्या माध्यमातून कोकणातील बेरोजगारांना नोकऱ्या मिळाल्या पाहिजेत. त्या दृष्टीने पर्यटनाचा विकास झाला तर मोठया प्रमाणामध्ये उद्योगधंदे त्या परिसरामध्ये येतील. त्याचप्रमाणे कोकणातील स्थानिक वस्तूंना देखील बाजारपेठ मिळेल. आणि त्यामधून कोकणाची झालेली दुरावस्था दूर होईल. सभापती महोदय, गेट ऑफ इंडिया येथून आपल्याला अलिबाग, रेवस, मांडवा , उरण , दीघी व श्रीवर्धन या ठिकाणी सागरी मार्गाने जाता येते. परंतु या अस्तित्वात असलेल्या सागरी महामार्गाचा विकास करण्याची आवश्यकता आहे, तो विचार आपण अजूनपर्यंत केलेला नाही. रायगड जिल्हयामध्ये रस्त्याने जाण्यासाठी अडीच तास लागतात, आणि सागरी महामार्गाने आपल्याला तासाभरामध्ये जाता येते.

सभापती महोदय, वसई येथे चिमाजी अप्पा यांचा किल्ला आहे, त्या किल्ल्यामध्ये गवत वाढले आहे ते सुध्दा काढून टाकले जात नाही. अशाप्रकारचे अनेक किल्ले दुर्लक्षित आहेत त्याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. आपण कोकणासाठी ओडीसी ही ट्रेन सुरु केली, तिचे पुढे काय झ ाले माहीत नाही? आपण मोठया प्रमाणात पैसे खर्च करुन प्रकल्प तयार करण्यापूर्वी स्थानिक लोकांना विश्वासात घेतले नाही. सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषणा झाली. त्यासाठी सागरी महामंडळ स्थापन करण्यात आले परंतु त्यासाठी व्यवस्थापक नेमला नाही, त्यासाठी कार्यालय स्थापन केले नाही. केवळ युती सरकारने सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून जाहीर केल्यामुळे आपण त्याकडे दुर्लक्ष करणे योग्य नाही. सभापती महोदय, कोकणातील विकासाच्या प्रस्तावावर मी विस्तृतपणे बोलणार आहे. 720 किलोमीटरचा फार मोठा समुद्र किनारा लाभलेला डहाणूपासून सिंधुदुर्गपर्यंतचा हा भाग आहे . त्याठिकाणी असलेल्या बंदरांची अवस्था अतिशय वाईट आहे. युती सरकारच्या काळात बंदरांचा विकास करण्यासाठी एक धडक योजना हाती घेण्यात आली होती. त्यामध्ये 14 बंदरांचा विकास करण्याची योजना तयार करण्यात आली होती. त्यापैकी किती बंदरांचा विकास करण्यात आला आहे? आज त्या ठिकाणी मालवाहू बंदरे झाली पाहिजेत,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे...

लोकांना ने-आण करणारी बंदरे झाली पाहिजेत अशाप्रकारची विनंती या ठरावाच्या माध्यमातून करतो आणि माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी मांडलेल्या ठरावाला पाठिंबा देऊन माझे भाषण संपवितो.

---

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे ( विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, सन्मानीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी पर्यटनाच्या माध्यमातून कोकणचा विकास करण्याच्या संबंधात जो ठराव मांडलेला आहे, त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभी आहे. खरे म्हणजे कोकणाच्या विकासाच्यादृष्टीने अनेक गाष्टी सांगता येतील.शासनाने कोकणाच्या विकासासाठी वेगळा आराखडा तयार केलेला आहे काय ? असा प्रश्न आहे. त्या ठिकाणची जी काही बलस्थाने आहेत, त्या ठिकाणी काही वैगुण्य असेल तर त्यावर मात करुन, त्याबाबत धोरण आखणे, प्लॅन तयार करणे या गोष्टी होणे आवश्यक आहे. परंतु तसा आराखडा केलेला नाही. असे सांगितले जाते की, जिल्हा नियोजन मंडळाने 5 ते 10 टक्के रक्कम वाढवून त्यांच्यामार्फत त्या ठिकाणी योजना राबविल्या जातात असे सांगितले जाते. पंरतु प्रत्यक्षात त्या ठिकाणी काही दिसत नाही. कोकणचा गोवा होऊ शकलेले नाही, केरळ होऊ शकलेले नाही. कोकणच्या किनाऱ्याचा विकास करुन मुंबईतील पर्यटकांना किंवा परदेशी पर्यटकांना आकर्षित करण्याच्या दृष्टीने काही सोयी-सुविधा उपलब्ध करुन देणे जरुरीचे आहे. पर्यटनाच्या दृष्टीने सिंधुदूर्ग सारखा जिल्हा आहे, त्या ठिकाणी पर्यटक भरपूर येतील. पर्यटनाच्या दृष्टीने त्या ठिकाणी हॉटेल्सची व्यवस्था केली पाहिजे. त्या ठिकाणी मूलभूत रस्त्यांची, पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करुन दिली पाहिजे. व्यावसायिकांना या सुविधा दिल्या तर गोव्या ऐवजी सिंधुदूर्ग जिल्ह्यामध्ये पर्यटक आकर्षित होतील, याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. कोकणामध्ये तांत्रिक शिक्षणावर भर दिला पाहिजे, तसेच आरोग्याच्या सुविधा दिल्या पाहिजेत. कोकणामध्ये सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलझाले पाहिजे तसेच वैद्यकीय, महाविद्यालये सुरु झाली पाहिजेत. कोकणाचा विकास करण्यासाठी एखादी समिती नेमावी, त्यामध्ये राजकारणी, तज्ज्ञ,शास्त्रज्ञ असतील तर त्यांचा त्या समितीमध्ये समावेश करावा. एवढे बोलून माझे दोन शब्द संपविते. धन्यवाद.

--

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MAP/

**<u>औचित्याच्या मुद्याबाबत</u>**

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, मला औचित्याच्या मुद्याद्वारे विनंती करावयाची आहे. अतिशय महत्वाची चर्चा उपस्थित केलेली आहे. प्रोसिजरप्रमाणे बॅलेट द्वारा अशासकीय ठराव चर्चेला आलेला आहे. मला विनंती करावयाची आहे. पुढे कोकणाच्या विषयाची चर्चा आहे, त्यामध्येच हा कोकणातील पर्यटनाच्या विषयाचा समावेश केला असता तेवढा सभागृहाचा वेळ वाचला असता. बऱ्याच वेळा असे होते की, एकाच विषयावर 93 ची सूचना चर्चेला असते आणि पुढे त्याच विषयावर लक्षवेधी सूचनाही असते. अशा विषयाच्या संबंधाने एकत्र चर्चेला कसे येतील या दृष्टीने विचार करावा अशी विनंती आहे.

---

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सुरेश शेट्टी ( राज्य मंत्री - पर्यटन विभाग ): सभापति महोदय, सर्वप्रथम मैं माननीय सदस्य श्री जयंत पाटील जी का अभिनंदन करना चाहता हूं, उन्होंने कोकण क्षेत्र में पर्यटन के विकास के संबंध में एक महत्वपूर्ण अशासकीय ठराव पेश किया है. इस ठराव के माध्यम से यहां अच्छी चर्चा हुई है. पर्यटन विकास के संबंध में आठ सम्माननीय सदस्यों ने अपने विचार व्यक्त किए हैं. मैं सभी सम्माननीय सदस्यों को यह बताना चाहता हूं कि, पिछले कई सालों से कोकण में पर्यटन के विकास के बारे में जो काम हुए हैं, वे कोई कम नहीं हुए है. पर्यटन विकास के संबंध में बहुत काम हुए है. यह बात सही है कि, जिस तरह से गोवा, केरल, और राजस्थान जैसे राज्यों ने पर्यटन के क्षेत्र में तरक्की की है, उस तरह से, उस तेजी से महाराष्ट्र में पर्यटन के विकास के संबंध में तरक्की नहीं हुई है. उसका कारण यह है कि इससे पहले हम महाराष्ट्र में पर्यटन के विकास के संबंध में कम दिलचस्पी लेते थे. क्योंकि महाराष्ट्र में मुंबई है और मुंबई में सदियों से बिना पब्लिसिटी किए बड़ी संख्या में लोग आते थे. हिन्दुस्तान से ही नहीं बल्कि विश्व से लोग मुंबई देखने के लिए आते थे. अगर किसी व्यक्ति से पूछा जाए कि आप हिन्दुस्तान में किस शहर में जाना चाहते हो तो वह मुंबई का ही नाम लेगा. तो इस तरह से मुंबई में इस देश के ही नहीं बल्कि विदेशों से भी लोग आते थे. इसी लिए महाराष्ट्र में इसके पहले जो पॉलिसी मेकर थे, उन्होंने उस समय यह सोचा था कि मुंबई और महाराष्ट्र के अन्य क्षेत्रों में पर्यटन को और मार्केटिंग को प्रमोट करने की जरुरत नहीं है, क्योंकि लोग खुद ही यहां आते हैं, मुंबई की ओर आकर्षित होते हैं. लेकिन पिछले कुछ सालों में गोवा, केरल, राजस्थान, पांडिचेरी ये छोटे छोटे राज्य पर्यटन के क्षेत्र में महाराष्ट्र से आगे निकल गए हैं. आज गोवा देखने के लिए देश और विदेश से सैकड़ों लोग विमान से आते हैं. गोवा में सैंकड़ों विमान उतरते हैं. उसी तरह से केरल में भी हजारों लोग पर्यटन के लिए जाते हैं. पहले गोवा और अन्य बड़े शहरों में विमान से जाने के लिए मुंबई होकर ही जाना पड़ता था लेकिन आज यह स्थिति नहीं है. आज स्थिति यह है कि देश और विदेशों से सीधे गोवा, कोचीन, बैंगलोर, चैनई जाने के लिए विमान सेवा उपलब्ध है. इस प्रकार की व्यवस्था हो जाने के कारण मुंबई में पर्यटकों की संख्या में कमी आई है. मैं समझता हूं कि अब वक्त आ गया है कि महाराष्ट्र में भी पर्यटन क्षेत्र का विकास किया जाए. इस संबंध में पिछले एक साल में बहुत चर्चा हुई है. कुछ महीने पहले सम्माननीय मुख्यमंत्री की

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अध्यक्षता में बैठक हुई थी. इस बैठक में नई पर्यटन नीति बनाने के बारे में विचार रखे गए थे. सरकार ने यह निर्णय लिया है कि महाराष्ट्र के लिए नई पर्यटन नीति बनाई जाएगी.. नये विजन के साथ यह पर्यटन नीति होगी. इस नई पर्यटन नीति के अन्तर्गत पूरे विश्व में महाराष्ट्र को मार्केटिंग की दृष्टि से, टुरिझम डेस्टीनेशन के लिए प्रोजेक्ट करना है. उसके साथ और क्या क्या करना चाहिए, इसके बारे में भी चर्चा हुई. आज कोकण क्षेत्र में 720 किलोमीटर का समुद्री किनारा है. उसके विकास के बारे में भी चर्चा हुई. इको टुरिझम के बारे में चर्चा हुई. रुरल टुरिझम के बारे में चर्चा हुई. बालीवुड टुरिझम के बारे में चर्चा हुई. एडवेंचर स्पोर्ट के बारे में चर्चा हुई. सहयाद्री जैसी जगह पर एडवेंचर स्पोर्ट शुरु करने के बारे में चर्चा हुई. इन सब चीजों पर चर्चा करके पर्यटन विकास के लिए ठोस नीति बनाई जा रही है और यह लगभग तैयार हो गई है. मंत्री मंडल की मान्यता मिल जाने के बाद सरकार नई " पर्यटन नीति " घोषित करेगी. इसके साथ ही साथ " टुरिझम प्रमोशन कौंसिल " बनाने का भी विचार कर रहे हैं. माननीय मुख्यमंत्री टुरिझम प्रमोशन कौंसिल के अध्यक्ष होंगे. बहुत सारे एन.जी.ओ., टुर आपरेटर और टुरिझम सेक्टर से संबंधित लोग इस कौंसिल में सदस्य होंगे ताकि इन लोगों के विचारों का सरकार को लाभ हो सके. इस प्रकार से महाराष्ट्र सरकार महाराष्ट्र में पर्यटन क्षेत्र को एक नई दिशा देने के बारे में कोशिश कर रही है.

इसके बाद श्री शर्मा ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MAP/ पूर्वी श्री. तालेवार 12:20

. . .श्री. सुरेश शेट्टी जारी

आने वाले दिनों में मैं समझता हूॅं कि महाराष्ट्र में चाहे कोंकण हो, चाहे विदर्भ हो अथवा कोई और जगह हो, सभी जगह पर हम लोग टूरिज्म को प्रमोट करने की पूरी पूरी कोशिश करेंगे. मा. सदस्य श्री. जयंत पाटील ने किलों के बारे में बात की. प्रदेश सरकार के अन्तर्गत 130 किले हैं और इनकी हमने यादी तैयार की है कि इनको हम किस तरह से सुन्दर बना सकते हैं, किस तरह से हेरिटेज वेल्यू के रुप में प्रिजर्व कर सकते हैं और किस तरह से बी.ओ.टी. के आधार पर प्राईवेट पार्टीज को देकर आस पास के क्षेत्र को विकसित कर सकते हैं, इसके ऊपर विचार चल रहा है. माननीय सदस्य ने इको टूरिज्म और एम.टी.डी.सी. की भूमिका के बारे में प्रश्न उपस्थित किए हैं. मैं उनको बताना चाहता हूॅं कि एम.टी.डी.सी. की भूमिका फेसिलिटेटर के रुप में होगी. हम नहीं चाहते कि एम.टी.डी.सी. पैसा इन्वेस्ट करे और रिसोर्ट बनाए. मैं तो सारे हिन्दुस्तान के लोगों को महाराष्ट्र में पैसा इन्वेस्ट करने के लिए बुलाना चाहता हूॅं. मैं अपनी तरफ से, एम.टी.डी.सी. की तरफ से और सरकार की तरफ से विदेशी इन्वेस्टर्स से भी कहना चाहता हूॅं कि आप मुंबई में, कोंकण में या महाराष्ट्र में कहीं भी निधि लेकर आते हैं और पर्यटन क्षेत्र में इन्वेस्ट करना चाहते हैं तो आपको पूरा सहयोग दिया जाएगा.

सभापति महोदय, माननीय सदस्य श्री. जोशी ने इन्फ्रा स्ट्रक्चर और इन्वेस्टमेंट के बारे में कहा. मैं उनको बताना चाहता हूॅं कि मैं आज यहां पर घोषणा नहीं कर सकता, लेकिन जब यह विषय केबिनेट में जाएगा, उसके बाद हम घोषणा कर सकते हैं. हम वित्त विभाग और दूसरे विभागों के साथ चर्चा कर रहे हैं कि महाराष्ट्र में उद्योगों में इन्वेस्टमेंट करने पर जिस प्रकार की सुविधाएं दी जाती हैं, उसी तरह की सुविधाएं टूरिज्म सेक्टर में इन्वेस्टमेंट करने पर दी जानी चाहिए. ऐसा हमारा प्रपोजल है और अंतिम निर्णय होने के बाद हम इस बारे में घोषणा करेंगे. माननीय सदस्यों ने इस चर्चा में बड़ी दिलचस्पी से भाग लिया है. इस चर्चा में उठाए गए कई मुद्दों का मैं उत्तर नहीं दे पाया हूॅं, लेकिन मैं समझता हूॅं कि बाद में कोंकण के विकास पर होने वाली चर्चा में मैं उत्तर दे सकूंगा. इन्हीं शब्दों के साथ मैं माननीय सदस्य श्री. जयंत पाटील से विनंती करता हूॅं कि वे अपना अशासकीय ठराव वापस ले लें.

==2==

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, एलिफण्टाच्या बाबतीत मी काही मुद्दे उपस्थित केले होते. त्याबाबतीत मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले नाही.

श्री. सुरेश शेट्टी : सभापति महोदय, माननीय सदस्य ने एलीफेंटा के बारे में प्रश्न उठाया है, मैं खुद वहां पर 2 बार जा चुका हूँ. वहां पर बिजली की समस्या है. पिछले 3 साल से गांव के लोगों को एम.टी.डी.सी. की तरफ से बिजली देते हैं. लेकिन हमारी कोशिश है कि बी.एस.ई.एस. या किसी और संस्था की तरफ से बिजली दी जाए. वहां पर केबलिंग की समस्या है, सी.आर.जेड. की समस्या है, पीने के पानी की समस्या है. इसके बारे में पालक मंत्री सारे गांव वालों की बैठक लेकर इन समस्याओं को हल करने की कोशिश कर रहे हैं.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय. सन्माननीय राज्यमंत्री महोदयांनी समाधानकारक उत्तर दिलेले असल्यामुळे मी माझा ठराव मागे घेण्यासाठी सभागृहाची अनुमती मागतो.

सभागृहाच्या अनुमतीने ठराव मागे घेण्यात आला.

---

...3..

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: नगरपालिका व महानगरपालिकांच्या आर्थिक कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी पंचायत राज समितीच्या धर्तीवर दोन्ही सभागृहाची संयुक्त समिती स्थापन करणे

**मु.शी.**: ागरपालिका व महानगरपालिकांच्या आर्थिक कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी पंचायत राज समितीच्या धर्तीवर दोन्ही सभागृहाची संयुक्त समिती स्थापन करणे या विषयावरील श्री. अनंत तरे, वि.प.स. यांचा ठराव.

श्री. अनंत तरे (रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील ठराव मांडतो -

"राज्यातील नगरपालिका व महानगरपालिकांना शासनाकडून अनुदान मिळत असल्यामुळे त्यांच्या आर्थिक कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी "पंचायत राज समितीच्या" धर्तीवर दोन्ही सभागृहाची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

सभापती महोदय, या सदनाचे तत्कालीन सन्माननीय सदस्य श्री. गंगाधर फडणवीस यांनी 1982 मध्ये आणि याच सदनाचे तत्कालीन सन्माननीय सदस्य श्री. नारायण वैद्या यांनी 1988 मध्ये अशा प्रकारचा ठराव या सदनामध्ये मांडलेला होता.

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ KGS/ MAP/ SBT/ श्री.शिगम नंतर 12:25

श्री. अनंत तरे ....

सभापती महोदय, पहिल्यांदा जी चर्चा झाली त्या चर्चेला तत्कालिन मंत्री श्री.लिलाधर व्यास यांनी उत्तर दिले होते आणि त्यानंतर जी चर्चा झाली त्या चर्चेला तत्कालिन मंत्री श्री.बी.अे.देसाई यांनी उत्तर दिले होते. हा विषय अत्यंत महत्वाचाआहे. गेली 22-24 वर्षे या प्रश्नावर सभागृहात चर्चा होत आहे. हा विषय तिसऱ्यांदा सभागृहात मांडण्यात आला आहे. महाराष्ट्रातील सर्व जिल्हा परिषदांचे लेखा अहवाल आणि प्रशासकीय अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवले जातात. आजच्या कामकाजपत्रिकेवर देखील जिल्हा परिषदांचे 2004-05 चे वार्षिक प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात येणार आहेत. तथापि महानगरपालिकांचे आणि नगरपालिकांचे प्रशासकीय अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवले जात नाहीत. त्यासाठी महानगरपालिका आणि नगरपालिका कायद्यात दुरुस्ती करणे आवश्यक आहे. मागील आठवडयात आपण उल्हासनगर महानगरपालिकेच्या संदर्भात सभागृहामध्ये चर्चा केली. महानगरपालिका आणि नगरपालिका या स्वायत्त संस्था असल्यामुळे यांच्या कारभारावर सरकारचा कोणत्याही प्रकारचा अंकुश नाही. पंचायती राज समिती राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना भेटी देते. ऑडीट ऑब्जेक्शन असतील त्यासंदर्भात जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांची साक्ष नोंदविते तसेच जिल्हा परिषदेमार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांची आणि कामांची पाहणी करते आणि यामध्ये जर दोष आढळून आले तर संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द आणि कर्मचाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याची शिफारस देखील ही समिती करते. यानंतर जो अहवाल सदनामध्ये मांडला जातो त्यावर जरी चर्चा होत नसली तरी दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली जाते. मंत्रीमहोदयांनी यापूर्वी उत्तर देताना सांगितले होते की महानगरपालिकांना शासन अनुदान देत नाही. नगरपालिकांना देतो. सगळया महानगरपालिकांना शासन अनुदान देत नाही ही गोष्ट खरी असली तरी काही महानगरपालिकांना अनुदान दिले जाते. महानगरपालिकांना अनुदान जरी दिले जात नसले तरी विविध करांच्या माध्यमातून जकात कर असेल किंवा सेसच्या माध्यमातून त्यांच्याकडे पैसा जमा होत असतो आणि हा जनतेचा पैसा आहे. म्हणून जनतेच्या पैशावर नियंत्रण ठेवण्याचे काम शासनाने केले पाहिजे अशी माझी मागणी आहे. महानगरपालिकेच्या बाबतीत कुठल्याही प्रकारचे नॉर्म्स नाहीत. मंत्रालया उप सचिवांना भेटायला गेलो असता विचारले की तुम्ही अेसी का लावला नाही तर उत्तर देतात की आम्हांला अेसी लावण्याचा अधिकार नाही. उलट नगरपालिकेमध्ये मात्र अधिकारी अेसी लावतात आणि अेसी गाडया वापरतात. यांच्यावर कोणत्याही

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ KGS/ MAP/ SBT/ श्री.शिगम नंतर 12:25

श्री. अनंत तरे...

बंधन नाही. ऑडीट केले जाते पण त्यावर कोणत्याही प्रकारची चर्चा महासभेत किंवा सर्वसाधारण सभेमध्ये होत नाही. ऑडीट ऑब्जेक्शन असतात त्याच्यावर चर्चा होत नाही. ऑडीट काही वेळा होते काही वेळैला होत नाही. ऑडीट ऑब्जेक्शन असतात ती परस्पर अधिकाऱ्यांना दाखविली जातात आणि त्यावर चर्चा न होताच ती बंद केली जातात. अशा प्रकारच्या ऑडीट ऑब्जेक्शनवर चर्चा करण्याचा आणि ती पाहण्याचा अधिकार दोन्ही सभागृहाच्या सदस्यांच्या समितीला असावा अशा प्रकारची आग्रही मागणी मी यानिमित्ताने करणार आहे. महानगरपालिकेला जो निधी मिळतो त्याचे नॉर्म्स असतात. शहरी विभागातून आलेला नगरसेवक कोणत्याही प्रकारचे नियम नसताना हा निधी मागास भागाकरिता वापरतो. अनेक ठिकाणी नगरसेवक हा निधी न वापरता तो वापरल्याचे दाखवून विविध ठिकाणी खर्च केल्याचे दाखवितात. माननीय आयुक्तांना असलेल्या कलम 5(2) (2) च्या अधिकारात अधिकारी सकाळी फाईल तयार करतात आणि संध्याकाळी पेमेंट होते. आमच्या ठाणे महानगरपालिकेची यासंदर्भात चौकशी झाली पाहिजे. 100 प्रस्ताव असे झालेले आहे तकी सकाळी फाईल तयार झाली,संध्याकाळी छानर्नी होऊन पेमेंट झाले` आहे. अतिशय तातडीचे काम असेल तर अशा प्रकारचे प्रस्ताव आणले जात नाहीत. तरीसुध्दा ऑडीट रिमार्क्स आले तर ते महानगरपालिका कायदा.949 अनुसार एखादा प्रस्ताव महासभेमध्ये यावयाचा असेल तर माननीय आयुक्तांच्या सहीने आणि माननीय महापौरांच्या मंजुरीनंतर तो प्रस्ताव महासभेसमोर चर्चा होऊन एकमताने मान्य होतो.

नंतर भारवि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत तरे...

असा प्रस्ताव पुन्हा आयुक्तांकडे जातो. त्यावर आयुक्त Yes किंवा No लिहितात. अशाने कायद्याची कुचेष्टा होते. महापौरांना दहा रुपयाची वस्तू घ्यावयाची असेल तर आयुक्तांना विनंती करावी लागते. अशा प्रकारची स्वायत्ता त्यांना देण्यात आलेली आहे. लोकप्रतिनिधीने एखाद्या सर्वसामान्य माणसाने अनधिकृत बांधकामासंबंधी तक्रार केल्यानंतर देखील त्यावर काहीही कारवाई होत नाही. प्रत्येक नागरिक हा अनधिकृत बांधकामाच्या विरोधात कोर्टामध्ये जाऊ शकत नाही. त्यामुळेच उल्हासनगर, नवी मुंबई, ठाणे, मीरा-भाईंदर, पुणे या महानगरपालिकांमधील अनधिकृत बांधकामाचे प्रश्न हे विधिमंडळात उपस्थित होतात. राज्यातील नगरपालिका व महानगरपालिका कारवाई करतानासुध्दा हितसंबंध बघून कारवाई करते. नगरपालिका व महानगरपालिकांच्या ऑडिट रिपोर्टमध्ये काही ठपका ठेवला असेल तर विधिमंडळाची समिती संबंधित नगरपालिका किंवा महानगरपालिकेने कोणती कार्यवाही केली याची छाननी करू शकेल. मी येथे आपल्याला एक गोष्ट सांगणार आहे. समजा एखादा प्लॅन मंजूर झाला असेल तर तो अधिकृत समायचा का ? मी ठाण्याला नगरसेवक होते. त्यावेळी रस्त्यावर एक इमारत बांधण्यात आली होती. ती अनधिकृत असावी असे मला वाटल्यामुळे मी चौकशी केली असता, त्यावेळी मला सदर इमारतीला परवानगी दिली आहे असे सांगण्यात आले होते. जेव्हा मी ठाण्याचा महापौर झालो, त्यावेळी त्या इमारतीच्या संदर्भातील फाईल मागितली असता, ती इमारत अनधिकृत असल्याचे माझ्या निदर्शनास आले. अशाप्रकारे नगरपालिका आणि महानगरपालिकांमध्ये कामकाज होत असते. तेव्हा याप्रकरणीसुध्दा कारवाई होणे गरजेचे असते. पण संबंधितांविरूध्द कारवाई केली जात नाही. त्यामुळेचे एखाद्या समितीची आवश्यकता भासते. नगरपालिकांमध्ये प्रतिनियुक्ती हा देखील एक मोठा भाग आहे. नगरपालिका आणि महानगरपालिकेतील सर्वच अधिकारी हे तीन वर्षांच्या प्रतिनियुक्तीवर असतात. त्यामुळे असे अधिकारी नगरपालिका किंवा महानगरपालिकांमध्ये कोणत्या अडचणी आहेत, हे समजून घेत नाही. असे अधिकारी महापालिकेमध्ये येताना रिकाम्या हाताने येतात. मात्र जाताना तसे होत नाही. तेव्हा शासन प्रतिनियुक्तीला आळा घालणार आहे काय ? असा माझा या निमित्ताने सवाल आहे. महापालिकांमधील अधिकारी हे तीन वर्षासाठी प्रतिनियुक्तीवर आलेले असल्यामुळेत

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत तरे...

त्यांना कुठलेच सोयरसुतक नसते. ते आपला कार्यकाळ पूर्ण करून जातात. त्यामुळे प्रतिनियुक्तीवरसुध्दा अंकुश ठेवला पाहिजे. नगरपालिका व महानगरपालिकेतील अनुसूचित जाती व जमातीच्या कर्मचाऱ्यांची नियमाप्रमाणे भरती, बढती व पदोन्नती झाली आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी विधिमंडळाची अनुसूचित जाती व जमाती कल्याण समिती आहे. त्याच धर्तीवर राज्यातील नगरपालिका व महानगरपालिकांच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी विधिमंडळाची समिती असावी असे मला वाटते. एखादे पत्र जरी लिहिले तरी महानगरपालिका आपल्याला उत्तर देत नाही. याचे कारण त्यांना माहित असते की, आमच्यावर शासनाचा अंकुश नाही. त्यामुळेच परिसर स्वच्छतेची काळजीसुध्दा महानगरपालिकांमधून घेतली जात नाही. नाले स्वच्छ केले जात नाहीत. मात्र करोडो रुपयांपचे बिल केले जाते. मी आपल्याला सांगेन की, पेटीवर काम करणारे कामगार असतात. खऱ्या अर्थाने पाहणी केली तर असे दिसून येईल की, निम्म्या पेक्षा कर्मचारी तेथे नसल्याचे आढळून येतील.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ KGS/ MHM/ पूर्वी श्री.भारवि.... 12:35

श्री.अनंत तरे....

याचा अर्थ महानगरपालिकेचे कर्मचारी असल्याचे दाखवून त्यांचा पैसा विविध मार्गाने काढण्याचा प्रकार होतो. म्हणून अशा प्रकारांवर शासनाचा अंकुश असण्यासाठी या समितीची नितांत आवश्यकता आहे. मुंबईमध्ये फार मोठया प्रमाणावर टॅक्स आणि इतर माध्यमातून पैसा शासनाकडे जमा होतो. तो केवळ मुंबईवरच खर्च होतो अशातला भाग नाही. संपूर्ण महाराष्ट्रासाठी त्याचा उपयोग केला जातो. केंद्र सरकारचे अनुदान सुध्दा त्या ठिकाणी वापरले जाते. परंतु महानगरपालिकेचा असा विचार असतो की, हा पैसा शहरी भागातच खर्च करुन विकास करण्यात यावा. महोदय, कल्याण महानगरपालिकेतील 28 गावे महानगरपालिकेतून बाजूला गेली. ती गावे महानगरपालिकेला टॅक्सच्या माध्यमातून रक्कम देत असताना सुध्दा त्या गावांना कोणतीच सुविधा मिळत नव्हती. महोदय, अशाच प्रकारची अवस्था ठाणे महानगरपालिकेतील 28 गावांमध्ये उद्‌भवत आहे. त्या गावांनी विचार केला आहे की, आम्हाला ठाणे महानगरपालिकेमधून काढून टाका. ठाणे महानगरपालिकेच्या माध्यमातून त्या गावांमध्ये जाण्यासाठी रस्ता करण्यात आलेला नाही. त्या गावामध्ये जाण्यासाठी फिरुन, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या माध्यमातून जावे लागते. ठाणे महानगरपालिका 1984 मध्ये अस्तित्वात आली. जवळजवळ 24 वर्षाचा कालावधी उलटून सुध्दा महानगरपालिकेच्या हद्दीतील गावांमध्ये रस्ते करता आले नाहीत, परिवहनाची स्वतंत्र व्यवस्था करता आली नाही. सोयी-सुविधा पुरविण्यात न आल्यामुळे महानगरपालिकेला टॅक्स का म्हणून द्यावा ? अशा प्रकारची भावना तेथील रहिवाशांमध्ये निर्माण झाली आहे. म्हणून आस्थापनेवर होणारा खर्च सोडून, महानगरपालिकेचे जे आर्थिक बजेट असते, ते शहरातील संपूर्ण भागात खर्च होण्याची आवश्यकता आहे. खर्च करण्याच्या बाबतीत महानगरपालिकेवर कोठे तरी निर्बंध येण्यासाठी या सभागृहाच्या माध्यमातून सन्माननीय मंत्री श्री.राजेश टोपे यांना विनंती करतो की, हा विषय अतिशय महत्वाचा विषय आहे. या विषयाच्या बाबतीत मी केवळ दोन सूचना करणार आहे.

महोदय, अनधिकृत बांधकामाच्या संदर्भात जर सामान्य माणसाने एखादी तक्रार केली तर, महापालिकेच्या वतीने त्या तक्रारीला केराची टोपली दाखविली जाते. शहरांमध्ये मोठमोठया इमारती कशा उभ्या राहतात या संदर्भात माझी लक्षवेधी सूचना सभागृहात चर्चेला आली होती. महोदय, एखादी बाब जर सभागृहात उपस्थित झाली नाही तर, त्या विषयाशी संबंधीत असलेल्या

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत तरे....

दोषींवर कारवाई होणार नाही काय ? त्या विषयाला न्याय मिळवून देण्यासाठी नागरिकांनी कोर्टातच जावे काय ? म्हणून महापालिकेमध्ये असे जे काही प्रकार होतात त्यावर नियंत्रण आणण्याची आवश्यकता आहे. उल्हासनगर येथील अनधिकृत बांधकामाच्या संदर्भात जेव्हा चर्चा उपस्थित करण्यात आली होती तेव्हा मी विनंती केली होती की, शासनाच्या सचिव पातळीवर एक विभाग काढावा आणि अनधिकृत बांधकामाबाबत तक्रार आली की, त्याची चौकशी करुन कारवाई करण्यात यावी. त्यामुळे असे जे काही प्रश्न आहेत त्यातून मार्ग काढण्यासाठी नागरिकांनी शेवटी कोणाकडे जावे ?

महोदय, या अनुषंगाने बीपीएमसी ॲक्ट मध्ये काही सुधारणा करणे आवश्यक वाटते. कारण या ॲक्टनुसार महापौरांना कोणत्याही प्रकारचे अधिकार देण्यात आलेले नाहीत. आपण त्यांना अधिकार देऊ नका, परंतु कार्यकारी अधिकार तरी द्यावेत असे मला वाटते. महापौरांनी सभेमध्ये मान्य केलेला ठराव अंतिम मान्यतेसाठी आयुक्तांकडे पाठवावा लागतो. महोदय, सर्व लोकप्रतिनिधींनी मान्य केलेल्या ठरावाला आयुक्त "Yes" किंवा "No" असा शेरा मारतात. जनतेने निवडून दिलेल्या लोकप्रनिनिधींच्या ठरावावर आयुक्त आपला निर्णय देतात. ठराव परिपक्व होऊन आलेला असताना सुध्दा तो प्रशासनापुढे जातो. बीपीएमसी ॲक्ट मध्ये सभेने मान्य केलेला प्रस्ताव आयुक्तांना बंधनकारक असावा अशा प्रकारची मी सूचना करु इच्छितो.

तसेच दुसरा मुद्दा हा ऑडिट संदर्भातील आहे. महासभेपुढे महापालिकेचे ऑडिट सक्तीने चर्चेला आले पाहिजे. त्यामध्ये दोषी असलेल्या संदर्भात महासभेपुढे चर्चा झाली पाहिजे अशा प्रकारची सक्ती महानगरपालिकेच्या प्रशासनावर असली पाहिजे. महोदय, आज जो ठराव मी मांडलेला आहे तो यापूर्वी 1982 आणि 1988 मध्ये मांडलेला होता. आज पुन्हा एकदा तो मांडावा लागला आहे. आज या ठरावाची "हॅट्रीक" झालेली आहे. हा प्रस्ताव पुन्हा सभागृहापुढे येऊ नये या दृष्टिकोनातून माननीय मंत्री महोदयांनी निर्णय घ्यावा अशी या ठरावाच्या माध्यमातून मी त्यांना विनंती करतो. त्यामुळे पुन्हा एकदा पंचायत राज समितीच्या धर्तीवर नगरपालिका आणि महानगरपालिकांच्या आर्थिक कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी दोन्ही सभागृहाची एक संयुक्त समिती स्थापन करण्यावी यावी, अशी मागणी करतो आणि माझे दोन शब्द पुरे करतो.

----------

नंतर श्री.कांबळे....

अस्धापित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी ( औरंगाबाद विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, ठरावाला पाठिंबा देताना दोनच मिनिटांत मी माझ्या सूचना सांगणार आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांनी महानगरपालिकेसंदर्भात अतिशय चांगले व सविस्तर सांगितले. सभापती महोदय, आपल्या या स्वायत्तता देण्यामुळे अशा पध्दतीचे प्रश्न निर्माण झालेले आहेत. महानगरपालिकेचा कारभार सुधारता येत नाही आणि आम्हाला सरकारची मदतही त्या ठिकाणी नेता येत नाही. त्यामुळे टाऊनप्लॅनिंग विभाग काम करते की नाही हा प्रश्न महाराष्ट्रात निर्माण व्हायला लागलेला आहे. मी आपल्याला औरंगाबाद येथील महानगरपालिकेचे उदाहरण सांगतो. परवा श्री. राठोड नावाच्या अधिकाऱ्याला म्हणजेच टाऊनप्लॅनिंग ऑथोरिटीला मुजीबालम या नगरसेवकाने जनरल बॉडीमध्ये कंबरेत लाथ घातली. त्याचे कारण असे होते की, 10 लाख रुपयांचा मोबदला देताना त्याने 2 कोटी 10 लाखांचा बदल केला. मला येथे कोणत्याही पक्षासंदर्भात बोलावयाचे नाही आणि त्यामध्ये माझा इंटरेस्टही नसतो हे आपल्यालाही माहित आहे आणि महानगरपालिकेचे कारभार कसे चालतात हे देखील आपल्याला माहित आहे. सभापती महोदय, पुणे, मुंबई येथे काय काय दिवे लागतात हे मी काही बोलत नाही. कोल्हापूरमध्ये तसेच इतर सगळ्या महानगरपालिकेत जमिनीचे जेवढे ठराव आले, त्यात किती ठरावांवर चर्चा झाली ? की आयत्या वेळेस घुसडली. डायरेक्ट मिनिटमध्ये समजले की, अरेरे, ही जमीन होती आणि आता ती गेली आहे. तरी, यावर आपण कुठेतरी नियंत्रण ठेवणार आहात का ? महानगरपालिकेचा कारभार पारदर्शक करावयाचा की नाही हा महत्वाचा प्रश्न आहे. नगरपालिकेचे प्रश्न मात्र वेगळे आहेत. मराठवाड्यातील 52 नगरपालिकांमधील जवळपास 20-22 ठिकाणी आजही कुठेतरी तहसीलदार असणारे ॲक्टींग सी.ई.ओ. म्हणून काम करीत आहेत. सभापती महोदय, ते काही कामच करत नाहीत, अशी परिस्थिती आहे. माझ्याकडे माहिती आहे की, 52 पैकी 36 ठिकाणच्या हद्दी संपलेल्या आहेत. हद्द एक्स्टेन्शनचे प्रस्ताव कलेक्टर ऑफिस अणि कमिशनर ऑफिस यामध्येच खालीवर होतात. हे प्रश्न मला न समजलेलेच आहेत. नगरपालिकेची हद्द संपल्याबरोबर पाचशे सहाशे घरे झालेली आहेत. पण हद्द वाढतच नाही. त्यामुळे तिथल्या लोकप्रतिनिधींची इतकी कुचंबणा होते की, लोक त्यांच्याकडे येऊन गळा धरतात की, तुम्ही या संदर्भात सरकार म्हणून काही करत का नाही ? आणि सरकार म्हणते की, ते स्वायत्त आहेत,

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी ....

त्यांच्याशी आमचा काही संबंध नाही. ही स्वायत्तता आहे की काम झटकून देण्याचा प्रकार आहे ? यावर एकदा नियंत्रण केले पाहिजे. सभापती महोदय, माझी आपणास सूचना आहे की, आपण एखादा ग्रुप ऑफ कमिटीज करुन यावर नियंत्रण ठेवा. पंचायत राज समितीपेक्षाही वेगळी आणि एक वेगळे नाव असलेली कमिटी करा. सर्व नगरपालिकांच्या दौऱ्याचा कार्यक्रम होऊ शकणार नाही. तरी, आपण या संदर्भात सायन्टिफिक, ऑडिटींग, अकाऊंटिंग करणारी व्यवस्था निर्माण करावी, जेणेकरुन आम्हाला लोकांना फेस करता येईल. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांनी मांडलेल्या ठरावाला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. मी मुंबई स्थानिक स्वराज्य संस्थेकडून निवडून आलेलो आहे. सभापती महोदय, "क" वर्ग, "ब" वर्ग, "ड" वर्ग अशा अनेक नगरपालिका आहेत, त्या सर्वांना अनुदान मिळते. काही महानगरपालिकांना अनुदान मिळत नाही. त्यांच्या कारभारावर अंकुश नाही. सभापती महोदय, पंचायत राज समितीच्या माध्मयातून महालेखापालांकडून जे आक्षेप येतात, त्यांवर साक्ष बोलवून आपण कार्यवाही करतो आणि त्याचा परिणाम सर्वसामान्य जनतेला न्याय मिळण्यामध्ये होतो. परंतु महानगरपालिका व नगरपालिकांच्या बाबतीत अशी कोणतीही समिती नसल्यामुळे त्यांचा कारभार कळत नाही. मी आपल्याला दोनच उदाहरणे देऊ इच्छितो. सभापती महोदय, जळगांव महानगरपालिका आणि आणि भुसावळ नगरपालिका या दोन्हींच्या बाबतीत अनेक वेळा टीका झाल्या. टीका करण्यासाठी आता कोणतीही प्रशासकीय संस्था शिल्लक राहिलेली नाही. अगदी न्यायसंस्थेनेसुध्दा त्यांच्यावर ताशेरे ओढलेले आहेत. किंबहूना, सन्माननीय सदस्य श्री. सुरेश जैन यांनी सुध्दा ते महानगरपालिकेत असताना, स्वतःच्या पक्षाच्याच नगरसेवकांवर कारवाई करावी, असा आग्रह जिल्हाधिकारी व एस.पी. यांच्याकडे धरला. परंतु तरीसुध्दा कोणत्याही प्रकारचा अंकुश राहत नाही. आपण आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांची यादी पाहिली तर आपल्याला दिसून येईल की, अनेक प्रश्न हे महानगरपालिका व नगरपालिकांसंदर्भातच आहेत. याचा अर्थ असा होतो की, शासनाला या संदर्भात कार्यवाही करता येते, कारवाई करता येते, प्रश्न विचारता येतात, यामध्ये शासनाचा रोल आहे. परंतु त्यांच्यावर अंकुश ठेवण्यासाठी शासनाककडे कोणतीही समिती अस्तित्वात नाही.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

येथे प्रश्न आल्यानंतर आपण अधिकाऱ्यांवर कारवाई करतो, मुख्याधिकारी यांच्यावर कारवाई करतो. भुसावल नगरपालिकेच्या बाबतीत हायकोर्टाने आदेश दिलेले आहेत की, तेथील नगरसेवकांवर कारवाई करण्यात यावी. तसेच जळगांव महानगरपिालका तर बरखास्त करण्यात आली होती. सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांनी सांगितले की, या ठरावाची या सभागृहात आता हॅटट्रीक झालेली आहे, तसेच सन्माननीय सदस्य सुध्दा तीन वेळा महापौर होते, त्यांची सुध्दा हॅटट्रीक झालेली आहे. या संदर्भातील त्यांचा अनुभव माझ्यापेक्षा खूप मोठा प्रदीर्घ असा आहे. म्हणून त्यांनी मांडलेल्या ठरावाचा माननीय मंत्री महोदयांनी विचार करावा एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

-----------

.....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## माननीय उपसभापती यांचे अल्पोपहाराचे निमंत्रण

**तालिका सभापती** : एक सूचना आलेली आहे ती मी वाचून दाखवितो. "महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनास उपस्थित माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, मंत्रिमंडळ सदस्य, दोन्ही सभागृहातील माननीय विरोधी पक्ष नेते व सन्माननीय सदस्य तसेच शासकीय अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी बुधवार, दिनांक 19 एप्रिल, 2006 रोजी सायंकाळी 4 ते 8 या वेळेत विधान भवनाच्या हिरवळीवर मी अल्पोपहार व चहापानाचा कार्यक्रम आयोजित केलेला आहे. कृपया आपल्या सोयीनुसार आपण अवश्य उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी यासाठी हे आग्रहाचे निमंत्रण."

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे (नगर विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, अशासकीय कामकाजाच्या माध्यमातून सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे, श्री. श्रीकांत जोशी, श्री. अरविंद सावंत व इतर अन्य सन्माननीय सदस्यांनी एका महत्वाच्या प्रश्नावर चर्चा उपस्थित केलेली आहे. त्यांनी त्याबाबत आपले मत व्यक्त केलेले आहे. पंचायत समिती व जिल्हा परिषदांवर ज्या प्रमाणे पंचायत राज समितीचे नियंत्रण असते त्याच धर्तीवर महानगरपालिका व नगरपालिका यांच्यावर सभागृहातील सदस्यांचे नियंत्रण ठेवण्यासाठी एक समिती गठीत करावी अशी मागणी सर्वच सन्माननीय सदस्यांनी केलेली आहे. सभापती महोदय, या दोन संस्थांमध्ये बेसिक फरक आहे. जिल्हापरिषदेचा सर्व कारभार ट्रान्सफरन्ट असतो. जिल्हा परिषद व पंचायत समित्यांचा कारभार 100 टक्के राज्य शासन व केंद्र शासनाच्या अनुदानावर चालतो असे म्हटले तर वावगे होणार नाही असे मला वाटते. या सर्व अनुदानावर नियंत्रण ठेवण्यासाठी पंचायत राज समिती गठीत करण्यात आलेली आहे. महानगरपालिका व नगरपालिकांच्या दृष्टीकोनातून विचार केला तर आता नागरीकरण खूप मोठया प्रमाणात झालेले आहे. 42 टक्के लोक हे या नागरी वस्त्यांमध्ये राहत आहेत. 42 टक्के लोक हे 22 महानगरपालिका व 227 नगरपालिकांच्या नागरी क्षेत्रामध्ये राहत आहेत. 75 टक्के लोकसंख्या ही महानगरपालिका परिसरात राहते तर व 25 टक्के लोकसंख्या नगरपालिका क्षेत्रामध्ये राहत आहे. महानगरपालिकेच्या उत्पन्नाची बाजू पाहिली तर आपल्या लक्षात येईल की, जवळ जवळ सर्व उत्पन्न हे महानगरपालिका जकात व प्रॉप्रटी टॅक्सच्या माध्यमातून मिळत असते. महानगरपालिकांना जकात लागू केलेली आहे, त्यांचे खासगीकरण सुध्दा करण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे प्रॉप्रटी टॅक्स, मालमत्ता कर हा सगळया महानगरपालिका व नगरपालिकांना लागू आहे. हा टॅक्स गोळा करण्याचा अधिकार या संस्थांना देण्यात आलेला आहे. यातून उत्पन्नाचे साधन निर्माण करण्याचा अधिकार त्यांना दिलेला आहे. त्यामुळे मुंबई महानगरपालिकेचा संपूर्ण खर्च ती संस्था भागवू शकत आहे. 80 टक्के लोक हे महानगरपालिकांमध्ये राहत आहेत. त्यांना जकात व प्रॉप्रटी टॅक्सच्या माध्यमातून उत्पन्नाचे साधन निर्माण करुन देण्यात आलेले आहे. 74 वी घटना दुरुस्ती झाली तेव्हा या संस्थांना स्वायत्तता देण्यात आलेली आहे. 74 वी घटना दुरुस्ती केली याचाच अर्थ त्यांना स्वायत्तता दिलेली आहे त्यांचे अधिकार हिरावून घेण्याचा कोणताही प्रकार होऊ नये असे मला वाटते.

यानंतर श्री. सरफरे..

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. राजेश टोपे...

या ठरावाच्या निमित्ताने अनेक माननीय सदस्यांनी सूचना केल्या व विचार व्यक्त केले. महानगरपालिकेमध्ये आणि नगरपालिकेमध्ये भ्रष्टाचाराचे अड्डे कशाप्रकारे आहेत, आणि कशाप्रकारे तेथे गलथान कारभार चालू आहे यासंबंधी आपले म्हणणे मांडले. तसेच या सर्व गोष्टींवर कशाप्रकारे नियंत्रण आणता येईल यासंबंधी देखील त्यांनी अपेक्षा व्यक्त केली. वस्तुस्थिती अशी आहे की, या सर्व गोष्टींवर नियंत्रण आणण्याची आवश्यकता असली तरी त्यांच्या खर्चावर मर्यादा आणण्यासाठी काही नियम आहेत. महानगरपालिका आणि नगरपालिकांच्या कायद्यामध्ये आर्थिक निकष ठरविण्यात आले आहेत. आणि म्हणून कायद्यातील तरतुदीच्या विरुध्द जर कुणी काम केले तर त्याचे दरवर्षी लोकल फंड ऑडिट करण्यात येते. ज्या ठिकाणी शासनाकडून 1 कोटींचे अनुदान दिले जाते त्या ठिकाणी अशाप्रकारे ऑडिट करण्याची तरतूद आहे. त्याचप्रमाणे त्या ठिकाणी अकाऊंटंट जनरल यांचेमार्फत सुध्दा ऑडिट करण्याचा एक पर्याय आपल्यासमोर आहे. त्याचप्रमाणे सी.ए.जी. यांच्या माध्यमातून सुध्दा ऑडिट करण्यात येते. आणि त्यांनी केलेल्या ऑडिटचा अहवाल आपल्या सभागृहामध्ये मांडण्यात येतो. त्या अहवालावर लोकलेखा समितीच्या बैठकीमध्ये चर्चा करण्यात येते. त्यामुळे या संपूर्ण पध्दतीवर डायरेक्ट किंवा इनडायरेक्ट नियंत्रण नाही असे आपल्याला म्हणता येणार नाही. तसेच, त्यांच्या अहवालाच्या माध्यमातून देखील सभागृहामध्ये अनेक मुद्दे उपस्थित केले जातात. त्यामुळे महानगरपालिका व नगरपालिकेवर अशाप्रकारचे आपले नियंत्रण निश्चितपणे आहे.

सभापती महोदय, लोकल फंड ऑडिट आणि ए.जी. यांचेमार्फत ऑडिट केले जाते. त्याच बरोबर राज्य शासनाला सुध्दा यामध्ये विशेषाधिकार आहेत. शासनाला वाटले की, एखाद्या महानगरपालिकेमध्ये किंवा नगरपालिकेमध्ये भ्रष्टाचाराचे प्रकरण निर्माण झाले तर त्यावेळी त्या संपूर्ण वर्षाचे लेखापरिक्षण करण्याचा अधिकार शासनाला आहे. अशाप्रकारे अनेक प्रकारे महानगरपालिका व नगरपालिकांवर शासनाचा अंकुश निश्चितपणे आहे. यामध्ये वेळेचा अपव्यय होऊ नये यासाठी देखील कायद्यामध्ये निश्चितपणे तरतूद आहे. माननीय सदस्यांनी या ठिकाणी विचार व्यक्त करतांना या कारभारामध्ये पारदर्शकता असली पाहिजे, त्यांच्या कारभारामध्ये कार्यक्षमता वाढली पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली. त्यादृष्टीने माझा नगर विकास विभाग सातत्याने प्रयत्न करीत आहे. त्यासंबंधी मी जाणीवपूर्वक सांगतो की, या वर्षीच्या अंदाजपत्रकामध्ये महानगरपालिका व नगरपालिकांचे 100 टक्के संगणकीकरण व्हावे याकरिता 10 कोटी रुपये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे...

देण्याचे ठरविले आहेत. अशाप्रकारे महानगरपालिका व नगरपालिका पेपरलेस करण्याचा नगर विकास विभागाचा प्रयत्न आहे. त्याचप्रमाणे महानगरपालिका व नगरपालिकांची सेवा अधिक स्वच्छ झाली पाहिजे. याचे कारण सर्वसामान्य माणसांचा जन्मापासून मृत्यूपर्यंत त्याठिकाणी संबंध येत असतो. त्याकरिता संगणकीकरणाच्या माध्यमातून त्यांच्या कामकाजामध्ये कार्यक्षमता वाढविण्याचा प्रयत्न आहे. त्याकरिता महानगरपालिका आणि नगरपालिकांमध्ये 100 टक्के स्टाफींग पॅटर्न मंजूर केला आहे. महानगरपालिका व नगरपालिकांवर नवीन-नवीन जबाबदाऱ्या येत असल्यामुळे नवीन पदे मंजूर केली आहेत. त्याठिकाणी ऑडिटर, अकाऊंटंट आणि टाऊन प्लॅनरची पदे नव्हती. त्याकरिता नियोजन करण्याच्या दृष्टीने असिस्टंट टाऊन प्लॅनरचे पद मंजूर केले आहे. अशाप्रकारे नवीन स्टाफींग पॅटर्नच्या दृष्टीकोनातून, कॉप्युटरायझेशनच्या दृष्टीकोनातून महानगरपालिकेला एन.यू.आर.एम.च्या माध्यमातून पैसे मिळतात. अशाप्रकारे आम्ही त्याठिकाणी दुहेरी पध्दतीने सक्तीचे अकाऊटींग करण्याची पध्दत करीत आहोत. माननीय सदस्यांना आठवतच असेल की, महानगरपालिकेला दरवर्षी ऑडिट रिपोर्ट सादर करावा लागतो. अशापध्दतीचे ठराव हे वारंवार येत असतात याची मला कल्पना आहे. त्यामुळे महानगरपालिका व नगरपालिकांच्या कारभारावर देखरेख ठेवण्यासाठी लोकल फंड ऑडिट, अकाऊंटंट जनरल यांचेमार्फमत ऑडिट होत असते. त्याचप्रमाणे या संदर्भात जे वेगवेगळे कायदे आहेत त्यामध्ये सुध्दा नगर विकास विभागामार्फत वेळोवेळी बदल करण्यात येत असतात.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/ पूर्वी श्री.सरफरे.... 12:55

श्री.राजेश टोपे (पुढे सुरु...

नगरविकास विभागाच्या वतीने "पंचायत राज" सारखी समिती गठीत करण्याविषयी ठरावाच्या माध्यमातून सन्माननीय सदस्यांनी शिफारस केलेली आहे. राज्यामध्ये ज्या काही नगरपालिका, महानगरपालिका आहेत त्यांच्या कारभाराच्या दृष्टीने ज्या काही उणिवा आहेत, त्या दुरुस्त करण्याच्या दृष्टीने वेळोवेळी महानगरपालिकेच्या अधिनियमामध्ये बदल केला जात असतो. त्याप्रमाणे या ठिकाणी उपस्थित केलेल्या मुद्यांच्या संदर्भाने निश्चितच विचार केला जाईल. महानगरपालिकेमध्ये डेप्युटीशनवर येणाऱ्या कर्मचारी, अधिकाऱ्यांची संख्या मोठयाप्रमाणावर वाढलेली आहे. या संदर्भाने केडरायझेशन करण्याचा विचार केलेला आहे, तसा प्रस्ताव शासनाने तयार केलेला आहे. ज्या अ वर्ग, ब वर्ग, क, वर्ग महानगरपालिका, नगरपालिका आहेत त्या ठिकाणी केडरायझेशन करण्याचा प्रस्ताव आहे. त्यामुळे नव्याने भरती करता येईल, त्याचबरोबर कोणत्याही महानगरपालिकेमध्ये त्या अधिकाऱ्यांची बदली करता येईल.

---

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/

श्री.अनंत तरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.टोपे साहेबांनी आमची समजूत घालण्याचा प्रयत्न केलेला आहे. तीन वेळा या ठिकाणी अशाप्रकारचा प्रस्ताव आलेला होता. यामध्ये गांभीर्याने शासनाने लक्ष घालावे. मंत्री महोदयांनी सांगितले की, 100 टक्के अनुदान देतो आहोत त्यामुळे त्या संदर्भाने शासनाने काळजी घेण्याचा विचार केलेला आहे. परंतु ऑक्ट्रॉयच्या माध्यमातून नगरपालिकांना पैसे मिळत होते ते बंद केलेले आहे. आता 100 टक्क्के अनुदान महानगरपालिकांना, नगरपालिकांना दिले जाणार आहे. परतुं स्थानिक स्वराज्य संस्थांना भरती करण्याचा अधिकार दिलेला नाही, त्या संदर्भाने विचार करण्याची आवश्यकता आहे. कर्मचाऱ्याची भरती करावयाची असेल तर त्यासाठी शासनाची मान्यता घ्यावी लागते. नगरपालिका, महानगरपालिका टेंपररी म्हणून कर्मचाऱ्यांच्या नेमणुका केलेल्या आहेत ते कर्मचारी टेपररी म्हणून वर्षानुवर्षे तेथे काम करत आहेत. त्यांना सेवेमध्ये घेण्याचे प्रस्ताव अनेक महानगरपालिकांकडून शासनाकडे प्रलंबित आहेत. त्या संबंधाने कार्यवाही का केली जात नाही ? असा प्रश्न आहे.

दुसरे ऑडीट करण्याच्या संबंधात सांगितले की, नगरपालिकांचे ऑडीट करण्याबाबतची कायद्यामध्ये तरतूद आहे. परंतु दोन-दोन, तीन-तीन वर्षे त्या नगरपालिकांचे, महानगरपालिकांचे ऑडीट होत नाही. महानगरपालिकेतील अधिकारी हे कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीचे पैसेही लंपास करतात,ते उघडकीस येत नाही. ठाणे महानगरपालिकेमध्ये शिक्षण मंडळ आहे, परिवहन मंडळ आहे, त्या ठिकाणचे ऑडीटच केले जात नाही. म्हणून त्या संदर्भात समिती असण्याची गरज आहे. यासाठी लोकल फंड ऑडीट, अे.जी.चे ऑडीट होण्याची आवश्यकता आहे. यापैकी एक तरी ऑडीट या नगरपालिकांना कंपल्सरी केले पाहिजे, याचा विचार करावा.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. तरे साहेबांनी जे काही विचार व्यक्त केले, त्याबाबत निश्चितच पुढे त्याचा विचार केला जाईल. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी हा ठराव मागे घ्यावा, अशी मी विनंती करतो.

श्री.अनंत तरे : सभागृहाच्या अनुमतीने मी माझा ठराव मागे घेतो.

सभागृहाच्या अनुमतीने ठराव मागे घेण्यात आला.

**तालिका सभापती (श्री.गुरुनाथ कुलकर्णी)** : आता अशासकीय कामकाज संपलेले आहे. यानंतर सभागृहाची बैठक दुपारी 1-15 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 12 वाजून 59 मिनिटांनी, दुपारी 1 वाजून 15 मिनिटापर्यन्त स्थगित झाली.)

----

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

( स्थगितीनंतर )

( सभापतीस्थानी माननीय सभापती )

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे.

**नालासोपारा नगरपालिका हद्दीतील एकाच कामासाठी दोनदा काढण्यात आलेल्या निवेदेबाबत**

**(1) * 12951 प्रा. शरद पाटील , श्री. जयंत पाटील** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) नालासोपारा (जिल्हा ठाणे) नगरपालिका हद्दीमधील चाणक्यनगरीतील मगध ते चक्रेश्वर तलाव दरम्यानच्या रस्त्याचे माहे एप्रिल 2005 साली रुपये दोन लाख चौऱ्याऐंशी हजार आठशे सेहेचाळीस रक्कमेच्या निविदा काढण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त कामासाठी दिनांक 31 डिसेंबर, 2005 ला सदर नगरपरिषदेने वृत्तपत्रात एकशे एकोणपन्नास क्रमांकाच्या निविदा जाहीर करुन परत त्याच रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण या कामासाठी एक लाख चौऱ्याऐंशी हजार आठशे सेहेचाळीस रक्कमेची निविदा काढलेली आहे, हे खरे आहे काय,

(3) उक्त काम माहे एप्रिल 2005 मध्ये पुर्ण केलेले असतांना परत दिनांक 31 डिसेंबर 2005 मध्ये निविदा काढण्यामागील कारणे काय आहेत,

(4) उक्त निविदाबाबत माजी नगरसेवक नितीन शेलार, एस.आर. खान व जनहित मंचाचे विलास विचारे यांनी मा. जिल्हाधिकारी (ठाणे) यांच्याकडे दिनांक 31 डिसेंबर, 2005 मध्ये वा त्या दरम्यान तक्रार केलेली आहे, हे खरे आहे काय,

(5) असल्यास, त्यानुसार दोषी व्यक्तींवर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. राजेश टोपे, श्री. विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (1) नाही.

(2) व (3) उमराळा रस्ता ते उचलकुंभ रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरणाचे काम मार्च, 2004 मध्ये पूर्ण झाले होते. त्यापैकी मगध ते चक्रेश्वर पर्यन्तचा रस्ता सखल असून पाणी साठत असल्याने त्या भागातील रस्त्याची उंची वाढविण्याच्या वाढीव कामासाठी रु. 1,84,846/- ची निविदा दिनांक 31 डिसेंबर, 2005 मध्ये प्रसिध्द केली होती.

(4) होय.

(5) एकाच कामासाठी दोनदा निविदा प्रसिध्द केलेल्या नाहीत. त्यामुळे कारवाई करण्यात आलेली नाही.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी असे उत्तर दिले आहे की, उमराळा ते उचलकुंभ या रस्त्याच्या कामामध्येच मगध ते चक्रेश्वरपर्यंतच्या कामाचा समावेश आहे. एप्रिल, 2004 मध्ये जे काम पूर्ण झाले त्यामध्ये मगध ते चक्रेश्वर या रस्त्याच्या कामाचा समावेश



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे. एप्रिल, 2004 मध्ये जेव्हा काम झाले त्याचवेळी उंची वाढविण्याचे काम का केले नाही ? डिसेंबर महिन्यामध्ये 1,84,846 रुपयांची नवीन निविदा काढण्याचे कारण काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, ही वस्तुस्थिती आहे की, पहिल्यांदा जे काम झाले ते 330 मीटरचे होते. त्याची किंमत 5 लाख 81 हजार रुपये होती. ते काम पूर्ण झाल्यानंतर 115 मीटरचा जो खोलगट भाग होता त्या भागामध्ये पाणी साठत होते आणि दळणवळणासाठी त्रास होत होता. म्हणून त्या 115 मीटरच्या कामासाठी 1 लाख 84 हजार रुपयांच्या कामाची निविदा काढण्यात आली. पहिल्या कामाचे एस्टीमेशन करताना त्यावेळी या कामाचे एस्टीमेट त्या कामामध्ये सहभागी केले असते तर हा अधिकचा खर्च निश्चितपणे टळला असता. जे 330 मीटरचे काम झाले त्याचवेळी खऱ्या अर्थाने हे उंची वाढविण्याचे काम का होऊ शकले नाही याची चौकशी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत करण्यात येईल आणि त्या चौकशीच्या अनुषंगाने कारवाई करण्यात येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : पहिल्या कामाचे एस्टीमेट किती रुपयांचे होते ? दुसऱ्यांदा जे काम केले त्याचे एस्टीमेट किती रुपयांचे होते ? माजी नगरसेवक श्री. नितीन शेलार यांनी केलेल्या तक्रारीचे स्वरुप काय होते ?

श्री. राजेश टोपे : पहिल्या कामाचे एस्टीमेट 5,81,940 रुपये होते. दुसऱ्या कामाचे एस्टीमेट 1,84,846 रुपये होते. तक्रारीचे स्वरुप असे होते की, एकाच कामाची निविदा दोन वेळा काढली. काम झालेले असताना परत दुसऱ्यांदा निविदा काढली आणि बोगस बिले उचलण्याचा प्रकार आहे अशा प्रकारची तक्रार होती. त्या तक्रारीमध्ये तथ्य नाही. दुसरे जे काम आहे त्या कामाची निविदा अजून मंजूर झालेली नाही. 22 टक्के जादाची निविदा असल्यामुळे त्या निविदेच्या संदर्भात मुख्याधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे परत निविदा काढण्याच्या दृष्टीने प्रस्ताव पाठवला आहे. दुसरे काम झालेले नाही. पहिल्या कामाची लांबी 330 मीटर होती. त्या 330 मीटर कामामध्ये 115 मीटरचा खोलगट भाग होता. त्या भागाची उंची वाढवण्याच्या दृष्टीने ही दुसरी निविदा काढण्यात आली होती. ती निविदा अजून मंजूर झालेली नाही. ते काम अजून झालेले नाही. यामध्ये भ्रष्टाचार झालेला नाही. ही बाब खरी आहे की, मागच्यावेळी जर हे काम होऊ शकले असते तर हा नवीन खर्च टळला असता. तेवढ्या हद्दीपर्यंत ही चौकशी करण्यात येईल.

-----

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**डोंबिवली महापालिकेच्या जलशुध्दीकरण प्रकल्पात**
**स्फोट होऊन एकाचा झालेला मृत्यु**

**(2) * 14416 श्री. विनोद तावडे , श्री. नितीन गडकरी , डॉ. अशोक मोडक , श्री. रामनाथ मोते , श्रीमती संजीवनी रायकर** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) डोंबिवली महापालिकेच्या बारावे जलशुध्दीकरण प्रकल्पात दिनांक 21 नोव्हेंबर, 2005 रोजी झालेल्या स्फोटात जखमी झालेल्या आशीष वडके यांचे दिनांक 6 डिसेंबर, 2005 रोजी निधन झाले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, महापालिका प्रशासन व कॉन्ट्रेक्टर यांनी 50 हजार रुपये देता येईल असे मृतांच्या कुटूंबियांना सांगितले हे खरे आहे काय,

(3) असल्यास, चार लाख 40 हजार रुपयांची नुकसानभरपाई मिळाली पाहिजे असा वडके कुटुंबाचा दावा आहे, हे खरे आहे काय,

(4) असल्यास, या संदर्भात चौकशी करुन नियमानुसार नुकसान भरपाई देण्यात येईल काय ?

**श्री. राजेश टोपे, श्री. विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (1), (2), (3) व (4) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या बारावे जलशुध्दीकरण केंद्राच्या देखभाल दुरुस्ती (मनुष्यबळासह) चे काम मे.महाराष्ट्र इलेक्ट्रोमेक कंपनी लि. यांचेकडे कंत्राटपध्दतीने देण्यात आले आहे. मृत कर्मचारी सदर कंत्राटदाराकडे कार्यरत असताना दिनांक 21/11/2005 रोजी सदर जलशुध्दीकरण केंद्रात झालेल्या अपघातात जखमी झाल्याने त्यांचेवरील उपचाराकरीता रु. 2,50,000/- इतकी रक्कम कंत्राटदाराने खर्च केली आहे. दिनांक 6/12/2005 रोजी त्याचा दुर्देवी मृत्यू झाला. संबंधित कंत्राटदाराने मृत व्यक्तीचा राज्य कामगार विमा योजनेअंतर्गत विमा उतरविलेला आहे. त्यानुसार त्याच्या नातेवाईकांना विमा रक्कम तसेच कर्मचारी भविष्य निर्वाह निधी योजनेअंतर्गत देय रक्कम मिळण्याबाबत आवश्यक कार्यवाही कंत्राटदाराकडून करण्यांत येत आहे. या संदर्भात महानगरपालिकेकडून कोणतीही कार्यवाही अपेक्षित नाही. मृताच्या नातेवाईकांनी कॉन्ट्रॅक्टरकडे रु. 3 लाख नुकसान भरपाईची मागणी केली असून कॉन्ट्रक्टरने रु. 50,000/- इतकी नुकसान भरपाई देण्याचे मान्य केले. परंतू सदर रक्कम स्वीकारण्यास मृताच्या कुटुंबियांनी नकार दिला आहे.

यानंतर श्री. शिगम .....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ KGS/ पूर्वी श्री. बरवड 13:20

(ता.प्र.क्र. 12951...

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, महानगरपालिकेने जलशुध्दीकरणाचे काम एका कंत्राटदाराला दिलेले होते. त्यामुळे महानगरपालिकेचा या बाबीशी थेट संबंध नाही. हे खरे असले तरी नुकसान भरपाई दिली पाहिजे असा महानगरपिालकेचा नियम आहे. माझा प्रश्न असा आहे की, स्फोटात जखमी झालेला आशीष वडके हा जर महानगरपालिकेचा कर्मचारी असता तर त्याला किती नुकसान भरपाई दिली गेली असती ? याबाबतीत त्या मुलाची आई आणि भाऊ आम्हाला भेटले. त्यांना कोणीही सांभाळणारे नसल्यामुळे त्यांना नुकसान भरपाई दिली पाहिजे. महानगरपालिकेच्या नियमाप्रमाणे किती नुकसान भरपाई मिळावयास पाहिजे ? तसेच कंत्राटदाराने ही नुकसान भरपाई द्यावी असे महानगरपालिका कंत्राटदाराला सांगणार आहे काय ?

श्री. राजेश टोपे : वॉटर ट्रीटमेंट प्लॅण्टच्या ठिकाणी अपघात झालेला आहे. तो कंत्राटदाराचा कर्मचारी होता. शॉक लागून किंवा आगीचा भडका उडाल्यामुळे तो 40 टक्के भाजला. कंत्राटदाराने त्याच्या उपचारावर अडीच लाख रुपये खर्च केलेले आहेत. त्यानंतर महानगरपालिकेने मध्यस्ती करुन 50हजार रुपये नुकसान भरपाई देण्यास कंत्राटदाराला सांगितलेले आहे. याचा अर्थ त्याची आई आणि भाऊ यांना 50 हजार रुपये देण्याची तजवीज महानगरपालिकेने केलेली आहे. कंत्राटदाराकडून 3 लाख रुपये खर्च करण्यात आलेला आहे. एम्प्लॉईज पेन्शन स्कीम तसेच इएसआयएसच्या माध्यमातून त्याच्या आईला दरमहा तीन ते सोडतीन हजार रुपये मिळणार आहेत. तसेच लेबर ॲक्टच्या माध्यमातून मदत करता येईल किंवा कसे हे तपासून पाहिले जाईल आणि तशा पध्दतीची मदत केली जाईल.

श्री. रामनाथ मोते : या अपघाताची चौकशी करण्यात आलेली आहे काय ? अशा प्रकारचे अपघात होऊ नयेत म्हणून कोणती उपाययोजना केलेली आहे ?

श्री.राजेशटोपे : ही ॲक्सीडेण्टल घटना आहे. इंडस्ट्रीयल सेफ्टी ॲण्ड हेल्थच्या मार्फत या अपघाताची चौकशी करण्यात आलेली असून त्यांनी देखील तसाच अभिप्राय दिलेला आहे. लाईन चालू असताना स्क्रू डायव्हर आत टाकल्यामुळे विजेचा भडका उडाला आणि तो भाजला.

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 12951...

श्री. मधुकर सरपोतदार : इएसआयएसच्या माध्यमातून मृताच्या कुटुंबीयांना पेन्शन मिळेल असे उत्तर देण्यात आले. हा कर्मचारी इएसआयएसचा केव्हा पासून सभासद होता ? जेव्हा अपघात झाला त्यावेळी इएसआयएसचे कॉण्ट्रीब्युशन भरले गेले होते काय ? इएसआयएसचे कॉण्ट्रीब्युशन भरले गेले नाही तर ती जबाबदारी कर्मचा-यावर टाकली जाते. तेव्हा याबाबतीत वस्तुस्थिती काय आहे ?

श्री. राजेश टोपे : इन्शुरन्स रक्कम भरली जात होती. त्यामुळे पेन्शन मिळण्यामध्ये कोणतीही अडचण येणार नाही ?

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तांबळडेग (ता.देवगड, जि. सिंधुदूर्ग) येथील समुद्राच्या व खाडीच्या मुखातील गाळ काढण्याबाबत**

**(३) * १३०७५ मेजर सुधीर सावंत , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तांबळडेग (ता.देवगड, जि. सिंधुदूर्ग) येथील समुद्राच्या व खाडीच्या मुखातील गाळ काढण्याबाबत जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी यांनी तसेच तांबळडेग येथील सामाजिक कार्यकर्ते व ग्रामस्थ यांनी मा. मत्स्यव्यवसाय मंत्री तसेच प्रधान सचिव महाराष्ट्र शासन यांचेकडे दिनांक २१ एप्रिल, २००५ रोजी एका निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समुद्रातील व खाडीच्या मुखामध्ये भरपूर गाळ साचल्याने तसेच वाळूचे ढिगारे निर्माण झाल्याने तेथील मच्छीमारांना मासेमारी करण्यासाठी समुद्रात जा - ये करणे अडचणीचे व गैरसोईचे झाल्याने त्यांचेवर उपासमारीची वेळ आली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, गाळ काढण्यासाठी शासनाने अद्याप मंजूरी दिलेली नाही हे खरे आहे काय सदर गाळ काढण्यासाठी अंदाजे किती निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे वा दिला आहे तसेच त्वरीत गाळ काढून मच्छीमारांवरील उपासमारीचे संकट टाळण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. हसन मुश्रीम श्री. अनिस अहमद यांच्याकरिता** : (१) होय. अशी मागणी दिनांक १३/४/२००५ च्या पत्राने केली आहे.

(२) नाही.

(३) सदर कामाचे आराखडे व अंदाज पत्रक तयार करण्याबाबत आयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी किनारी अभियंता, मुंबई यांना कळविले आहे.

श्री. कर्नल सुधीर सावंत : उत्तराच्या भाग 3 मध्ये असे म्हटलेले आहे की, सदर कामाचे आराखडे व अंदाजपत्रक तयार करण्याबाबत आयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी किनारी अभियंता मुंबई यांना कळविले आहे. मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, 31 मार्च 2004ला गाळ काढण्यासाठी 10 कोटी रुपये देण्यात आले असताना अद्याप पर्यन्त एकही पैसा खर्च झालेला नाही. मत्स्यव्यवसाय आयुक्त आणि पत्तन अभियंता यांच्यामध्ये टेंडर कोणी काढावे यासंबंधीचा वाद आहे. आज अनेक बंदरे गाळाने भरलेली आहेत.

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ MHM/ MAP/ KGS/ श्री.शिगम नंतर 13:25

ता.प्र.क्र. 13075 पुढे सुरु...

कर्नल सुधीर सावंत .....

या प्रश्नामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी लक्ष घातल्याशिवाय उपयोग होणार नाही. या विषयासंदर्भात त्यांच्याकडे एक बैठक झाली होती. परंतु अद्याप प्रश्न सुटलेला नाही. मोरवे गांव हे तांबळडेग गावाला लागूनच आहे. तेथे देखील गाळ काढण्याचे काम झालेले नाही. त्यामुळे जवळजवळ 1000 मच्छिमार मासेमारी करु शकत नाहीत. माझा प्रश्न असा आहे की, या प्रश्नाच्या संदर्भात असलेला दोन खात्यांमधील वाद मिटविण्यचासाठी शासन कोणते प्रयत्न करणार आहे ? तांबळडेग येथील खाडीच्या मुखातील गाळ काढण्याचे काम केव्हा पूर्ण होणार आहे ?

श्री. हसन मुश्रीफ: सभापती महोदय, दोन वेगवेगळे प्रश्न मांडण्यात आले आहेत. तांबळडेग खाडीमधील गाळ काढण्यासाठी किनारी अभियंता यांना कळविण्यात आलेले आहे. या कामासाठी साधारणपणे 50 लाख रु. खर्च येईल असा अंदाज आहे. या कामासाठी सर्वेक्षण करुन आणि त्याला प्रशासकीय मान्यता घेऊन निधीच्या तरतुदीनुसार काम करावे लागेल. जुलै 2004 मध्ये कोकण पॅकेजमधून 2 कोटी 82 लाख रुपये कोकण विभागातील विविध खाडयांमधील गाळ काढण्यासाठी मंजूर केले होते. किनारी अभियंता आणि मत्स्यव्यवसाय खाते यांच्यामध्ये यासंदर्भात वाद होता. आता हा वाद राहिलेला नाही. 25 जानेवारी रोजी टेंडर काढलेली आहेत ती फायनल करुन निर्णय झाल्यावर लवकरात लवकर काम सुरु करण्यात येईल.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभ्ापती महोदय, मत्स्यव्यवसाय मंत्रालय काय काम करते हे आम्हां कोकणवासियांना समजत नाही. एक वर्षापूर्वी उर्वरित वैधानिक विकास मंडळामार्फत साडेचार कोटी रु. रत्नागिरी बंदराच्या विकासासाठी माननीय सदस्य आणि मंडळाचे अध्यक्ष श्री.उल्हास पवार यांनी उपलब्ध करुन दिले होते. 5 महिन्यानंतर अधिकाऱ्यांनी पत्र पाठविले की हे पैसे आम्ही खर्च करु शकत नाही. आमच्याकडे एजन्सी नाही असे उत्तर दिले गेले. 10 कोटी रुपये कोकण पॅकेजमधून दिल्यानंतर तांबळडेग किंवा अन्य बंदरातील गाळ काढण्यासाठी एजन्सी नव्हती. पैसे उपलब्ध करुन एजन्सी काम करणार नसेल तर अशा एजन्सी हव्या कशाला ? अशा अधिकाऱ्यांवर शासन कोणती कारवाई करणार आहे ? जो निधी उपलब्ध करुन दिला आहे तो शासन खर्च करणार आहे काय ?

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ MHM/ MAP/ KGS/ श्री.शिगम नंतर 13:25

ता.प्र.क्र. 13075 पुढे सुरु...

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, उर्वरित वैधानिक विकास मंडळाकडून साडेचार कोटी रुपये उपलब्ध करुन दिल्यावर ते आमच्या खात्याकडून खर्च न करता परत पाठविण्यात आले याबाबत चौकशी करण्यात येईल आणि त्यामध्ये सत्य आढळून आले तर संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात येईल. गाळ काढण्यासाठी लवकर टेंडर काढून पावसाळयापूर्वी काम सुरु करण्यात येईल.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, सागरी महामंडळ हे बंदर खात्याच्या अंतर्गत येते. प्रश्न सुध्दा बंदर खात्याअंतर्गत येतो. प्रश्नाला उत्तर मत्स्यव्यवसाय खात्याचे मंत्री देत आहेत. प्रत्यक्ष काम करणार आहे ते बंदर खाते. दोन्ही खात्यामध्ये समन्वय नाही. रत्नागिरीपासून जी विविध बंदरे आहेत त्यामध्ये गेल्या अतिवृष्टीनंतर प्रचंड प्रमाणावर गाळ साचला आहे. हा गाळ केव्हा काढण्यात येणार आहे आणि असा गाळ किनारपट्टीवर पुन्हा साचू नये म्हणून कोणती उपाययोजना करण्यात येणार आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, जो निधी उपलब्ध झाला आहे तो मत्स्यव्यवसाय खात्याकडे उपलब्ध झाला आहे. प्रश्न विचारला आहे तो मत्स्यव्यवसाय मंत्री यांना विचारला आहे. कोकण पॅकेजमधून 10 कोटी रुपये उपलब्ध करुन दिलेले आहेत त्यामधून टेंडर काढून त्यानंतर गाळ काढण्याची मोहीम हातामध्ये घेण्यात येईल.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, मी आपल्याकडे संरक्षण मागतो. या प्रश्नामध्ये तीन वेगवेगळी खाती गुंतलेली आहेत. या खात्यांमध्ये समन्वय नाही.

नंतर भारवि

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13075..

कर्नल सुधीर सावंत...

किनारी अभियंता हे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत येते. त्यामुळे त्यांनी काढलेले टेंडर हे मस्त्यव्यवसाय विभाग मानायला तयार होत नाहीत. मस्त्यव्यवसाय विभाग म्हणतो आम्ही टेंडर काढणार. टेंडर कोणी काढायचा हा वाद अजूनही मिटलेला नाही. त्यामुळे यात माननीय मुख्यमंत्र्यांनी लक्ष देणे आवश्यक आहे. या कामासाठी निधी देऊन दोन वर्ष झाली आहेत. परंतु, अद्यापत टेंडर काढलेले नाही. तेव्हा दोन विभागांमध्ये समन्वय साधण्याचे आदेश शासना देणार आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, या कामासाठी रुपये तीन कोटीची तरतूद करण्यात आली आहे. सदर काम लवकर पूर्ण करण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षेखाली बैठक बोलावून काम पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, तांबडडेग येथील खाडीचा गाळा काढावयाचा आहे. येथे एकूण किती मच्छिमार आहेत, त्यांच्या किती होडया आहेत व बंदरामध्ये किती मच्छिमारीचे उत्पादन होते ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, येथे एकूण 124 कुटुंब असून एकूण 603 मच्छिमार आहेत. त्यात प्रत्यक्ष मच्छिमार करणाऱ्यांची संख्या 203 असून यांत्रिकांची संख्या 25 आहे, तर बिगर यांत्रिकांची संख्या 14 आहे. येथे गेन व रापण पध्दतीने मच्छिमारी होते.

...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**जळगांव नगरपालिकेमध्ये गत २० वर्षात झालेल्या गैरव्यवहाराबाबत नेमलेल्या चौकशी अहवालाची अंमलबजावणी करण्याबाबत**

**(४) * १४५९५ श्री. गुरुमुख जगवानी , श्री. जगदिश गुप्ता , श्री. नितीन गडकरी , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री.सागर मेघे : तारांकित प्रश्न क्रमांक १०४०६ ला दिनांक १४ डिसेंबर, २००५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव नगरपालिकेमध्ये २० वर्षात झालेल्या गैरव्यवहार व भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या समितीने आपला अहवाल दिल्यानंतर दिनांक २६ जुलै, १९९४ रोजी नगरपालिका बरखास्त करण्यात आली हे खरे आहे काय,

(२) सदर ३ जिल्हाधिकाऱ्यांनी जळगांव नगरपरिषदेमध्ये गेल्या २० वर्षात झालेला गैरव्यवहार व भ्रष्टाचारा प्रकरणी दिलेल्या एकत्रित अथवा स्वतंत्र अहवालाची छाननी पूर्ण झाली आहे काय,

(३) सदर अहवालामध्ये २० वर्षांच्या भ्रष्टाचार व गैरव्यवहाराबद्दल कोणकोणाला दोषी धरण्यात आले आहे, व त्यांनी केलेल्या गैरव्यवहार व भ्रष्टाचाराचे नेमके स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, संबंधितांवर काय कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

**श्री.राजेश टोप**, **श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता**: (1) दि. 26/7/94 रोजी तत्कालीन जळगांव नगरपालिका बरखास्त करण्यात आल्याची बाब खरी आहे.

(२), (३) व (४) सदर ३ जिल्हाधिकाऱ्यांचे अहवाल न्या.पी.बी.सावंत या चौकशी आयोगाकडे पाठविण्यात आले. न्या.पी.बी.सावंत चौकशी आयोगाच्या निष्कर्षानुसार करावयाच्या कार्यवाहीबाबत शासनाने एक कार्यबल नियुक्त केला होता. सदर कार्यबलाच्या अहवालास आव्हान देण्यात आले असून, सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी शासनाचे एका मुद्दाकडे लक्ष वेधू इच्छितो. न्या.पी.बी.सावंत चौकशी आयोगाच्या निष्कर्षानुसार करावयाच्या कार्यवाहीबाबत औरंगाबाद उच्च न्यायालयाने दिनांक 7.4.2006 रोजी निर्णय दिला आहे. त्यामुळे या लेखी उत्तरामध्ये शासनाला काही दुरुस्ती करावयाची आहे काय ? असे मला विचारावयाचे आहे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, अलीकडेच हायकोर्टाचा निकाला लागला आहे. सावंत आयोगासंबंधी जे निदेश हायकोर्टाने दिले आहेत, त्यासंबंधीच्या मुद्यासंबंधीचा खुलासा मी माझ्या उत्तरात करीन.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.14595 ...

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, लेखी उत्तरामध्ये दुरूस्ती करावयाची आहे किंवा नाही असा माझा मुद्दा आहे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, हायकोर्टाचा निकाल लागला आहे. त्यामध्ये वेगळा टास्क फोर्स समितीची शिफारस करण्यात येऊ नये असे म्हटले आहे. (अडथळा) कार्यबल गट आहे. त्या कार्यबल गटाच्या समितीची शिफारस विचारात घेण्यात येऊ नये. न्यायमूर्ती सावंत आयोग यांचा प्रस्ताव मान्य किंवा अमान्य करावा असा उल्लेख हायकोर्टाच्या निर्णयामध्ये आहे. एवढी दुरूस्ती उत्तरामध्ये करावी.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी दुरूस्ती काय केली आहे ? त्या खोलात मी जात नाही. न्यायमूर्ती सावंत आयोगाचा अहवाल स्वीकारावा किंवा तो स्वीकारू नये असे स्पष्ट निदेश हायकोर्टाने दिले आहेत. म्हणजे आता हे प्रकरण सबज्युडीस नाही. असे जरी असले तरी न्यायमूर्ती सावंत यांचा अहवाल जीवंत आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MAP/ SBT/ पूर्वी श्री.भारवि.... 13:35

ता.प्र.क्र.14595....

श्री.नितीन गडकरी....

त्यावर सुकथनकर समितीचा ॲक्शन टेकन रिपोर्ट आहे. तीन जिल्हाधिकाऱ्यांपैकी एका जिल्हाधिकाऱ्याने 7/12 च्या उताऱ्यावर नोंद केली की, हे अतिक्रमण आहे. त्याचा रिपोर्ट सावंत आयोगाला दिला होता. त्या आधारावर जळगाव महानगरपालिकेच्या आयुक्तांनी 41 नगरसेवकांना डिस्कॉलिफाय करण्याची नोटीस दिली. वास्तविक पाहता नोटीस देणे हा एक प्रोसेसचा भाग आहे. परंतु अशा नोटीसीला "स्टे" देणे ही बाब बहुधा पहिल्यांदाच घडली असावी. या नोटीसीला माननीय नगरविकास राज्यमंत्री महोदयांनी स्टे दिलेला आहे. माननीय मुख्यमंत्री महोदय, आपण या खात्याचे कॅबिनेट मंत्री आहात. आयुक्तांच्या निर्णयाला स्थगिती देण्याचा अधिकार आहे, परंतु नोटीसीला स्थगिती देण्याचा आपण नव्याने अध्यादेश काढला आहे काय ? त्यामुळे स्टे देण्याचा जो प्रकार राज्यमंत्री महोदयांनी केला आहे तो कोणत्या नियमाने केला आहे ? नियमाने केला नसल्यास, तो रद्द करण्यात येईल काय ?

श्री.राजेश टोपे : महोदय, बी.पी.एम.सी. ॲक्टच्या कलम 451 मध्ये असे म्हटले आहे की, कोणतीही अनलॉफिल गोष्ट नगरपालिकेचा तसा आदेश किंवा ठराव असेल तर ती विखंडीत करण्याचा अधिकार आहे. या प्रकरणा संदर्भात श्री.जोशी कमिटीच्या संदर्भातील हिअरिंग माझ्याकडे सुरु आहे. जोशी समितीच्या दृष्टिकोनातून हाय कोर्टाने स्पष्ट निर्णय दिला आहे की, जोशी समितीमध्ये अंतर्भूत असलेले जे 6 मुद्दे आहेत, त्याबाबत अधिकारी/पदाधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्याशिवाय कोणतीही ॲक्शन घेऊ नये किंवा कार्यवाही करु नये. असे असताना जळगांव महानगरपालिकेच्या आयुक्तांनी 41 नगरसेवकांना या मुद्यांच्या अनुषंगाने नोटीस काढली असेल तर ते कंटेप्ट ऑफ कोर्ट होऊ शकते असे मला वाटते. त्यामुळे यामध्ये कंटेप्ट ऑफ कोर्ट होऊ नये म्हणून मी नोटीसीला स्टे दिला आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी अतिशय साधा आणि सोपा प्रश्न विचारला आहे. 20 वर्षातील जळगाव महानगरपालिकेतील हा भ्रष्टाचार आहे. तीन जिल्हाधिकाऱ्यांनी या भ्रष्टाचाराची चौकशी केली आणि त्यातून वेगवेगळे अहवाल समोर आले. जोशी समितीने सुध्दा अहवाल दिलेला आहे. या संदर्भात सावंत आयोगाने सांगितले आहे की, सावंत आयोगाने सुचविल्यानुसारच कारवाई केली पाहिजे. महोदय, 21 मार्च

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MAP/ SBT/ पूर्वी श्री.भारवि.... 13:35

ता.प्र.क्र.14595....

श्री.पांडुरंग फुंडकर...

रोजी सर्व सदस्यांना आयुक्तांनी नोटीस दिली. त्यामध्ये असे म्हटले आहे की, " आपणास तीन दिवसांच्या आत डिस्क्वॉलिफाय का करु नये याबाबतचे उत्तर तुम्ही द्यावे." असे असताना या नोटीसीला दुसऱ्याच दिवशी म्हणजे 22 मार्च रोजी नगरविकास राज्यमंत्र्यांनी स्टे दिला आहे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी जो मुद्दा उपस्थित केला तो महत्वाचा आहे. त्यामुळे मी विचारु इच्छितो की, कायद्याने अशा पध्दतीने स्थगिती देता येते काय ? जर कायद्याने ती स्थगिती दिली गेली नसेल तर ती आपण उठविणार आहात काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, हाय कोर्टाच्या ज्या ऑर्डर्स आहेत त्याचा मी अगोदरच स्पष्टपणे उल्लेख केला आहे. जे सहा मुद्दे होते त्या मुद्यातील एखाद्या मुद्याच्या अनुषंगाने नोटीस काढली असेल आणि त्यामध्ये अनलॉफिल सारखे काही घडले आहे असे वाटल्यावरुन स्थगिती देण्यात आली आहे. कारण मुख्य मुद्दा कंटेप्ट ऑफ कोर्ट होऊ नये हा आहे. या बाबतचे हिअरिंग लवकरात लवकर घेऊन पुढील योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, 7 तारखेला औरंगाबाद हाय कोर्टाने दिलेल्या निर्णयाप्रमाणेच, सावंत आयोगाचा रिपोर्ट जीवंत आहे.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.14595 ....**

श्री. नितीन गडकरी ....

सभापती महोदय, यामध्ये कंटेम्प्ट ऑफ कोडचा प्रश्न कसा काय निर्माण होतो ? हे मला कळत नाही. राज्यामध्ये क्वॉसी ज्युडिशिअल पदांचा गैरवापर होतो, म्हणून असे प्रश्न निर्माण होतात. सभापती महोदय, ठरावाला स्थगिती देण्याचा अधिकार आहे, कमिशनरच्या निर्णयाला स्थगिती देण्याचा अधिकार आहे, परंतु नोटीशीला स्थगिती देण्याचा अधिकार नाही. मग आय.ए.एस. कमिशनरची नियुक्ती केली तर कंटेम्प्ट ऑफ कोड होणार नाही. सभापती महोदय, अशाप्रकारे सरकार चालविणे योग्य नाही. नोटीशीला स्टे दिला तर प्रशासन कसे काय चालणार ? तरी, या संदर्भात माझा माननीय मुख्यमंत्र्यांना प्रश्न आहे की, नोटीशीला स्टे देण्याचा अधिकार सरकारला आहे का ? आणि नसेल तर नोटीशीला दिलेला स्टे रद्द करणार का ?

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, हा विषय हाताळण्याचे सर्व अधिकार मी राज्यमंत्र्यांना दिलेले आहेत. राज्यमंत्री जेव्हा एखादा निर्णय घेतात, त्यावेळी त्या निर्णयाची जबाबदारी कॅबिनेट मंत्र्याकडे येते. मी कॅबिनेट मंत्री आहे. मी तो विषय राज्यमंत्र्यांकडे वर्ग केलेला आहे. त्यांनी या संदर्भात निर्णय घेतलेला आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, नोटीशीला स्टे देण्याचा अधिकार आहे का ? या प्रश्नाचे उत्तर मला हवे आहे.

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, कायद्याच्या कलमांचा अर्थ कसा घ्यायचा हे व्यक्तींनुसार बदलते. मी माझे अधिकार राज्यमंत्र्यांना ट्रान्सफर केले आहेत.

श्री. नितीन गडकरी : याचा अर्थ असा आहे का की, कायदा नसला तरीही तसा निर्णय घ्यायचा.

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्रिमहोदयांनी ज्याप्रमाणे याचा अर्थ समजून घेतला आहे, त्याप्रमाणे त्यांनी निर्णय दिलेला आहे. त्या संदर्भात मी माझे वेगळे मत व्यक्त करणे बरोबर होणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.14595 ....**

श्री. गुरुमुख जगवानी : सभापती महोदय, जलगांव नगरपालिका में पिछले 20 वर्षों में जो भ्रष्टाचार हुआ है, उसके कारण आज यह नगरपालिका करीब 400 करोड़ रुपये के कर्ज में दब गई है. नगरपालिका में हो रहे भ्रष्टाचार की वजह से आम नागरिक परेशान है. विकास नहीं हो रहा है. इसलिए मेरी यह मांग है कि मुंबई लोकल फंड एक्ट के सेक्शन 108 के तहत और बीपीएमसी एक्ट के सेक्शन 10 एवं 11 के तहत जलगांव नगरपालिका के कार्य का स्पेशल ऑडिट किया जाए. क्या सरकार स्पेशल ऑडिट करवाएगी ? दूसरा मेरा प्रश्न यह है कि, जो लोग भ्रष्टाचार के आरोप में दोषी पाए गए हैं, उनको कितने दिनों के अंदर सजा दिलवाई जाएगी ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांच्या प्रश्नाला उत्तर दिले आहे की, कोणत्याही परिस्थितीत या संदर्भातील हिअरिंग लवकरात लवकर घेऊन स्टे संदर्भातील निर्णय देण्यात येईल. सभापती महोदय, यामध्ये काही गैरकारभार आढळला त्यासंदर्भात जोशी कमिटी नियुक्ती केली, त्याचाही रिपोर्ट देण्यात आला आहे. सावंत कमिशन देखील नेमण्यात आले. जैन साहेबांच्या कमिशनमध्येही याबाबत झाले. फक्त महानगरपालिकाच नाहीत तर दोन्ही प्रश्नांसंदर्भातील हिअरिंग संदर्भात लवकर निर्णय घेतला जाईल. परत स्पेशल ऑडीट करण्याची गरज नाही.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.14595...

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय मंत्री महोदयांनी जे उत्तर दिलेले आहे त्याला अनुलक्षून माझा असा प्रश्न आहे की, या प्रकरणाची सुनावणी आपण किती दिवसांमध्ये पूर्ण करणार आहात ? दुसरा प्रश्न असा आहे की, जळगांव महानगरपालिकेत घरकुल योजनेमध्ये गैरप्रकार झालेला आहे व त्यामध्ये 78 नगरसेवक दोषी आढळलेले आहेत, त्यांच्या विषयी गेल्या तीन महिन्यापासून महानगरपालिका आयुक्त यांनी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केलेली आहे, एफआयआर दाखल झालेला आहे, पोलीस स्टेशनने आतापर्यंत संबंधितांवर कारवाई केलेली नाही, ती कारवाई न होण्याची कारणे काय आहेत ? मंत्री महोदयांनी या प्रकरणाला सुध्दा स्टे दिलेला आहे काय ? आयुक्तांनी दिलेल्या तक्रारीची दखल पोलीस स्टेशन घेत नाही, म्हणजेच या प्रकरणाच्या पाठीमागे कोणीतरी आहे काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाचे उत्तर मी अगोदरच दिलेले आहे, एक महिन्याच्या आत सुनावणी घेऊन निर्णय घेण्यात येईल. तसेच जळगांव महानगरपालिकेत घरकुल योजनेमध्ये जो गैरप्रकार झालेला आहे त्यामध्ये दोषींवर एफआयआर दाखल झालेला आहे, पुढील चौकशी चालू आहे यासाठी कोणाचाही दबाव येण्याचे काहीही कारण नाही.

---------------------

........2.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सायन येथील वाहतूकीची कोंडी फोडण्यासाठी उड्डाणपूल बांधण्याबाबत**

**(५) * १३३०१ श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. धनाजी साठे , श्री. रमेश निकोसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सायन येथे वाहतुकीची होणारी कोंडी फोडण्यासाठी सायन येथे ठाणे ते मुंबई या मार्गावर उड्डाण पूल बांधण्याच्या प्रकल्पास प्रशासनाने मान्यता दिली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नियोजित पुलाचे कामाचा शुभारंभ केव्हापासून करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, सदर पुलाचे बांधकाम पूर्ण होण्यासाठी किती कालावधी लागेल ?

**श्री. राजेश टोपे, श्री. विलासराव देशमुख, यांच्याकरिता** : (१) मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत डॉ. आंबेडकर रस्त्यावरील अस्तित्वातील सायन उड्डाणपुलाचे दुहेरीकरण करणे, पूर्व द्रुतगती महामार्गावर सुमननगर चेंबूर येथे उड्डाणपूल बाधणे आणि पूर्व द्रुतगती महामार्गावर नवघर जंक्शन मुलूंड (पूर्व) येथे उड्डाणपूल बाधणे, कामांचा समावेश करण्यात आला असून सदर कामाची अंमलबजावणी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत करण्यात येणार आहे.

(२) सायन उड्डाणपुलाचे दुहेरीकरण करणे या कामाची निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

(ब) सुमननगर चेबूर येथे उड्डाणपुल बांधण्याच्या कामास दि. २४/११/२००५ रोजी कार्यादेश देण्यात आले असून सदरचे काम प्रगतीपथावर आहे.

(क) नवघर मुलूंड (पूर्व) येथील उड्डाणपुलाच्या कामाकरीता निविदा मागविण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) वरील तिन्ही कामे कार्यारंभ आदेश दिल्यापासून अठरा महिन्याच्या कालावधीत पूर्ण होईल असे अपेक्षित आहेत.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, हा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे. सुमननगर व सायन येथे रहदारी मोठया प्रमाणात असल्यामुळे तेथे हे दोन उडड्‌ाण पूल बांधण्यात येत आहेत. सायन येथील उड्डान पूलासाठी निविदा प्रक्रिया कीती दिवसात पूर्ण करण्यात येईल व या कामांसाठी अर्थसंकल्पात कीती रक्कम राखून ठेवण्यात आलेली आहे. मुंबईच्या प्रवेशद्वारावर हे पूल असल्यामुळे पूल बांधतांना त्यांना अग्रक्रम का देण्यात आलेला नाही ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सुमनगर, सायन व नवघर हे तीन उड्डाण पूल बांधण्यात येत आहेत, त्यातील सुमननगर पूलाचे काम एमयूआयपीच्या अंतर्गत एमएसआरडीसीकडून करण्यात येत आहे. तेथील काम हे प्रगती पथावर आहे. नोव्हेंबर, २००६ पर्यंत हे काम पूर्ण होणार आहे. तसेच सायन येथील पूलाच्या संदर्भात निविदा मागविण्यात आल्या होत्या, त्या कामासाठी दोन निविदा आल्या होत्या, या दोन निविदा जास्त दराच्या व योग्य नसल्यामुळे परत निविदा मागविण्यात येत आहे, निविदा जास्त प्रमाणात येण्यासाठी व निविदांमध्ये स्पर्धा निर्माण होण्यासाठी मोठया प्रमाणात जाहिरात करुन निविदा मागविण्यात येतील, निविदा आल्यानंतर त्यांची खात्री करुन घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल. ...३...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.१३३०१...

श्री. प्रमोद नवलकर : सभापती महोदय, माझा माननीय मुख्यमंत्री महोदयांना असा प्रश्न आहे की, सायन-चेंबूर व नवघर या पूलाच्या संकल्पित मार्गावर कोणी गायक गायिका राहतात काय ? पूलाच्या कामात कोठे अडथळा येऊ नये म्हणून मी हा प्रश्न विचारीत आहे.

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, सदर परिसरामध्ये अनेक कलावंत राहत असतील, परंतु कोणताही पूल बांधत असतांना रहदारीचा विचार करुन पूल बांधण्यात येतो. पूल बांधण्याचा क्रायटेरिया रहदारीचा लावण्यात येतो, त्या रस्त्यावर कोण राहतो व कोण राहत नाही हा क्रायटेरिया लावण्यात येत नाही.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, या पूलावर अनेक ठिकाणी बोटल नेक आहेत, सन्माननीय सदस्य श्री. गडकरी साहेबांनी सांगितल्याप्रमाणे अशा प्रकारची चौकशी करुन सर्वे करण्यात आलेला आहे काय ?

यानंतर श्री. सरफरे...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 13301...

डॉ. दीपक सावंत....

सायनच्या पुढे बॉटलनेक होते व वहातूक तासन तास निघत नाही. याचे सर्व्हेक्षण करण्यासाठी आपण धोरणात्मक निर्णय घेणार काय? त्याचप्रमाणे त्याठिकाणी असलेली पोलीस चौकी कार्यरत नाही. तेथील वहातूक नियंत्रित करण्यासाठी ती पोलीस चौकी आपण सुरु करणार काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाचे उत्तर सजेशन फॉर ॲक्शन आहे.आणि दुसरा प्रश्न वेगळया विभागाशी संबंधित आहे.

श्रीमती सुधा जोशी : मुंबईमध्ये उड्डाण पूल बांधण्यात आले त्यावेळी सायन सर्कल इथे एका दिशेने उड्डाण पूल बांधण्यात आला होता. तो मुंबईहून ठाणे या मार्गावर बांधण्यात आला त्यावेळी जागेअभावी विरुध्द दिशेच्या वहातुकीसाठी पूल बांधण्याचे काम हाती घेण्यात आले नाही. प्रश्न असा आहे की, आंबेडकर मार्गावरील अस्तित्वात असलेल्या सायन उड्डाण पूलाचे दुहेरीकरण करण्यात येणार आहे. हे दुहेरीकरण करण्यासाठी त्याठिकाणी जागा उपलब्ध आहे काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, त्याठिकाणी जागा आहे. मे 2006 मध्ये या कामाचे टेंडर काढले जातील, आणि ऑक्टोबर 2006 मध्ये काम सुरु होईल व 18 महिन्यात काम पूर्ण होईल.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी दिलेले उत्तर गंभीर स्वरुपाचे असल्यामुळे त्याची नोंद घेणे आवश्यक आहे. मंत्रिमहोदय म्हणाले की, टेंडर मागविण्यात आले परंतु त्या ठिकाणी दोनच निविदा आल्यामुळे त्या निविदा रद्द करण्यात आल्या. याबाबतचे हे खरे कारण नसून खरे कारण असे आहे की, आपल्याला हव्या असलेल्या माणसांनी टेंडर न भरल्यामुळे ते टेंडर रद्द करण्यात आले हे खरे आहे काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, त्या ठिकाणी दोन निविदा भरण्यात आल्या होत्या. त्यापैकी एके ठिकाणी साडे 19 टक्केची निविदा होती तर दुसरी साडे 14 टक्केची होती. या निविदा एस्टिमेट कॉस्टपेक्षा जास्त असल्यामुळे त्या रद्द करण्यात आल्या. याबाबत स्पर्धात्मक निविदा प्राप्त झाल्यानंतर त्याठिकाणी निर्णय घेणे उचित होईल.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, सुमन नगर येथील पूलाचे बांधकाम प्रगतीपथावर असल्याचे म्हटले आहे. त्याठिकाणी असलेल्या चौकामध्ये अण्णाभाऊ साठे यांचे स्मारक आहे. या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

19-04-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही )LL 2

DGS/ SBT/ MAP/ 13:50

ता.प्र.क्र. 13301...

श्री. प्रकाश शेंडगे...

पूलाच्या बांधकामामुळे अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकाला धोका पोहोचणार आहे. त्याकरिता आपण धोरणात्मक निर्णय घेणार आहात काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी सांगितलेली बाब निश्चितपणे तपासून पहाण्यात येईल. त्याठिकाणी अण्णा भाऊ साठे यांच्या स्मारकाला अडथळा येत असेल तर ती बाब तपासून घेऊन उचित निर्णय घेण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या प्रश्नाच्या बाबतीत आपल्या कार्यालयाकडून चूक झाली आहे असे मला वाटते. वास्तविक हा प्रश्न नगर विकास विभागाकडे न जाता तो एम.एस.आर.डी.सी.कडे जावयास हवा होता. म्हणजेच या प्रश्नाचे उत्तर माननीय मंत्री श्री. अनिल देशमुख यांनी देणे आवश्यक होते..

**सभापती :** या प्रश्नाचे 90 टक्के उत्तर मंत्रिमहोदयांनी दिले आहे...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, अण्णा भाऊ साठे यांच्या स्मारका संदर्भात माननीय श्री. अनिल देशमुख यांच्याबरोबर झालेल्या बैठकीमध्ये मागणी केली होती. त्यावेळी माननीय श्री. अनिल देशमुख यांनी जो निर्णय घेतला तो याठिकाणी सांगणे बरोबर नाही. हा प्रश्न जर त्यांच्या विभागाकडे गेला असता तर त्याचे योग्य उत्तर आले असते...

**सभापती :** माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांनी या संबंधी माननीय श्री. अनिल देशमुख यांना माहिती द्यावी.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, होय.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, मी ठाण्यावरुन दररोज मुंबईमध्ये येतो. चेंबूर येथील एव्हराईड नगरच्या सर्कलजवळ नेहमी ट्रॅफिक जॅम होते. चेंबूर व ठाणे येथून येणारी वाहने त्या ठिकाणी एकत्र येतात. त्या ठिकाणी मेगा ब्लॉक टाकण्यात आला आहे. आर.सी.एफ. च्या रेल्वे लाईनच्या डाव्या बाजूला मेगा ब्लॉक टाकला आहे. तेथील वहातूक सुरळीत होण्यासाठी आपण रेल्वे पूलाच्या खालून वहातुकीची व्यवस्था केली तर या मेगा ब्लॉकच्या माध्यमातून पुणे-चेंबूरकडून वहातूक मुंबईकडे येते ती सायनकडे सुध्दा जाईल. आणि त्यामुळे सुमन नगर येथील ट्रॅफिकचा घोळ कमी होईल.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 13301 (पुढे सुरु....

श्री.राजेश टोपे : ही बाब तपासून पहाण्यात येईल आणि उचित निर्णय घेण्यात येईल.

श्री.अनंत तरे : सभापती महोदय, प्रश्न असा आहे की, प्रचंड ट्राफिक असल्यामुळे मुलुंड येथे उड्डाण पूल बांधणार आहात. उड्डण पुलावरुन पादचारी सबवे बांधणार आहात काय ? मुलुंड ते नवघर ॲक्ट्रॉय नाका आहे, तो मुलुंडच्या हद्दीपर्यन्त नेणार आहात काय ? मी सन्माननीय बांधकाम मंत्री श्री.छगन भुजबळ साहेबांना पत्र पाठवून विनंती केलेली होती परंतु त्या पत्राला त्यांनी उत्तर दीलेले नाही. मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्री यांना पत्र लिहिले तर त्यांच्याकडून उत्तर दिले जाते. परंतु मंत्री महोदयांना पाठविलेल्या पत्रांना त्यांच्याकडून उत्तर मिळत नाही. प्रश्न असा आहे की, सब वे मुलुंड ते नवघर जंक्शनपर्यन्त न्या. त्या ठिकाणी पादचाऱ्यांचे अपघात होतात म्हणून त्या ठिकाणी सब वे बांधण्यासाठी पत्र लिहिलेले होते परंतु मंत्री महोदय उत्तर देत नाहीत. मंत्री महोदयांनी आम्ही पाठविलेल्या पत्रांना उत्तर द्यावे.

श्री.राजेश टोपे : ही बाब तपासून पहाण्यात येईल.

--

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ SBT/

**नाशिक महापालिकेच्या लेखा विभागाने राबविलेल्या दुहेरी नोंद पध्दतीच्या निविदा प्रक्रियेबाबत**

**(६) * १५११४ श्री. अरविंद सावंत , श्री. विलास अवचट , श्री. नितीन गडकरी , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. विनोद तावडे , श्री. जगदिश गुप्ता , श्री. शांताराम करमळकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महापालिकेच्या लेखा विभागासाठी दुहेरी नोंद पध्दतीने काम करण्यासाठी राबविलेल्या निविदा प्रक्रियेमुळे सुमारे सव्वा दोन कोटी रुपयांचे नुकसान होत असल्याचा आरोप माहे जानेवारी, २००६ च्या सुमारास माजी महापौर नाशिक यांनी केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तसेच ही संशयास्पद पध्दतीने करण्यात आलेली निविदा प्रक्रिया रद्द करुन यात सामील असलेल्या पालिका अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणीही केली हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत अधिक चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) तद्नुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता :** (१) (२) (३) व (४) नाशिक महानगरपालिकेने द्विनोंदी लेखा पध्दतीने काम देण्यासाठी निविदा मागितल्या होत्या. सदर निविदांच्या संदर्भात शासनाकडे लोकप्रतिनिधींची तक्रार प्राप्त झाल्यामुळे शासनाने सचिव, सामान्य प्रशासन विभाग (माहिती व तंत्रज्ञान) यांना चौकशी करण्याचे आदेश दिलेले होते. त्याचा अहवाल प्राप्त झाला असून त्याची छाननी करण्यात येत आहे.

ही बाब मुंबई उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे.

श्री.अरविंद सावंत : लेखा विभागासाठी दुहेरी नोंद पध्दतीने काम करण्यासाठी सांगितलेले आहे. बाटलीबॉय कंपनीकडून निविदा आलेली आहे त्यांनी १ कोटी ५६ लाखाची निविदा दिली. त्यानंतर महानगरपालिकेने मराठी माणसाच्या कंपनीला अडचण करण्यासाठी जी निविदा सोईस्कर होती ती नाकारली आणि मोसीकॉन कंपनीची ३ कोटी २९ लाखाची निविदा होती ती स्वीकारली. कोणतीही निविदा न मागविता स्वत:च्या अधिकारामध्ये निर्णय केला. माझा प्रश्न असा आहे की, उत्तरामध्ये म्हटलेले आहे की,"चौकशी करण्याचे आदेश दिलेले होते. त्याचा अहवाल प्राप्त झाला असून त्याची छाननी करण्यात येत आहे". हा अहवाल केव्हा प्राप्त झाला ? त्या अहवालाची छाननी किती दिवसात पूर्ण होईल ? संबंधितांवर केव्हा कारवाई केली जाईल ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ SBT/

ता.प्र.क्र.15114 (पुढे सुरु...

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, अहवाल मागच्या आठवड्यामध्ये प्राप्त झालेला आहे. त्यामुळे त्याबाबतचा उचित निर्णय निश्चित घेण्यात येईल. दुसरी बाब मला निदर्शनास आणून द्यावयाची आहे की, हे प्रकरण आता न्यायप्रविष्ट आहे. न्यायालयाचा निकाल येईल त्यानंतर कारवाई करावी लागेल.

श्री.विलास अवचट : हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. न्यायालयामध्ये कोण गेलेले आहे ? दुसरा प्रश्न असा आहे की, शासनाने महानगरपालिकेला आदेश दिले, त्याप्रमाणे निविदा काढण्यात आल्या. अहवालाची छाननी सुरु आहे त्यामुळे प्राथमिक स्वरुपामध्ये आपण अहवाल पाहिला असेल तर त्या अहवालाचे स्वरुप काय आहे ?

श्री.राजेश टोपे : मी अहवाल पाहिलेला नाही. त्या अहवालाची छाननी चालू आहे, छाननी नंतर त्या संबंधातील निर्णय घेण्यात येईल.

श्री.विलास अवचट : कोर्टामध्ये कोण गेले ?

श्री.राजेश टोपे : शासनाने त्यास स्थगिती दिलेली होती, त्याच्या विरुध्द ते कोर्टात गेलेले आहेत.

श्री.श्रीकांत जोशी : सिंगल एन्ट्रल सिस्टीमऐवजी डबल एन्ट्री सिस्टीम केल्यामुळे अतिरिक्त खर्चाचे प्रमाण वाढते, हे खरे आहे काय ? दुसरे असे की, या पध्दतीमुळे जो काही आर्थिक भार वाढणार आहे? तो भार शासन सोसणार आहे काय ?

श्री.राजेश टोपे : हा वेगळा प्रश्न आहे.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबईला आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर बनविण्यासाठी**
**शहरातील झोपडपट्टया हटविण्याबाबत**

**(7) * 13464 श्री. गोविंदराव आदिक , श्री. संजय दत्त , श्री. धनाजी साठे , श्री. रमेश निकोसे , श्री. अनंत तरे , श्री. कन्हैयालाल गिडवानी , मेजर सुधीर सावंत , श्री. सुधाकर गणगणे , श्रीमती कांता नलावडे , श्री. विनोद तावडे , श्री. मधुकर चव्हाण , श्री. प्रकाश शेंडगे** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबईला आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर बनविण्यासाठी झोपडपट्टी मुक्त करण्यासाठी टप्प्याटप्प्याने झ ोपड्या हटविण्याची योजना मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत आखण्यात आली आहे हे खरे आहे काय,

(2) सदर योजनेनुसार पुढील 3 वर्षात मुंबईतील 2 लाख झोपड्या तोडण्यात येणार आहेत हे खरे आहे काय,

(3) झोपड्या तोडण्याच्या बाबतीत आवश्यक असलेले मनुष्यबळ तसेच आवश्यक यंत्रणा आणि खर्च याबाबतचा तपशील काय आहे,

(4) झोपडीधारकांची पर्यायी व्यवस्था कशी करण्यात येणार आहे त्यांना देण्यात येणारी घरे मोफत न देता पैसे घेऊन देण्याबाबतचे धोरण आहे हे खरे आहे काय ?

**श्री. दयानंद मस्के, श्री. विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (1) नाही. तथापि, दि. 3 जानेवारी, 2006 रोजी झालेल्या बैठकीत याबाबत प्राथमिक चर्चा झालेली असून, अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही.
(2) प्रश्न उद्भवत नाही.
(3) प्रश्न उद्भवत नाही.
(4) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, मुंबईतील झोपडपट्टयांचे पुनर्वसन हे शासनापुढील एक आव्हान आहे. याबाबतीत शासनाचे धोरण काय आहे ? त्याचा आराखडा शासनाने तयार केला आहे काय ?

श्री. दयानंद मस्के : मुंबईतील झोपडपट्टयांचा प्रश्नाच्या बाबतीत अनेक विभागाच्या माध्यमातून त्या ठिकाणी डेव्हलपमेंट कशी होईल याबाबतीत शासन प्रयत्नशील आहे. 1995 च्या अगोदरपासूनचे जे लोक आहेत त्यांना घरे देण्याकरिता एसआरए योजना आहे. परंतु रेल्वे लाईनच्या बाजूच्या झोपडपट्टया, विमानतळाच्या जवळील झोपडपट्टया, पाईलपलाईनच्या जवळच्या, मिठीनदी, पोईसर नदीच्या ठिकाणी ज्या झोपडपट्टया आहेत तसेच रस्त्याच्या कडेल असलेल्या ज्या झोपडपट्टया आहेत त्यांची पुनर्रचना करण्यासाठी शासनाने प्रयत्न केलेला आहे. त्या पध्दतीने कार्यवाही चालू आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ SBT/

ता.प्र.क्र. 13464 .....

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी एअरपोर्टच्या संदर्भात अधिकची माहिती दिलेली आहे. परवा मी मुंबईच्या संदर्भातील चर्चेमध्ये मिठी नदीच्या संदर्भात बोललो. कुर्ला येथील संदेशनगरमध्ये 252 झोपडीधारकांना त्यांच्याकडे सेंसस नंबर असताना अपात्र ठरविण्यात आले. त्यासंदर्भात मी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती केली. त्यांनी ती विनंती मान्य केली. त्या ठिकाणी नोटीस देऊन त्यांना तात्काळ पर्यायी जागा न देता बांधकाम तोडण्याचे काम सुरु झाले. या लोकांपैकी 153 लोकांना पात्र करण्यात आले. मी माननीय मुख्यमंत्र्यांना प्रश्नोत्तराच्या तासानंतर भेटणार आहे. त्या ठिकाणी 99 लोक पात्र असताना सुध्दा त्यांना पर्यायी जागा न देता काल त्यांची घरे तोडलेली आहेत. त्यांना तातडीने पर्यायी जागा देणार काय ?

श्री. दयानंद मस्के : त्यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी पत्र द्यावे. ते तपासून पाहून कार्यवाही करण्यात येईल.

श्री. कन्हैयालाल गिडवाणी : उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, तथापि, 3 जानेवारी, 2006 रोजी झालेल्या बैठकीत याबाबत प्राथमिक चर्चा झालेली असून अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही. हा विषय महत्वाचा असल्यामुळे 3 तारखेला महत्वाची बैठक झाली असेल. अंतिम निर्णय घेण्यासाठी शासन पुढील काय कार्यवाही करणार आहे ?

श्री. दयानंद मस्के : त्या बैठकीमध्ये प्रेझेंटेशन देण्यात आले. झोपडपट्टीची डेव्हलपमेंट कशा पध्दतीने होईल, पुनर्वसनाची योजना कशी लागू होईल यासंदर्भात प्रेझेंटेशन देण्यात आले. धारावी येथे ज्यांनी डेव्हलपमेंट केली होती ते श्री. मुकेश मेहता यांनी प्रेझेंटेशन केले होते.

श्री. सुधाकर गणगणे : मुंबई शहरातील एकूण किती झोपडपट्ट्या हटवण्याचा शासनाचा प्लॅन आहे ? किती झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन करण्याचा शासन विचार करीत आहे ?

श्री. दयानंद मस्के : एकंदर सर्व झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन व्हावे असा शासनाचा विचार आहे.

श्री. दिवाकर रावते : सर्व झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन म्हणजे सन 2005 पर्यंतच्या, सन 2010 पर्यंतच्या, सन 2015 पर्यंतच्या अशा कोणत्या सालापर्यंन्तच्या झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन करणार ?

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ SBT/

ता.प्र.क्र. 13464 .....

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, या योजनेमध्ये साधारणत: 2 लाख झोपडपट्टयांचे पुनर्वसन करावे असा एक प्लॅन त्यांनी तयार केलेला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने जे अतिक्रमण एअरपोर्टच्या आजूबाजूला आहेत ते काढणे, बऱ्याच ठिकाणी फूटपाथवर झोपडपट्टया आहेत त्या काढणे वगैरे त्यामध्ये आहे. मिठी नदीच्या आजूबाजूला काम सुरु केलेले आहे. रस्त्याच्या कडेला झोपडपट्टया आहेत त्या काढणे, मुंबईच्या विकासात अडचणीच्या ठरणाऱ्या ज्या झोपडपट्टया आहेत त्या सर्व झोपडपट्टयांचे पुनर्वसन एकवेळ शक्य नाही. त्यासाठी एसआरए मार्फत विकास होत आहे. मुंबईमध्ये 34 मतदारसंघ आहेत. ते लक्षात घेऊन त्या प्रत्येक मतदारसंघामध्ये ही योजना आपल्याला राबवता येईल अशा पध्दतीचे एक निवेदन त्यांनी केलेले आहे. तेथील ज्या झोपडपट्टया हलवल्या जातील त्यांच्यासाठी मिठागराच्या जमिनी ताब्यात देणार आहेत, त्या जमिनीवर घरे बांधून त्यांना हलवण्याचा प्रस्ताव त्यांनी आमच्यासमोर सादर केलेला आहे.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र.13464....) (श्री. विलासराव देशमुख..

याची अंमलबजावणी लगेच होणे अशक्य आहे कारण मिठागराच्या जमिनी राज्य शासनाकडे हस्तांतरित व्हावयाचा आहेत. त्यासाठी काही कालावधी लागणार आहे. पर्सस्पेक्टीव्ह प्लॅन सादर केलेला असून तो प्लॅन शासनाच्या विचाराधीन आहे.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबई महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात इमारत दुरुस्तीसाठी साडे आठ कोटींची तरतूद केल्याबाबत**

**(८) * १५३९८ श्री. मधुकर चव्हाण , श्री. विनोद तावडे , डॉ. अशोक मोडक , श्री. कन्हैयालाल गिडवानी , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. रमेश निकोसे , श्री. धनाजी साठे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर पालिकेच्या मालकीच्या बी.आय.टी. चाळी, पालिका कर्मचारी वसाहतीतील इमारती व इतर शेकडो इमारतींच्या दुरुस्तीसाठी मुंबईमहानगर पालिकेच्या अर्थसंकल्पात साडे आठ कोटी रुपयांची तरतूद आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालिकेच्या या इमारतींपैकी कित्येक इमारती दुरुस्ती अभावी मोडकळीस आल्यामुळे धोकादायक स्थितीत आहेत हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू इमारतीच्या किरकोळ दुरुस्तींची कामे करण्यासाठी निविदा न मागविता विभाग स्तरावर ही कामे करुन घेण्याचे आदेश अतिरिक्त आयुक्तांनी दिले असतानासुध्दा लेखा विभागातील अधिकाऱ्यांनी आक्षेप घेतल्यामुळे ही कामे सुरु झाली नाहीत हे खरे आहे काय,

(४) असल्यास, अतिरिक्त आयुक्तांचे आदेश न पाळणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

**श्री. राजेश टोपे, श्री. विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (१), (२), (३) व (४)

मुंबई शहरातील बी.आय.टी. चाळीसह इतर महानगरपालिका इमारतीच्या दुरुस्तीकरिता एकूण ८ कोटी ६७ लाख २० हजाराच्या तरतूदीपैकी मुंबई महानगरपालिकेने दिनांक ३१.३.२००६ पर्यंत रु. ८ कोटी १८ लाख ८७ हजार इतका खर्च केला आहे.

श्री. मधुकर चव्हाण : ता.प्र.क्र. 15398

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने प्रश्नाच्या छापील उत्तरामध्ये सुधारणा करु इच्छितो. प्रश्न भाग (3) व (4) च्या संदर्भात " अशा प्रकारचे आदेश अतिरिक्त आयुक्तांना दिलेले नाहीत. त्यामुळे कोणावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही". असे वाचावे. बाकी छापल्या प्रमाणे.

श्री. मधुकर चव्हाण : उर्वरित रक्कम स्पेल ओव्हर होऊन पुढील वर्षी तरतूद करण्यात येईल काय ?

श्री. राजेश टोपे : 8 कोटी 18लाख रु. खर्च झालेले आहेत. उर्वरित पैसे पुढच्या वर्षी खर्च करण्यात येतील.

---

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सिडकोने बेकायदेशीरपणे केलेली भुखंडाची विक्री**

**(९) * १३५९७ श्री. नितीन गडकरी** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिनांक २४ नोव्हेंबर, २००५ रोजी मुंबई उच्च न्यायालयाने सिडकोने बेकायदेशीरपणे केलेल्या भूखंड विक्री विरोधात दिलेल्या निकालपत्रात सातारा समुहाने बोगस सदस्य दाखवून चार हजार चौ.मी. भूखंड मिळविणे, एअर इंडियाचा भूखंड गुरुकृपा सोसायटीला देण्यात येणे, बी.एम.टी.सी. चा तुर्भे येथील भूखंड डेल्कॉन बिल्डर्सला दिल्याने कोट्यावधी रुपयांचे झालेले नुकसान इ. बाबत चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वनश्री. शगुफा, रेविरिया, ययाती या हाऊसिंग सोसायट्यांना सीआरझेड कायदा धाब्यावर बसवून खारफूटीचे जंगल तोडून सिडकोने विना निविदा नाममात्र दराने भूखंड विक्री करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, वरील बिल्डर व हौसिंग सोसायट्याना विना निविदा नाममात्र दराने भूखंड विक्री केल्याने सिडकोचे काही कोटी रुपयांचे नुकसान झाले त्यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्याच्या विरोधात काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे, श्री. विलासराव देशमुख यांच्याकरिता** : 1)माननीय उच्च न्यायालय, मुंबई येथे पब्लिक कर्न्सन फॉर गव्हर्नन्स ट्रस्ट यांनी दाखल केलेल्या जनहित याचिका क्रमांक 43/2005 प्रकरणी माननीय न्यायालयाने दिनांक 23.11.2005 रोजी दिलेल्या निकालपत्रात सहा सहकारी गृहनिर्माण संस्थांना सिडकोने केलेले भूखंड वाटप रद्द केले आहे. तसेच अशा प्रकारच्या इतर 23 सहकारी गृहनिर्माण संस्थांना वाटप केलेली भूखंडाची प्रकरणे तपासून नियमानुसार कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. या 23 प्रकरणांमध्ये न्यू सातारा को. ऑ. सोसायटीचा समावेश आहे. तथापि, त्यामध्ये गुरुकृपा सोसायटी व डेल्कॉन बिल्डरचा समावेश नाही.

1) सिडकोने वनश्री, शगुफा, रिविएरा, ययाती व इतर तीन संस्थांना 1992-1994 दरम्यान इरादापत्र दिलेले होते व त्यांनी त्यावेळच्या प्रचलित धोरणाप्रमाणे भाडेपट्टयाच्या अधिमूल्य रक्कमेचा 1993-1998 दरम्यान सिडकोकडे भरणाही केलेला आहे. प्रत्यक्ष भूखंडाचा ताबा सन 2003-2005 दरम्यान देण्यात आलेला आहे. सिडकोकडील प्राप्त अहवालानुसार सदर प्रकरणी सी.आर.झेड. कायद्याचे उल्लंघन झालेले नाही, तसेच खारफुटीचे जंगल तोडून सदर भूखंडाचे वाटप केलेले नाही.

3) व 4) प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे प्रश्न उद्‌भवत नाही.

...४..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र.13597.....)

श्री. नितीन गडकरी : शासनाचे 250 कोटी रु.चे नुकसान झालेले आहे. रहेजा कार्पोरेशनला जो भूखंड दिला त्याबाबतीत हाय कोर्टामध्ये केस चालू आहे. उच्च न्यायालय आणि कॅग यांनी या व्यवहारामध्ये शंका निर्माण केलेली आहे...

श्री. राजेश टोपे : हा प्रश्न वाधवाणी बिल्डरशी संबंधित आहे...

श्री. नितीन गडकरी : भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या वाणिज्यिक अहवालामध्ये 26.74 कोटी रुपयाचे नुकसान झाल्याचे सांगितलेले आहे. तेव्हा याबाबतचा संपूर्ण निर्णय हा सिडकोच्या स्तरावर झालेला आहे की मंत्रालय स्तरावर झालेला आहे ? या प्रकरणी झासलेल्या भ्रष्टाचाराची शासन चौकशी करणार आहे काय ?

श्री. राजेश टोपे : सिडको मार्फत को-ऑप. सोसाट्यांना प्लाटचे वाटप केले जाते. याबाबतीत शासनाकडून निर्णय घेतला जात नाही. लॅण्ड डिस्पोझेबल रुल्सच्या बाबतीत शासनाकडून मान्यता घेतली जाते. माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी रहेजासंबंधीचा प्रश्न उपस्थित केला. हा प्रश्न वाधवा बिल्डरशी संबंधित आहे. हायकोर्टाने 6 सोसायट्यांचे प्लॉटस् रद्द केलेले आहेत. सिडकोने ते प्लॉटस् ताब्यात घेतलेले आहेत. एकूण 24 प्लॉस्टस्च्या बाबतीत चौकशी व्हावी अशी अपेक्षा हायकोर्टाने व्यक्त केलेली आहे. 18 प्लॉटस्चे वाटप झालेले आहे. याबाबतीत चौकशी करण्यासाठी सिडकोचे एम.डी. आणि तीन सदस्यांची कमिटी गठित करण्यात आलेली असून ही चौकशी लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल. कमिटीच्या अहवालानुसार कारवाई करण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : कॅगने आपल्या समोर ऑडिट अहवाल दिलेला आहे. त्यामध्ये शासनाचे करोडो रुपयाचे नुकसान झाल्याचे सांगितलेले आहे. लॅण्ड डिस्पोझेबल ॲक्टमध्ये त्रुटी आहेत. हे प्लॉट बाजार भावाने विकलेले आहेत.

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 13597 पुढे सुरु...

सभापती महोदय, लॅन्ड डिस्पोजल रुल्स प्रमाणे सगळे निर्णय टेंडर काढून झाले पाहिजेत असा आदेश शासन देणार आहे काय ? नगरविकास विभागाकडून गेल्या 5-10 वर्षामध्ये आरक्षरण बदलण्याचा जो गोरज धंदा सुरु आहे त्याबाबतीत चौकशी झाली पाहिजे. यासंदर्भातील जो काही रिपोर्ट आला आहे तो लक्षात घेता याची चौकशी सिडकोच्या जॉइंट एमडीमार्फत करणे बरोबर होणार नाही. सिडकोची जर चौकशीच करावयाची असेल तर ती कमीत कमी मुख्य सचिवांनी केली पाहिजे तरच त्या चौकशीमधून काही तरी बाहेर येईल. म्हणून सिडकोची मुख्य सचिवांमार्फत चौकशी करुन तो अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल काय ? त्याचप्रमाणे आरक्षण बदलणे आणि विनाटेंडर ॲलॉटमेंट करणे यासंदर्भात कायद्यात बदल करण्याचा निर्णय शासन घेणार आहे काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सिडकोच्या जॉइंट एमडीमार्फत चौकशी केली जाणार आहे. कोणत्याही गोष्टीला पाठीशी घालण्याचा शासनाचा अजिबात विचार नाही. हायकोर्टाच्या सल्ल्यानुसार अशा पध्दतीची चौकशी व्हावी म्हणून ही चौकशी करण्यात येत आहे. जे लोक को-ऑप.सोसायटयांचे मेंबर होते ते नवी मुंबईमध्ये घर नसताना ठराविक अटी घालून अनेक जण मेंबर झाल्याचे हायकोर्टाच्या निदर्शनास आले. त्यानंतर वधवा बिल्डरला देण्यात आलेले सगळे प्लॉट रद्द करण्याचा निर्णय घेतला गेला. त्या अनुषंगाने इतर को-ऑप.सोसायटया आहेत त्यांच्या मेंबरची तपासणी व्हावी म्हणून जॉइंट एमडी यांची चौकशी समिती नेमली. शासनाला पारदर्शकता ठेवायची असेल तर माननीय सदस्य श्री.गडकरी यांनी जी सूचना केली आहे त्याचा शासन निश्चित विचार करील. कायद्यामध्ये मॉडिफिकेशन करण्याच्या संदर्भात श्री. मागो यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीचा अहवाल आल्यानंतर कायद्यामध्ये जरुर मॉडिफिकेशन करण्याचा विचार करण्यात येईल.

श्री. प्रमोद नवलकर : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

**सभापती** : माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, प्रश्नोत्तराचा तास 1 वाजून 15 मिनिटांनी सुरु झाला होता. आता 2 वाजून 14 मिनिटे झाली आहेत. अजूनही प्रश्नोत्तराच्या तासातील एक मिनिट शिल्लक आहे.

.....2

**मुंबईतील इंडिया युनायटेड (इंदू) मिलच्या जागेवर**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक उभारण्याचा निर्णय**

**(१०) * १५५१२ श्री. राजेंद्र जैन , श्री. जितेंद्र आव्हाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील इंडिया युनायटेड (इंदू) मिलच्या जागेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य राष्ट्रीय स्मारक उभारण्यासंदर्भात दिनांक २१ ऑक्टोबर, २००५ रोजी मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली इ ाालेल्या बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) उक्त प्रकरणी अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता.** (१) दि. २१.१०.२००५ रोजी सुकाणू समिती, चैत्यभूमीचा विकास व सौदर्यीकरण प्रकल्पासंबंधीची बैठक मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीत मुंबईतील इंडिया युनायटेड (इंदू) मिलच्या जागेवर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य राष्ट्रीय स्मारक उभारण्यासंदर्भात कोणतीही चर्चा अथवा निर्णय झालेला नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, प्रश्नाला दिलेल्या लेखी उत्तराने माझे समाधान झाले असल्यामुळे मी याप्रश्नावर आणखी प्रश्न विचारु इच्छित नाही.

**सभापती :** प्रश्नोत्तराचा तास संपला.

------

नंतर भारवि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विधान भवन इमारतीस 25 वर्ष पूर्ण झाल्याबद्दल.**

घोषणा.

(प्रेस : येथे सोबतची घोषणा छापावी.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: लेखी उत्तरे

**मु.शी.**: अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली,दुसरी,तिसरी,चौथी,
पाचवी व सहावी यादी सभागृहासमोर ठेवणे.

**सचिव** : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने तारांकित प्रश्नोत्तराची पहिली,दुसरी,तिसरी,चौथी,पाचवी व सहावी यादी सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली,दुसरी,तिसरी,चौथी,पाचवी व सहावी यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस येथे सोबतच्या याद्या छापाव्यात.)

...

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.: औचित्याच्या मुद्दासंबंधी.**

**सभापती** : आज औचित्याच्या मुद्याच्या दहा सूचना आल्या आहेत. औचित्याचे मुद्दे हे खरे म्हणजे कामकाजपत्रिकेमध्ये नसतात. यासाठी नियमांमध्ये अन्य तरतूद केलेली आहे. तरी सुध्दा मी औचित्याचे मुद्दे मांडण्यास अनुमती देतो. सन्मानीय सदस्यांनी आपले औचित्याचे मुद्दे एक मिनिटांमध्ये मांडले तर दहा-बारा मिनिटांमध्ये आपण औचित्याचे मुद्दे मांडले जातील. आता सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आपले औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, काल महाराष्ट्रात एकाही शेतकऱ्याची आत्महत्या झालेली नाही. त्यामुळे मी शासनाचे अभिनंदन करतो.

**सभापती** : ठीक आहे. आता सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, वेगवेगळया ठिकाणी महिला मंडळ, महिला बचत गट बेकायदेशीर दारूमुळे त्रास होतो म्हणून गावठी दारूच्या भट्टया बंद पाडण्याचे आंदोलन करीत असतात. अशा वेळी अनेक वेळा त्यांच्यावर गुन्हे दाखल होतात. यासंबंधी शासनाकडे दिनांक 1 जानेवारी 1998 रोजी मागणी करण्यात आली होती की, ज्या महिला मंडळे, महिला संघटना, महिला कार्यकर्ते, यांनी गावठी दारूबंदीच्या विरोधात आंदोलन केली आहेत त्यांच्या विरूद्धात दाखल केलेल्या केसेस मागे घेण्यात याव्यात. त्याप्रमाणे शासनाने विनंती मान्य केली. परंतु, 1998 पासून ते 2006 पर्यंत म्हणजे गेल्या आठ वर्षांमध्ये 1-2 केसेस मागे घ्यावयाच्या राहिल्या आहेत. त्या शासनाने मागे घ्याव्यात अशी विनंती मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, ज्या महिलांना गावठी दारूच्या विरोधात, बेकायदेशीर दारूच्या विरोधात आंदोलन केले होते, अशा महिलांवर तांत्रिक गुन्हे दाखल केले आहेत, असा मुद्दा उपस्थित केला आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MAP/ SBT/ पूर्वी श्री.भारवि.... 14:20

श्री.आर.आर.पाटील ....

सन 1998 ते 2006 पर्यंत बेकायदेशीर दारुच्या विरोधात महिलांनी जी आंदोलने केली आहेत आणि त्यांच्यावर जे गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत ते मागे घेण्यात येतील.

---------

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी अतिशय खेदाने आणि दु:खद अंतकरणाने हा औचित्याचा मुद्दा या ठिकाणी मांडत आहे.

महोदय, रायगड किल्ल्यावर शिवाजी महाराजांच्या पुण्यतिथीचा कार्यक्रम नियमित साजरा होतो. लोकमान्य टिळक यांनी ही प्रथा सुरु केली होती. रायगड स्मारक मंडळ, पुणे यांच्या वतीने रायगडावर 1895 पासून शिवपुण्यतिथी उत्सव नियमितपणे साजरा करण्यात येतो. या वर्षीही या कार्यक्रमाचे आयोजन करीत असताना, सन्माननीय सदस्य श्री.विनायकराव मेटे यांच्या शिवसंग्राम या संघटनेने आग्रह केल्यामुळे त्यांनाही निमंत्रण देण्यात आले होते. कारण सर्वच शिवप्रेमींनी त्या ठिकाणी जाऊन, शिवरायांना मानवंदना द्यावी ही त्यामागील आदरणीय भावना आहे. परंतु कालच्या कार्यक्रमाला गालबोट लागले.

सन्माननीय सदस्य श्री.विनायकराव मेटे यांनी होळीच्या माळावरील शिवरायांच्या पुतळयाशेजारी मंडप उभारुन, आपल्याच कार्यक्रमास सुरुवात केली. रायगड स्मारक मंडळाची पालखी मिरवणुकीपाठोपाठ शिवसंग्रामनेही पालखी काढली. एकाच वेळी दोन्ही पालख्या शिवसमाधीवर पोहोचल्या. प्रथम रायगड स्मारक मंडळाने विधिवत पूजा केली, व आरती झाली. शासकीय पोलीस मानवंदनेला सुरुवात होणार इतक्यात, समाधीस्थळी उपस्थित असलेल्या शिवसंग्रामच्या कार्यकर्त्यांनी प्रचंड गोंधळ घालण्यास सुरुवात केली. महोदय, त्या ठिकाणी दरवर्षी शासनातर्फे पोलिसांच्या वतीने 12.30 वाजता मानवंदना दिली जाते. ही वेळ ठरलेली आहे. परंतु याच वेळी सन्माननीय सदस्य श्री.मेटे यांच्या कार्यकर्त्यांनी गोंधळ घालण्यास सुरुवात केली. त्यांनी प्रथम आरती करण्याबाबत हट्ट धरला, त्यामुळे पुन्हा गदारोळ झाला आणि पुन्हा शिवसंग्रामची दुसरी आरती झाली. त्यामुळे मानवंदनेला सुमारे एक तास उशीर झाला. महोदय, हा सर्व प्रकार ई.टी.व्ही. ने प्रत्यक्ष दाखविलेला आहे. आपण सर्व शिवप्रेमी आहोत. त्यामुळे एकाच ठिकाणी





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

एकाच वेळी दोघांनीही आरती केली असती तर काहीच बिघडले नसते. पालखी जात असताना शिवसंग्रामच्या कार्यकर्त्यांनी ढोल वाजवावयास सुरुवात केली. महोदय, हा संपूर्ण प्रकार खेदजनक आहे. मी सन्माननीय सदस्य श्री.विनायकराव मेटे यांना सकाळी विनंती केली होती की, त्यांनी घडलेल्या प्रकरणी दिलगिरी व्यक्त करणे आवश्यक आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.विनायकराव मेटे यांना आपण विनंती करावी की, रायगडावर शिवरायाचा जो अवमान त्यांच्याकडून झालेला आहे त्याबद्दल त्यांनी दिलगिरी व्यक्त करावी.

श्री.नितीन गडकरी : महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे आणि श्री.दिवाकर रावते यांची मी संयुक्त भेट घडवून आणली होती. सन्माननीय सदस्य श्री.मेटे यांना रायगडावरील कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून बोलवा आणि त्यांचा सन्मान करावा व त्यांचे भाषण ठेवा असे मीच सुचविले होते. श्री छत्रपती स्मारक मंडळ, पुणे या समितीचे अध्यक्ष कै.जयंतराव टिळक होते. त्यामुळे या माध्यमातून मी सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांना सांगू इच्छितो की, रायगड या ठिकाणी अशा प्रकारची घटना घडणे योग्य नाही. या घटनेचा संबंध आपल्याशी जोडला जातो. शिवाजी महाराज आपल्या सर्वांचे आदरस्थान आहे. त्यामुळे आपण या प्रकरणी स्वत: लक्ष घालून हे प्रकरण मिटवावे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी स्वत: या प्रकरणी पुढाकार घेऊन, पुन्हा असा प्रकार घडणार नाही, याबाबत दक्षता घेईन.

-----

श्रीमती संजीवनी रायकर : सभापती महोदय, तांदळी (वडगांव) ता.नगर, जि.अहमदनगर येथील मायनर इरिगेशन तलावाला डावा कालवा काढून, 400 ते 500 एकर शेती ओलिताखाली आणण्याचा प्रस्ताव सुमारे 10 वर्षांपूर्वी शासनाच्या विचाराधीन होता. त्यावेळी सुमारे 40 लाख रुपये खर्च अपेक्षित होता. महोदय, हा कोरडवाहू आणि दुष्काळी भाग आहे.

नंतर श्री.कांबळे...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर ....

त्या भागात कायमस्वरुपी टँकरने पाणीपुरवठा होत आहे. तरी, कृपया या इरिगेशन तलावाला डावा कालवा लवकर काढून शेतकऱ्यांना आधार द्यावा, अशी मी या औचित्याच्या निमित्ताने आपणास विनंती करते.

----

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, मी मघाशी या संदर्भात सांगितले होते. परंतु त्यामध्ये थोडी अधिकच्या माहितीची भर घालतो. सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री मिठी नदी संदर्भात बोलले. त्या संदर्भात मी असे सांगू इच्छितो की, तेथील जिल्हाधिकाऱ्यांनी सेन्ससचे नंबर्स असताना देखील तेथील 99 कुटुंबांना अपात्र ठरविले आहे. मी त्या व्यक्तींना भेटलो आहे. संबंधित खात्याच्या प्रधान सचिवांना देखील भेटलो आहे. मला माननीय मुख्यमंत्र्यांची देखील भेट घ्यायची होती, परंतु ते भेटू शकले नाहीत. आता मिठी नदीच्या कामांना जोरात सुरुवात झाली आहे. सभापती महोदय, मी या संदर्भात श्री. जॉनी जोसेफ यांनाही भेटलो. सभापती महोदय, जे पात्र आहेत, त्यांची घरे कशी काय तोडतात ? त्यांना अपात्र कसे काय ठरविले जाते ? सभापती महोदय, मी कुर्ला येथील, संदेशनगर बैलबाजार या ठिकाणासंदर्भात बोलत आहे. तेथील 252 कुटुंबांना जिल्हाधिकाऱ्यांनी अपात्र ठरविले होते. परंतु मी या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांना प्रस्ताव दिल्यानंतर 254 कुटुंबांपैकी 153 कुटुंबे पात्र झाली. आता फक्त 99 कुटुंबे राहिली आहेत. तरी, त्यांची तपासणी न करता त्यांना जागा उपलब्ध करुन द्यावी, एवढीच माझी या निमित्ताने विनंती आहे.

श्री. राजेश टोपे : सभापती होदय, सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी दिलेल्या औचित्याच्या सूचनेसंदर्भात मी आपणास असे सांगू इच्छितो की, या प्रकरणात ते योग्य आहेत की नाहीत याची तपासणी करुन चौकशी केली जाईल व त्यानंतर निश्चितपणे पर्यायी जागा देखील उपलब्ध करुन दिली जाईल.

----

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, मी एक औचित्याचा मुद्दा मांडू इच्छितो. या सदनामध्ये मराठीत उत्तर देण्याचे काही सन्माननीय सदस्य टाळतात. तसाच प्रकार मराठी वृत्तवाहिन्यांच्या संदर्भात आहे. सभापती महोदय, मला केबलवर सह्याद्री वाहिनी दिसत नाही. सभापती महोदय, महाराष्ट्राच्या राजधानीमध्ये मराठी वृत्तवाहिन्या दाखविणे बंद आहे. तरी, या संदर्भात मी या औचित्याच्या माध्यमातून माननीय उप मुख्यमंत्र्यांना विनंती करतो की, त्या मराठी वृत्तवाहिन्या दाखविण्याची केबलचालकांना सक्ती करण्याचा कायदा करण्याची आवश्यकता आहे.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, अनेक ठिकाणी केबल ऑपरेटर्स मराठी वृत्तवाहिन्या दाखवत नाहीत. मराठी कार्यक्रम दाखविले जात नाहीत. अगोदरच मराठी चॅनेल्स कमी आहेत. तरी, या संदर्भातील नियमांत बदल केला जाईल व केबल ऑपरेटर्सना मराठी वृत्तवाहिन्या दाखविणे सक्तीचे केले जाईल. सभापती महोदय, त्या संदर्भातील फी बाबत सुध्दा सवलत देण्याचा विचार करण्यात येईल.

----

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, मी खालीलप्रमाणे औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

" हॉटेल व्यावसायिकांवरील वॅट कर साडेबारा टक्क्यांवरुन चार टक्के इतका कमी करावा, या मागणीसाठी हॉटेल व्यावसायिकांच्या आहार संघटनेच्या नेतृत्वाखालील मुंबईतील पंधरा हजार आणि राज्यभरातील एक लाखाहून अधिक हॉटेल व्यावसायिकांनी आज दिनांक 19.4.2006 रोजी बंद पुकारला आहे. तसेच वॅट चार टक्के न केल्यास दिनांक 1 मे, 2006 पासून बेमुदत बंद आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. दिनांक 1 एप्रिल, 2005 पासून वॅट हा कर राज्यात लागू करण्यात आलेला आहे. या कराला राज्यातील व्यापाऱ्यांनी पुर्वीपासूनच विरोध केलेला आहे. राज्यातील छोट्या हॉटेल व्यावसायिकांसाठी हा कर चार टक्क्यांवरुन साडेबारा टक्के इतका वाढविण्यात आलेला आहे. त्याच तुलनेत थ्री स्टार ते सेव्हन स्टार हॉटेल व्यावसायिकांवर मात्र हा कर तेवीस टक्के वरुन साडेबारा टक्के इतका कमी करण्यात आला आहे. इतर राज्यामध्ये हॉटेल

..3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त ....

व्यावससायिकांना 4 टक्के वॅट आकारला जात आहे. मध्यममवर्ग आणि गोरगरिब वर्ग प्रामुख्याने या "ब" आणि "क" श्रेणी हॉटेलमध्ये जेवण करतात. अशा हॉटेलांची संख्या पंच्च्यान्नव टक्के आहे. या करवाढीचा फटका शेवटी मध्यमवर्ग आणि गोरगरिब दरवाढीच्या रुपाने बसणार आहे. परिणामी आपले पोट हातावर घेऊन श्रमणारे श्रमिक, बेघर यांची कुचंबना होणार आहे. त्यांच्यावर उपाशीपोटी झोपण्याची वेळ येणार आहे. "

----

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून महाराष्ट्रात घडते आहे आणि बिघडते आहे. डान्स बार घडल्यामुळे संसार बिघडले आहेत आणि ते बंद केल्यामुळे हायकोर्टात बिघडायला लागले आहे.

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VVK/ SBT/ MHM/ MAP/ KGS/ प्रथम श्री. कांबळे.. 14:30

श्री. विनोद तावडे..

डान्सबार बंदीच्या निर्णयासंदर्भात काल टीव्हीवर सुध्दा दाखविण्यात आलेले आहे, डान्सबार बंदीच्या निर्णयासंदर्भात सरकार सुप्रीम कोर्टामध्ये जाणार आहे किंवा नाही ? काही प्रतिनिधी म्हणतात जाणार, काही म्हणतात जाणार नाही. आता माननीय उपमुख्यमंत्री उपस्थित आहेत त्यांनी सरकारची बाजू काय आहे ती स्पष्ट करावी.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, या निर्णयाच्या विरोधात अपिल करण्यासाठी कोर्टाने दोन महिन्याची मुदत दिलेली आहे. 13 मे पासून कोर्टाला उन्हाळी सुटी लागणार आहे. या निर्णयाच्या विरोधात सरकारने सुप्रीम कोर्टात अपिल करणे आवश्यक आहे असे माननीय मुख्यमंत्री व विधी विभागाने मत व्यक्त केलेले आहे. याबाबत ॲडव्होकेट जनरलचे मत मागविलेले आहे, तसेच दिल्लीतील काही नामवंत विधितज्ज्ञ यांची सुध्दा मते घेण्यात आलेली आहेत व त्यांनी सुध्दा ही केस अपिल करण्यासारखी आहे असे मत दिलेले आहे. अशा प्रकारे सरकारने सुप्रीम कोर्टात जाण्याचा निर्णय घेतलेला आहे, यासाठी विधी विभागाने व मुख्यमंत्री महोदयांनी मान्यता दिलेली आहे. ॲडव्होकेट जनरलने सुप्रीम कोर्टात अपिल करावे अशा सूचना सुध्दा आजच देण्यात आलेल्या आहेत.

श्री. धोंडीराम राठोड : सभापती महोदय, सिंचनाच्या अनुशेषाच्या संदर्भात मराठवाडा विभागातील प्रश्नांवर मी औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे. जालना जिल्हयातील परतूर तालुक्यातील मंठा, गंगाखेड येथील साठवण तलाव बांधण्याबाबत परवानगी मागितली आहे, वारंवार लोकप्रतिनिधींची व जनतेची शासनाने दखल घेतलेली नाही. शासनाकडे याबाबत अनेक वेळा पत्रव्यवहार करुनही अद्याप साठवण तलावास पाणी उपलब्धतेचे प्रमाणपत्र न मिळाल्याने प्रकल्प सुरु करण्यास अडचण येत आहे. सभापती महोदय या साठवण तलावाची सिंचन क्षमता 6.4 इतकी असतांना जलसंपदा विभागाकडून जाणूनबुजून या प्रकल्पाचे काम रखडवून ठेवण्यात येत आहे. त्यामुळे तेथे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला आहे. अशा प्रकारचा औचित्याचा मुद्या मी उपस्थित करीत आहे. अत्यंत महत्वाच्या मुद्यांवर सभागृहामध्ये औचित्यांचा मुद्दा मांडत असतांना माननीय उपमुख्यमंत्री यांचे मी या प्रश्नाकडे लक्ष वेधू इच्छितो. आमचा साठवण तलाव आपण सुरु करणार आहात काय ? सर्व औचित्यांच्या मुद्यांना उत्तरे देण्यात आलेली असल्यामुळे या मुद्दाला सुध्दा माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

.......2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : औचित्याच्या मुद्याला उत्तर मागणे योग्य नाही. आपण मग प्रश्नोत्तराचा तास कशासाठी घेत आहोत.

श्री. आर.आर.पाटील : सन्माननीय सदस्यांच्या भावना मी पाटबंधारे मंत्र्यांना सांगतो व या प्रश्नांमध्ये स्वत: लक्ष घालण्याबाबत त्यांना कळविण्यात येईल.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, काल मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या महासभेमध्ये लोकशाहीला काळीमा फासण्यासारखा प्रकार घडलेला आहे. काल मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या महासभेमध्ये विषय क्रमांक 60 च्या संदर्भात महानगरपालिका अधिनियम 1966 च्या महाराष्ट्र विकास नियंत्रण नियमावली मध्ये बदल करण्याचा प्रस्ताव आला होता. या प्रस्तावाच्या विरोधात कोणत्याही सदस्याने काहीही बोलू नये म्हणून सभागृहामध्ये कोणालाही बोलू न देता महापौर यांनी प्रस्ताव मान्य केला व तो सभागृहात मंजूर सुध्दा करण्यात आला. असा प्रकार घडलेला आहे. तेथील विरोधी पक्ष नेते श्री. किरण म्हात्रे व शिवसेना भारतीय जनता पार्टीचे काही नगरसेवक यांनी ठरावाला विरोध केला. परंतु महापौरांनी त्यांचे ऐकले नाही. विरोधी पक्षाचे सभासद जेव्हा वेल मध्ये आले तेव्हा सत्ताधरी काँग्रेस व राष्ट्रवादी नगरसेवक यांच्या सभासदांमध्ये मोठा गोंधळ झाला. हा प्रस्ताव मंजूर झाला तरी देखील सभासद महापौराच्या विरोधात वेलमध्ये येऊन मोठमोठयाने घोषणा देत होते.

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

प्रा. शरद पाटील...

पोलिसांना बोलाविल्यानंतर पोलिसांमार्फत त्यांना अटक करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी श्री. किरण म्हात्रे यांनी सभागृहामध्ये आपल्याला पोलीस हात लावू शकत नाहीत अशाप्रकारचा इशारा दिल्यानंतर पोलिसांनी त्यांना अटक केली नाही. त्याठिकाणी सत्ताधारी पक्षाच्या नगरसेवकांनी श्री. किरण म्हात्रे यांना मारहाण करण्याचा प्रयत्न केला असता पोलिसांनी त्यांना संरक्षण दिले. शेवटी तेथील कर्मचाऱ्यांमार्फत श्री. किरण म्हात्रे यांना बाहेर नेण्यात आले. त्यांच्यावर महापौरांनी सभागृहामध्ये जातिवाचक शिव्या दिल्या म्हणून पोलीस स्टेशनमध्ये ॲट्रॉसिटीचा दावा दाखल केला. या माध्यमातून माननीय उप मुख्यमंत्र्यांना विनंती करतो की, शासनाने श्री. किरण म्हात्रे यांना झ ालेल्या मारहाणीची चौकशी करावी. त्याचप्रमाणे महापौर आणि नगरसेवकांनी श्री. किरण म्हात्रे यांच्यावर अन्यायकारक ॲट्रॉसिटीचा दावा दाखल केला आहे तो काढून टाकण्याचे आदेश देण्यात यावेत.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, म्हाडाच्या भू संपादन कार्यालयातील श्री. पी. यू. वर्गिस नावाच्या उप अभियंत्यांनी जवळ जवळ 38 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केला म्हणून त्यांना 1 फेब्रुवारी 2006 रोजी सेवेतून निवृत्त करण्यात आले. परंतु त्यांच्यावर आजपर्यंत कोणतीही फौजदारी कारवाई केली नाही. त्यामुळे त्यांनी केलेल्या गुन्हयाची प्रथमदर्शनी चौकशी केल्यानंतर त्यांनी गुन्हा केल्याचे सिध्द झाले व त्यांना बडतर्फ केले. परंतु आर्थिक गुन्हे विभागामध्ये त्यांच्याविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल केलेला नाही. या व्यवहारामध्ये म्हाडाचे 38 कोटी रुपये बुडाले आहेत. त्यासंबंधी अडीच महिने होऊन देखील शासनाने त्वरीत फौजदारी गुन्हा दाखल केलेला नाही तो करावा, अशी या औचित्याच्या मुद्दयाव्दारे आपल्या माध्यमातून माननीय उपमुख्यमंत्र्यांना विनंती करतो.

**उपसभापती** : मंत्रिमहोदय जर उत्तर देणार असतील तर माझी हरकत नाही. परंतु माननीय सदस्यांनी अशाप्रकारची प्रथा पाडणे बरोबर नाही.

श्री. नितीन गडकरी : माननीय उप मुख्यमंत्र्यांच्या विभागाशी संबंधित मुद्दा असला तरी तशाप्रकारचा आग्रह सभागृहामध्ये धरणे बरोबर नाही.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, म्हाडाच्या 38 कोटी रुपयांचा हा प्रश्न आहे. त्या अधिकाऱ्याला आपण बडतर्फ केले आहे परंतु त्याचबरोबर त्याच्याविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करणे आवश्यक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्य प्रा. शरद पाटील यांनी सभागृहामध्ये जातिवाचक शिवीगाळ केल्यामुळे गुन्हा नोंदविण्यात आल्याची बाब सांगितली आहे. निश्चितपणे यासंबंधी सभागृहाचे प्रोसेडींग तपासले जाईल. आणि कुणावरही अन्याय्य व चुकीची कारवाई होणार नाही याबाबत दक्षता घेतली जाईल. त्याचप्रमाणे माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी म्हाडा मध्ये झालेल्या भ्रष्टाचारासंबधीचा मुद्दा उपस्थित केला आहे. त्याबाबत संबंधित विभागाकडून माहिती मागवून घेण्यात येईल. आणि सेवाविषयक शिक्षा पुरेशी नसेल आणि भ्रष्टाचार केल्याचे उघड झाले असेल तर निश्चितपणे गुन्हयाची नोंद केली जाईल.

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, आठ, दहा दिवसापूर्वी इंडियन एक्सप्रेसमध्ये एक बातमी छापून आली आहे. त्यामध्ये मुंबई विद्यापिठाशी संलग्न असलेल्या 220 महाविद्यालयातील 3 हजार प्राध्यापक व 2 हजार प्राध्यापकेतर कर्मचाऱ्यांना तीन महिन्यापासून पगार मिळाला नाही. लोकसत्ता वर्तमानपत्रामध्ये कदाचित ही बातमी अधिक सुस्पष्ट वाटावी अशापध्दतीने प्रसिध्द झाली आहे. ही बाब संपूर्ण महाराष्ट्राला गवसणी घालणारी आहे. राज्यातील 11 विद्यापिठामध्ये काम करणाऱ्या 40 हजार प्राध्यापकांचा हा प्रश्न आहे. वास्तविक पहातां 1996 मध्ये पाचवा वेतन आयोग लागू झाल्यानंतर त्यामधील शिफारशीप्रमाणे वेतनेतर फरकाची रक्कम त्यांना मिळणे अपेक्षित होते. कदाचित 1996 साल बाजूला पडले परंतु 1998 सालापासून त्यांना पूर्वलक्षीप्रभावाने फरकाची रक्कम मिळणे अपेक्षित होते, दुर्दैवाने ती रक्कम अजून त्यांना मिळाली नाही. मला स्वाभाविकपणे समोरच्या ट्रेझरी बेंचच्या लोकांना विनंती करावयाची आहे. वास्तविक पहाता, वरिष्ठ वेतनश्रेणी म्हणजे कालबध्द पदोन्नती असते. म्हणजे प्राध्यापक कोणत्या वरिष्ठ श्रेणीसाठी पात्र ठरणार आहेत याची माहिती शासनाकडे असते. दरवर्षी आर्थिक नियोजन करुन त्यांना पूर्वलक्षी प्रभावाने फरकाची रक्कम दिली पाहिजे. असे आतापर्यंत होणे आवश्यक होते. आठ-आठ वर्षे झाली तरी त्यांना त्यांच्या न्यायाचे वेतन मिळत नाही, त्यांना दर महिन्याचे वेतन मिळत नाही.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. अशोक मोडक (पुढे सुरु...

अनेक जनावर आपत्ती कोसळलेली आहे. या संबंधात गांभीर्याने विचार करावा, अशी औचित्याच्या मुद्याव्दारे विनंती आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्यासाठी परवानगी मागतात.)

**उपसभापती** : माझ्याकडे माननीय सभापतींनी कोणते औचित्याचे मुद्दे घ्यावयाचे त्याची यादी दिलेली आहे. त्याप्रमाणे मी सन्माननीय सदस्यांना परवानगी दिलेली आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापतीस्थानी आपण अहात, आपल्याला एखाद्या सन्माननीय सदस्यांनी विनंती केली तर त्यांना औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्याची परवानगी आपण देऊ शकता.

**उपसभापती** : औचित्याचे मुद्यांची संख्या वाढायला लागलेली आहे. अशी भिती वाटायला लागली की, त्या मुद्यातील औचित्य जाऊ नये.

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे की, शेळी-मेंढी विकास महामडळाच्या संदर्भातील अहवाल तयार आहे, तो सभागृहाला माननीय राज्यमंत्री महोदयांनी सादर करावा. पी.एस.आय. श्री.बारगल यांच्या वर्तनाच्या संदर्भात 93 च्या सूचनेच्या अनुषंगाने चर्चा झाली. त्यांना निलंबित करण्याबाबतची सभागृहात मागणी केलेली होती. या संदर्भात चौकशी करण्याचे आपण निर्देश देऊन शासनाला निवेदन करण्यास सांगितले होते. ते निवेदन अजून केलेले नाही. ते करावे अशी विनंती आहे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : अजून चौकशी चालू आहे.

**उपसभापती** : आपल्याला उत्तर देता येणार नाही. 7 दिवसामध्ये चौकशी व्हायला पाहिजे होती. "चौकशी चालू आहे" असे उत्तर देणे बरोबर नाही. यासंबंधात उद्या शासनाने या विषयावर निवेदन करावे.

श्री.प्रकाश शेंडगे : शेळी-मेंढी विकास महामंडळाचा अहवाल सभागृहात सादर केलेला नाही.

**उपसभापती** : आजची आपल्याला माहिती पाहिजे असेल.

श्री.हसन मुश्रीफ : हा अहवाल अधिवेशन संपण्यापूर्वी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुधाकर गणगणे ....

ही ऐतिहासिक वास्तू शासनाने जनत करावी आणि ती वास्तू राष्ट्रीय स्मारक म्हणून जाहीर करण्याच्या बाबतीत शासनाने नोंद घ्यावी अशी मी विनंती करतो.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. काल आणि आजच्या टाईम्स ऑफ इंडियामध्ये जी बातमी आलेली आहे त्यानुसार औष्णिक प्रकल्पातून 4 हजार मेगॉवॅट वीज येईल असे जाहीर झालेले आहे. त्या औष्णिक प्रकल्पाला विरोध असण्याचे कारण नाही. कोकणातील देवगड आणि विजयदुर्ग हा परिसर हापूस आंब्यासाठी प्रसिध्द आहे. हापूस आंब्याशी आपला भावनिक संबंध आहे. ते या महाराष्ट्राचे भूषण आहे. त्या ठिकाणी एन्व्हार्यमेंटच्या दृष्टीने काय प्रकल्प आहे हे अजून समजलेले नाही. त्या ठिकाणी पर्यावरणावर परिणाम होत असेल तर लोकांचा विरोध आहे. नाही तर लोकांचा सपोर्ट आहे. त्यांच्या पर्यावरणाच्या प्रकल्पाचा अभ्यास करुन त्याचा लेखी अहवाल आल्याशिवाय त्या प्रकल्पाच्या बाबतीत पुढे जाऊ नये असे मी या औचित्याच्या मुद्याव्दारे मागणी करीत आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी एका गंभीर बाबीकडे औचित्याच्या मुद्याव्दारे आपले लक्ष वेधू इच्छितो. केंद्र शासनाने 148 अवर्षणप्रवण तालुक्यांना मान्यता दिलेली आहे. त्यांच्या वार्षिक योजनेमध्ये 148 अवर्षणप्रवण तालुक्यांची यादी छापण्यात आलेली आहे. परंतु 9 मार्चच्या शासन निर्णयाप्रमाणे राज्य शासनाने स्वत:च ज्या 148 तालुक्यांची यादी मान्य केली आहे त्या तालुक्यांची संख्या अचानक 148 वरुन 90 वर आणलेली आहे. आश्चर्याची गोष्ट अशी की, ही संख्या 90 वर आणत असताना यातील जे तालुके वगळण्यात आलेले आहेत त्यातील 48 तालुके विदर्भातील आहेत. खरे म्हणजे श्री. आर. आर. पाटील साहेब, अशा प्रकारचा अन्याय तुम्ही का करता ? हे 48 तालुके शासनाने कोणाच्या ठरावानुसार वगळले ? पश्चिम महाराष्ट्र विकास मंडळाने ठराव पास केला. त्यांच्या ठरावानुसार तुम्ही विदर्भातील तालुके वगळले. यामुळे विदर्भामध्ये काय मेजेस जाईल ? ही गोष्ट विदर्भावर अन्याय करणारी आहे. ही बाब अतिशय अन्यायकारक आहे. पुन्हा नवीन मुद्दा काढल्यावर आपणच म्हणाल की, आधी अनुशेषाचा मुद्दा काढला होता, आता हा नवीन मुद्द काढला आहे. शासन असे का वागते ? शासन विदर्भावर असा

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

अन्याय का करते ? हे 48 तालुके पुन्हा त्या यादीमध्ये घ्यावेत. आपण तशी दुरुस्ती पुन्हा करावी. आपण असा अन्याय करु नका. त्यामुळे वाईट मेसेज जाईल. सभापती महोदय, एका मुद्याच्या बाबतीत मी बोलून बोलून थकलो आहे. हे अधिवेशन परवा संपणार आहे. ॲडव्होकेट जनरलचा रिपोर्ट कोठे गेला ? त्यासंदर्भात माननीय सभापती महोदयांनी आदेश दिले होते. ॲडव्होकेट जनरलच्या रिपोर्टच्या बाबतीत काय करावयाचे ? ते आपण सांगावे. सभागृहाचे कामकाज कसे चालणार ? हे सरकार कसे चालणार ? मी या विषयावर बोलत नाही. मी काय करावे ते आपण सांगावे.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, आता माझ्याकडे जी माहिती आहे तेवढेच मी सांगू इच्छितो. राज्यात कोठेही चुकीचा मेसेज जाऊ नये म्हणून मी सांगू इच्छितो. केंद्र सरकारने महाराष्ट्रामधील ज्या डीपीएपीच्या तालुक्यामध्ये ज्या ठिकाणी जलसंधारणाची कामे कमी झालेली आहेत अशा तालुक्यांचा सर्व्हे करुन 148 तालुक्यांचा समावेश त्यामध्ये केलेला आहे. परंतु केंद्र सरकारने ही यादी करण्यापूर्वी महाराष्ट्र शासनाने ज्या तालुक्यामध्ये इरिगेशनचा बॅकलॉग आहे अशा 87-90 तालुक्यांच्या संदर्भात 3 समित्या गठीत केल्या होत्या. इरिगेशनचा बॅकलॉग असणारे, इरिगेशन कमी असणारे, पाऊस कमी असणारे जे तालुके आहेत अशा 90 तालुक्यांमध्ये इरिगेशनचे काम कमी झालेले आहे. 148 तालुके हे जलसंधारणाचे काम कमी झालेले तालुके आहेत. ज्या दुष्काळी भागासाठी वैधानिक मंडळ स्थापन करावयाचे होते किंवा प्रस्तावित आहे त्यामध्ये ज्या ठिकाणी इरिगेशनची कामे कमी झालेली आहेत, पाऊस कमी आहे अशा तालुक्यांसाठी ते करण्याचा प्रस्ताव होता. सन्माननीय सदस्य जे सांगत आहेत ती बाब तपासून पाहिली जाईल. यातील ज्या तालुक्यांमध्ये इरिगेशन कमी आहे, पाऊस कमी आहे आणि जे निकष या 90 तालुक्यांसाठी ठरविलेले आहेत त्या निकषामध्ये यातील जे काही तालुके बसत असतील त्यांचा समावेश यामध्ये करण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : तुम्ही यादी जाहीर केलेली आहे.

....3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील : यादी जरी जाहीर केलेली असली तरी वरचे जे 58 तालुके रद्द केलेले आहेत, 148 तालुक्यांपैकी ज्या तालुक्यांचा यामध्ये समावेश झालेला नाही ते तालुके तपासून पाहिले जातील आणि निकषांमध्ये बसणाऱ्या तालुक्यांचा समावेश केला जाईल.

श्री. नितीन गडकरी : शासनाने जी. आर. काढलेला आहे.

यानंतर श्री. शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील : जी.आर. काढलेला असला तरी सुध्दा ज्या निकषाने 90तालुके निश्चित करण्यात आलेले आहेत त्यामध्ये काही तालुके बसत असतील तर त्यांचा निश्चितपणे समावेश केला जाईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : केन्द्राने 148 तालुक्यांची यादी पाठविली. मग तालुके कोणत्या निकषाने कमी केले ?

श्री. आर.आर.पाटील : ही बाब तपासून घेण्यात येईल. निकषात बसणा-या सर्व तालुक्यांचा समावेश निश्चितपणे करण्यात येईल.

प्रा. बी.टी.देशमुख : तालुक्याच्या नावाखाली मोठया प्रमाणावर निधी ओढण्याचा प्रयत्न होत आहे. सबंध राज्यामध्ये चार-साडेचारशे हजार हेक्टरचा सिंचनाचा अनुशेष दूर करण्याच्या बाबतीत राज्यपालांनी जे निदेश दिलेले आहेत त्याबाबतीत विथ कंसिडरेशन ही मागणी फेटाळून लावली जाते. या प्रश्नाला कॉन्स्टीटयूशनल स्टेटस आहे. माननीय उपमुख्यमंत्री ही बाब तपासणार आहेत. तालुक्यांना वेगळे काढणे हे घटनेच्या 371(2)च्या अनुच्छेदानुसार आणि माननीय राज्यपालांनी काढलेल्या आदेशांच्या विरोधात आहे काय ? तसे असेल तर ते रद्द करण्याची तयारी ठेवली पाहिजे.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. रणजित कांबळे ( ग्रामविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, धुळे, नंदूरबार, जळगाव, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातूर, अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ, नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली या जिल्हा परिषदांचे सन 2004-2005चे वार्षिक प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : जिल्हा परिषदांचे सन 2004-2005चे वार्षिक प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

---

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: अंदाज समितीचा पाचवा अहवाल सादर करणे

श्रीमती मंदा म्हात्रे (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अंदाज समितीचा सन 2003-2004 या वर्षाच्या अर्थसंकल्पात अंतर्भूत असलेल्या गृह (पर्यटन) विभागाच्या "शिवनेरी किल्ला व त्याच्या सभोवताली सुशोभिकरण करणे" या खर्चाच्या नवीन बाबीसंबंधातील समितीच्या विसाव्या अहवालातील (2003-2004) शिफारशींवर शासनाने केलेल्या कारवाईबाबत पाचवा अनुपालन अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

**उपसभापती** : अंदाज समितीचा पाचवा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

---

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा पहिला अहवाल सादर करणे

श्री. वसंतराव खोटरे (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा पहिला अहवाल सभागृहाला सादर करीत आहे.

**उपसभापती** : विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा पहिला अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

---

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: इतर मागासवर्ग कल्या समितीचा पहिला अहवाल सादर करणे

श्री. सुधाकर गणगणे (समिती सदस्य ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने इतर मागासवर्ग कल्याण समितीचा पहिला अहवाल सभागृहाला सादर करतो.

**उपसभापती** : इतर मागासवर्ग कल्याण समितीचा पहिला अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

---

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ KGS/ श्री.शिगम नंतर 14:55

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना.

**उपसभापती** : श्री.अनंत तरे,वि.प.स. यांनी "भिवंडी महानगरपालिका(जि.ठाणे) शिक्षण मंडळाच्या सभापती,उपसभापती पदाकरिता दिनांक 27 फेब्रुवारी 2006 रोजी बेकायदेशीररित्या निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. ती नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर डॉ.नीलम गोऱ्हे,वि.प.स. यांनी "दिनांक 17 एप्रिल 2006 रोजी विरार-चर्चगेट मार्गावरील लोकल गाडीमध्ये लक्ष्मी अय्यर या महिलेचा झालेला अपघाती मृत्यू" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. ती नियम 93 चा विषय होत नसल्याने,मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री विनोद तावडे व इतर वि.प.स. यांनी "राज्यातील व्यापारी व हॉटेल मालकांनी मूल्यवर्धित कराच्या (व्हॅट) विरोधात एक दिवसाचा लाक्षणिक संप पुकारल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. ती नियम 93 चा विषय होत नसल्याने,मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री गुरुमुख जगवाणी व इतर वि.प.स. यांनी "दिनांक 18 एप्रिल 2006 रोजी जळगांव शहरातील सिरीन अपार्टमेंटमध्ये पोलिसांनी धाड टाकून अतिरेकी संघटनांशी संबंधित असलेल्यांना अटक करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. ती नियम 93 चा विषय होत नसल्याने,मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री. जयंत पाटील,वि.प.स. यांनी "कृष्णा नदीत सध्या केवळ चार फूट पाणी असल्याने व कोयना धरणातून पाणी न सोडल्याने सांगली शहरात निर्माण झालेली पाण्याची टंचाई" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. ती नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री नितीन गडकरी व इतर वि.प.स. यांनी "राज्यामध्ये गेल्या पाच-सहा वर्षात महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये झालेली वाढ त्यामुळे जनमानसात पोलिसांच्या बाबतीत व शासनाबाबत निर्माण झालेला असंतोष" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. ती नियम

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** ....

93 चा विषय होत नसल्याने,मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्रीमती कांता नलावडे व इतर वि.प.स. यांनी "दिनांक 16 एप्रिल 2006 रोजी भिवंडी(जि.ठाणे) येथील नितेश मदनसिंग राजपुरोहित,वय 16,या मुलाचे झालेले अपहरण व त्यामागे मुले पळविणारी एक सक्रिय टोळी असण्याची शक्यता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. ती 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

इतर सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली आहे.

-----

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: हरकतीच्या मुद्यासंबंधी.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी आज नागपूरला जात आहे. त्यामुळे ॲडव्होकेट जनरल यांचे मत सभागृहासमोर शासनाने आज ठेवावे. इतक्या वेळेला आपण निदेश देऊन सुध्दा शासन ॲडव्होकेट जनरलचे ओपिनियन सभागृहासमोर ठेवत नाही. त्यांना वेळ नाही काय ? ते अमेरिकेत गेले आहेत काय ? आपल्या आदेशांची अवहेलना होत आहे. आपल्या आदेशांची शासन दखल घेत नाही. आपल्या पदाची प्रतिष्ठा शासन सांभाळीत नाही. आपण दिलेल्या आदेशाला ॲडव्होकेट जनरल मुंबईत असून 20/20 दिवस उत्तर देत नाहीत. उद्या त्यांचे मत सभागृहासमोर ठेवू नका. परवा जर सभागृहासमोर ही माहिती आली नाही तर मी येथेच उपोषणाला बसणार आहे आणि कामकाजात भाग घेणार नाही. लोकशाहीवर विश्वास राहिला नाही. परवाचे सभागृहाचे कामकाज होऊ दिले नाही तर आम्हांला दोष देऊ नका.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, ॲडव्होकेट जनरलचे मत सभागृहाच्या पटलावर ठेवावे असे आदेश आपण सोमवारी दिले. It is a sheer arrogance म्हणजे याला उध्दटपणाशिवाय दुसरा शब्द असू शकत नाही. सभागृहासमोर माहिती का ठेवली जात नाही याचे कारण तरी शासनाने सांगावे. पोष्टाचा बंद आहे काय ? टॅक्सीचा बंद आहे काय ? कारण तरी निदान सांगितले पाहिजे. सगळे ब्लॅक म्हणजे ठस्स झाल्यासारखे वाटते आहे. सभापती महोदय, There is no response, There is no responsiveness, There is no sensitive and there is no sensitiveness. निदान कोणीतरी मंत्रीमहोदयांनी उठून सांगितले पाहिजे. कोणी काहीही बोलत नाही. शासनाने ॲडव्होकेट जनरलचे मत सदनासमोर ठेवावे असे निदेश आपण सोमवारी दिलेले आहेत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, कॅबिनेट मंत्री सरकारचे प्रतिनिधी म्हणून सभागृहात बसलेले आहेत. त्यांच्यापैकी कोणीतरी उठून यासंदर्भात शासनाचे मत सांगावे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपल्या आदेशाला 20/20 दिवस केराची टोपली दाखविली जाते हा शासनाचा उध्दटपणा आहे.

नंतर भारवि

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, शासन आपल्या निदेशाचा मान राखत नाही. त्यामुळे सभागृहाची बैठक पाच मिनिटांकरिता स्थगित करावी.

श्री.नितीन गडकरी : ...हे सभागृह कशासाठी आहे ? माननीय सभापतींचे आदेश शासन पाळत नसल्यामुळे सभागृहाची बैठक 5 मिनिटांकरिता स्थगित करावी.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या सदनामध्ये कामकाज चालू असते त्यावेळी कुठल्या तरी एका विभागाच्या कॅबिनेट मंत्र्यांनी सभागृहात उपस्थित असले पाहिजे असा नियम आहे. त्याप्रमाणे आता सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित आहेत. त्यामुळे त्यांनी कुठल्याही प्रसंगाला हजरजबाबीने उत्तर दिले पाहिजे. येथे कॅबिनेट मंत्री उपस्थित असताना ते शासनाच्यावतीने सभागृहाला कोणतेच आश्वासन देणार नसतील तर मग सभागृहाची बैठक संबंधित मंत्रिमहोदय येईपर्यंत दहा मिनिटांकरिता स्थगित करावी.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आता जे कॅबिनेट मंत्री उपस्थित आहेत, त्यांना जर यासंबंधीची काहीच माहिती नसेल तर मग सभागृहाची बैठक पाच मिनिटांकरिता स्थगित करावी.

श्री.नितीन गडकरी : सभागृहामध्ये आम्ही बोलू नये म्हणून माननीय मुख्यमंत्र्यांनी आमच्या विरूध्द स्थगनादेश द्यावा.

**उपसभापती** : सभागृहाची बैठक दुपारी 3.30 वाजेपर्यंत स्थगित होत आहे.

(दुपारी 3.02 ते 3.30 वाजेपर्यंत बैठक स्थगित झाली.)

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**:: स्थगितीनंतर ::**

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**<u>ॲडव्होकेट जनरल यांचे मत सदनामध्ये ठेवण्याबाबत.</u>**

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, ॲडव्होकेट जनरल यांचे ओपिनियन सदनापुढे ठेवण्याबाबत सदनाच्या वतीने सांगितले होते. त्यानुसार हे ओपिनियन परवा सदनामध्ये ठेवण्यात येईल. त्यामुळे आता सभागृहाचे कामकाज पुढे चालू ठेवण्यासाठी सर्वांनी सहमती देऊन, सहकार्य करावे असे मला वाटते.

श्री.नितीन गडकरी : महोदय, सर्वप्रथम या विषयासंदर्भात माननीय सभापती महोदय काय बोलले होते ते मी सांगतो. त्यांनी सांगितले होते की, "दिनांक 16 मार्च, 2006 रोजी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी पुरवणी मागण्यांच्या वेळी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावेळी मी सांगितले होते की, या बाबतचा निर्णय घेण्यासाठी एक-दोन दिवस लागतील असे मी सांगितले होते. यामध्ये दोन-तीन दिवस जास्त लागले ही वस्तुस्थिती आहे." तसेच त्यांनी असेही म्हटले होते की, "ॲडव्होकेट जनरल यांचे ओपिनियन विचारात घेण्याचे ठरले आहे. त्यानुसार आमची प्रक्रिया सुरु आहे. त्यानंतर सभागृहात रुलिंग देण्यात येईल." नंतर असेही सांगितले गेले की, "सोमवारी ॲडव्होकेट जनरल यांचे ओपिनियन सभागृहासमोर ठेवण्यात येईल." महोदय, अजून पर्यंत ते ओपिनियन आलेले नाही. ॲडव्होकेट जनरल अमेरिकेत गेले आहेत काय ? त्यांच्याकडून ओपिनियन 20 दिवस उलटले असतानाही का येत नाही ? ते राज्याच्या अर्थमंत्र्यांचे ऐकत नाहीत काय ? त्यामुळे ॲडव्होकेट जनरल यांचे ओपिनियन येण्यास विलंब झाल्यामुळे या ठिकाणी शासनाच्या वतीने दिलगिरी व्यक्त करणे आवश्यक आहे.

**उपसभापती** : सन्माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी सांगितले आहे की, ॲडव्होकेट जनरल यांचे ओपिनियन दिनांक 21 एप्रिल, 2006 रोजी सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

प्रा.बी.टी.देशमुख : महोदय, असे जर होत असेल तर मी या गोष्टीचा निषेध करुन, सभागृहाबाहेर जाईन. ॲडव्होकेट जनरल यांचे ओपिनियन सोमवारी सभागृहापुढे ठेवण्याचे ठरले असताना ते का ठेवले गेले नाही ? याबाबत माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करणे आवश्यक आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख....

Mr. Deputy Chairman, Sir, this matter should not be taken casually. They should not take the Chair's directives casually. सभापती महोदय, आपण पीठासीन अधिकारी आहात. एका बाजूला शासन आमच्या भागाला पैसा देत नाही, आता ॲडव्होकेट जनरल यांचे ओपिनियनही देणार नाही काय ? त्यामुळे या संदर्भात आपणच आम्हाला न्याय द्यावा.

श्री.नितीन गडकरी : महोदय, 20-20 दिवस ॲडव्होकेट जनरल यांचे ओपिनियन न येणे, ही बाब सरकारला भूषणावह आहे काय ?

प्रा.बी.टी.देशमुख : ही गंभीर गोष्ट असल्यामुळे, ती गांभीर्याने घेतली पाहिजे. माननीय सभापती महोदयांनी आदेश देऊनही त्या नुसार जर कार्यवाही होत नसेल तर ते... It is a highest degree of ignorance. उध्दटपणाचे कमाल शिखर आहे, असेच म्हणावे लागेल.

श्री.जयंत पाटील : महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी सांगितले की, ॲडव्होकेट जनरल यांचे ओपिनियन येण्यास विलंब झाला आहे. हे खरे आहे. परंतु उद्या किंवा परवा हे ओपिनियन सभागृहासमोर ठेवले जाईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, सभापती या नात्याने आपण दिलेल्या आदेशाचे पालन शासनाकडून का होत नाही ? या राज्यातील काही लोकांना आपण गुलाम आहात असे सातत्याने भासविण्याचा विडाच या शासनाने उचलला आहे काय ? महोदय, शासनाकडून ही जी काही कृती होत आहे ती योग्य नाही. शासन असे सुध्दा म्हणत नाही की, आम्ही आपले क्षमार्थी आहोत. It is not fair on the part of the Government.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, विलंबाबद्दल मी दिलगिरी व्यक्त करतो. परंतु ॲडव्होकेट जनरल यांचे ओपिनियन परवा सदनासमोर ठेवण्यात येईल.

प्रा.बी.टी.देशमुख : महोदय, शासनाने विलंबाबद्दल दिलगिरी व्यक्त केल्याबद्दल सभापतींच्या वतीने मी शासनाचा आभारी आहे. But, I would like to know that what is the genuine difficulty in this case? परंतु केवळ दिलगिरी व्यक्त करुन आपण घरी जाणार आहात काय ? आपण ओपिनियन परवा ठेवणार आहात, याचा अर्थ ॲडव्होकेट जनरल यांचे ओपिनियन अजूनपर्यंत शासनाकडे आले नाही काय ? जर आले असेल तर, झेरॉक्स मशिन

..3..

खराब झाली आहे काय ? महोदय, आमच्या भागाला पैसा देत नसाल तर नका देऊ, परंतु ॲडव्होकेट जनरलचे ओपिनियन आमच्या भागाच्या दृष्टीने बरे-वाईट असेल ते सुध्दा शासन आम्हाला पाहू देत नाही. त्यामुळे ॲडव्होकेट जनरल यांचे ओपिनियन शासनाकडे अद्यापपर्यंत का आले नाही ? आणि आले असल्यास ते आमच्यासमोर का ठेवण्यात आले नाही ? शासनाची झेरॉक्स मशिन खराब झाली आहे काय ? या गोष्टींचा खुलासा शासनाने करणे आवश्यक आहे.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख ....

नाही तर मी सभागृहामध्ये थांबणार नाही, निषेध करुन बाहेर जाईन. हा त्रास आम्ही 50 वर्षे भोगत आहोत.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख साहेब आपण प्रश्न विचारल्यानंतर माननीय उप मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले. शुक्रवारी ओपिनिअन देण्यात येईल असे सांगितले. परंतु त्यानंतर पुन्हा आपण प्रतिप्रश्न केला आणि त्यावर माननीय मंत्रिमहोदयांनी दिलगिरीही व्यक्त केली. ॲडव्होकेट जनरलचे मत परवा देण्यात येणार असल्याबाबत त्यांनी सांगितले आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आम्ही मागत असलेले पैसे देत नाहीत, गव्हर्नरचे ऐकत नाहीत, घटनेचे ऐकत नाही, सभापतींचे ऐकत नाहीत. सभापती महोदय, या संदर्भातील रिपोर्ट आम्हाला द्यावा. माझी आपणास विनंती आहे की, या संदर्भातील ॲडव्होकेट जनरल यांचे मत परवा द्यावे, उद्या देऊ नका, कारण मी उद्या सभागृहात नाही.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, ॲडव्होकेट जनरल यांचे मत आज देण्यामध्ये काय अडचण आहे ? ते मत जाणून घेण्याचा मला अधिकार आहे. मी त्या मागासलेल्या विभागाचा लोकप्रतिनिधी म्हणून बोलत आहे. ओपिनिअन द्यायचे नाही हे काही बरोबर नाही.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, ओपिनिअन आल्यानंतर त्याच्या आठशे कॉपीज सर्क्युलेट करावयाच्या आहेत. ते ओपिनिअन आज आले आहे. त्या सर्क्युलेट करण्यास वेळ लागणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी म्हणाले की, या संदर्भातील ॲडव्होकेट जनरल यांचे मत परवा द्यावे, उद्या देऊ नका, कारण मी उद्या सभागृहात नाही. त्यामुळे मी " परवा " असे म्हणालो. जे झेरॉक्स मशिन बोलू शकत नाही, त्यावर मी दोष टाकणार नाही. सभापती महोदय, आपल्या आदेशाप्रमाणे ते ओपिनिअन आम्ही परवा सभागृहासमोर देणार आहोत. सन्माननीय सदस्याना झालेला डिले कंडोन करण्यात यावा.

----





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**माननीय श्री. बाळासाहेब भारदे यांच्या गौरवग्रंथाच्या प्रकाशन सोहळ्याबाबत**

**उपसभापती** : महाराष्ट्र विधानसभेचे माजी अध्यक्ष, जेष्ठ गांधीवादी विचारवंत आणि कीर्तन परंपरेचे अध्वर्यु माननीय श्री. बाळासाहेब भारदे यांचे विचार, भाषणे आणि लेख यांचे संकलन असलेल्या गौरवग्रंथाचा प्रकाशन सोहळा गुरुवार, दिनांक 20 एप्रिल, 2006 रोजी सकाळी 10.00 ते 11.30 या वेळेत मध्यवर्ती सभागृह, चौथा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आला आहे.

माननीय श्री. बाळासाहेब भारदे यांच्या गौरवग्रंथाचे प्रकाशन माननीय मुख्यमंत्री यांच्या शुभहस्ते होणार आहे. यासंबंधीची निमंत्रणपत्रिका सर्व सन्माननीय सदस्यांना त्यांच्यासाठी राखून ठेवण्यात आलेल्या टपालखणाद्वारे वितरित करण्यात आली आहे. तरी, सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी गौरवग्रंथ प्रकाशन सोहळ्यास अवश्य उपस्थित रहावे.

----

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>सभागृहाच्या कामकाजासंबंधी</u>**

श्री नितीन गडकरी : सभापती महोदय माझी एक विनंती आहे की, मला आज विमानतळावर जावयाचे असल्यामुळे माझी क्रमांक 2 ची लक्षवेधी आहे] ती कृपया 93 च्या निवेदनाच्या आधी घ्यावी.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, विमान हे रात्रीचे आहे, एखादी गोष्ट टाळणे हे योग्य नाही, येथे झेरॉक्समशीन सारखी व्यवस्था नाही.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, पक्षाच्या कार्यक्रम असल्यामुळे मला जाणे आवश्यक आहे तरी कृपया लक्षवेधी 93 च्या निवेदनाच्या आधी घ्यावी अशी मी परत विनंती करतो.

**उपसभापती** : सभागृहाचे विरोधी पक्षनेते व सभागृहाचे नेते यांची परवानगी असेल तर घेण्यास लक्षवेधी आधी घेण्यास काहीही हरकत नाही.

श्री. आर. आर. पाटील : ठीक आहे, लक्षवेधी घेण्यात यावी.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, जॉन्सन ॲन्ड जॉन्सन कंपनीची जमीन शेतकऱ्यांकडून घेण्यात आलेली आहे. त्यासंदर्भात कोणतीही परवानगी न घेता ती जमीन बिल्डरांना देण्यात येत आहे, या विषयाच्या संदर्भात मी लक्षवेधी सूचना दिली होती ती लक्षवेधी सूचना केव्हा घेणार आहात. ती लक्षवेधीसूचना कालही चर्चेला आली नव्हती व आजही आलेली नाही म्हणून ती केव्हा घेण्यात येणार आहे याबाबत माहिती मिळावयास पाहिजे.

**उपसभापती** : ही लक्षवेधी सूचना जवळपास 2 ते 3 वेळा पुढे ढकलण्यात आलेली आहे. ही लक्षवेधी सूचना सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांनी दिलेली आहे. आता या ठिकाणी मी असे निदेश देत आहे की, ही लक्षवेधी सूचना उद्या घेण्यात यावी व जास्तीत जास्त परवापर्यंत ती चर्चेला घेण्यात यावी.

----------

.......2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत झालेला गैरप्रकार

**मु.शी.**: महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत झालेला गैरप्रकार या विषयावर सर्वश्री, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो. त्याबाबत त्यांनी निवेदन करावी, अशी विनंती करतो.

"महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने सन 1997 मध्ये घेतलेल्या परीक्षेत झालेले गंभीर गैरप्रकार, त्यामध्ये पोलीस उप अधिक्षक पदावर निवड करुन घेतल्याच्या आरोपावरुन नितीन लोहार, मनोज लोहार, सुनिल लोहार या तीन बंधुंविरुद्ध आयोगाने नवीन फिर्याद नोंदविणे, या संदर्भात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या दोन सहाय्यक पोलीस आयुक्तांमध्ये वाद निर्माण होणे, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षा घोटाळ्याचा तपास करणारे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त सुधाकर पुजारी यांनी पब्लिक प्रॉसिक्युटर रामनाथ किणी यांना धमकी देणे, पुजारी यांनी धमकी दिल्याने पोलीस संरक्षण मिळेपर्यंत आपण या प्रकरणाचे काम पाहू शकणार नाही असे पत्र श्री. किणी यांनी पोलीस महासंचालकांना पाठविणे, या प्रकरणातील महत्वाची कागदपत्रे श्री. पुजारी यांनी जाणीवपूर्वक स्वत:जवळ बाळगणे, या प्रकरणाची सखोल चौकशी होण्याची व श्री.सुधाकर पुजारी यांचेवर कडक कारवाई होण्याची नितांत आवश्यकता, शासनाची याकडे हेतूपुरस्सररित्या होत असलेली डोळेझाक, दोषींना पाठीशी घातले जात असल्याची भावना जनमाणसांत निर्माण होणे, यावर शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व कार्यवाही, शासनाची प्रतिक्रिया."

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृहराज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवदेन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे ) ......3....

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी एका विशेष बाबीकडे सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो की, पीडब्ल्यूडीचे माजी सचिव श्री. वाणी, मुंबईचे माजी पोलीस आयुक्त श्री. बापट यांच्यावर इन्व्हेस्टिगेशनच्या संदर्भात कसा अन्याय होत आहे यासंदर्भातील माहिती मी सभागृहात दिली होती. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे आयुक्त श्री. सुधाकर पुजारी यांच्या संदर्भात माहिती मिळाली ती धक्कादायक आहे. श्री. सुधाकर पुजारी यांचा संबंध आंतरराष्ट्रीय गुन्हेगारांशी असल्यामुळे त्यांची बदली लाचलुचपत प्रतिबंधक विभागातून विशेष शाखेत करण्यात आली होती हे खरे आहे काय ? तसेच श्री. सुधाकर पुजारी यांचे सीबीआय मध्ये झालेले डेप्युटेशन व गुन्हेगारांशी असलेले संबंध रद्द झाले हे खरे आहे काय ? त्यांच्या विरुध्द शासनाकडे किती अहवाल आलेला आहेत ? सगळयात गंभीर गोष्ट अशी आहे की, मोक्का कोर्टामध्ये त्यांच्यावर गुन्हा नोंदविण्यात आला होता त्यात एन.एम.सिंग माजी पोलिस आयुक्त, पीडब्युडीचे माजी सचिव श्री. वाणी, श्री. टी.के. चौधरी, सह आयुक्त, श्री. व्ही.एन. देशमुख, माजी आयुक्त, राज्य गुप्त वार्ता विभाग, तसेच प्रदीप सावंत, माजी पोलीस महासंचालक, श्री. श्रीकांत बापट, माजी पोलीस आयुक्त, तसेच एमपीएससीचे अध्यक्ष यांनी रॉ, डी.आर.आय. आणि आय.बी. या गुप्तचर संघटनेतून शपथेवर हे सांगितले आहे. हे खरे आहे काय ? त्याच्या संदर्भात उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करण्यात आलेले आहेत काय ? श्री. नेगी, एक्स डी.जी. श्री अग्रवाल, एक्स. डी. जी., श्री कश्यप एक्स डी.जी...

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

डॉ. पसरिचा, वर्तमान एक्स डी.जी., श्री. विरकर, प्रेझेंट डी.जी.एस.,सी.बी.एम.एस, श्री.अनिल ढेरे, जॉईंट सी.पी. यांनी त्यांच्याविरुध्द ॲफिडेव्हिट दाखल केले. आणि त्याचे खोटे पुरावे तयार करुन निर्दोष लोकांना अटक करण्याची परवानगी मागत आहेत. मला यामध्ये एकाच गोष्टीचे वाईट वाटते की, या संदर्भात पहिली गोष्ट अशी की, श्री. पुजारी हे काम करीत असतांना त्यांनी मोठ-मोठया निरपराध लोकांना इन्व्हेस्टिगेशनचा आधार घेऊन बळीचा बकरा केला आहे. श्री. वाणी हे सार्वजनिक बांधकाम विभागाचे माजी सचिव, अतिशय प्रामाणिक असलेले, माझा त्यांच्यावर पूर्ण विश्वास आहे. त्यांना सुध्दा जेलमध्ये दोन अडीच वर्षे काढावे लागले. श्री. शिवारे, प्राचार्य यांना सुध्दा जेलमध्ये टाकण्यात आले. श्री. बापट, हे देशातील आऊटस्टँडीग अधिकारी आहेत त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी ते पोलिसांकडे परवानगी मागावयास लागले. शेवटी हे असह्य झाले म्हणून सभागृहामध्ये हा विषय मांडला. मला आपल्याला एकच विनंती करावयाची आहे की, न्यायालयाबद्दल आम्हाला पूर्ण सन्मान आहे. परंतु न्यायालयामध्ये आणि प्रेसमध्ये एखादा उच्च पदस्थ अधिकारी लोकांना अशाप्रकारे अटक करतो त्यावेळी हा काहीतरी महत्वाचे काम करीत आहे असे समजून त्याला लोकांचा पाठींबा मिळतो. त्याला पाठींबा द्यायला हरकत नाही. परंतु या केसमध्ये ज्यांच्याकडे पुरावे नाहीत अशाप्रकारच्या निरपराध लोकांवर अन्याय झाला आहे. माझी विनंती अशी आहे की, मी विचारलेले प्रश्न खरे आहेत काय? असल्यास श्री. पुजारी यांच्यावर आपण काय कारवाई करणार आहात? त्यांना आपण ताबडतोब निलंबित केले पाहिजे. त्यांनी आतापर्यंत बायस इन्व्हेस्टिगेशन केले आहे. एवढया मोठया पोलीस अधिकाऱ्याने आक्षेप नोंदविले आहेत, त्यांनी अनेक लोकांचे जीवन उध्वस्त केले आहे.त्यामध्ये जे गुन्हेगार असतील त्यांच्यावर आपण कारवाई करावी. त्यामध्ये श्री. लोहार आहेत त्यांच्याबाबत माझे काही म्हणणे नाही. परंतु त्यांनी अशाप्रकारे बायस इन्व्हेस्टिगेशन केले आहे त्यांची चौकशी करुन कमीत कमी पुन्हा आपण कोर्टामध्ये गेले पाहिजे. मंत्रिमहोदय, आपला सार्वभौम चौकशी करण्याचा अधिकार आहे. आपल्या प्रशासकीय बाबीमध्ये ढवळाढवळ करण्याचा अधिकार न्यायालयाला नाही याची मला जाणीव आहे. तेव्हा या संदर्भात आपण कोणती कठोर कारवाई करणार आहात? असा माझा प्रश्न आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, महासंचालक, अँटी करप्शन ब्यूरो यांनी श्री. पुजारी यांच्याविरुध्द मार्च 2005 मध्ये, डिसेंबर 2005 मध्ये आणि एप्रिल 2006 मध्ये शासनाकडे अहवाल पाठविले आहेत ही वस्तुस्थिती आहे. सभापती महोदय, एम.पी.एस.सी. ची केस 1999 मध्ये दाखल झाली होती. त्या केसचा तपास चालू असतांना त्यांची बदली सोलापूरला करण्यात आली होती. ती बदली केल्यानंतर त्यांनी कोर्टामध्ये रिट दाखल केला...

श्री.नितीन गडकरी : ते सोलापूरला होते त्या ठिकाणी त्यांची बदली झाली याबाबत आपल्या गृह विभागाने चौकशी केली पाहिजे. हे हिरोइझम करुन तेथील लोकांना पकडून कोर्टात टाकायला लावतात. आणि मग पुन्हा सरकारला स्टे द्यावा लागतो याची आपण चौकशी करावी.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, त्यावेळी गुन्हेगाराशी संबंध असल्यामुळे बदली करण्यात आली होती. परंतु त्याचे नंतर इन्व्हेस्टिगेशन झाले नाही. यामध्ये त्यांचा संबंध आहे की नाही हे स्पष्ट झालेले नाही. या दरम्यान या केसचा तपास त्यांच्याकडे असल्यामुळे कोर्टाने तोंडी सूचना दिल्या की, त्यांची बदली करण्यात येऊ नये. आणि हा तपास त्यांच्याकडून काढून घेण्यात येऊ नये. सभापती महोदय, विभागाची अशी धारणा झाली की कोर्ट हा तपास मॉनिटर करीत आहे. ही गोष्ट खरी आहे की, वरिष्ठांचे आदेश न मानने, रिपोर्टींग न करणे यासंबंधी कसूरीचे अहवाल आले आहेत, वरिष्ठांचे अहवाल आले आहेत,. या प्रकरणाचा तपास कोर्ट बघत असल्यामुळे तुम्ही कुणी मला विचारु नका अशापध्दतीची उत्तरे दिली गेली आहेत. या सर्व प्रकरणाची चौकशी करण्यात येईल. सभापती महोदय, वरिष्ठांनी काही सूचना केल्या तर माझ्या कामामध्ये हस्तक्षेप केला जात आहे म्हणून कोर्टामध्ये ॲफिडेव्हिट दाखल करण्यात आले. ही सर्व मॅटर कोर्टाच्या निदेशाप्रमाणे चालू आहेत. त्यामुळे शासनाने याबाबत कारवाई केली नव्हती. परंतु सुप्रिम कोर्टाचा यामध्ये निकाल असा आहे की, जरी एखादा तपास हायकोर्टाच्या न्यायाधिशाकडून मॉनिटर केला जात असेल, त्याच्या नियंत्रणाखाली तपास केला जात असेल तरीसुध्दा विभागाची शिस्त पाळावी लागेल.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील (पुढे सुरु...

अशाप्रकारचा सुप्रीम कोर्टाचा निकाल झालेला आहे. त्यांच्या संबंधात तीन कसूर अहवाल आलेले आहेत, कोर्टाच्या निकालाचा आधार घेऊन तो अहवाल 15 दिवसात तपासून चौकशी पूर्ण केली जाईल आणि जी कारवाई करणे शक्य आहे ती केली जाईल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मंत्री महोदयांना पुरावा पाहिजे असेल तर तो द्यायला मी तयार आहे. लोकशाहीमध्ये चार स्तंभ आहेत. विधिमंडळ, एक्झीक्युटीव्ह म्हणजे नोकरशाही, त्यानंतर प्रेस आणि ज्युडिशियरी असे ते स्तंभ आहेत. यांचे वेगवेगळे अधिकार आहेत. सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाप्रमाणे जर हायकोर्टाने एखाद्या अधिकाऱ्यावर जबाबदारी दिली असेल तर त्या विषयामध्ये हस्तक्षेप न करता, ते अधिकारी शिस्तीने वागत नसतील, वरिष्ठांच्या आदेशाचे पालन करत नसतील तर तो त्यांचा गंभीर स्वरुपाचा गुन्हा आहे, त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे. मंत्री महोदय, आपण हे सगळे कसे सहन करता,समजत नाही. मी आापल्या ठिकाणी असतो तर न्यायालयाला सांगितले असते की,आता पुरे झाले, माझ्यावर कंटेम्प्ट झाला तरी हरकत नाही, मी ऐकणार नाही, तो माझा अधिकार आहे. चार डी.जीं.नी त्यांच्या संबंधात तक्रार केलेली आहे, त्याची दखल घेतली जात नाही. श्री.नेगी, श्री.कश्यप, श्री. पसरीचा आणि श्री.अनिल ढेरे या डायरेक्टर ऑफ जनरलचे ते ऐकत नाहीत, याबाबत त्यांच्या तक्रारी आहेत. मग कसे प्रशासन चालेल ? या अधिकाऱ्याची बदली सी.बी.आय.कडे झाली होती, पण त्यांचा संबंध अंडरवर्ल्डशी असल्यामुळे ती रद्द केली गेली. मी केवढा ताकदवान आहे हे ते दाखवत असत. त्यांचा त्यामध्ये दोष असेल तर त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे. मंत्री महोदय, दोन-अडीच वर्षे निरपराध लोकांना चौकशीच्या नावाखाली डांबून ठेवलेले आहे. श्रीमती सायली जोशी यांचे तर जीवन उध्वस्त केले. त्यांच्यावरील 24 आरोपांपैकी 20 आरोपामध्ये त्या निर्दोष सुटलेल्या आहेत, 4 आरोपांचा निर्णय व्हायचा आहे. अशाप्रकारे लोकांचे जीवन उद्ध्वस्त होणार असेल, समाजाला उद्ध्वस्त केले जात असेल तर शासन म्हणून आपण मूकपणे पाहू शकत नाही. या विषयी गंभीरतेने घ्यावे. यासाठी विरोधी पक्षातर्फे ताकतीनिशी आपल्या मागे उभे आहोत. याचे रेकॉर्ड होईल. माझी विनंती आहे की, लोकशाहीची, कायद्याची बूज ठेवण्याकरिता, पोलीस प्रशासनामधील शिस्त टिकविण्याकरिता आपण कारवाई केली पाहिजे. आपण राष्ट्रवादीचे गृहमंत्री नाही तर आपण महाराष्ट्राचे गृहमंत्री आहात, आमचे गृहमंत्री आहात, महाराष्ट्राच्या जनतेचे गृह मंत्री आहात, तुम्ही राजाच्या भूमिकेमध्ये आहात.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MAP/

श्री.नितीन गडकरी (पुढे सुरु.....

आपल्यावर 'थकले रे नंदलाला'असे म्हणण्याची वेळ येऊ नये. जिथे हस्तक्षेप करायला पाहिजे तेथे करत नाही. माझी विनंती आहे की, या संदर्भात सगळ्या गोष्टी सांगितलेल्या आहेत, त्या खऱ्या असतील तर स्वत: सगळ्या फाईल्स बोलवा. सुप्रीम कोर्टाच्या आदेशाप्रमाणे सबज्युडीस मॅटरमध्ये हायकोर्ट मॉनिटरीग, इन्व्हेस्टीगेशन करत आहे. परंतु प्रशासकीय कारणावरुन शिस्तभंगाची कारवाई करण्याचा आपल्याला अधिकार आहे. आपण सुसंस्कृत आहात. हा निर्णय घेतल्यामुळे लगेचच न्यायालय काही तरी म्हणेल म्हणून घाबरुन जाऊन संबंधितांवर कारवाई करण्यामध्ये मागे राहू नका. या संबंधाने श्री.पुजारी दोषी असतील, तसे रिपोर्ट मिळाले तर 15 दिवसामध्ये चौकशी करुन त्यांना निलंबित करण्याची कारवाई करणार आहात काय ? त्यांनी जी चौकशी केलेली आहे ती बायस माईन्डने केलेली आहे, असा त्यांच्यावर आरोप आहे. ही चौकशी उच्च अधिकाऱ्याकडून करण्यात येईल काय ?

श्री.आर.आर.पाटील : एम.पी.एस.सी.मध्ये जे काही घोटाळे झाले ते आपल्याला माहीत आहेत. या संबंधाने निरपराध लोकांवर बायस माईन्डने कारवाई केलेली आहे असे सांगितले गेले. परंतु एम.पी.एस.सी.मध्ये सगळेच काही आलबेल आहे, असा निष्कर्ष काढता येणार नाही. हा तपास इन्व्हेस्टीगेशन ऑफ ब्युरोकडे दिलेला होता. त्या मागची कारणे शोधून काढली पाहिजेत. आहे. श्री.लोहार प्रकरणामध्ये एम.पी.एस.सी.ने त्यांचे केलेले नॉमिनेशन रद्द केले.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील .....

सभापती महोदय, मग केलेले नॉमिनेशन तरी चुकीचे असले पाहिजे किंवा जे रद्द केले ते तरी चुकीचे असले पाहिजे. दोनपैकी कोणती तरी एक गोष्ट चुकीची असली पाहिजे. त्या ठिकाणी चुकाच होत नव्हत्या असा निष्कर्ष आपण काढावयास नको. तरी सुध्दा कोणावर नाहक आरोप झाले असतील, त्यांना आरोपी केले असेल, ही सगळी बाब कोर्टामध्ये आहे. ते जर निर्दोष असतील तर निश्चितपणे कोर्टातून सुटतील. जर ते सुटले तर शासनाला निष्कर्ष काढता येईल की, त्यांच्यावर बायस ॲक्शन घेतली होती आणि त्यांना आरोपी केले होते. या स्टेजला आपण कोणालाही निरपराध मानण्याची आवश्यकता नाही. कारण ते कोर्टाचे काम आहे. प्रशासकीय शिस्त पाळली पाहिजे या आपल्या मताशी मी सहमत आहे. सभापती महोदय, येत्या पंधरा दिवसाच्या आत जे अहवाल त्यांच्या विरोधात आलेले आहेत त्याचा तपास ए.सी.एस. करतील. ते अहवालाची छाननी करतील आणि त्या अनुषंगाने जी कारवाई करणे आवश्यक असेल ती कारवाई केली जाईल.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय गृहमंत्री श्री. आर. आर. पाटील साहेबांनी उत्तर देताना सांगितले की, त्यांचा गुन्हेगारांशी संबंध आहे म्हणूनच त्यांची बदली करण्यात आली. बदलीची शिक्षा पुरेशी आहे काय ? त्याचवेळी त्यांना निलंबित का करण्यात आले नाही ? अजूनही निलंबनाची कारवाई करता येऊ शकते काय ?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, मी स्पष्टपणे सांगितले की, गुन्हेगारांशी संबंध आहे म्हणून बदली करण्यात आली होती. पण गुन्हेगारांशी संबंध असल्याचे स्पष्ट झालेले नाही. त्यादृष्टीने चौकशी केली गेली नाही. कोर्टानेच बदली करु नये आणि तपास काढू नये अशा सूचना दिल्यामुळे तो तपास तसाच चालू राहिला.

**उपसभापती** : हे सगळेच प्रकरण खरोखर गंभीर आहे. माननीय मंत्रिमहोदय श्री.आर.आर. पाटील यांना सांगू इच्छितो की, गृह खात्याचा कारभार आपण हाती घेतल्यानंतर आपला असा लौकिक आहे की, ज्या ठिकाणी आपल्याला अधिकारी दोषी दिसला तर आपण ताबडतोब त्यांच्यावर उचित कारवाई केलेली आहे. काय कारवाई करावयाची तो अधिकार आपल्याकडे आहे. एका प्रकरणामध्ये दारु पिऊन माणसे मृत्युमुखी पडली म्हणून तिकडच्या अधिकाऱ्यांना दोषी धरले आणि

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ SBT/

**उपसभापती** ......

कालांतराने त्यांना सेवेत समाविष्ट करुन घेतले गेले. त्यांचा तसा दोष असेल किंवा नसेल. एखादा अधिकारी त्या पदावर काम करीत असताना त्यांची नि:पक्षपातीपणे चौकशी होऊ शकत नाही असे माझे प्रामाणिक मत आहे. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी सांगितले तसेच आम्ही सुध्दा वर्तमानपत्रामध्ये वाचले. श्री. बापट यांच्यासारखे अधिकारी, ज्यांनी उभी हयात निष्कलंकपणे सेवा केलेली आहे अशा माणसाला एखाद्या प्रकरणामध्ये या पध्दतीने सामोरे जावे लागत असेल तर महाराष्ट्रातील निष्कलंक, प्रामाणिक प्रशासकीय अधिकारी पोलीस दलामध्ये किंवा अन्य खात्यामध्ये काम करणार नाहीत. आपण उत्तरामध्ये असेही म्हटले की, पुढील तपास कोर्टाकडे दिलेला आहे. त्याचा तपास होऊन कोर्टाच्या निकालानंतर ते निर्दोष आहेत की सदोष आहेत हे समजेल. कोर्टाच्या निकालानंतर ते अधिकारी निर्दोष आहेत की नाही हा दाखला ज्यावेळी आपण देता त्याचवेळी ज्या अधिका-यांविरुध्द त्याच्या वरिष्ठांनी आपल्याकडे रिपोर्ट सादर केला आहे तो अधिकारी दोषी नाही असे या ठिकाणी गृहीत धरणे मला स्वत:ला उचित वाटत नाही. आपण असे म्हणालात की, 15 दिवसाच्या आत चौकशी करुन आम्ही निश्चितपणे कारवाई करु. या ठिकाणी मला आपल्याला अशा प्रकारचे निदेश देण्याची आवश्यकता वाटत नाही परंतु एक गोष्ट मात्र निश्चित आहे की, जे प्रामाणिक लोक आहेत, ज्यांनी उभी हयात शासकीय सेवेत प्रामाणिकपणे काम केलेले आहे ते विनाकारण अडीच वर्षे, तीन वर्षे तुरुंगामध्ये खितपत पडले असतील तर त्याचा देखील गांभीर्याने विचार केला गेला पाहिजे.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, रेकॉर्डवर काही गोष्टी राहू नयेत. त्यांनी ज्यांना अटक केली त्यातील काही लोक आता न्यायालयीन कस्टडीमध्ये आहेत. काही लोक जामिनावर सुटलेले आहेत. त्यांच्यावर आरोपपत्र दाखल आहेत. अशा स्टेजला त्या लोकांना या व्यासपीठावरुन किंवा या सभागृहाच्या माध्यमातून याबाबतीत क्लिनचीट देणे हा न्याय व्यवथेमध्ये हस्तक्षेप ठरु शकतो. आपण याबाबतीत प्रतिक्रिया व्यक्त न केलेली बरी.

यानंतर श्री. शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रश्न असा आहे की, प्रशासकीय शिस्तीचे उल्लंघन झालेले आहे की नाही ही बाब आम्ही तपासून बघू. 15 दिवसात ऐसीएस अधिका-यामार्फत तपास करुन कोणी दोषी आढळले तर कारवाई करण्यात येईल अशी भूमिका मी शासनामार्फत व्यक्त करतो.

**उपसभापती** : मी येथे सांगू इच्छितो की, मी न्यायालयाचा अनादर करु इच्छित नाही. आता पर्यन्त तो कधी केला नाही. परंतु समाजामध्ये लोकप्रतिनिधी म्हणून काम करीत असताना एखादी व्यक्ती कशी वावरते याची माहिती आपणाला असते. हा प्रश्न या सभागृहामध्ये दुस-यांदा उपस्थित करण्यात आला. ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी असे सांगितले आहे की, मी या ठिकाणी खात्रीने म्हणू शकतो की, श्री. वाणी सारखा एखादा शासकीय अधिकारी प्रामाणिक असेल तर तो केवळ कस्टडीमध्ये असल्यामुळे अप्रामाणिक आहे असे म्हणण्याचा आम्हाला नैतिक अधिकार नाही. आमचा नैतिक अधिकार हाच आहे की, त्या अधिका-याने खरोखरच प्रामाणिकपणे काम केलेले असेल व तो संकटात असेल तर त्याला न्याय देण्याचा हा प्रयत्न आहे. त्यामुळे यामध्ये न्यायालयाचा अवमान करण्याचा कोणताही हेतू नाही. एखादा अधिकारी दोषी आहे की निर्दोष आहे यासंबंधात 2005 मध्ये पाहिला अहवाल आला. डिसेंबर 2005 मध्ये दुसरा अहवाल आला आणि त्यानंतर पुन्हा 2006 मध्ये अहवाल आलेला आहे. इतकी वर्षे त्याच्या वरिष्ठ अधिका-यांनी आपल्याकडे अहवाल पाठवलेले आहेत. त्यामुळे असा प्रश्न उभा राहतो की, एखाद्याच्या बाबतीत आपण ज्या तडजोडीने ॲक्शन घेतली जाते ..... मला स्वत:ला वाटते की, न्यायालयाचा आदर करणारी आपली संस्था आहे. परंतु याचा अर्थ असा नाही की, न्यायालयाने दिलेले आदेश आपण पाळतो. सरकारी यंत्रणेतील कोणत्या अधिका-याने कोणते काम करावे हे न्यायालय ठरवू लागले तर आपल्या स्वत:चे अधिकार संपण्याची भीती आहे. आम्ही केलेल्या कायद्यामध्ये कोर्टाला इंटरप्रेटेशन करण्याचा अधिकार आहे, परंतु ते चुकीचे इंटरप्रेटेशन होत असेल आणि ख-या अर्थाने जिवंत माणसे मरायला लागली तर आमच्या सारखी माणसे डोळे बंद करुन निमूटपणे बसू शकत नाहीत. माननीय उपमुख्यमंत्र्यांनी याबाबतीत 15 दिवसात ॲक्शन घेतो असे सांगितले. जो अधिकारी प्रामाणिकपणे काम करणारा असेल त्याला न्याय मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली तर ते चुकीचे होणार नाही. तेव्हा याबाबतीत 15 दिवसा पेक्षा जास्त कालावधी लागू नये अशी माझी अपेक्षा आहे.

श्री. आर.आर.पाटील : ठीक आहे.

-------

...2..

**93च्या सूचनेबाबत**

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, मी काल देखील या सभागृहामध्ये 93च्या सूचनेवरील निवेदन चर्चेसाठी घेण्यात येईल म्हणून सभागृहामध्ये दीड तास थांबलो होतो. आताही मी या सभागृहामध्ये नियम 93च्या सूचनेवरील निवेदन चर्चेसाठी घेण्यात येईल यासाठी थांबलो आहे.

**उपसभापती** : काल आपण सभागृहामध्ये एक-दीड तास थांबल्यानंतर 93च्या सूचनेवरील निवेदन चर्चेसाठी घेण्यात आले नाही हे योग्य झाले नाही असे मी म्हटले होते. आता सन्माननीय सदस्य श्री नितीन गडकरी यांना अत्यंत महत्वाच्या कामासाठी नागपूरला जावयाचे असल्यामुळे त्यांनी त्यांची लक्षवेधी पहिल्यांदा घ्यावी अशी विनंती केली. माननीय उपमुख्यमंत्र्यांनी देखील त्यास मान्यता दिली. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी याबाबतीत मला विनंती केल्यामुळे सदनाच्या संमतीने मी लक्षवेधी घेतलेली आहे.

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी आणि सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी विनंती केल्यानुसार लक्षवेधी घेण्यात आल्याचे आपण सांगितले. काजकाजपत्रिकेवरील कामकाजाचा जो क्रम आहे त्यानुसार कामकाज घ्यावयास पाहिजे. कामकाजपत्रिकेवरील कामकाजाचा क्रम बदलून कामकाज घेण्याची प्रथा सुरु करणे इष्ट नाही एवढेच मला सांगावयाचे आहे.

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ MAP/ श्री. शिगम नंतर 16:05

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या विषयावर वाद होणे आणि चर्चा होणे बरोबर होणार नाही. मी आपल्याला एवढीच विनंती करतो की, लक्षवेधी सूचना पुकारली आहे तेवढी पूर्ण करा आणि त्यानंतर 93 ची निवेदने चर्चेला घ्या.

**उपसभापती** : मी हेच बोललो होतो की जी लक्षवेधी मी पुकारली आहे ती लक्षवेधी संपल्यानंतर लगेचच 93 ची निवेदने चर्चेला घेतो.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी सूचना केल्याप्रमाणे विशेष बाब म्हणून त्यांची लक्षवेधी सूचना आधी चर्चेला घेण्याचे आपण मान्य केले. त्यांची लक्षवेधी संपल्यानंतर 93 ची निवेदने सुरु करावयाला पाहिजे होती. आपण दुसरी लक्षवेधी सुध्दा पुकारली. माननीय सदस्य श्री.गडकरी यांनी दिलेली लक्षवेधी झाल्यानंतर कामकाज पत्रिकेवरील क्रमाप्रमाणे सभागृहाचे कामकाज सुरु करावे आणि नियम 93 अन्वये सूचना चर्चेला घ्याव्यात अशी मी आपणांस विनंती करतो.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मंत्री श्री. गणेश नाईक हे वरिष्ठ मंत्री आहेत. अतिशय कर्तृत्ववान आहेत. काल आणि आज सुध्दा ते सांगत आहेत की आम्ही येथे येऊन बसलो आहोत. सभागृहात तुम्ही रिकामे येऊन बसला आहात काय ? विधानसभेमध्ये आणि विधानपरिषदेमध्ये अशा दोन्ही सभागृहामध्ये जाणे हे तुमचे काम आहे. काल आणि आज आम्ही तयारी करुन बसलो आहोत असे ते म्हणत आहेत. दोन वेळा त्यांनी असे वक्तव्य केलेले आहे. दिवसभराचे सभागृहाचे महत्वाचे कामकाज आहे. तुम्ही तयारी करुन आला आहात चांगली गोष्ट आहे. परंतु "काल आणि आज दोन्ही दिवस आम्ही येथे येऊन बसलो आहोत" अशा प्रकारचे त्यांचे जे वक्तव्य आहे ते असता कामा नये.

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी मी केलेल्या वक्तव्याबाबत जी भावना व्यक्त केली तशी माझी भावना नाही. माननीय सदस्यांनी तशा प्रकारचा अर्थ काढला असेल तर मी दिलगिरी व्यक्त करतो. काल नियम 93 अन्वये सूचनांवर चर्चा करावयाची आहे असे आम्हांला सांगितले गेले. अपवादात्मक परिस्थितीमध्ये माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांची लक्षवेधी सूचना आपण आधी घेतली होती. सभागृहाचे कामकाज कार्यक्रम पत्रिकेप्रमाणे चालले पाहिजे अशी आमची अपेक्षा आहे. सभागृहातील सर्वच घटकांना न्याय मिळाला पाहिजे.

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : यापुढे सभागृहामध्ये कोणत्याही मंत्रीमहोदयांनी विनंती केली की, मला खालच्या सभागृहात म्हणजे विधानसभेमध्ये जायचे आहे तर अशा प्रकारची परवानगी यापुढे मिळणार नाही. तसेच कोणत्याही सदस्यांना अशा प्रकारची कामकाजाच्या क्रमात बदल करण्याबाबतची सवलत मिळणार नाही. माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांना खास बाब म्हणून परवानगी देण्यात आली होती. यापुढे कोणत्याही मंत्र्यांनी अशा प्रकारचे पत्र आमच्याकडे पाठवू नये असे निदेश मी देत आहे.

-------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



SSK/ SBT/ MAP/ श्री. शिगम नंतर 16:05

**पृ.शी**. कोपरगांव,जि.अहमदनगर येथील 24 कुक्कुट पालन व्यावसायिक शेतकरी उपोषणास बसणे.

**मु.शी**.: कोपरगांव,जि.अहमदनगर येथील 24 कुक्कुट पालन व्यावसायिक शेतकरी उपोषणास बसणे याबाबत सर्वश्री नितीन गडकरी,पांडुरंग फुंडकर,विनोद तावडे,वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. हसन मुश्रीफ (पशुसंवर्धन राज्यमंत्री) : सभ्ंापती महोदय, सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे यांनी "कोपरगांव जि.अहमदनगर येथील 24 कुक्कुट पालन व्यावसायिक उपोषणास बसणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती,तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

------

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, या सूचनेवरील निवेदनाने माझे समाधान झाले आहे.

.....4



**पृ.शी**.: कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या हमी किंमतीमधून कापून घेण्यात आलेला निधी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मु.शी.**: कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या हमी किंमतीमधून कापून घेण्यात आलेला निधी याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर,नितीन गडकरी,सागर मेघे,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. जयप्रकाश दांडेगांवकर( सहकार राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री पांडुरंग फुंडकर,नितीन गडकरी, सागर मेघे यांनी "कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या हमी किंमतीमधून कापून घेण्यात आलेला निधी या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती,तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती महोदय, निवेदनात "13.83 लाख शेतकऱ्यांना 170.23 कोटी रुपयांचे वाटप झाले आहे असे म्हटले आहे. या वाक्याऐवजी " 15.46 लाख शेतकऱ्यांना 189.54 कोटी रुपयांचे वाटप आतापर्यंत झाले आहे" असे वाचावे.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**<u>निवेदन</u>**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

....5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**निवेदनानंतर**

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या राज्यात कापूस उत्पादक पणन महासंघाच्या वतीने कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या हमी किंमतीमधून भागभांडवल म्हणून 3 टक्के रक्कम 1995 पर्यंत कापून घेण्यात आली. कापून घेतलेले हे 768 कोटी रुपये शेतकऱ्यांना परत करण्याचा निर्णय झाला आणि त्यातील 350 कोटी रुपये पहिल्या टप्प्यामध्ये द्यावयाचे ठरले. त्यानुसार या रकमेचे वाटप सुरु झाले.

नंतर भारवि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर..

सभापती महोदय, मी मंत्रिमहोदयांचे अभिनंदन करतो. चेकचे वाटप सुरू असताना घोळ सुरू आहे. 15-20 वर्षाच्या हिशोबा करिता एका खाजगी कंपनीला कॉन्ट्रॅक्ट देण्यात आले आहे. या कंपनीने चुकीच्या नावाने चेक काढलेले आहेत. त्यामुळे असे चेक बँकेमध्ये वटत नाहीत. मृत व्यक्तींच्या वारसदारांना चेक मिळण्यासंबंधी ॲफिडेव्हीट करून घेण्याच्या सूचना असल्या तरी देखील तहसिलदार त्या ॲफिडेव्हीटवर सही करीत नाही. मार्च महिन्यातील चेक एप्रिलमध्ये देण्यास सुरूवात केली आहे. अशाप्रकारे तेथे घोळ सुरू आहे. सटाणा, लासलगाव येथील काही उदाहरणे माझ्या समोर आहेत. आरई गावचे एक प्रकरण माझ्याकडे आहे. तेथील 225कापूस उत्पादक शेतकऱ्यांना चेक दिले आहेत. सदर चेक त्यांच्या घरी जाऊन दिलेले नाहीत. ते गावात बाजूला टाकून दिले. काही चेक हे खरेदी विक्री संघामध्ये ठेवले होते. असा प्रकारचा गोंधळ तेथे सुरू आहे. चेकचे वाटप खरेदी विक्री संघाच्या माध्यमातून होत असल्यामुळे त्यांना कमिशन दिले जाते. असे जरी असले तरी तेथेसुध्दा चेक पडून आहेत. अनेक गावातील लोकांच्या चेकचा आज प्रश्न आहे. तसेच चेक वटविण्यासाठी बँकेत खाते उघडण्यास सांगितले जाते. 50-60 कि.मी.वरून 100 रुपयाचा चेक घेण्यासाठी शेतकऱ्याला जवळ जवळ 60 रुपये खर्च करावे लागतात. म्हणून त्यांना बेअरर चेक दिले पाहिजेत. तेव्हा चेक वितरणामधील गोंधळ थांबविण्यासाठी कोणत्या प्रकारे उपाययोजना करणार आहे ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, कापसाच्या चेकचे वितरण पूर्वीपासून खरेदी विक्री संघामार्फत होते. प्रत्येक गावात क्रमावारी पध्दतीने चेक देण्याच्या सूचना खरेदी विक्री संघाला देण्यात येतील. तसेच, 100 रुपयाच्या चेकसाठी बँकेत खाते उघडण्याची गरज नाही, असे आदेश यापूर्वीच दिले आहेत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपण सूचना दिल्या असल्या तरी त्याचे पालन तहसिलदार,बँक,खरेदी विक्री संघ करीत नाही.

श्री.जयप्रकाश दांडेगांवकर : सभापती महोदय, शासनाच्या आदेशाची कार्यवाही करावी अशा पुन्हा सूचना संबंधितांना देण्यात येतील. आता पर्यंत एकाच वेळी जवळ जवळ 15 लाख शेतकऱ्यांना चेक दिलेले आहेत. कापूस पणन महासंघाकडे शेतकऱ्यांची कुठलीही तक्रार आलेली नाही.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, कापूस पणन महासंघाकडे कोणीही तक्रार करीत नाही. आमच्याकडे आलेल्या तक्रारी शासनाकडे दिल्या तर चालतील का ? चेक वाटपात प्रचंड गोंधळ असल्यासंबंधीची बातमी वर्तमानपत्रात छापून येत आहे. तेव्हा असा गोंधळ पुन्हा होऊ नये म्हणून निश्चित अशी सिस्टीम शासन सुरू करणार आहे काय ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सिस्टीम संबंधी सूचना केली आहे. जर सिस्टीममध्ये काही त्रुटी असतील तर त्या दूर केल्या जातील. तसेच मृत व्यक्तीच्या वारसदारांना साध्या ॲफिडेव्हीटवर चेक देण्यासंबंधीची सूचना केली आहे, त्यावर निश्चितपणे विचार करण्यात येईल.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, जिल्हा मध्यवर्ती बँकांकडे सरकारचा पैसा अजूनपर्यंत पोहोचलेला नाही. त्यामुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका चेक कॅश करीत नाही. ते चेक परत येत आहेत. त्यामुळे ते चेक त्वरित पाठविण्याची सूचना आपण देणार आहात काय ?

श्री.जयप्रकाश दांडेगांवकर : सभापती महोदय, हुंडी वगैरे हा काही प्रकार आता राहिलेला नाही. आता व्यवहार चेकने सुरु आहे. त्यामुळे पैशांची अडचण नाही. जर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेसंदर्भात सन्माननीय सदस्यांचा काही अनुभव असेल तर त्यांनी तो मला सांगावा त्याबाबत योग्य ती कार्यवाही केली जाईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, चेकमधील नावामध्ये असंख्य चुका झालेल्या आहेत. नावामध्ये, मधल्या नावामध्ये, आडनावामध्ये ज्या चुका झालेल्या आहेत त्याची दुरुस्ती कोठे करण्यात येईल ? कारण या चुकांमुळे बँका चेक स्वीकारत नाहीत. असे चुकलेले चेक कोठे दुरुस्त होणार आहेत ? माझ्यामते 1000 चेक असे आहेत की, ज्यामध्ये अशा प्रकारच्या चुका झालेल्या आहेत. त्यामुळे या चुका नेमक्या कोठे दुरुस्त करणार आहात ?

श्री.जयप्रकाश दांडेगांवकर : महोदय, किरकोळ दुरुस्ती असेल तर संघाच्या पातळीवर तेथल्या तेथेच दुरुस्ती करण्याबाबत सांगितले जाईल. वडिलांचे किंवा आडनाव बदलले असेल तर संघाकडे ते चेक पाठवावेत, त्या ठिकाणावरुन दुरुस्ती करुन दिली जाईल.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मिठी नदी सफाईचे काम युध्द पातळीवर करण्याची गरज

**मु.शी.**: मिठी नदी सफाईचे काम युध्द पातळीवर करण्याची गरज याबाबत श्री.मधुकर चव्हाण व इतर वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, श्री.मधुकर चव्हाण व इतर वि.प.स. यांनी "मिठी नदी सफाईचे काम युध्द पातळीवर करण्याची गरज" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

:: निवेदन ::

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, शासन मिठी नदीच्या संदर्भात किती उदासीन आहे हे आपण सर्वजण जाणतो. या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री आणि राज्यमंत्री महोदयांनी सांगितले होते की, दिनांक 31 मे, 2006 पर्यंत मिठी नदीतील गाळ काढण्याचे काम पूर्ण करणार आहोत. 31 मे पर्यंत 12 लाख मेट्रीक टन गाळ काढण्यात येणार आहे. परंतु महानगरपालिकेच्या आयुक्तांनी कळविले आहे की, एमएमआरडीए आणि जिल्हाधिकारी या कामामध्ये काहीही सहकार्य करीत नाही. त्या ठिकाणी आतापर्यंत केवळ 1.75 मेट्रीक टन इतकाच गाळ काढण्यात आला आहे. उपजिल्हाधिकारी श्री.गवळी आणि साळवे सांगतात की, त्या ठिकाणी अजूनही डिमार्केशन करण्यात आलेले नाही. त्या ठिकाणी एकंदर गोंधळाची परिस्थिती आहे. त्या ठिकाणी झोपडया अधिकृत की अनधिकृत आहेत याबाबत काहीही सांगितले जात नाही. 31 मे हा दिवस येण्यास केवळ 43 दिवस उरलेले आहेत. 31 मे पर्यंत हा गाळ काढून, सप्टेंबर महिन्यापर्यंत तेथील सौंदर्यीकरण, रुंदीकरण आणि खोली वाढविण्याचे काम शासनामार्फत केले जाणार आहे. माझा प्रश्न असा आहे की, 3600 अनधिकृत बांधकामे तोडावयाची आहेत, त्यापैकी अमूक इतकी बांधकामे तोडलेली आहेत याबाबत उच्च न्यायालयामध्ये शासनाने असे ॲफेडेव्हिट केले आहे काय ? तसेच महानगरपालिकेने त्या ठिकाणी 1.75 मेट्रीक टन गाळ काढलेला आहे. परंतु एमएमआरडीए या यंत्रणेकडून एक किलो सुध्दा गाळ काढण्यात आला नाही. कलिना, सी.एस.टी. रोड पर्यंत हा गाळ काढावा लागणार आहे. त्या ठिकाणी मराठी कुटुंब वर्षानुवर्षे राहत आहेत, त्यांना बेकायदेशीर ठरविण्यात आले आहे. ज्या राजकीय पुढाऱ्यांनी त्या ठिकाणी ताटया लावल्या त्यांना पर्यायी जागा देण्याचे शासनाने ठरविले आहे. मी नोटीस दिली नसल्यामुळे त्या पुढाऱ्यांची नावे घेणे संयुक्तीक होणार नाही. त्यामुळे माझा नेमका प्रश्न असा आहे की, 31 मे पर्यंत शासन 12 लाख मेट्रीक टन गाळ काढणार आहे काय ? हाय कोर्टामध्ये अनधिकृत बांधकामाबाबत ॲफेडेव्हिट केले आहे काय ? किती गाळ काढला आहे ? डिमार्केशन केले नसेल तर ते केव्हा करणार आहात ? नदीच्या रुंदीकरणाचे आणि गाळ काढण्याचे काम केव्हा करणार आहात ?

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, या विषयावर अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून सविस्तर चर्चा झालेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी तीन प्रश्न उपस्थित केलेले आहेत. 31 मे पर्यंत 12 लाख 57 हजार घन मीटर गाळ काढण्याचे टार्गेट आहे. नदीची खोली किंवा रुंदी करीत असताना प्रथम अडथळे दूर करणे आवश्यक आहे. हायड्रोलॉजीक स्टडी, किंवा चितळे समिती हे एक माध्यम आहे.

नंतर श्री.व्ही.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे...

यामध्ये 5.57 हजार मेट्रीक टन गाळ काढण्यात आलेला आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून हजारो मेट्रीक टन व एमएमआरडीएकडून 7 लाख मेट्रीक टन गाळ काढण्याचे काम चालू आहे. एमएमआरडीएककडून आतापर्यंत 4 लाख 35 हजार मेट्रीक टन गाळ काढण्यात आलेला आहे. एकूण 12 लाख मेट्रीक टन गाळ काढावयाचे निश्चित करण्यात आलेले आहे, त्यातील साडेचार लाख मेट्रीक टन गाळ काढण्यात आलेला असल्यामुळे सरासरी 30 ते 35 टक्के काम झालेले आहे. रोज 7 हजार मेट्रीक टन गाळ काढण्याचे काम एमएमआरडीएकडून करण्यात येत आहे. हायटाईड काम तेथे करण्यात येते, 10 ते 12 तास काम करण्यात येत आहे. सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न असा विचारला होता की, अनधिकृत बांधकाच्यासंदर्भात तेथे 3600 अतिक्रमणधारकांवर नोटीसा बजाविलेल्या आहेत. त्यातील 1700 पात्र लोकांचे ॲफिडेव्हिट केलेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी असा प्रश्न उपस्थित केला की, काही ठिकाणी नवीन झोपडया निर्माण करण्यात येत आहेत. कोणत्याही प्रकारची नवीन झोपडी तेथे निर्माण करण्यात येत नाही, जे पात्र आहेत त्यांनाच पर्यायी जागा मिळणार आहेत, ज्यांनी नवीन झोपडया बांधल्या असतील त्यांना एकालाही पर्यायी जागा दिली जाणार नाही. पात्र लोकांना पर्यायी जागा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही शासनाच्यावतीने करण्यात येत आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, अजूनही तेथे पात्र व अपात्र कोण आहेत हे ठरविलेले नाही. 26 जुलैला महापूर आला असून पात्र व अपात्र कोण आहे हे ठरविण्यात आलेले नाही ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी स्पष्ट सांगितले आहे, की 1700 झोपडीधारक हे पात्र आहेत, जे 1700 लोक बाधित आहेत त्यांची यादी तयार करण्यात आलेली आहे. तरी यामध्ये एखादी काही चूक झाली असेल व एखादा पात्र व्यक्ती निष्काशित करण्यात आली असेल, याबाबत सन्माननीय डॉ. दीपक सावंत यांनी सुध्दा मघाशी मुद्दा उपस्थित केला होता. याबाबत चौकशी करुन त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल.

......2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, 60 हजार मे.टन गाळ बृहन्मुंबई महानगरपालिकेने काढला असून 75,000 मे.टन गाळ एमएमआरडीने काढलेला आहे. एवढाच गाळ काढलेला असतांना मंत्री महोदय सांगत आहेत की, एकूण साडेचार हजार मे.टन गाळ काढण्यात आलेला आहे, 60 हजार व 75 हजार यांची बेरीज साडेचार लाख मे.टन होत नाही, ती जेमतेम सव्वा लाखापर्यंत होते. मंत्री महोदय येथे असत्य माहिती देत आहे, माझी मंत्री महोदयांना विनंती आहे, मंत्री महोदय व सर्व सदस्यांनी एमएमआरडीए काय काम करते यासाठी तेथे प्रत्यक्षात जाऊन पाहणी करावयास पाहिजे. मुंबई महानगरपालिकेचे माजी आयुक्त व किरीट सोमय्या यांना उत्तर दिलेले आहे की, गाळ काढण्यामध्ये एमएमआरडीए सहकार्य करीत नाही. यामधील वस्तुस्थिती काय आहे ती सभागृहाला सांगितली पाहिजे. इतका प्रचंड गाळ काढला तर तो कोठे टाकला आहे, त्या गाळाचे डोंगर तयार झाले असते, त्यांच्या टेकडया तयार झाल्या असत्या, त्या मुंबईमध्ये कोठेही दिसत नाही. हा गाळ कोठे टाकला त्याची माहिती मंत्री महोदय देतील काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी असे विचारले की, आकडयांमध्ये चूक दिसत आहे, आकडयांमध्ये काही चुका झाल्या असतील तर त्या दुरुस्त करण्यात येतील. परंतु बृहन्मुंबई महानगरपालिका व एमएमआरडीएकडून दररोज गाळ काढण्याचे काम चालू आहे. एकूण साडेचार हजार मे.टन गाळ काढण्यात आलेला आहे.

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मिठी नदीमधून काढण्यात आलेला गाळ टाकण्याची व्यवस्था कांजूरमार्ग व मुलुंड येथील अधिकृत डंपिंग ग्राऊंडवर करण्यात येत आहे. त्या ठिकाणी मॅनग्रोव्ह आहे यासाठी कुणीतरी कोर्टामध्ये गेले परंतु त्याठिकाणी मॅनग्रोव्ह नाही अशाप्रकारचे प्रतिज्ञापत्र शासनाच्या वतीने कोर्टामध्ये करण्यात येत आहे. त्याचबरोबर माननीय सदस्य सर्वश्री. मधुकर चव्हाण, विनोद तावडे, दिवाकर रावते या मुंबईतील आमदारांच्या मतदारसंघातील हा विषय असल्यामुळे त्यांच्या आस्थेचा हा विषय आहे. त्या दृष्टीने निश्चितपणे मी साईटवर जाऊन व त्या ठिकाणी बैठक घेऊन यामध्ये असलेल्या उणीवा दुरुस्त करण्यात येतील.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी पात्र झोपडपट्टीधारक व पात्र व्यावसायिकांची नावे सांगितली. परंतु ती आमच्यासमोर आलेली नाहीत. आज त्या भागामध्ये नव्याने फोटोपास दिले जात आहेत. त्या ठिकाणी हा धंदा सुरु झाला आहे. जर आपण आम्हाला ती यादी दिली तर त्यामधील एखादे नाव त्या ठिक्‍ाणी जाऊन आम्हाला तपासता येईल. तेव्हा अशाप्रकारची यादी आपण आम्हाला देणार काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, तशाप्रकारची 1700 लोकांची यादी निश्चितपणे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, मंत्रिमहोदय रोजच्या रोज गाळ काढला जात असल्याचे सांगत आहेत. परंतु प्रत्यक्षात मुलुंडच्या डंपिंग ग्राऊंडवर काढलेल्या गाळाचा ढीग दिसत नाही. तर मग हा गाळ कुठे टाकला जात आहे? याचे उत्तर मिळणे आवश्यक आहे. निवेदनाच्या पहिल्या परिच्छेदामध्ये "मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयाने पुराचे पाणी शिरुन झालेल्या नुकसानीचे सर्व्हेक्षण केले, पंचनामे केले व त्यानंतर तात्काळ आपदग्रस्तांना सानुग्रह वाटपाचे काम युध्द पातळीवर पूर्ण केले गेले" असे म्हटले आहे. सभापती महोदय, मी मुंबईमध्ये राहात असल्यामुळे मी स्वत: प्रत्येक भागामध्ये फिरले आहे. कोणत्याही भागामध्ये शासनाकडून तात्काळ कोणत्याही प्रकारची मदत दिली गेली नाही. त्याठिकाणी असलेल्या एन.जी.ओ. यांनी मदत केली आहे. परंतु शासनाने कोणतेही सर्व्हेक्षण केले नाही, पंचनामे केले नाही. तेथील काही इमारतींच्या पहिल्या मजल्यापर्यंत पाणी गेले होते त्या इमारतींचा सर्व्हेक्षणामध्ये समावेश करण्यात आला नाही, त्यांचा पंचनामा करण्यात आला नाही. अनेक झोपडपट्टयांमधील लोकांना मदत मिळालेली नाही. तेव्हा आपण त्यांना मदत करणार काय?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या संदर्भात माझ्या हद्दीपर्यंत मी जरुर उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे. मिठी नदीमधून काढण्यात आलेला गाळ कांजूरमार्ग आणि मुलुंड येथील डंपिंग ग्राऊंडवर टाकण्यात येत आहे. माननीय सदस्यांनी 26 जुलैच्या महापूरासंबधी प्रश्न विचारला आहे, त्यासाठी त्यांना वेगळा प्रश्न विचारावा लागेल.

श्री. अनिल परब : सभापती महोदय, मुंबईमध्ये जी बांधकामे अधिकृत आहेत ती पाडण्याचे काम सुरु आहे. त्यामध्ये सर्रास रेट ठरविले जात आहेत. त्या बाबत लेखी पुरावे दाखल करुन सुध्दा लोकांचे म्हणणे ऐकून घेतले जात नाही, व त्यांची बांधकामे तोडली जातात. आणि जी अनधिकृत बांधकामे आहेत त्यांना नंबर दिले जात आहेत. त्याबाबत एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांशी हात बांधले गेले आहेत. तेव्हा या संदर्भात हे अधिवेशन संपल्यानंतर तातडीने मुंबईच्या आमदारांची अधिकाऱ्यांबरोबर एक बैठक घेऊन त्यामध्ये बऱ्याच गोष्टींचे निराकरण करण्यात येईल काय?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, 25 एप्रिल 2006 रोजी अशाप्रकारची बैठक निश्चितपणे घेतली जाईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण ठाणे महानगरपालिकेचे महापौर होता. त्यामुळे गाळ काढून त्याची विल्हेवाट कशी लावली जाते याचे आपल्याकडे भरपूर ज्ञान आहे. याठिकाणी 60 हजार व 75 हजार मे.टन गाळ काढल्याचे नमूद केले आहे. एवढा गाळ काढण्यासाठी किती यंत्रणा वापरली? किती जेसीबी यंत्र आणि किती डंपर लागले? हा गाळ काढण्यासाठी किती वेळ लागला? याची माहिती आलेली नाही. माझ्या माहितीप्रमाणे या ठिकाणी दिलेली सर्व माहिती चुकीची आहे. आपण या सदनातील आमदारांबरोबर एकदा यासंबंधीची पहाणी करावी. सदनापुढे जर अशाप्रकारची चुकीची माहिती येत राहिली तर गोंधळ निर्माण होतो. तेव्हा मी स्वत: त्याठिकाणी जाऊन पहाणी करतो असे आपण आम्हाला सांगा. त्याचपमाणे या ठिकाणी दुसऱ्या पानावरील तिसऱ्या परिच्छेदामध्ये "मतदारसंघ निहाय" म्हटले आहे म्हणजे काय? मिठी नदीच्या पात्राच्या दोन्ही बाजूला असलेली अतिक्रमणे काढून मिठी नदीतील गाळ काढून घेणे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरु...

निवेदनामध्ये म्हटलेले आहे की, अशाप्रकारे विधानसभा मतदार संघनिहाय नियोजनपूर्वक नैसर्गिक आपत्तीचे अस्मानी संकट कमी कालावधीत व सुयोग्यरित्या पूर्ण करण्यात आले आहे व याबाबत वरिष्ठ पातळीवरुन देखील प्रशंसा केलेली आहे." मतदार संघ निहाय हे कशासाठी म्हटलेले आहे, त्याचे कारण काय आहे ?

श्री.राजेश टोपे : मिठी नदीच्या संबंधाने कालही प्रश्न उपस्थित केलेला होता. मागच्या आठवडयामध्ये सन्मानीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी या विषयाच्या संबंधाने 93 अन्वये सूचना उपस्थित केलेली होती, त्यानंतर त्यांनी याच विषयाच्या संबंधाने अर्धातास चर्चाही उपस्थित केलेली होती. सन्माननीय सदस्यांनी उपस्थित झालेल्या मुद्यांच्या संबंधात आणि या 93 च्या सूचनेमध्ये उपस्थित केलेल्या मुद्यांच्या संबंधातील एकत्रित माहिती घेऊन गंभीरपणाने पुन्हा एकदा आपण चर्चा करु. कारण कालपरवाही नव्याने माहिती मिळालेली आहे. ही एक आठवडयापूर्वीची माहिती दिलेली आहे. आतापर्यन्त 60 हजार घ.मी. गाळ काढण्यामध्ये यश आलेले आहे. आपण सगळे त्या साईटवर जाऊन कामाची परिस्थिती पाहू, कांजूरमार्ग, मुलुंड येथे कोठे गाळ टाकलेला आहे, हेही आपल्याला पहाता येईल. मुख्यमंत्री महोदयांनी शब्द दिलेला आहे की, 31 मार्च 2005 पर्यन्त हे सर्व काम पूर्ण करण्यात येईल. हे काम पूर्ण करण्यासाठी आम्ही बांधिल आहोत, त्यादृष्टीने पावले उचलली जातील.

श्री.दिवाकर रावते : परवाच्या अतिवृष्टीमुळे नुकसान झालेले आहे. आता त्या ठिकाणचा गाळ गाठण्यासाठी रस्ता तयार करण्यात येत आहे, अशी परिस्थिती आहे. ठेकेदार त्यांची जबाबदार बरोबर पार पाडत नाहीत. मिठी नदीतील 60 हजार घ.मी.गाळ काढल्याचे सांगितले जाते परंतु प्रत्यक्षात 20 हजार घ.मी. गाळ काढलेला असेल आणि बील मात्र 60 हजार घ.मी.गाळ काढल्याचे दाखविलेले असेल. त्या ठिकाणी कालपरवापर्यन्त जेसीबी जाण्यासाठी रस्ता तयार केला जात होता. प्रशासनाने गाफील राहू नये, म्हणून ठेकेदारांनी किती काम केलेले आहे, हे प्रत्यक्षात पाहिले पाहिजे. ठेकेदार शासनामधील अधिकाऱ्यांना पैसे देऊन गप्प बसवितात. 60 हजार घ.मी. आणि 75 हजार घ.मी. गाळ काढला असे सांगितले जाते,प्रत्यक्षात वेगळेच आहे. येत्या 15 दिवसामध्ये हे काम पूर्ण होणे शक्य आहे काय ? जेसीबी किती लागलेले आहेत, याचीही माहिती घेणे आवश्यक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ MHM/ KGS/ SBT/

**उपसभापती** : हा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे. एम.एम.आर.डी.ए.शी संबंधित असलेल्या ब-याचशा सन्माननीय आमदारांनी विनंती केली की, या प्रश्नासंबंधी संबंधित अधिकाऱ्यांबरोबर बैठक बोलवावी. जेणे करुन त्यांच्या प्रश्नांना सविस्तर उत्तरे मिळतील. दुसरा महत्वाचा प्रश्न असा आहे की, एम.एम.आर.डी.ए.च्या अधिकाऱ्यांचे कोणत्याही ठेकेदारावर नियंत्रण नाही, ही वस्तुस्थिती आहे. उदाहरण सांगायचे म्हणजे मुलुंडपर्यन्त एम.एम.आर.डी.ए.ने रस्ता न्यावा, यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांनीही आदेश दिलेले होते, परंतु त्याचा त्यांनी विचार केलेला नाही. कोपरी येथील रस्ता खराब झालेला आहे. त्याबाबतची माहिती घेण्याकरिता मी दोन तास थांबून संबंधित इंजिनियरना बोलावून घेतले, परंतु त्याचा काही परिणाम झाला नाही. त्यामुळे सभागृहामध्ये बोलणे मला भाग आहे. इंजिनियर आणि ठेकेदार यांचे साटेलोटे असावे. मंत्री महोदया आपण जी बैठक बोलवाल तेव्हा श्री.जयसिंगवार म्हणून अधिकारी आहेत, त्यांनाही बोलवावे म्हणजे खरे सत्य काय आहे, ते समजेल.

श्री.राजेश टोपे : ठीक आहे.

--

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामध्ये विविध पदांसाठी झालेल्या भरतीमध्ये गैरव्यवहार होणे

**मु. शी.** : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामध्ये विविध पदांसाठी झ ालेल्या भरतीमध्ये गैरव्यवहार होणे याबाबत सर्वश्री सागर मेघे, नितीन गडकरी व पांडुरंग फुंडकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. धर्मरावबाब आत्राम ( परिवहन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री सागर मेघे, नितीन गडकरी व पांडुरंग फुंडकर यांनी "महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामध्ये विविध पदांसाठी झालेल्या भरतीमध्ये गैरव्यवहार होणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 2......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ KGS/

श्री. सागर मेघे : सभापती महोदय, मी तीन अधिवेशनांपासून या प्रश्नाच्या मागे लागलो आहे. 29 जुलैला तसेच 14 डिसेंबरला आणि आज 19 एप्रिलला हा प्रश्न लावलेला आहे. याबाबत तीनहीवेळा वेगवेळी उत्तरे मिळालेली आहेत. ऑक्टोबर, 2005 पर्यंत भरती करु असे सांगण्यात आले होते. 14 डिसेंबरला उत्तर दिले परंतु कोणाचीही भरती झाली नाही. त्यानंतर असे सांगण्यात आले की, ज्या लोकांना वेटींग लिस्टमध्ये ठेवलेले आहे त्याची भरती करु. सभापती महोदय, आजच्या निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, चालक उमेदवारांच्या बाबतीत निवडीमध्ये चाचणी घेताना खाडाखोड, गिरवागिरव इत्यादी गैरप्रकार झाल्यामुळे या उमेदवारांची यापूर्वी केलेली निवड रद्द करण्यात आली असून त्या ठिकाणच्या पात्र चालक उमेदवारांची फेर चाचणी घेण्यात आलेली आहे. या उमेदवारांच्या मुलाखती मे, 2006 मध्ये घेण्याचे विचाराधीन आहे. सभापती महोदय, 14 डिसेंबरला ज्यावेळी प्रश्न आला होता त्यावेळी मी स्पेसिफिक प्रश्न विचारला होता. त्यावेळी माननीय राज्यमंत्र्यांनी असे उत्तर दिले होते की, चालकांच्या 1400 पदांच्या संदर्भात भरती प्रक्रिया घेण्यात आली आणि त्या भरती प्रक्रियेमध्ये भ्रष्टाचार झाल्याच्या तक्रारी आल्या त्यामुळे पुन्हा मुलाखती घेण्यात आल्या आहेत. 14 डिसेंबरला सांगण्यात आले की, पुन्हा मुलाखती घेण्यात आल्या आहेत. त्यापैकी 963 लोकांना निवड यादीमध्ये ठेवण्यात आले आहे. प्रवाशांची संख्या वाढल्यावर त्यांना नियुक्ती देण्यात येईल. मे, 2006 मध्ये तिसऱ्यांदा मुलाखती का घेत आहेत हे माहीत नाही. एप्रिल महिन्यामध्ये अधिकाऱ्यांनी लेखी आश्वासन दिले होते की, 30 एप्रिल पर्यंत तुम्हाला भरती करुन घेऊ. महाराष्ट्रात इतर ठिकाणी भरती करण्यात आली. पण विदर्भातील चार जिल्ह्यांची भरती करण्यात आली नाही. मे महिन्यामध्ये तिसऱ्यांदा कशासाठी मुलाखती घेणार आहेत ? त्यांच्या परत मुलाखती न घेता दुसऱ्यांदा ज्यांची नियुक्ती केलेली आहे, जे वेटींग लिस्टमध्ये आहेत त्यांना लेखी आश्वासन दिल्याप्रमाणे 30 एप्रिल पर्यंत भरती करणार काय ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : मागच्यावेळी जे उत्तर दिले होते त्यामध्ये 7050 चालक वाहकांच्या मुलाखती घेतल्या होत्या. त्या लोकांना टप्प्याटप्प्याने ऑक्टोबर पासून घेण्याच्या दृष्टीने 6957 लोकांची भरती केलेली आहे. 7050 पैकी 3 कॅटेगरीमध्ये 93 लोकांची नेमणूक करावयाची होती. नागपूर विभागाच्या चार जिल्ह्यासाठी 2075 चालकांच्या मुलाखती घेतल्या होत्या. मुलाखती

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ KGS/

श्री. धर्मरावबाबा आत्राम .....

घेतल्यानंतर खाडाखोड करणे, संगणकामध्ये दुरुस्ती करणे इत्यादी लफडी दिसून आली. त्यामुळे सगळ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सस्पेंड केलेले आहे. त्यांच्यावर कारवाई केलेली आहे. 2075 पैकी ज्या उमेदवारांची निवड खाडाखोड करुन केली होती त्यांची चाचणी घेतली आणि त्यापैकी 1054 लोकांना फेर चाचणीमध्ये सिलेक्ट केले असून या 1054 लोकांच्या मुलाखती घेणार आहोत. ही जी खाडाखोड झालेली आहे त्यामध्ये बोगस मार्क वाढविण्यात आले होते. त्यांची पुन्हा चाचणी घेतली. 1054 लोकांची निवड केली. त्या निवड यादीतून जेवढे ड्रायव्हर लागणार आहेत त्या लोकांच्या मुलाखती घेणार आहोत आणि त्यांची निवड करुन ज्या बसेसच्या फेऱ्या वाढतील त्या ठिकाणी त्यांना घेणार आहोत.

श्री. दिवाकर रावते : मार्कामध्ये खाडाखोड करण्याचे लफडे कोणी केले ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : यामध्ये वर्ग 1 चे 35 अधिकारी आहेत, वर्ग 2 चे 27 अधिकारी आहेत. वर्ग 3 मधील 29 वाहतूक निरीक्षक आहेत.

श्री. पांडुरंग फुंडकर : हा प्रश्न 2004 पासून सुरु आहे. 2004 मध्ये राज्य परिवहन महामंडळामध्ये या जागा भरण्याचे ठरविले होते आणि या जागा भरत असताना नागपूर विभागामध्ये ही भानगड झाली.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री पांडुरंग फुंडकर...)

यामध्ये लाखो रुपयांचा गैरव्यवहार झालेला आहे. दोन वेळा इंटरव्ह्यू झाल्यानंतर पुन्हा तिस-या वेळी इंटरव्ह्यू घेण्याची काय गरज आहे? नागपूरच्या अधिवेशनामध्ये ही पदे भरली जातील असे मंत्रीमहोदयांनी सांगितले होते. ही 93ची सूचना देईपर्यन्त पदे भरली गेली नाहीत. ज्या अधिका-यांनी या भानगडी केल्या ते अधिकारी कोण आहेत ? त्यांनी विदर्भातील मुलांना 2 वर्षे नोकरीपासून वंचित ठेवलेले आहे. या अधिका-यांची नांवे काय आहेत ? या अधिका-यांवर कोणती कारवाई करणार आहात ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : माझ्याकडे 90 अधिकारी आणि कर्मचा-यांची नावे आहेत. ही नावे आणि जी काही कारवाई केलेली आहे ती मी पटलावर ठेवण्यास तयार आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : विदर्भातील मुलांवर अन्याय केलेला आहे. त्यांना नोकरीपासून वंचित ठेवलेले आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**उपाध्यक्ष** : याप्रकरणी जे कोणी अधिकारी आणि कर्मचारी दोषी असतील त्यांच्यावर कोणती कारवाई केलेली आहे हे आपण सभागृहाला परवा अवगत करावे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री. अरविंद सावंत : सहा. वाहतूक निरीक्षक (क), सहा. भांडारपाल प्रमुख कारागीर (क), सुरक्षा रक्षक या पदांसाठी केव्हा भरती करण्यात येणार आहे ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : 93 अधिकारी ताबडतोबीने घेणार आहेत. तसेच जशा फे-या वाढतील त्यानुसार वाहनचालकाचे सिलेक्शन करुन त्यांना घेण्यात येईल. त्यांना वेटिंगलिस्टवर ठेवता येणार नाही.

--



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : सांगली जिल्ह्यातील किर्लोस्कर कारखान्यात उसळलेली दंगल

**मु.शी** : सांगली जिल्हयातील किर्लोस्कर कारखान्यात उसळलेली दंगल याबाबत श्री. कन्हैयालाल गिडवानी, प्रा. शरद पाटील व श्री. नितीन गडकरी, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, श्री. कन्हैयालाल गिडवानी, प्रा.शरद पाटील आणि श्री. नितीन गडकरी, वि.प.स. यांनी "सांगली जिल्ह्यातील किर्लोस्कर कारखान्यात उसळलेली दंगल" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

(प्रेस : येथेसोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कन्हैयालाल गिडवाणी : सांगली जिलह्यातील कायदा आणि सुव्यवस्था पूर्णतः बिघडलेली आहे. सांगली जिल्हा हा उत्तर प्रदेशमध्ये किंवा बिहारमध्ये आहे की काय असे वाटू लागले आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, या प्रकरणी 15 दिवसामध्ये उच्चस्तरीय चौकशी कोणाच्या अध्यक्षतेखाली करण्यात येणार आहे ?

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सांगली येथील किर्लोस्कर कंपनीमध्ये युनियनमधील दोन गटांमध्ये ही भांडणाच्या चार घटना घडल्या आहेत. यामध्ये 46 आरोपींना अटक करण्यात आली असून 6 दिवसांच्या पोलीस कस्टडीनंतर आता त्यांना मॅजिस्ट्रेट कस्टडीमध्ये ठेवण्यात आले आहे. संबंधित पोलीस स्टेशनचे अधिकारी या प्रकरणाची अधिक चौकशी करीत आहेत. याप्रकरणाचा तपास पोलिसांनी चांगल्या प्रकारे केला आहे.

श्री. कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, अतिशय गंभीर अशी घटना झालेली आहे. ही घटना कशामुळे घडली आणि का घडली याची उच्चस्तरीय चौकशी करावी आणि ती 15 दिवसात पूर्ण करावी अशी माझी शासनाला विनंती आहे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या कंपनीतील बी.बी.वाघ आणि श्री.बाळासाहेब पवार या दोन गटांमध्ये युनियनचा ताबा कोणाकडे घ्यावा यावरुन वाद सुरु झाला आणि त्याच्यातून हा प्रकार घडला आहे.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय,.....

**उपसभापती** : 93 च्या निवेदनावर आपण एकच प्रश्न विचारण्यासाठी परवानगी देतो. अशा प्रकारे प्रत्येक सदस्य प्रश्न विचारु लागला तर रात्री 12.00 वाजेपर्यंत सभागृहाचे कामकाज चालवावे लागेल.

श्री. कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, जिल्हयामध्ये दहशतीचे वातावरण आहे. माननीय उपमुख्यमंत्री या जिल्हयातील आहेत तरी सुध्दा एवढी मोठी घटना घडते आहे. माझा एकच प्रश्न आहे की वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत या प्रकरणाची चौकशी करणार काय आणि ती किती दिवसात पूर्ण करणार ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, पोलिसांनी या प्रकरणाची चांगल्या प्रकारे चौकशी केलेली आहे. या सभागृहाच्या परंपरा आणि संकेत लक्षात घेऊन तसेच माननीय सदस्यांनी केलेल्या मागणीनुसार याप्रकरणी उच्च स्तरीय चौकशी करणे गरजेचे आहे म्हणून उच्च स्तरावरुन या प्रकरणाची चौकशी करण्यात येईल.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, हा प्रकार युनियनच्या वादातून उद्‌भवला आहे. हल्ला झालेल्या बाळासाहेब पवार आणि सर्जेराव पवार यांना मोठया जखमा झालेल्या आहेत. त्यांच्यावर तलवारीने हल्ला झालेला आहे. हा सर्व प्रकार श्री.बी.बी.वाघ यांच्या प्रेरणेने झालेला आहे.

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MHM/ श्री. शिगम नंतर 16:45

प्रा. शरद पाटील ...

वास्तविक पाहता या कंपनीमधील युनियन शेतकरी कामगार पक्षाची आहे. श्री. वाघ यांनी अत्याचार करुन आणि कंपनीमधील वरिष्ठांशी संगनमत करुन कामगारांवर अन्याय सुरु केल्यामुळे कामगार बिथरले. श्री.बाळासाहेब पवार आणि सर्जेराव पवार यांनी युनियन उभी करण्याचा प्रयत्न केला. त्यातूनच ही मारामारी झाली. या युनियनमधील वाद संपुष्टात आल्याशिवाय खून, मारामारी हे प्रकार थांबणार नाहीत.

नंतर भारवि ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.शरद पाटील..

म्हणून शासन कामगार आयुक्तांना युनियनच्या सभासदांबरोबर बैठक घेऊन नेतृत्त्वासंबंधीच्या प्रश्नातून मार्ग काढण्यासंबंधीचा ओदश देईल काय ?

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : होय.

...

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: ठाणे येथील प्रीमियर रबर अँड केबल इंडस्ट्रिज बंद असणे

**मु.शी.**: ठाणे येथील प्रीमियर रबर अँड केबल इंडस्ट्रिज बंद असणे बाबत श्री.अनंत तरे, वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.गणेश नाईक (कामगार मंत्री) : सभापती महोदय, श्री.अनंत तरे यांनी "ठाणे येथील प्रीमियर रबर अँड केबल इंडस्ट्रिज बंद असणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस येथे सोबतचे निवेदन छापावे.)



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंतर तरे : सभापती महोदय, मे.प्रीमियर रबर अँड केबल इंडस्ट्रिज लि.ही डोंबिवली, तालुका कल्याण, जिल्हा ठाणे येथील कंपनी असून ती सन 1976 पासून बंद पडली आहे. सदर कंपनी जवळ जवळ 30 वर्षाहून अधिक काळ बंद असल्यामुळे या कंपनीतील 336 कामगारांना एक दमडी देखील मिळालेली नाही. या कंपनीला युनियन बँकने कर्ज दिले होते. सदर कंपनीने कर्जाची परतफेड न केल्यामुळे बँकेने डीआरटीकडे तक्रार केली होती. या कंपनीतील कामगारांना अद्याप त्यांची देणी मिळालेली नाही. मी येथे मंत्रिमहोदयांना धन्यवाद देतो. त्यांनी हिंद कंटेनरमधील कामगारांना रुपये 75 लाखाची देणी मिळवून दिलेली आहेत. त्याप्रमाणे या कंपनीतील कामगारांना त्यांची देणी मिळवून द्यावीत. या कंपनीविरूध्द शासनाने एम.आर.टी.पी.अंतर्गत औद्योगिक न्यायालयामध्ये कारवाई सुरू करावी. तसेच एम.आय.डी.सी.च्या विभागीय अधिकाऱ्यांनी देखील सदर कंपनीस व्यवहार करण्यास अनुमती दिलेली आहे. त्यामुळे आज तेथे कमर्शिअल ॲक्टीव्हीटीज सुरू आहेत. या कंपनीतील कामगार 30 वर्षापासून बेकार आहेत. यातील काहींचे निधन देखील झाले असेल. तेव्हा या कंपनीतील कामगारांच्या पाठीशी राहण्याची भूमिका या शासनाने घेऊन त्यांना त्यांची देणी मिळण्यासंबंधी शासन किती दिवसात प्रयत्न करणार आहे ? असा माझा पहिला प्रश्न आहे. एम.आय.डी.सी.च्या ज्या विभागीय अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांची थकबाकी असताना प्रीमिअर कंपनीला झेनिथ कंपनीला जागा विकण्यासाठी परवानगी दिली आहे, त्या विभागीय अधिकाऱ्यावर शासन कारवाई करणार आहे काय ? तसेच आज तेथे जी कमर्शिअल ॲक्टीव्हीज सुरू आहे तिला स्थगिती देऊन कुठल्याही प्रकारची ॲक्टीव्हीटी होणार नाही असा निर्णय शासन घेणार आहे काय ?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, मे.प्रीमियर रबर अँड केबल इंडस्ट्रीज लि.ही कंपनी एमआयडीसी, डोंबिवली, तालुका कल्याण, जि.ठाणे येथे सन 1965 मध्ये सुरू झाली. सदर कंपनी ही मालकाच्या गैर व्यवस्थापनामुळे 1976 पासून बंद पडली. कुठल्याही प्रकारची नोटीस न देता कंपनी बंद केल्यामुळे कामगार औद्योगिक न्यायालयात गेले. औद्योगिक न्यायालयाने संपूर्ण थकबाकी अदा करण्याचा आदेश दिला. त्याची कारवाई करण्यासाठी कामगार विभागाने प्रयत्न सुरू केला. परंतु, वारंवार बोलावूनसुध्दा या कंपनीचे व्यवस्थापन आले. आता पर्यंत दिनांक 3.1.2005 व 5.1.2005 आणि 7.3.2006 रोजी मी स्वत: कंपनीचे व्यवस्थापन आणि कामगार यांना बोलावून

..3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गणेश नाईक...

बैठक घेण्याचा प्रयत्न केला. प्रीमिअर रंबर अँड केबल इंडस्ट्रिज या कंपनीची मालमत्ता झेनिथ इंडस्ट्रियल रबर प्रोडक्टस् प्रा.लि.ला लीजवर घेण्याचा प्रस्ताव डीआरटीकडे दिला होता त्यानुसार सदर मालमत्ता ही झेनिथ कंपनीकडे हस्तांतरित झाली. या कंपनीतील कामगारांना काम दिले नाही म्हणून एमआरटीयू अँड पीयुएलपी ॲक्ट 1971 अंतर्गत औद्योगिक न्यायालयात तक्रार दाखल केली. यासंबंधीचा निदेश दिल्यानंतर थकित रकमेच्या वसुलीबाबतची कार्यवाही सुरू करावी असा सल्ला कामगार आयुक्त कार्यालयाने दिला आहे. तथापि, याबाबत कामगारांनी कोणतीही कार्यवाही केलेली नाही. शासनाने ज्या सूचना दिल्या आहेत, त्याप्रमाणे कामगारांनी कार्यवाही केली तर त्यांना पैसे मिळवून देण्यात मदत होणार आहे. येथे एमआयडीसीच्या विभागीय अधिकाऱ्यांसंबंधीचा प्रश्न विचारण्यात आला आहे. त्यासंबंधी मी असे सांगू इच्छितो की, डीआरटीने निर्णय दिल्यानंतर विभागीय अधिकाऱ्यांना हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही. शासनाने सुचविलेल्या मार्गदर्शनप्रमाणे कामगार वागलेत तर त्यांना निश्चितच फायदा होऊ शकेल.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ KGS/ MHM/ पूर्वी श्री.भारवि.... 16:55

श्री.गणेश नाईक.....

ते जर आम्ही दिलेल्या मार्गदर्शक सल्ल्यानुसार वागले तर निश्चितप्रकारे त्यांना मदत होईल.

श्री.अनंत तरे : सभापती महोदय, त्या कामगारांनी औद्योगिक न्यायालयात जावे असे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी दिले आहे. ते अगोदर औद्योगिक न्यायालयात गेल्यामुळे न्यायालयाने कामगारांची सर्व देणी द्यावी याबाबत निर्णय दिलेला आहे. हे पैसे मिळण्यास त्यांना 30 वर्षांचा कालावधी लागलेला आहे. पुन्हा एकदा औद्योगिक न्यायालयात जाणे कितपत योग्य आहे ? त्या ठिकाणी ज्या कमर्शिअल ॲक्टीव्हीटीज सुरु आहेत त्यांच्या बाबतीत आपण काय निर्णय घेणार आहात ? रिजनल ऑफिसरने कर्मचाऱ्यांचे पैसे का भरले नाही ?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, इंडस्ट्रीअल डिस्प्युट ॲक्टनुसार कामगारांनी न्यायालयामध्ये खटला दाखल केला तर, कामगार आयुक्तांचे, उप आयुक्तांचे आणि सहाय्यक आयुक्तांचे काम मध्यस्थी करुन त्यातून मार्ग काढणे आहे. आम्ही दिलेल्या सल्ल्यानुसार जर ते कामगार वागले तर, संबंधीत सेक्शनखाली जिल्हाधिकाऱ्यांच्या वतीने ती प्रॉपर्टी ताब्यात घेऊन त्यांच्या देणी देता येतील. परंतु कामगारांनी चुकीने कार्यवाही केल्यामुळे त्यांना मदत देता आली नाही. ते जर आमच्या सल्ल्याप्रमाणे वागले तर त्यांना निश्चितप्रकारे मदत दिली जाईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, 1976 पासून ही कंपनी बंद आहे. सभापती महोदय, हा आपल्या जिल्हयातील प्रश्न आहे. 1976 पासून त्या कंपनीतील कामगारांना पगार मिळत नाही. 30 वर्षानंतर आपण त्या विषयावर चर्चा करीत आहोत. त्यामुळे या राज्यामध्ये कामगार मंत्री असावा की, असू नये असा हे निवेदन वाचल्यानंतर प्रश्न उद्‌भवतो. कामगार मंत्री जर कामगारांना न्याय मिळवून देण्यास असमर्थ असतील तर हे खाते का म्हणून असावे ?

महोदय, निवेदनामध्ये म्हटले आहे की, "प्रस्तुत कंपनीतील कामगारांना कंपनीच्या मालकांनी काम दिले नाही. तसेच केलेल्या कामाचे वेतन दिले नाही व इतर कोणतीही कायदेशीर देणी दिले नाही. याबाबत संबंधीत कामगारांनी एमआरटीयू ॲंड पीयुएलपी ॲक्ट, 1971 अंतर्गत औद्योगिक न्यायाल, ठाणे येथे तक्रार (क्र.231/96) दाखल केली होती. याबाबत माननीय औद्योगिक न्यायालय यांचेकडे सुनावणी होऊन, त्यांनी दिनांक 25/10/2001 रोजी व्यवस्थापनास आदेश देऊन कामगारांचे थकीत वेतन/कायदेशीर देणी देण्याबाबत निदेश दिले आहेत." महोदय, हा एक निर्णय झालेला आहे. परंतु या निर्णयाची अंमलबजावणी करुन, घेण्याची जबाबदारी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सरकारची आहे. परंतु सरकारने निवेदनामध्ये पुढे असे म्हटले आहे की " याबाबत कामगारांनी एमआरटीयू अँड पीयूएलपी अधिनियमांतर्गत औद्योगिक न्यायालयात थकित रकमेच्या वसुलीबाबत वसुलीची कार्यवाही सुरु करावी." महोदय, एका ठिकाणी त्यांना न्याय मिळालेला असताना आपण त्यांना पुन्हा कार्यवाही सुरु करण्याबाबत सांगत आहात. एकीकडे कार्यवाही केली असे म्हटले आहे, आणि दुसरीकडे त्यासंदर्भात 2001 मध्ये न्यायालयाने कामगारांना थकित देणी द्यावी असा आदेश देता. पुन्हा याच कायद्याबाबत कार्यवाही सुरु करा असे म्हणता. याबाबत माननीय मंत्री महोदयांनी बैठका घेतल्या आहेत. ते ठाणे जिल्हयाचे पालकमंत्री आहेत. तेथील जनता आपल्याकडे मदतीची अपेक्षा करीत आहे. त्यामुळे आपण हतबलपणे उत्तर देणे योग्य होणार नाही. एखाद्या आरोपीला पकडले आणि तो जर वकील लावण्यास हतबल असेल तर, शासन स्वत:च्या खर्चाने त्याच्यासाठी वकीलाची व्यवस्था करते. हा प्रश्न 1976 पासून प्रलंबित आहे. 1976 पासून त्या कामगारांना पगार दिला जात नाही. त्यामुळे त्या कामगारांना त्यांची सर्व प्रकारची देणी मिळण्याच्या दृष्टिकोनातून शासन कार्यवाही करेल काय ?

श्री.गणेश नाईक : महोदय, मे.प्रिमियर रबर अँड केबल इंडस्ट्रीज कंपनीने झेनिथ कंपनीला आपली मालमत्ता हस्तांतरित केली आहे.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक ....

सभापती महोदय, तोपर्यंत औद्योगिक न्यायालयाचा निकाल आला नव्हता. औद्योगिक न्यायालयाच्या निकालाची कार्यवाही होण्याच्या अनुषंगाने, कामगार मंत्रालयातील कर्मचारी / अधिकारी काम करत असताना येत नाहीत. म्हणजे औद्योगिक न्यायालयाने दिलेला निकाल ते मानत नाहीत. म्हणून कन्टेम्प्ट ऑफ कोड करण्याकरिता युनिअनने किंवा प्रतिनिधींनी हायकोर्टामध्ये जायला पाहिजे. या ठिकाणी आम्ही त्यांना सांगितले आहे की, इंडस्ट्री डिस्प्युट ॲक्टच्या सेक्शनखाली तुम्ही औद्योगिक न्यायालयात गेल्या कारणाने, कामगार आयुक्तालय किंवा कामगार मंत्रालय हस्तक्षेप करु शकत नाही. परंतु आम्ही नमुद केल्याप्रमाणे जर ते गेले आणि त्या ठिकाणचा तसा आदेश आला तर माननीय जिल्हाधिकाऱ्यांना सांगून ती प्रॉपर्टी जप्त करुन, त्या प्रॉपर्टीची विल्हेवाट लावून कामगारांना देणी देण्यासारखी आहेत.

**उपसभापती** : या संदर्भातील सन्माननीय सदस्यांचे मुद्दे व माननीय मंत्रिमहोदयांचे उत्तर माझ्या लक्षात आले आहे. एक गोष्ट नक्की आहे की, सन 1976 पासून आजतागायत कोर्टाने निकाल देऊन देखील कामगारांना देणी मिळालेली नाहीत. दुसरीकडे हीच प्रॉपर्टी हस्तांतरित करण्यात आलेली आहे. आता माननीय कामगारमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे, झालेल्या हस्तांतरणाच्या विरोधात या कामगारांनी हायकोर्टात किंवा संबंधित न्यायालयात गेले पाहिजे. माननीय कामगार मंत्र्यांनी या प्रश्नावर या लोकांची दोन वेळा बैठक घेतलेली आहे. हा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने मी स्वत: माननीय कामगारमंत्र्यांना असे निदेश देतो की, या संदर्भात अजुन एखादी बैठक बोलावून या संदर्भातील डायरेक्टिव्हज् त्यांना पुन्हा द्यावेत आणि कोर्टात गेल्यानंतर जोपर्यंत त्या संदर्भातील निकाल लागत नाही तोपर्यंत त्या ठिकाणी होत असलेल्या डेव्हलपमेंटला स्थगिती द्यावी.

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, त्या ठिकाणी दुसरे कुठल्याही प्रकारचे काम होत नसून त्याच स्वरुपाचे काम तेथे सुरु आहे. वय झाल्याने कामगार रिटायर्ड झालेले असल्यामुळे, त्यांना कामावर घेता आले नाही. सभापती महोदय, मी आपल्यामार्फत सन्माननीय सदस्यांना एकच गोष्ट सांगेन की, सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरेंनी हिंद कन्टेनरचा प्रश्न माझ्याकडे आणला, मी त्यांना मार्गदर्शन केल्याप्रमाणे कामगारांनी ॲक्टीव्ह काम केले तर त्यांना 75 लाख रुपये मिळू शकतात. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. दिवाकर रावते म्हणतात की, कामगार

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक ....

मंत्र्यांची काय गत आहे ? मी त्यांच्या सिनिऑरिटीला मान देऊन असे सांगू इच्छितो की, जे घटक माझ्याकडे येतात, त्यांच्या प्रश्नासंदर्भात लगेच बैठक लावून मी त्या गोष्टीचा सोक्षमोक्ष लावण्याचा प्रयत्न करतो. सभापती महोदय, न्यायालयाच्याही काही कक्षा असतात, त्यांच्या कक्षेमध्ये आपण हस्तक्षेप करु शकत नाही. मी आपण निदेश दिल्याप्रमाणे बैठक लावतो. त्या बैठकीस नवीन व्यवस्थापनाला आणि कामगार प्रतिनिधींना बोलावितो व पुन्हा एकदा त्यांच्यामध्ये समेट घडविण्याचा प्रयत्न करतो. माझे प्रयत्न असे आहेत की, मालक वर्ग जर आला नाही तर, कामगार मंत्रालयाने दिलेल्या मागदर्शनानुसार त्यांनी पुढे वाटचाल करावी. त्यांना निश्चितपणे न्याय मिळण्याबाबत आम्ही प्रयत्न करु.

**उपसभापती** : आपण बोलाविलेल्या बैठकीला मालक वर्ग न आल्यास आपण त्यांच्यावर स्टॉपेज ऑफ वर्कची नोटीस दिली किंवा त्यांच्यावर कारवाई केली तर कामगारांच्या अगोदर मालक धावत येतील, असे माझे मत आहे.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, प्रिमिअर व झेनिथ ह्या वेगळ्या कंपन्या नाहीत, ती एकच कंपनी आहे. सभापती महोदय, ती सिस्टर कन्सर्न आहे, ती मिलीजुली आहे. त्यामुळे मला आपल्याला कर्मचाऱ्यांच्या वतीने विनंती करावयाची आहे की, तेथे चाललेल्या इतर ॲक्टिव्हिटीज्ना तातडीने प्रतिबंध करावा आणि ज्या वर्कर्सचे वय 60 वर्षे झालेले आहे, त्यांच्या मुलांना नोकरीत सामावून घ्यावे.

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, अन्य मेथडच्या मार्गाने त्या मालक वर्गाकडून कामगारांची देणी देण्यासंदर्भात निश्चितपणे प्रयत्न करणार आहोत. परंतु सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांनी सांगितल्याप्रमाणे, तेथे दुसरे नवीन कामगार काम करतात, उत्पादन करतात, हे थांबविणे अशक्य आहे.

श्री. अनंत तरे : आपण त्यांच्या मुलांना नोकरीवर घेण्याचा प्रस्ताव तरी करु शकता ना ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, ही कंपनी सुरु होऊन 5-6 वर्षे झालेली आहेत. आता तेथे दुसरे लोक कामाला लागले आहेत. या गोष्टीचा तपास करावा लागेल. निवृत्त कर्मचाऱ्यांची देणी देण्याच्या अनुषंगाने आपण बैठक लावून जरुर प्रयत्न करु.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: उल्हासनगर येथील अनधिकृत बांधकामे नियमित करण्याबाबत झालेला गैरव्यवहार

**मु.शी.**: उल्हासनगर येथील अनधिकृत बांधकामे नियमित करण्याबाबत झालेला गैरव्यवहार याबाबत सर्वश्री. कन्हैयालाल गिडवानी, अनंत तरे, डॉ. दीपक सावंत, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. कन्हैयालाल गिडवानी (विधानसभेने निवडलेले) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छितो. आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" उल्हासनगर मधील लाखो लोक बेघर होवू नयेत म्हणून राज्य शासनाने तेथील अनधिकृत बांधकामे नियमित करण्यासाठी १४ जानेवारी, २००६ रोजी काढलेला अध्यादेश, तथापी त्याठिकाणी अनधिकृत बांधकामे बांधण्यासाठी जसा गैरव्यवहार झाला तसाच गैरव्यवहार आता पुन्हा ती अधिकृत करण्यासाठी होईल अशी व्यक्त करण्यात येत असलेली भिती, असे होवू नये म्हणून नियमित करण्याच्या प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र आय.ए.एस. अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली पथक नेमण्यात यावे व नविन नियमित झालेल्या उल्हासनगरचे सिंधुनगर असे नामकरण करण्यात यावे अशी सन्माननीय लोकप्रतिनिधींनी दिनांक ३ मार्च, २००६ रोजी मुख्यमंत्र्यांकडे पत्राद्वारे केलेली मागणी, तथापी, अद्यापही त्याबाबत कोणतीही कार्यवाही न झाल्याने ४०,००० बेकायदेशीर बांधकामे नियमित करण्याच्या प्रक्रियेमध्ये देखिल गैरव्यवहार होईल अशी भिती व्यक्त होत असल्याने शासनाने या मागणीकडे तातडीने लक्ष देण्याची आवश्यकता, सबब याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. राजेश टोपे (नगर विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...........2......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कन्हैयालाल गिडवानी : सभापती महोदय, उल्हासनगर येथील अनधिकृत बांधकामे नियमित करण्यासंदर्भात शासनाने अध्यादेश काढला होता. त्यासंदर्भातील निर्णय 15 डिसेंबर, 2005 रोजी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनामध्ये झालेला आहे. तसेच यासंदर्भातील विधेयक सभागृहात पास झालेले आहे. उल्हासनगर येथील जवळपास 40 हजार अनधिकृत बांधकामे नियमित करण्याचे कार्यवाही यामुळे होणार आहे. तेथील जनतेच्या जीवन मरणाचा प्रश्न असल्यामुळे असा निर्णय घेण्यात आलेला आहे. यामध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार तेथे वाढत चालेला आहे. ही बांधकामे नियमित करण्याची कार्यवाही सुरु झाल्यामुळे उल्हासनगर शहरामध्ये मोठया प्रमाणात अनधिकृत बांधकामे बांधण्याची कार्यवाही सुरु झालेली आहे. यासंदर्भात माननीय मुख्यमंत्री व माननीय उपमुख्यमंत्री महोदयांना मी 23 फेब्रुवारी, 2006 रोजी एक पत्र दिले होते, त्या पत्राचा उल्लेख लक्षवेधीच्या निवेदनामध्ये आलेला नाही. शासनाने ही बांधकामे नियमित करण्याचा खूप मोठा निर्णय घेतलेला आहे, असा निर्णय केंद्र शासन सुध्दा घेऊ शकलेले नाही. माननीय मुख्यमंत्री महोदयांना मी जे पत्र दिलेले आहे, त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, "Govt. of Maharashtra's Ordinance number 1/2006 dated 14-1-2006, in regard to the unauthorized development in Ulhasnagar. An urgent and immediate need to appoint a section wise supervision team for all the 5 sections of the Ulhasnagar Municipal Corporation where notice for regularization of nearly 40,000 unauthorized residential and commercial complexes has been issued and to appoint a Senior IAS Officer to overview the appointed supervision team." सभापती महोदय, हा विषय खूप मोठा आहे, 40 बेकायदेशीर बांधकामे ही नियमित करण्यात आलेली आहेत. तेथे आता अनधिकृत बांधकामे सुरु झालेली आहेत. तेथील जे आयुक्त आहेत त्यांचा अहवाल. तेथील अधिकाऱ्यांनी मला दिलेला आहे, उल्हासनगरचे आयुक्त शासनाचे काम करीत नाहीत, कोणाच्या दबावाखाली ते काम करीत आहेत, म्हणून शासनाने त्यांच्यावर कारवाई करणे गरजेचे आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांना मी जे पत्र दिले होते त्यामध्ये मी 5 ते 6 मुद्दे सांगितले होते त्यासंदर्भात अजूनही कार्यवाही झालेली नाही.

......3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कन्हैयालाल गिडवानी...

उल्हासनगरच्या संदर्भात श्री. नंदलाल यांची समिती नियुक्ती केली होती त्यांनी 3 महिन्यापूर्वी शासनाला अहवाल दिलेला आहे, त्यानुसार शासनाने अजूनही कारवाई केलेली नाही. या अहवालास आता 4 महिने होत आलेले आहेत त्यावर अजून कारवाई का करण्यात येत नाही ? तसेच तेथील जे आयुक्त आहेत ते जबाबदारीने काम करीत नाहीत, अनधिकृत बांधकाममध्ये मोठया प्रमाणात ते भ्रष्टाचार करीत आहेत. हायकोर्टाच्या आदेशानुसार तेथे एका आएएस अधिकाऱ्यास काम करणे शक्य नाही. ठाण्याचे जिल्हाधिकारी यांची पदनिर्देशित प्राधिकारी म्हणून शासनाने नेमणूक केलेली आहे. शासनाने त्यांना 18 महिन्यांची मुदत दिलेली आहे, या 18 महिन्यांच्या मुदतीत यासंदर्भात निर्णय घेऊन अहवाल शासनास सादर करावयाचा आहे. हे काम एका आयएएस अधिकाऱ्यांकडून होऊ शकणार नाही. उल्हासनगरचे 1 ते 5 असे सेक्शन आहेत तरी त्या प्रत्येक सेक्शनसाठी एक अधिकारी नेमण्यात येणार आहे काय ? तसेच आणखी एका आयएएस अधिकाऱ्यांची नियुक्ती उल्हासनगर येथे करण्यात येणार आहे काय ? तसेच नंदलाल समितीच्या अहवालाप्रमाणे ताबडतोब कारवाई करण्यात येईल काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या ठिकाणी विधेयकाच्या वेळी सुध्दा सविस्तर चर्चा झालेली आहे. त्यावेळी मी जे आश्वासन दिलेले आहे. त्यामध्ये नंदलाल समितीच्या माध्यमातून जी कार्यवाही करण्याचे सांगितले आहे त्याप्रमाणे कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याचे काम चालू झालेले आहे.

यानंतर श्री. सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे...

कोणत्या कर्मचाऱ्यांवर विभागीय चौकशी चालू आहे याची आकडेवारी दिली होती. ती माहिती मी पुन्हा सुध्दा देण्यास तयार आहे.दुसरा महत्वाचा मुद्दा असा की, त्यांनी आयुक्तांची बदली करावी अशी विनंती केली आहे. त्या ठिकाणी माननीय सदस्यांच्या म्हणण्याप्रमाणे आज अनधिकृत बांधकामे होत असतील तर ती गंभीर बाब आहे. त्यामुळे अशी कोणतीही बाब खपवून घेण्याचा हा विषय नाही.

श्री. अनंत तरे : त्या आयुक्तांवर आपण कारवाई केली पाहिजे...

श्री. राजेश टोपे : एखादा अधिकारी नियमाला धरुन जर आपले कर्तव्य पार पाडीत नसेलतर निश्चितपणे माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे त्या संदर्भात चौकशी करु. माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांना मी विचारु इच्छितो की, आजच्या परिस्थितीमध्ये कुणीतरी बदलीची मागणी केल्यानंतर मंत्र्यांनी "हो" म्हणायचे अशाप्रकारची प्रथा पाडावयाची काय? त्यामधून सभागृहाचे समाधान होईल काय?

श्री. विनोद तावडे : आपल्याला ते माहीत नाही काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, आपल्या सभागृहाची प्रथा आणि परंपरा आपल्याला मोडावयाच्या नाहीत. माननीय सदस्यांचे म्हणणे असेल आणि जर ते निश्चितपणे अकार्यक्षम असतील व त्यांच्या अकार्यक्षमतेमुळे त्या ठिकाणी अनधिकृत बांधकामे वाढत असतील तर त्याबाबत निश्चितपणे गांभीर्याने दखल घेतली जाईल. त्याबाबत प्राथमिक चौकशी करुन त्यामध्ये शासनाच्या निदर्शनास आल्यास त्या अधिकाऱ्याची ताबडतोब बदली करण्यास हे शासन मागेपुढे पहाणार नाही. त्यावेळी या सदनामध्ये करण्यात आलेल्या सूचनेचा विचार करण्यात येईल. सभापती महोदय, दुसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे 40 हजार घरे किंवा अनधिकृत बांधकामे नियमित करण्याचे खूप मोठे काम आहे. त्याकरिता डेसिग्नेटेड ऑफिसर किंवा पदनिर्देशित अधिकारी नेमावयाचा आहे. त्याकरिता दोन्ही सभागृहाने कायदा संमत केला आहे. त्यामध्ये स्पष्ट तरतूद आहे की, एक किंवा 4 झोन पाडण्यात येऊन त्याठिकाणी पदनिर्देशित अधिकारी नियुक्त करण्यात येईल. उल्हासनगर शहरासाठी एक पदनिर्देशित अधिकारी नेमून त्याच्या हाताखाली तीन अधिकारी नेमण्यात यावेत. त्यामध्ये स्ट्रक्चरल इंजिनिअर, अग्निशमन अधिकारी व टाऊन प्लॅनिंग अधिकारी अशा तीन एक्सपर्ट अधिकाऱ्यांची कमिटी असेल. आणि ही कमिटी पदनिर्देशित अधिकाऱ्याला मदत करील. उल्हासनगर शहरामध्ये चार झोन पाडण्यात आले आहेत. त्या ठिकाणी चार वेगवेगळे पदनिर्देशित अधिकारी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे...

असतील. हायकोर्टाचे असे म्हणणे आहे की, हे काम 18 महिन्याच्या आत पूर्ण करण्यात यावे. त्यामुळे त्या कामाचे असलेले गांभीर्य आणि परिस्थितीला सामोरे जाण्याच्या दृष्टीने त्या ठिकाणी चार झोन करण्यात येतील. आणि त्या चार ठिकाणी उपसचिव दर्जाचा अधिकारी नेमण्यात येईल, मग तो आय.ए.एस. दर्जाचा सुध्दा अधिकारी असेल. अशाप्रकारे त्या कायद्यामध्ये असलेल्या तरतुदीला अनुसरुन जी कारवाई अपेक्षित आहे त्या दृष्टीने चार पतनिर्देशित अधिकारी नेमून निश्चितपणे करण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. गिडवाणी यांनी विचारल्याप्रमाणे आपण आयुक्तांची बदली करणार काय? उल्हासनगरमध्ये आज 40 हजार अवैध बांधकामे करण्यात आली आहेत. ती नियमित करण्यासाठी कायदा करीत असतांना त्यामध्ये गैरप्रकार होण्याची शक्यता आहे. मागील वेळी सुध्दा अशाप्रकारचे गैरप्रकार झाले आहेत. त्यामुळे आपण त्या आयुक्तांची बदली केली पाहिजे. त्याचप्रमाणे त्या ठिकाणी असलेले कार्यकर्ते कुमार आयलानीवर कारवाई करण्यात आली. परंतु बाकीचे जे लोक सापडले आहेत त्यांच्यावर कारवाई कां केली नाही? ती कारवाई किती दिवसात करणार आहात?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, जी काही कारवाई करण्यात आली आहे त्या संदर्भात माननीय सदस्यांचे असे मत आहे की, चेहरे बघून कारवाई करण्यात आली आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/ पूर्वी श्री.सरफरे.. 17:15

श्री.पांडुरंग फुंडकर : सरकारची जबाबदारी आहे.

श्री.राजेश टोपे : यामध्ये जी काही कारवाई करणे आवश्यक आहे, ती करण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर :ही कारवाई किती दिवसामध्ये करणार आहात ?

श्री.राजेश टोपे : कारवाई करण्याचा अधिकार हा आयुक्तांना आहे. त्यांच्या वतीने लवकरात लवकर ही कारवाई करण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : आमचे हेच म्हणणे आहे की, आयुक्त कारवाई करत नाहीत.

**उपसभापती** : या प्रश्नामध्ये जेवढे गांभीर्य आहे, तेवढ्याच गांभीर्याने मी बोलू शकतो. तो माझा स्वत:चा मतदार संघ आहे. मला माझ्या जबाबदारीची पूर्ण जाणीव आहे. सर्वच सन्माननीय सदस्यांनी उल्हासनगर महानगरपालिकेच्या आयुक्तांची बदली करण्याच्या संबंधात मागणी केलेली आहे. बदली करण्याचा अधिकार हा शासनाचा आहे. अशाप्रकारचे अकार्यक्षम आयुक्त असतील तर त्या ठिकाणी अनधिकृत बांधकामामध्ये वाढ होत जाणार. अनधिकृत बांधकामांच्याबाबतीत कारवाई होईल. मी जबाबदारीने त्या भागामध्ये काम करत असतो. मला स्वत: प्रत्यय आलेला आहे की, या पूर्वी ठाणे जिल्ह्यात कधीही अकार्यक्षम आयुक्त मिळालेले नव्हते. कोणाच्या तरी अधिपत्त्याखाली ते काम करत असतात. ते लोकप्रतिनिधींना खिजगतीमध्ये धरत नाहीत. भेटायला बोलाविले तर जाणीवपूर्वक ते येत नाहीत. अशाप्रकारचा अधिक्षेप बऱ्याचवेळेला झालेला आहे. अशाप्रकारचे अकार्यक्षम आयुक्त त्या ठिकाणी फार काळ रहाणे उचित नाही, असे माझे स्पष्ट मत आहे. हायकोर्टाने अनधिकृत बांधकामाच्या संधाने निर्णय दिलेला होता. त्या संदर्भाने या ठिकाणी चर्चा झाल्यानंतर अनधिकृत बांधकामाच्या संबंधाने राज्य शासनाने फार मोठा दृष्टीकोन ठेवला. या विषयामध्ये सर्व पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी मिळून 855 अनधिकृत बांधकामांच्या संबंधात निर्णय केला. जन भावनेचा, लोक मताचा आदर करुन शासनाने या संबंधाने अध्यादेश काढला. त्या अध्यादेशाची अंमलबजावणी कशी करायची, हेही त्यामध्ये ठरवून दिलेले आहे. हायकोर्टाच्या निर्णयाप्रमाणे, अे,बी,सी, असे वॉर्ड केलेले आहेत. तो प्रश्न निकालामध्ये निघाला असला तरी अनधिकृत बांधकामाच्या संबंधात मोठया प्रमाणावर गुन्ह्रे दाखल करावयाचे आहेत. मी राजकारणामध्ये, समाजकारणामध्ये वावरत असताना चुकीच्या गोष्टीमुळे काय परिणाम होतात, याची मला कल्पना आहे. श्री.कुमार आयलानी हे त्या ठिकाणचे महापौर होते, अनधिकृत बांधकामाच्या संबंधाने त्यांच्याकडे दोष जात होता म्हणून त्यांच्यावर तितक्याच तत्परतेने कारवाई झाली. सत्तेचा माज चढतो म्हणतात, तसे झालेले आहे. त्यानंतरही काही कारवाई होत नसेल तर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/

**उपसभापती (पुढे सुरु...**

माझ्यासारख्या माणसालाही आंदोलनाची भूमिका घ्यावी लागेल. आपण त्या ठिकाणच्या 855 इमारती रेग्युलर करण्याचे मान्य केलेले होते. त्यानंतर अनेक बेकायदेशीर बांधकामे झालेली आहे,अजूनही चालू आहेत. हे मी जबाबदारीने सांगतो.

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** .......

यासंदर्भात मी वारंवार अधिकाऱ्यांना देखील बोलवून विचारणा केली होती. माझ्याकडे तक्रारी आल्या होत्या. त्या तक्रारी मी त्यांच्याकडे पाठविल्या होत्या. परंतु खेदाने म्हणावे लागेल की, जे सोयीचे होते त्या एकाच बांधकामाला त्यांनी हात लावला. बाकीच्याकडून खंडणी वसूल केली. शासन 855 इमारती रेग्युलराईज करणार आहे. या कामामध्ये कोणत्याही प्रकारचा भ्रष्टाचार होऊ नये यासाठी मी देखील त्या ठिकाणी डोळ्यात तेल घालून पाहणार आहे. भ्रष्टाचाराची ऑफर सगळीकडे केलेली आहे. यामुळे लोकांवर अन्याय होतो आणि एकंदर प्रशासन व्यवस्था आणि राज्य शासनाची फार मोठी बदनामी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामध्ये सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन मी शासनाला असे निदेश देतो, अशी सूचना करतो की, ही जी अनधिकृत बांधकामे अधिकृत करावयाची आहेत त्यासाठी आय.ए.एस.दर्जाचा अधिकारी नेमावा. जो कोणत्याही राजकीय दबावाला बळी पडणार नाही असा अधिकारी नेमावा. दुसरी बाब अशी की, उल्हासनगरला महानगरपालिका आयुक्त म्हणून आय.ए.एस. दर्जाचा अधिकारी नेमावा अशा प्रकारची सूचना हायकोर्टाने तीनचार वर्षापूर्वी राज्य शासनाला केली होती. हायकोर्टाच्या त्या आदेशाचा मान ठेवावा आणि त्या ठिकाणी सध्या जे आयुक्त आहेत त्यांच्या बाबतीत जास्त उशीर न करता, जमले तर उद्या संध्याकाळच्या आत त्यांना कार्यमुक्त करा आणि त्या ठिकाणी आपण आपल्या पसंतीचा कार्यक्षम आयुक्त, जो कार्यदक्षतेने काम करील, राजकीय मुलाहिज न ठेवता जनतेकरिता राबेल असा अधिकारी ताबडतोबीने नेमावा अशा प्रकारचे निर्देश मी आपल्याला देत आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, उल्हासनगरच्या अनधिकृत बांधकामाच्या संदर्भात आणि त्यानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीचे आपण बरोबर अवलोकन केलेले आहे. आपण या ठिकाणी जी भूमिका घेतलेली आहे, आपण जे निर्देश दिलेले आहेत ते आदेश शासनाने पाळून त्या ठिकाणी कोणाची मस्ती चालता कामा नये अशा पध्दतीचा व्यवहार शासनाच्या माध्यमातून उल्हासनगरमध्ये व्हावा अशी अपेक्षा आहे. ती अपेक्षा शासनाने पूर्ण करावी.

**उपसभापती** : बाकीचे जे दोषी लोक आहेत मग त्यामध्ये अधिकारी असोत किंवा पदाधिकारी असोत त्या सगळ्यांना येत्या सात दिवसांमध्ये अटक झाली पाहिजे. एकही जण स्पेअर राहता कामा नये.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण एवढ्या रोखठोकपणाने पूर्ण परिस्थितीचे अवलोकन करुन राजकीय शक्ती जी उल्हासनगरमध्ये थैमान घालत आहे त्याचे वर्णन करुन शासनाच्या अधिकाऱ्याची एकतर्फी वागणूक सांगितली. आजपर्यंत पीठासीन अधिकाऱ्यांकडून शासनाचा एवढा बुरखा फाडणे आणि भ्रष्ट अधिकाऱ्याच्या बाबतीत एवढे परखड मत व्यक्त झाले नव्हते. ते आपण केले त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो. महाराष्ट्रात सगळीकडे प्रश्न निर्माण झाल्यानंतर याबाबतीत शासनाला धडा मिळेल अशी अपेक्षा आहे. आपण असे रोखठोक निर्देश दिले की, उद्या संध्याकाळपर्यंत हे झाले पाहिजे.

**उपसभापती** : मी याचे कारण सांगतो. मी सन्माननीय मुख्यमंत्र्यांना यासंदर्भामध्ये स्वत: भेटून अवगत केले आहे आणि त्यांनी त्यांच्या सचिवांना सांगितले आहे की, त्या ठिकाणी ताबडतोब दुसरा अधिकारी नेंमावा. मी जे बोलत आहे त्याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी माननीय मुख्यमंत्र्यांकडून खात्री करुन घ्यावी. उद्या संध्याकाळपर्यंत त्या आयुक्तांना कार्यमुक्त करा.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, आपण या ठिकाणी दिलेले निर्देश, आपण दिलेली सूचना यादृष्टीकोनातून आयुक्तांच्या संदर्भात सभागृहाच्या भावना आणि आपले निर्देश या सगळ्याचा विचार शासनाने केलाच पाहिजे....

**उपसभापती** : त्याची अंमलबजावणी शासनाला करावीच लागेल.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. शासनाला काय वाटते यापेक्षा शासनाने या ठिकाणी जाहीर करावे.

( अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

**उपसभापती** : मी सभागृहाची बैठक 20 मिनिटांसाठी तहकूब करतो. आपण माननीय मुख्यमंत्र्यांशी बोलून नंतर निर्णय घ्यावा.

श्री. राजेश टोपे : दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन माननीय सभापतींनी दिलेल्या निर्देशांचे पालन शासनाकडून केले जाईल.

श्री. अनंत तरे : सिंधुनगर नावा देण्याच्या बाबतीत उत्तर द्यावे.

श्री. राजेश टोपे : उल्हासनगर महानगरपालिकेने तसा ठराव करुन शासनाकडे पाठविला तर राज्य शासन केन्द्र श्ासनाकडे तशा प्रकार ठराव निश्चितपणे पाठविल.

श्री. रामनाथ मोते : उल्हासनगरमध्ये 5 विभाग आहेत. त्यामुळे 5 अधिकारी नेमावे लागतील.

श्री. राजेश टोपे : 5 विभाग असतील तर 5 अधिकारी नेमण्यात येतील.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मराठवाड्यातील वाहतुकीच्या ठेक्यांच्या निश्चितीबाबत मुदतवाढ देण्याचा घडलेला प्रकार

**मु. शी** : मराराठवाड्यातील वाहतुकीच्या ठेक्यांच्या निश्चितीबाबत मुदतवाढ देण्याचा घडलेला प्रकार यासंबंधी सर्वश्री वसंतराव चव्हाण, गुरुनाथ कुलकर्णी, जितेंद्र आव्हाड, प्रा. फौजीया खान, सर्वश्री लक्ष्मण जगताप, धनाजी साठे, सदाशिवराव पोळ, राजेंद्र जैन, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री रमेश निकोसे, विलासराव शिंदे व रामदास तडस, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. वसंतराव चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" मराठवाड्यातील वाहतुकीच्या ठेक्यांच्या निश्चितीबाबत मुदतवाढ देण्याची कोणतीही तरतूद शासन निर्णयात नसताना लातूर, परभणी व हिंगोली या जिल्ह्यांना वगळून इतर सर्व जिल्ह्यांना सातत्याने मुदतवाढ देण्याचा प्रकार नुकताच उघडकीस येणे, परिणामी वाहतूकदारांमध्ये पसरलेले तीव्र असंतोषाचे वातावरण, मुदतवाढ करण्यामागे संबंधित ठेकेदार व अधिकारी यांची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करण्याची स्थानिक जनतेकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया "

श्री. सुनील तटकरे (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. ) ..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंत चव्हाण : लक्षवेधीला दिलेल्या उत्तरामध्ये विसंगती आहे. वाहतूक ठेकेदारांना मुदतवाढ देण्याचे कारण काय ? अकोला, वाशिम, गडचिरोली, गोंदिया, वर्धा, चंद्रपूर, नागपूर, परभणी, हिंगोली, लातूर, ठाणे इतक्या जिल्ह्यामध्ये रास्त दराने अन्नधान्य वाहतुकीचे काम सुरु आहे. तरी सुध्दा काही मर्जीतल्या जिल्ह्यांना जास्त दर असूनही 8 वर्षापासून मुदतवाढ का देण्यात येत आहे ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, 1997मध्ये दिलेल्या दरावर वाहतुकदार जर 10-12 वर्षे काम करण्यास तयार आहेत तर मुळात मंजूर केलेले दर किती जास्त होते ? 1997 पासून डिझेलच्या दरात, महागाईच्या निर्देशांकात जवळजवळ 200 टक्क्या पेक्षा जास्त वाढ झाली आहे. असे असूनसुध्दा ठेकेदार मुदतवाढ घेण्यास धडपड करीत असतील तर किती प्रचंड प्रमाणात गैरव्यवहार झाला आहे हे शासनाच्या कसे लक्षात येत नाही ? द्वारपोच योजनेच्या नावाने मुदतवाढ घेऊनही काम न केलेल्या ठेकेदारांना काळ्या यादीत टाकून त्यांची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल काय ? तसेच त्यांच्याकडून फरकांची रक्कम वसूल करण्यात येईल काय ?

श्री. सुनील तटकरे : वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये काढण्यात आलेल्या निविदांच्या संदर्भात मुदतवाढ देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतलेला होता. सर्व गोष्टींचे अवलोकन केल्यामुळे शासनाची बचत झाली. मुदतवाढीच्या संदर्भात न्यायालयामध्ये दाखल केलेली याचिका न्यायालयाने खारीज केली. यासंदर्भामध्ये राज्य सरकारचे वेगवेगळे निर्णय झाले. 1997 मध्ये मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर उस्मानाबाद,बीडे, नांदेड, जालना, पुणे अमरावती, नंदूरबार व धुळे या जिल्हयाच्या बाबतीत मुदतवाढ देण्यात आली. निविदा मागवून कंत्राट निश्चित करण्यात आली होती आणि त्याबाबतीत मुदतवाढ देण्यात आली होती. न्यायालयामध्ये याचिका दाखल करण्यात आल्यानंतर ती खारीज करण्यात आली. या निविदांची मुदत संपल्यानंतर नवीन धोरण कशा पध्दतीने आखता येईल याचा शासन निश्चितपणे विचार करील काय ?

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

SSK/ MHM/ KGS/ MAP/ SBT/ श्री.शिगम नंतर 17:30

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, वारंवार मुदतवाढ देण्यासाठी एक रॅकेट आहे. मुदतवाढ का द्यावयाची तर आधीची मुदत संपायला आली आहे आणि वेळ मिळाला नाही असे कारण सांगून मुदतवाढ दिली जाते. मुदतवाढ देण्याचे रॅकेट आहे हे मी जबाबदारीने बोलतो आहे. 31.5.2006 रोजी मुदतवाढ संपणार असल्याने नव्याने निविदा काढण्याची प्रोसेस सुरु झालेली आहे काय ? नव्याने निविदा काढू नका अशी कोणत्या अधिकाऱ्याने किंवा लोकप्रतिनिधींनी आपल्याला कळविले आहे काय ? हिंगोली येथील प्रकरणाच्या संदर्भात कोर्टाने काही स्ट्रीक्चर्स पास केलेली आहेत काय ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, या प्रश्नाच्या अनुषंगाने निवेदनामध्ये खुलासा करण्यात आला आहे. काही लोकप्रतिनिधींनी मुदतवाढ द्यावी असे म्हटले आहे आणि काही लोकप्रतिनिधींनी मुदतवाढ देऊ नये असेही म्हटले आहे. लोकप्रतिनिधींना जे काही सांगावयाचे असते ते सांगण्याचा अधिकार अबाधित आहे त्यामुळे त्यावर मी भाष्य करणार नाही. परंतु यासंदर्भातील धोरण निश्चितपणाने ठरविण्यात येईल.

श्री. चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, ज्या जिल्हयांनी मुदतवाढ मागितली त्यांना ती दिल्यानंतर काही जिल्हयांनी निविदा काढल्या. मुदतवाढ दिल्यानंतर ज्या निविदा काढल्या त्याचे दर भरमसाठ आले होते ही गोष्ट खरी आहे काय ? शासनाने मुदतवाढ दिल्यानंतर काही लोक उच्च न्यायालयात गेले. या याचिकेच्या संदर्भात न्यायालयाने शासनाच्या बाजूने निकाल दिला ही गोष्ट खरी आहे काय ? त्याचप्रमाणे नागपूर खंडपीठामध्ये सुध्दा काही लोकांनी याचिका दाखल केली होती त्यासंदर्भात कोर्टाने दंड केला होता ही गोष्ट खरी आहे काय ? याबाबतीत सर्वोच्च न्यायालयाने सुध्दा शासनाने घेतलेल्या निर्णयाच्या बाजूने निकाल दिला हेही खरे आहे काय ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांचे उत्तर "होय" असे आहे.

श्री. कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, 31.5.2006 रोजी वाहतूक कंत्राटदारांची मुदत संपणार आहे. याबाबतीत शासन नवीन धोरण केव्हापासून अवलंबिणार आहे ?

श्री. सुनील तटकरे: सभापती महोदय, निविदांची मुदत 31.5.2006 रोजी संपत आहे याची शासनाला माहिती आहे. यामुळे सार्वजनिक वितरण व्यवस्थेवर कोणत्याही पध्दतीचा परिणाम होणार नाही याची दखल शासन घेईल आणि लवकरच यासंबंधीचा निर्णय निश्चितपणाने घेईल.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, ज्या लोकप्रतिनिधींनी मुदतवाढ द्यावी आणि मुदतवाढ देऊ नये अशा प्रकारची मागणी केली आहे त्यांची नांवे काय आहेत ? 10/10 वर्षे मुदतवाढ दिलेली आहे अशा ठेकेदारांची आणि संबंधित अधिकाऱ्यांची लाचलुचपत विभागाकडून चौकशी करण्यात येईल काय ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, मागणी केलेल्या लोकप्रतिनिधींची नांवे आता माझ्याकडे नाहीत. मी ती सभागृहाच्या पटलावर ठेवीन. 1997 सालापासून मुदतवाढ दिलेली आहे. 1998 मध्ये 1999 मध्ये मुदतवाढ दिलेली आहे. यासंदर्भात उच्च न्यायालयात याचिका दाखल झाल्यानंतर सरकारने घेतलेल्या मुदतवाढीचा निर्णय कोर्टाने मान्य केलेला आहे त्यामुळे कोणावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

यानंतर भारवि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, सन 1997 पासून हे सर्व सुरू आहे. तेव्हा डिझेलचा रेट 20 रुपये होता. आता रुपये 40 प्रति लिटर इतका आहे. त्यामुळे अन्नधान्य वाहतुकीचे कंत्राट मिळविण्यासाठी सगळेच प्रयत्न करीत असतात. तेव्हा शासन रॅकेटला संरक्षण देण्यासाठी मदत करणार आहे की, रॅकेट उद्ध्वस्त करण्यासाठी नवीन टेंडर काढण्याचा प्रयत्न करणार आहे ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, या सर्व बाबींचा धोरण ठरविताना शासन निश्चितपणे विचार करील.

श्री.सुरेश देशमुख : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये ट्रक व्यावसायिकांना धंदे उपलब्ध नसल्यामुळे शासनाने मुदतवाढ दिलेली आहे. यासंबंधी आम्ही शासनाला अनेक सूचना केल्या होत्या. गेल्या दहा वर्षातील जो फरक आहे, तो वाढवून द्यावा अशा प्रकारची मागणी करण्यात आली आहे, त्यासंबंधी मंत्रिमहोदय लक्ष देऊन योग्य तो निर्णय घेतील काय ?

श्री.सुनील तटकर : सभापती महोदय, सभागृहात सन्माननीय सदस्यांनी ज्या ज्या भावना व्यक्त केल्या आहेत, त्या जरी परस्पर विरोधी असल्या तरी देखील सर्व गोष्टींचा साकल्याने विचार करून शासन निर्णय घेईल.

...

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यातील अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ ग्रंथपाल म्हणून गणने.

**मु.शी.**: राज्यातील अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ ग्रंथपाल म्हणून गणनेसंबंधी सर्वश्री रणजितसिंह मोहिते पाटील, विनायकराव मेटे,जितेंद्र आव्हाड,गुरूनाथ कुलकर्णी,प्रा.फोजिया खान,श्री.सदाशिवराव पोळ, श्रीमती मंदा म्हात्रे,सर्वश्री संजय दत्त,गोविंदराव आदिक,प्रतापसिंह मोहिते पाटील,रमेश निकोसे,धनाजी साठे,चंद्रभान रघुवंशी,सुधीर सावंत, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

प्रा.फौजिया खान (नामनियुक्त) : अध्यक्ष महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"राज्यातील माध्यमिक शाळांमध्ये काम करणाऱ्या अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ ग्रंथपाल करण्याबाबत सोलापूर जिल्हा माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा ग्रंथपाल संघाने वेळोवेळी मागणी करुनही शासनाचे त्याकडे होणारे दुर्लक्ष परिणामी अर्धवेळ ग्रंथपालांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, सदरहू नस्ती शासनाच्या मान्यतेसाठी प्रलंबित असून यावर निर्णय घेण्यात होत असलेला विलंब, वर्षानुवर्षे अर्धवेळ ग्रंथपाल म्हणून काम करावे लागत असल्यामुळे त्यांच्यात पसरलेले नैराश्य, अर्धवेळ ग्रंथपाल म्हणून काम करणाऱ्या ग्रंथपालांना पूर्णवेळ ग्रंथपाल म्हणून मान्यता देण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती (श्री.गुरूनाथ कुलकर्णी)** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, लेखी निवेदनामध्ये काही सन्मानीय सदस्यांची नावे टाईप करण्याचे राहून गेले आहे. आपल्या अनुमतीने खालील सन्माननीय सदस्यांची नावे लेखी निवेदनामध्ये समाविष्ट करण्यात यावीत.

" सर्वश्री संजय दत्त, गोविंदराव आदिक,प्रतापसिंह मोहिते-पाटील,रमेश निकोसे,धनाजी साठे,चंद्रभान रघुवंशी,सुधीर सावंत"

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, निवेदन में यह लिखा है कि 924 अर्धवेळ ग्रंथपाल के पद पूर्णवेळ ग्रंथपाल के पद में रुपांतरित करने के संबंध में मंत्री मंडल की मान्यता मिल चुकी है और इसके लिए अपेक्षित राशि रुपये 5 करोड़ 45 लाख 53 हजार की तरतूद की गई है. लेकिन शेष 1067 अर्धवेळ ग्रंथपाल के पद भी पूर्ण वेळ ग्रंथपाल के पद में रुपांतर करना बहुत जरुरी है.क्योंकि कुछ 6 साल से और कुछ 9 साल से ग्रंथपाल के पद पर कार्य कर रहे हैं. शिक्षा विभाग ने तत्वत: मंजूरी दी है लेकिन वित्त विभाग की तरफ से मंजूरी रुकी हुई है. मैं यह पूछना चाहती हूं कि वित्त विभाग की ओर से कब तक मंजूरी मिल जाएगी और इसके लिए धनराशि की तरतूद कब तक उपलब्ध करके दी जाएगी, क्या मंत्री महोदय इसका समय स्पष्ट करेंगे ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, चिपळूणकर समितीच्या शिफारशीनुसार अनुदान प्राप्त राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी अनुदानित शाळांमध्ये ग्रंथपाल/पूर्णवेळ ग्रंथपाल पदे निश्चित करण्याबाबतचे धोरण ठरवून देण्यात आले आहे. या धोरणानुसार 501 ते 100 विद्यार्थी संख्येपर्यंत 1 अर्धवेळ ग्रंथपाल, 1001 ते 1500 विद्यार्थी संख्येपर्यंत 1 पूर्णवेळ ग्रंथपाल पदे देय आहेत. या निकषानुसार आतापर्यंत 1991 पदांना पूर्णवेळ ग्रंथपालाचा दर्जा दिलेला आहे. त्यासाठी तरतूद देखील केलेली आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ SBT/ MAP/ पूर्वी श्री.भारवि... 17:40

श्री.हसन मुश्रीफ....

1067 अर्धवेळ ग्रंथपाल अनेक वर्षांपासून काम करीत आहेत. परंतु ते विद्यार्थी संख्येच्या निकषात बसत नसल्यामुळे त्यांना पूर्णवेळ ग्रंथपाल करता येत नाही. या अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ ग्रंथपाल करण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर नेला होता. परंतु विद्यार्थी संख्येची अट पूर्ण करुन शकत नसल्यामुळे त्यांना पूर्णवेळ ग्रंथपाल करता येणार नाही असे सांगितले गेले.

श्री.श्रीकांत जोशी : महोदय, अर्धवेळ ग्रंथपालांची संख्या 862 वरुन, 962 वर जात जात ती 1067 इतकी झाली आहे. सेंट जोसेफ हायस्कूल येथे अर्धवेळ ग्रंथपाल म्हणून काम करणारी मोहन हाडे ही व्यक्ती आहे. महोदय, ज्यांनी 15-15 वर्षे काम केलेले आहे त्यांना शासन अर्धवेळ ग्रंथपाल म्हणून ठेवते आणि ज्यांनी दोन वर्षे काम केले त्यांना पूर्णवेळ ग्रंथपाल म्हणून मान्यता देत आहे. मानवतेच्या दृष्टिकोनातून उरलेल्या अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ ग्रंथपाल करण्यासाठी, विद्यार्थ्यांच्या निकषात त्या शाळा बसण्यासाठी, त्या शाळा दुसऱ्या शाळांना जोडून किंवा त्या संस्थांच्या शाळांमध्ये अर्धवेळ ग्रंथपालांची बदली करुन, विद्यार्थी संख्येची अट पूर्ण करुन, त्या अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ ग्रंथपाल करण्यासाठी शासन प्रयत्न करणार आहे काय ? यावर कायमस्वरुपी मार्ग काढण्यासाठी शासन काय करणार आहे ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, 1067 अर्धवेळ ग्रंथपाल राज्यात आहेत. ज्यांची सेवा 5 वर्षांपेक्षा जास्त झालेली आणि आणि 500 ते 1000 विद्यार्थी संख्येची अट शिथिल करण्याबाबत मंत्रिमंडळासमोर अगोदर प्रस्ताव नेला होता. परंतु तो मंजूर करण्यात आला नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी शाळा जोडण्याबाबत जी सूचना केली, त्याबाबत विचार करु.

श्री.धनाजी साठे : महोदय, या ठिकाणी चिपळूणकर समितीच्या 500 ते 1000 विद्यार्थी संख्येच्या निकषाचा उल्लेख केला गेला. संपूर्ण महाराष्ट्रात अनुदानित/विनाअनुदानित अनेक शाळा आहेत. या शाळा झाल्यामुळे 500 ते 1000 ही विद्यार्थी संख्या पूर्ण करु शकत नाही. त्यामुळे त्यांना अर्धवेळ ग्रंथपाल म्हणून कायमस्वरुपी काम करावे लागणार आहे. त्यामुळे मानवतेच्या दृष्टिकोनातून ही अट शिथिल करण्याबाबत शासन विचार करेल काय ?

श्री.हसन मुश्रीफ : महोदय, 1067 अर्धवेळ ग्रंथपाल आहेत हे खरे आहे. 2000 पासून शासनाने शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भरतीवर बंदी आणली आहे. ज्या ज्या वेळी जी.आर. काढले

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ....

आहेत, त्यावेळी सन्माननीय सदस्यांच्या भावना विचारात घेता काही वेळा स्थगिती देण्यात आली आहे. या अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ करण्याबाबत सातत्याने शासनाचा प्रयत्न सुरु आहे. ही आर्थिक बाब असल्यामुळे हा प्रस्ताव पुन्हा मंत्रिमंडळासमोर नेला जाईल. 5 वर्षे ज्यांची सेवा झ ाालेली आहे त्यांना पूर्णवेळ ग्रंथपाल करण्याबाबत विचार करु. तसेच विद्यार्थी संख्येची अट शिथिल करण्याबाबतही प्रयत्न करु. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत जो जी.आर.काढणार आहोत, त्यामध्ये सोयीस्करपणे धोरण ठेऊ.

प्रा.शरद पाटील : महोदय, माननीय मंत्री महोदयांनी समाधानकारक उत्तर दिलेले आहे. खरे म्हणजे पूर्वीचा जो प्रस्ताव होता तो वित्त विभागाने का नाकारला ? हा प्रस्ताव पुन्हा एकदा मंत्रिमंडळासमोर नेत असताना वित्त विभागाशी चर्चा करुन, अर्धवेळ ग्रंथपालांना मानवतेच्या दृष्टिकोनातून न्याय मिळवून देणे आवश्यक आहे. त्यामुळे ही बाब वित्त विभागाला पटेल या दृष्टिकोनातून शासन प्रस्ताव तयार करणार आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : महोदय, पूर्वीचा प्रस्ताव निकषामध्ये बसत नसल्यामुळे वित्त विभागाने तो नाकारला होता. त्यामुळे प्रथम पूर्वीचे निकष बदलणे आवश्यक आहे. पाच वर्षापेक्षा जास्त कालावधी नोकरी झालेल्या अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ ग्रंथपाल करण्यासंदर्भात प्रस्ताव करुन तो प्रस्ताव पुन्हा एकदा मंत्रिमंडळासमोर घेऊन जाऊ.

श्री.रामनाथ मोते : महोदय, आपण सभापतीच्या आसनावर बसलेले असल्यामुळे आपल्याला या विषयावर बोलता येणार नसले तरी, आपणही आमच्या मताशी सहमत आहात. कारण आज खरोखरच अर्धवेळ ग्रंथपालांवर अन्याय होतो आहे.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

सभापती महोदय, या ठिकाणी शिक्षकांना आणि ग्रंथपालांना खूप काम आहे. तरी, या संदर्भात विद्यार्थ्यांच्या संख्येचे निकष लावू नयेत. सभापती महोदय, वाचन संस्कृती विकसित होण्यासाठी, तसेच बदलत्या परिस्थितीमध्ये, नवीन अभ्यासक्रमाच्या दृष्टीने ग्रंथालय फार आवश्यक आहे. तरी, या प्रकरणी विद्यार्थ्यांच्या संख्येचे निकष विचारात न घेता त्या ठिकाणी असलेले ग्रंथालय, पुस्तके विचारात घेऊन आपण आम्हाला संरक्षण द्यावे. सभापती महोदय, या राहिलेल्या 1067 अर्धवेळ ग्रंथपालांनी पाच वर्षांपेक्षाही अधिक काळ सेवा केलेली आहे. तरी, आपण त्यांच्या संदर्भात शासनाला निदेश द्यावेत.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सांगत आहेत ते खरे आहे. ग्रंथालय आणि पुस्तके यांचे खऱ्या अर्थाने प्रबोधन होत नाही. म्हणून सभापती महोदय, राहिलेल्या 1067 अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ करण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करीत आहोत. या संदर्भातील भावना आम्ही निश्चितपणे मंत्रिमंडळाकडे पाठवू.

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, " जेथे गाव तेथे ग्रंथालय " अशी जोरदार घोषणा सरकारच्या वतीने झालेली आहे आणि ते आवश्यकही आहे. सभापती महोदय, ग्रंथालय काळाची गरज झालेली आहे. ग्रंथालये गावांपर्यंत पोहोचली पाहिजेत. शहरात असलेल्या ग्रंथालयाची ही अवस्था आहे, तर गावातील संस्थांच्या, ग्रामपंचायतीच्या ग्रंथालयांची काय अवस्था असेल ? या प्रकरणी शासनाने अलिकडच्या काळात बरेच परिवर्तन करुन त्यांना आर्थिक न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे. तरी, यासंबंधी माझा माननीय मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, ग्रंथालयाच्या प्रश्नासंबंधी असे मुद्दे न आणता या संदर्भात मुलभूत प्रयत्न करुन परिवर्तन घडवून न्याय देण्यासंदर्भात शासन काही प्रयत्न करणार आहे का ? शासन या निकषांमध्ये काही बदल करणार का ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, " जेथे गाव तेथे ग्रंथालय " हे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आम्हाला मान्य आहे. या संदर्भातील निकष बदलण्यासाठी आम्ही जरुर प्रयत्न करु.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धोंडीराम राठोड : सभापती महोदय, चिपळूणकर अहवाल आल्यानंतर अनेक लोकांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिले होते की, विद्यार्थ्यांच्या संख्येच्या निकषावर अर्थवेळ ग्रंथपाल भरण्याची तरतूद मुळात चुकीची आहे. ग्रामीण भागातील शाळांना ही कोणतीही पदे मिळालेली नाहीत. त्या शाळांमध्ये पदे भरलेली नाहीत. सभापती महोदय, 2376 पदे मान्य आहेत, त्यातील फक्त 1991 पदे भरलेली आहेत व बाकीची पदे भरायला परवानगी दिलेली नाही. 924 शाळांच्या पदांना मान्यता दिलेली आहे. या ठिकाणी अन्याय होत आहे. सभापती महोदय हे काय चालले आहे ? तरी, माझा माननीय मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, या सर्व 2376 पदांना आपण मान्यता देणार का ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, चिपळूणकर अहवालाचे निकष लावले त्यावेळी विद्यार्थ्यांची संख्या जास्त होती. शाळा कमी होत्या. त्यानंतर आपण विनाअनुदान तत्वावर, कायमस्वरुपी विनाअनुदान तत्वावर शाळा द्यायला लागलो. त्यामुळे 1067 जणांवर अन्याय होत आहे हे मी मान्य केले आहे. राहिलेली सर्व पदे केव्हा भरण्यात येतील ? असा सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारला आहे. त्यांना मी सांगू इच्छितो की, सन 2000 मध्ये पदे भरायला स्थगिती दिली. त्यावेळी सर्व खात्यांचा आढावा झाला. त्या आढाव्यात पदे कमी करावे असे ठरले. त्यानंतर त्या संदर्भात काढलेला जी.आर. स्थगित करण्यात आला. पुन्हा जी.आर. काढला आणि पुन्हा स्थगित झाला. मी या संदर्भात एवढेच सांगू इच्छितो की, नवीन पदे भरण्यासंदर्भात लवकरच जी.आर. काढला जाईल.

श्री. विलासराव शिंदे : सभापती महोदय, पाचशे ते हजार विद्यार्थीसंख्येच्या मागे आपण एक ग्रंथपाल नियुक्त केला. परंतु अनेक विद्यालयांमध्ये पुरेशी विद्यार्थीसंख्या असुनही त्या ठिकाणी ग्रंथपाल नेमण्यास शासनाने परवानगी दिली नाही. पाचशे विद्यार्थीसंख्येच्या ठिकाणी आपण अर्धवेळ ग्रंथपालाची नियुक्ती केली. तरी, या संदर्भात माझी आपणास अशी मागणी आहे की, त्या विद्यालयांच्या आसपास असलेल्या किती विद्यालयांना ग्रंथपालांची नियुक्ती करण्याची परवानगी दिली याबाबत शासनाने तपासणी करावी.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव शिंदे..

त्यामुळे 500 विद्यार्थ्यांची संख्या ही जी मर्यादा आहे ती वाढविली पाहिजे, त्यामध्ये त्या ग्रंथपालांचा काहीही दोष नाही, आणि तिसरी गोष्ट म्हणजे 8 किलोमीटर पर्यंतच्या परिसरामध्ये 2 विद्यालयात पूर्णवेळ ग्रंथपाल देण्याचे शासनाचे धोरण आहे, अशा पध्दतीने अर्धवेळ ग्रंथपाल वाढवून देऊन, त्यांचा अभ्यासात समाविष्ट करुन पूर्णवेळ करावा अशी माझी विनंती आहे.

श्री. हसन मुश्रिफ : सभापती महोदय, या प्रश्नांचे उत्तर मी आधीच दिलेले आहे, जागा भरण्याच्या संदर्भात शासन निर्णय काढलेला आहे, अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

-------------

.......2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कोकणातील शेतकऱ्यांना माकडांचा मोठया प्रमाणात होत असलेला उपद्रव

**मु.शी.**: कोकणातील शेतकऱ्यांना माकडांचा मोठया प्रमाणात होत असलेला उपद्रव याबाबत श्री. मधुकर सरपोतदार, डॉ. दीपक सावंत, श्री. अरविंद सावंत, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे वन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो, आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"कोकणातील रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्हयांमध्ये शेती, फळबागा व भाजीपाला यांचे उत्पादन धेणाऱ्या शेतकऱ्यांना माकडांचा मोठया प्रमाणात होत असलेला उपद्रव, परिणामी कोकणातील शेतकरी व रहिवासी जनता अतिशय हवालदिल होणे, माकडाच्या झुंडींनी आजुबाजूच्या परिसरातील शेती व फळपिकांची मोठया प्रमाणात नासधूस करणे, ग्रामस्थ व ग्रामपंचायतींनी वन खात्याकडे अनेकदा तक्रारी करुनही वन खात्याच्या अधिकाऱ्यांनी या प्रश्नाकडे केलेले दुर्लक्ष, परिणामी रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्हयातील जनता आपल्या शेती पिकाच्या उत्पन्नापासून वंचित होणे, या भयानक संकटापासून कोकणातील शेतकरी व शेतीमाल उत्पादकांना दिलासा देण्यामध्ये शासनाला आलेले अपयश, यामुळे स्थानिक जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. बबनराव पाचपुते (वनमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

.........3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेस जे उत्तर दिलेले आहे ते उत्तर पाहिले तर डोळयाला पाणी लावण्याचा प्रकार आहे. या विषयाच्या संदर्भात दोन वर्षापूर्वी मी विशेष उल्लेखाद्वारे हा प्रश्न माननीय मंत्री महोदयांकडे पाठविला होता. माननीय मंत्री महोदयांना त्यांच्या कार्यबाहुल्यामुळे दोन वर्षात माझ्या विशेष उल्लेखाचे उत्तर देता आलेले नाही. आणि म्हणून मला या विषयावर लक्षवेधी सूचना द्यावी लागली आहे. लक्षवेधीला जे उत्तर दिलेले आहे ते सभापती महोदय आपण वाचावे. यामध्ये मला काही प्रश्न विचारावयाचे आहेत, येथे उत्तर देतांना त्यांनी माकडांचा अभ्यास केलेला आहे काय ? ज्या भागात माकडांचा त्रास होतो तेथे आपण गेलात काय ? कोणत्या भागात गेला त्यांची नावे आम्हाला येथे सांगा. माकडे फळबागा, धान्य इतर अशा अनेक पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान करतात, या माकडांचा बंदोबस्त कसा करावा याबाबत अहवाल आलेला आहे काय ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा मांडलेला आहे, त्यांनी सिंधुदुर्ग जिल्हयाच्या संदर्भात पत्र दिले होते. संपूर्ण राज्यामध्ये माकड हे आहेत, खास करुन, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, चिपळूण यामध्ये मोठया प्रमाणात माकडे आहेत, या दोन जिल्हयामध्ये 1244 वानरे आहेत, काळया तोंडाची ही वानरे आहेत,

**तालिका सभापती** : मंत्री महोदय या प्राण्यांमध्ये माकड, वानर व करेड असे प्रकार आहेत.

श्री. बबनराव पाचपुते : या दोन जिल्हयामध्ये 2147 ही माकडे आहेत, त्यांची जनगणना केलेली आहे. माकड हा एका जागी राहणारा प्राणी नाही, तो स्थलांतर करणारा प्राणी आहे टोळीने ते जात असतो.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माकड हा स्थलांतर करणारा प्राणी नाही. तो आपली सीमा सोडून जात नाही, चुकीची नोंद होऊ नये म्हणून मी सांगतो.

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी याबाबत सुध्दा बऱ्याच अभ्यास केलेला दिसतो, ठीक आहे आम्हाला ते मान्य आहे, जशी माणसाला जगण्याची गरज आहे तशीच या वन्यप्राण्याला सुध्दा जगण्याची गरज आहे, जगण्याचा अधिकार आपण त्यांना दिलेला आहे. संपूर्ण माकडे त्या ठिकाणी नुकसान करीत आहेत, यामध्ये तेथील स्थनिक सरपंचानी सुध्दा तक्रारी केलेल्या आहेत, त्यामध्ये सरपंच पाटघर यांनी तक्रार केलेली आहे तसेच नांदगांव व कणकवलीचे सरपंच यांनी सुध्दा तक्रारी केलेल्या आहेत. (यानंतर श्री. सरफरे..

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते...

ज्या ज्या ठिकाणी तक्रारी आल्या त्या प्रत्येक गावामध्ये...

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय,दोन वर्षापूर्वी विशेष उल्लेखाव्दारे हा प्रश्न उपस्थित केल्यानंतर आपल्या विभागाच्या अधिकाऱ्यांनी मला पत्र पाठवून विचारणा केलेली नाही? तसेच, तुम्ही कोणत्या प्रकारच्या माकडांची चौकशी करीत आहात, त्या माकडांवर कोणत्या प्रकारचा इलाज केला पाहिजे याबाबत विचारणा केली नाही. त्या माकडांना पिटाळण्याकरिता आपण आपल्या विभागाची माणसे पाठविली कां? कारण त्याठिकाणी खाजगी वन क्षेत्र असल्यामुळे आपली माणसे त्या ठिकाणी जाणार नाहीत...

**तालिका सभापती (श्री. गुरुनाथ कुलकर्णी)** : माकडांपासून होणाऱ्या उपद्रवासंबंधी हा प्रश्न आहे. ती माकडे गावामध्ये फिरतात, शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान करतात. तेव्हा त्यांना प्रतिबंध कशाप्रकारे करावयाचा हे आपण सांगा.

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, ज्या ज्या ठिकाणाहून तक्रारी करण्यात येतात त्या ठिकाणी वन खात्याच्या लोकांना पाठविण्यात येते. त्या माकडांना हुसकावून लावण्यासाठी डबे वाजविणे, फटाके उडविणे या गोष्टी केल्या जातात. आणि त्यासाठी आवश्यक असलेले प्रबोधन देखील करण्यात येते...

श्री. मधुकर सरपोतदार : आपण त्या माकडांना हाकलण्यासाठी गेलात तर ते आपल्याला दात विचकून दाखवितात...

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, माननीय सदस्यांना बऱ्याच प्रकारची माहिती आहे...

**तालिका सभापती** : मी माझ्या नारळाच्या बागेमध्ये जातो त्यावेळी झाडावर लहानसे केलडे बसलेले असते. ते नारळ काढून सोलते आणि त्याची टरफले माझ्या अंगावर टाकते. हे माझ्या बाबतीत देखील घडले आहे...

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, आज कोकणामध्ये अशी परिस्थिती आहे की, ही माकडे झाडावरुन नारळ, फणस खाली फेकून देतात. त्यामुळे घरावरची कौले फुटतात. या माकडांना हाकलण्यासाठी आपण दिवसभर डबे वाजवीत बसायचे काय?दिवसभर फटाके फोडत राहायचे काय? निवेदनामध्ये आपण म्हटले आहे की, "माकडे पकडण्यासाठी मिरज, जि. सांगली येथे माकडे पकडणारे कंत्राटदार असून याबाबत क्षेत्रीय स्तरावर माहिती देण्यात आलेली आहे".

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत....

माझा प्रश्न असा आहे की, माकडे पकडणाऱ्या माणसांची माहिती जिल्हयातील माहिती केंद्रावर देण्यात यावी. तसेच, सर्व ग्रामपंचायतींना माहिती देऊन त्यांच्याकडे संपर्क नंबर देण्याची आवश्यकता आहे. आणि त्या लोकांशी संपर्क साधण्याबाबत सांगण्याची आवश्यकता आहे तसे आपण करणार काय?

श्री. बबनराव पाचपुते : सजेशन फॉर ॲक्शन.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, निवेदनामध्ये म्हटले आहे की, माकडांना हुसकावून लावण्यासाठी डबे वाजविणे, फटाके उडविणे यासारख्या पारंपारिक उपाय योजना करण्यात याव्यात. या उपाय योजना करण्यासाठी आपण गावातील लोकांना डबे आणि फटाके पुरविणार काय? माकड पकडणाऱ्या लोकांनी माकडांना पकडल्यानंतर त्यांची विल्हेवाट कशाप्रकारे लावली जाते? त्यांना दुसऱ्या गावामध्ये सोडण्यात येते काय? हाफकीन इंस्टिटयुटकडे त्यांना पाठविण्यात येते काय?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, लहान आकाराच्या माकडांना पकडून त्यांना दुसरीकडे सोडले जाते. नागपूरला अशाप्रकारे माकडांना पकडून त्यांना रामटेकच्या जंगलात सोडण्यात आल्यामुळे त्याठिकाणी अडचण निर्माण झाली नाही. माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे शेतकऱ्यांच्या घरावरील कौले फोडण्यात येतात, व त्यामधून त्यांचे नुकसान होते. परंतु हत्तीच्या आक्रमणामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई देण्यात येते. माकडाकडून झालेल्या नुकसानीची भरपाई देण्याबाबत अजून जी.आर. काढण्यात आलेला नाही. याचे कारण नुकसानीचे प्रमाण कमी आहे. शेवटी आपल्याला वन्य पशू, प्राण्यांना सुध्दा संभाळले पाहिजे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माकडांना प्रतिबंध करण्यासाठी आपण कोणतीही उपाय योजना करीत नाही. त्या ठिकाणी शेतकऱ्यांचे नुकसान होत असतांना गंमतीने चर्चा चालणार असेल तर लक्षवेधी सूचनेव्दारे प्रश्न विचारण्यात अर्थ नाही?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, मी हा विषय गांभीर्याने घेतला आहे. एका गावामध्ये जर एखादा वानर आला तर त्याचा त्या गावाला खूप त्रास होतो. त्याबाबत वन खात्याला कळविण्याची आवश्यकता आहे. त्यांना प्रतिबंध करण्यासाठी आपण रबरी बुलेट वापरण्यास सुरुवात केली असून तो प्रयोग यशस्वी झाला आहे. त्यामुळे ज्या ज्या ठिकाणी असे प्रकार होतील त्या ठिकाणी रबरी बुलेट वापरण्याबाबत उप वन रक्षकांना सुध्दा अधिकार दिले आहेत. त्यामुळे वन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते....

विभागाने ही बाब गांभीर्याने घेतली असून गावामध्ये माकडे कळपाने आल्यानंतर त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी आणि त्यांना हुसकावून लावण्यासाठी लोकांना डबे वाजविण्यासाठी आणि फटाके पेटविण्याबाबत सांगितले आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते (पुढे चालू...

पण या संदर्भात बंदोबस्त करावयाचा असेल रबरी बुलेट वापरण्याचा प्रयोग केलेला आहे. याचा अत्यंत चांगल्या प्रकारे रिझर्ल्ट मिळालेला आहे. माकडे शेतीचे नुकसान करतात,असे कळल्याबरोबर फॉरेस्टचे लोक येऊन त्यांचा बंदोबस्त करतील.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, कोकणातील माकडांचा प्रश्न उपस्थित करण्यात आला. मी मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देतो की, विदर्भामध्ये हरणांचे कळप, रानडुकरे मोठयाप्रमाणावरशेतीचे नुकसान करतात. हरणांच्या कळप शेतीचे नुकसान करत असतात, या संबंधात सरकार शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देणार आहे काय ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी हरणांचे कळप येऊन शेतीचे नुकसान करतात असे सांगितले. शेतीचे नुकसान झाले तर त्याचा पंचनामा करुन शेतीची नुकसानभरपाई दिली जाते. डुक्कर आणि रुई हे दोन प्राणी शेतीचे नुकसान करत असतात, त्यांची शिकार करण्यासाठी अधिकृत परवाना दिलेला आहे. शेतकऱ्यांनी तशी परवानगी मागण्यासाठी त्यांनी अर्ज केला तर त्यांना 48 तासाच्या आत परवानगी दिली जाते. 48 तासामध्ये परवानगी मिळाली नाही तर ती परवानगी मिळाली असे गृहित धरले जाते. तालुक्याला आर.एफ.ओ. असतात ते परवानगी देत असतात. फक्त त्यांची शिकार केल्याचे त्यांना कळवावे लागते. या दोन प्राण्यांच्याच बाबतीत परवानगी आहे.

प्रा.जोगेंद्र कवाडे : कोकणामध्ये माकडांचा बंदोबस्त करणे आवश्यक आहे, तो आपण करतो आहोत. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.फुंडकर साहेबांनी विदर्भाच्या संबंधातील हरणांच्या कळपांच्या संबंधात सांगितले. रान डुक्करे आणि हरणांचे कळप विदर्भामध्ये मोठयाप्रमाणावर येऊन शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान करतात. या संदर्भात शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याची कारवाई करण्यात येईल काय ?

श्री.बबनराव पाचपुते : या संदर्भात कोणत्याही राज्यापेक्षा आपल्या राज्यामध्ये नुकसान भरपाई देण्याच्या संदर्भात आपण पुढे आहोत. आपण हत्ती, कोल्हा, लांडगा, कोल्हा, रानडक्कर,रुई या जनावरांनी माणसांवर हल्ला केल्यानंतर त्यामध्ये माणूस मृत झाला तर त्याच्या कुटुंबियांना इतर राज्यामध्ये 30 हजार, 40 हजार रुपये नुकसानभरपाई देण्यात येते, परंतु आपण 2 लाख रुपये एका व्यक्तीला देतो. पाळीव जनावर म्हणून म्हैस,बैल यांच्यावर हल्ला झाला तर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ SBT/

श्री.बबनराव पाचपुते...

आपण 9 हजार रुपये नुकसानभरपाई देतो. शेळया-मेंढयांवर हल्ला केला तर त्यासाठी देखील आपण नुकसान भरपाई देतो. दोडा मार्ग, चंदगड, आजरा भागातील शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान हत्तींनी केले, त्यासाठी आपण नुकसान भरपाई दिलेली आहे.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते .....

पश्चिम बंगालमध्ये नुकसानभरपाई पाचपट कमी आहे. कर्नाटकमध्ये सुध्दा काही पटीने कमी नुकसानभरपाई देण्याचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्राचे वन चांगले आहे. वन्यजीवन राखण्याच्या संदर्भात शासनाची भूमिका अशी आहे की, जसा आपल्याला जगण्याचा अधिकार आहे तसाच वन्यप्राणी आणि सगळ्यांनाच जगण्याचा अधिकार आहे. त्यासाठी महाराष्ट्र सरकारला जरी पैशाची आणखी तोशीस लागली तरी जेवढे नुकसान होईल ते देण्याच्या संदर्भात अध्यादेश काढलेला आहे. पंचनामा करुन तीन महिन्यात नुकसानभरपाई देण्याचा प्रयत्न केला जाईल.

डॉ. दीपक सावंत : वन्यजीवन राखण्याच्या संदर्भात माननीय मंत्रिमहोदयांनी जे सांगितले त्याबद्दल दुमत नाही. परंतु माणसांच्या जीवावर ते उठावयास लागले तर वन्यजीव राखावयाचे की नाही असा प्रश्न येणार आहे. ही त्याची चाहूल आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, त्या ठिकाणी रबरी बुलेट देणार. त्या रबरी बुलेट्स आपण तेथील प्रत्येक पोलीस पाटील यांच्याकडे उपलब्ध करुन देणार काय ? ज्या गावामध्ये उपद्रव आहे अशा गावांमध्ये बुलेट पुरवणे व त्यासाठी पिस्तूल किंवा रिव्हॉल्वरचा परवाना त्यांना देणार काय ? त्यासाठी आपण एक सर्व्हे टीम नेमून रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील नेमक्या किती गावांना त्रास आहे त्यादृष्टीने उपाययोजना करणार काय ?

श्री. बबनराव पाचपुते : मी सन्माननीय सदस्यांना धन्यवाद देईन की, या निमित्ताने माकड हा प्राणी चर्चेमध्ये आला. ते टोळीने फिरतात त्यामुळे अडचण होते. त्यांचा सर्व्हे झालेला आहे. ते कोणकोणत्या गावामध्ये जातात याची माहिती आहे. बुलेट आपण सरपंच किंवा पोलीस पाटील यांच्याकडे देणार नाही. त्यामध्ये कायद्याप्रमाणे अडचण आहे. 1972 चा जो कायदा आहे त्याप्रमाणे त्यात अडचण होणार आहे. आपले जे वनरक्षक आहेत, जे गार्ड आहेत त्यांच्या बीटमध्ये 15 ते 20 गावे असतात. कधीही माहिती मिळाली की ते गार्ड गावामध्ये येऊन व्यवस्था करु शकतात. त्यांना कळविल्यानंतर एका तासामध्ये ते त्या ठिकाणी जाऊ शकतात.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, जंगल, वन, रान सोडून माकडे गावामध्ये का येतात ? याचा सर्व्हे करणे आवश्यक आहे असे मला वाटते. जंगलामध्ये माकडांना लागणारी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे .....

कंदमुळे, फळे यांचे प्रमाण कमी होत चालल्यामुळे माकडे गावाकडे येतात असे वर्तमानपत्रांमध्ये वाचले आहे. जी जंगले आहेत त्या ठिकाणी माकडांनी राहावयास पाहिजे, त्यांनी जंगल सोडून गावामध्ये येऊ नये म्हणून त्या ठिकाणी कंदमुळे, फळे याची व्यवस्था खात्याकडून झाली तर माकडांचा उपद्रव थांबेल. याबाबतीत शासन कार्यवाही करणार काय ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सूचनेचा विचार करु.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माकडांच्या उपद्रवाबद्दल आपण चर्चा केली परंतु यावर नेमका इलाज काय याचा शोध या चर्चेतून लागलेला नाही. आपली जी यंत्रणा असेल त्याबाबतीत त्या त्या गावचे सरपंच किंवा पोलीस पाटील यांना पाठवून, तुमच्या गावामध्ये असा त्रास असेल तर अमूक ठिकाणी संपर्क साधावा, आमची माणसे त्या ठिकाणी येतील आणि माकडांना पकडून दुसरीकडे सोडण्याचा इलाज करतील असे माहितीपत्रक तयार करुन ते सगळ्या ग्रामपंचायतींना पाठविणार काय ? असे पत्रक पाठवले तर त्याची प्रत आमच्या माहितीसाठी आम्हाला पाठवणार काय ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सूचनेचा विचार केला जाईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, कोकणातील प्रश्न मी नीट मांडतो म्हणून आपण मला प्रश्न विचारण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. वन्यप्राण्यापासून शेतीचे नुकसान झाले तर त्याबाबत नुकसानभरपाई दिली जाते. कोकणामध्ये फळबागांच्या बाबतीत नुकसानभरपाई दिली जात नाही. नियमामध्ये पिकांच्या बाबतीत तरतूद आहे. कोकणासाठी फळबागांच्या बाबतीत नियम लागू करण्यास संबंधित खात्याला भाग पाडणार काय ?

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते : आम्ही नवीन जी.आर.काढीत आहोत. एकरावर नाही तर प्रत्येक झ ाडाच्या बाबतीत अभ्यास करुन निर्णय घेतला जाईल. काजूच्या एका झाडाचे नुकसान झाले असेल, नारळाच्या एका झाडाचे नुकसान झाले असेल तर ते नुकसान किती झालेले आहे आणि त्यानुसार किती नुकसान भरपाई द्यावयास पाहिजे यासंदर्भात जी.आर. काढण्यात येत आहे. शेतक-यांना चांगली नुकसान भरपाई देण्याचा प्रयत्न राहील.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबई-नाशिक-धुळे महामार्गाचे रखडलेले काम

**मु. शी** : मुंबई-नाशिक -धुळे महामार्गाचे रखडलेले काम यासंबंधी श्री. संजय दत्त, कर्नल सुधीर सावंत, सर्वश्री. गोविंदराव आदिक व रमेश निकोस, वि.प.स. यां□ दिलेली ल□वेधी सूचना

श्री. रमेश निकोसे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अ□मती□ □यम 101 अ□वये पुढील तातडीच्या व सार्वज□□ महत्वाच्या बाबी□डे स□मा□□य वन मंत्र्यांचे ल□ वेधू इच्छितो आ□ त्याबाबत त्यां□ □वेद□ □रावे, अशी वि□ती □रतो.

"मुंबई-नाशिक-धुळे हा चार पदरी महामार्ग ठाणे जिल्ह्याच्या अभयारण्यातून जाणार असल्याने त्याला केंद्रीय वने व पर्यावरण खात्याचा विरोध असल्याने या मार्गाचे काम रखडलेले असणे, मुंबईहून नाशिकला जाताना कसारा घाटात प्रचंड वाहतूक कोंडी होत असल्याने ती दूर करण्यासाठी पर्यायी मुंबई-नाशिक चार पदरी महामार्गाचा प्रस्ताव तयार करण्यात येणे, पुढे तो धुळ्यापर्यंत वाढविण्यात आला, परंतु ठाणे जिल्ह्यात वने आणि पर्यावरण खात्याने आक्षेप घेतल्याने पहिल्या टप्प्यातच काम रखडलेले असणे, वाहतुकीची होत असलेली कोंडी सोडविण्यासाठी, इंधनाची व वेळेची बचत पाहता नागरिकांमध्ये शासनाबाबत निर्माण झालेला असंतोष, तरी शासनाने मुंबई-नाशिक-धुळे चार पदरी महामार्गातील होत असलेला अडथळा दूर करुन तातडीने हा प्रकल्प सुरु करयाबाबत करावयाची कारवाई व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

श्री. बबनराव पाचपुते ( वन मंत्री) : सभापती महोदय, ल□वेधी सूच□संबंधीच्या □वेद□च्या प्रती मा□□य सदस्यां□ आधीच वितरित □ल्या असल्यामुळे मी ते □वेद□ आपल्या अ□मती□ सभा□हाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : □वेद□ सभा□हाच्या पटलावर ठेव□यात आले आहे.

**□वेद□**

( प्रेस : येथे सोबतचे □वेद□ छापावे. )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश निकोसे : मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवेमुळे प्रवाशांना अडीच तासात पुण्याला पोहोचता येते. तत्कालीन बांधकाम मंत्री श्री. नितीन गडकरी यांच्या काळामध्ये हा रस्ता पूर्ण होईल की नाही अशी शंका व्यक्त केली जात होती. हा रस्ता पूर्ण झाल्यामुळे प्रवाशांची चांगली सोय झालेली आहे. मुंबई-नाशिक-धुळे हा महामार्ग मात्र उपेक्षित राहिलेला आहे. कसारा घाटामध्ये मोठ्या प्रमाणावर अपघात होतात. वाहतुकीची मोठ्या प्रमाणावर कोंडी होत असल्यामुळे तीन-चार तास तिष्ठत रहावे लागते. माझा प्रश्न असा आहे की, 13.3.06च्या पत्रात उपस्थित करण्यात आलेले मुद्दे कोणते आहेत. आराखडा तयार करण्यात आलेला आहे काय ? तसेच रस्ता किती कालावधीमध्ये पूर्ण होईल ? या प्रश्नांची सविस्तर उत्तरे द्यावीत.

श्री. बबनराव पाचपुते : मुंबई-नाशिक नॅशनल हायवे क्रमांक 3 याचे चौपदरीकरणाचे काम सुरु झालेले आहे. या कामासाठी शहापूर आणि ठाणे येथील 90.12 हेक्टर जमीन आवश्यक आहे. वन जमिनीचा वापर वनेतर कामांसाठी करण्याकरिता केन्द्र शासनाची परवानगी घ्यावी लागते. त्यासाठी त्या त्या विभागाने व्यवस्थित प्रस्ताव दाखल करण्याची आवश्यकता आहे. 13.3.06च्या पत्रान्वये काही त्रुटी निदर्शनास आणून दिलेल्या आहे. 7/12चे उतारे दिलेले नाहीत, नकाशे दिलेले नाहीत, अशा त्रुटी निदर्शनास आणून दिलेल्या आहेत. मुख्य वन संरक्षक, ठाणे यांनी त्रुटींची पूर्तता करुन देण्यास सांगितलेले आहे. हा प्रश्न अत्यंत महत्वाचा असल्यामुळे मी स्वत: संबंधित विभागाच्या अधिका-यांना एकत्र बोलावून कशा प्रकारे प्रस्ताव सादर केला पाहिजे हे सांगून नागपूर येथील विभागीय अधिका-यांच्या कार्यालयामध्ये प्रस्ताव पाठविलेला आहे. त्याठिकाणी काम करीत असताना वृक्षतोडीच्या बाबतीत अडचण होती. 23.3.06 ला वृक्षतोडीची परवानगी दिलेली आहे. परवानगी येण्यास वेळ लागला होता. पण काम थांबू दिले नाही.

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश निकोसे : सभापती महोदय, 1982 चा वन कायदा आहे तो निरर्थक आहे. त्याला काहीही अर्थ नाही. या कायद्यामुळे अनेक अडथळे निर्माण झालेले आहेत. अशा वेळी केंद्र सरकारचा जो प्रस्ताव आहे त्या प्रस्तावाची मुख्य वन संरक्षक यांच्यामार्फत तपासणी करुन किती महिन्यांमध्ये या रस्त्याची कामाला सुरुवात होईल हे शासनाने स्पष्ट करावे.

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, माननीय सदस्यांचा आदर करुन मी सांगेन की, 1980 चा जो वन कायदा आहे तो संपूर्ण देशामध्ये गौरविला गेला आहे. रोजच्या वापरासाठी या कायद्याची अडचण आहे. पण पर्यावरण टिकविण्यासाठी हा कायदा गरजेचा आहे. केंद्राचा हा कायदा आपण स्वीकारलेला आहे. तो निरर्थक नाही. महाराष्ट्रातील 77 हजार लोकांचे प्रश्न वनखात्यामुळे राहिले होते. आता छोटया छोटया कामांना वनखात्याने परवानगी दिलेली आहे. एक एकरापर्यंत परवानगी दिलेली आहे. लोकांचे प्रश्न आणि जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी परवानगी दिली आहे.पाझर तलाव असतील, नाला बंडींगची कामे असतील ती क्लीअर केली आहेत. राज्यात वनखात्यामुळे रखडलेल्या 1024 मोठया प्रकल्पांपैकी 750 प्रकल्प गेल्या वर्षामध्ये क्लीअर करण्यात आलेले आहेत. या प्रकल्पांना पर्यायी जमीन मिळत नव्हती. म्हणून हे प्रकल्प रखडले होते. या प्रकल्पांचे काम सुध्दा सुरु झालेले आहे. विशेषत: विदर्भातील गोसीखुर्द सारखे प्रकल्प सुध्दा क्लीअर झालेले आहेत. काम सुध्दा सुरु झालेले आहे. 1980 च्या वनकायद्यानुसार वनामध्ये काम करावयाचे असेल किंवा इतर कामासाठी जमीन वापरावयाची असेल तर तसा प्रस्ताव दाखल करावा लागतो. त्याला वनखात्याची परवानगी घेतल्याशिवाय काम करता येत नाही. या कामामध्ये प्रस्ताव वेळेवर दिला नाही. दिला तो अपूर्ण दिला. म्हणून पुन्हा प्रस्ताव परत पाठविण्यापेक्षा वनखात्याने पाठपुरावा करुन प्रस्ताव तयार केला. वनखात्याचे हे काम नाही. परंतु आम्ही एकत्र बसलो आणि राज्याच्या हिताच्या दृष्टीने आणि लोकांच्या हिताच्या दृष्टीने वनखात्याने पुढाकार घेऊन संपूर्ण प्रस्ताव तयार करण्याचे काम केलेले आहे. काम सुरु करीत असताना झाडे तोडण्याची अडचण निर्माण झाली त्यासाठी परवानगी दिलेली आहे. संबंधित खात्याच्या अधिकाऱ्यांनी व्यवस्थितपणाने प्रस्ताव दाखल केला नाही म्हणून काम थांबविण्यात आले होते. आता हे काम थांबणार नाही.

डॉ. वसंत पवार : सभापती महोदय, मुंबई-नाशिक-धुळे हा चौपदरी रस्ता गोल्डन ट्रँगल म्हणून ओळखला जातो. मुंबइ-भिवंडी हे काम झालेले आहे. आता भिवंडी-गोदे-पिंपळगांव बसवंत

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. वसंत पवार...

हे काम व्हावयाचे आहे. विशेषत: घाटाचे चौपदरीकरणाचे काम अद्याप व्हावयाचे आहे. हे काम लवकरात लवकर होणे गरजेचे आहे. शहापूर-इगतपुरी हे काम बाकी आहे. या घाटातून श्री.शरद पवार यांना 5 कि.मी.पायी चालावे लागले होते. वनकायदा आहेच. परंतु आता कार्बन क्रेडीट ही संकल्पना आलेली आहे. सामाजिक वनीकरण खाते आपल्याकडे काम करीत आहे. शासनाकडून जंगलामध्ये आणि डोंगरामध्ये झाडे लावलेली आहेत. त्याचे क्रेडीट मिळण्यासाठी वनखाते प्रस्ताव तयार करणार आहे काय ? अनेक वर्षे शासनाकडून झाडे लावली गेली आहेत त्यामुळे जेवढी आवश्यक आहेत तेवढी झाडे तोडायला हरकत नाही. जेवढी झाडे तोडली त्याच्या पटीत झाडे लावली जातील असे आश्वासन शासन केंद्र सरकारला देऊ शकणार आहे काय ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी अतिशय महत्वाचा आणि चांगला प्रश्न विचारला आहे. कार्बन क्रेडीट पॉलिसी आपण स्वीकारलेली आहे. केंद्र सरकारने कॅबिनेटमध्ये यासंदर्भात निर्णय घेतलेला आहे. महाराष्ट्रासह संपूर्ण देशामध्ये कार्बन क्रेडीटचे धोरण राबविण्यात येत आहे. प्रत्यक्षात त्याची कारवाई सुरु झालेली नाही. निर्णय अजून अंमलात आलेला नाही. तरीसुध्दा ज्याठिकाणी अभयारण्ये असतील किंवा राखीव वने असतील त्याठिकाणापासून 10 कि.मी.च्या आत झाडे तोडण्यासाठी परवानगी दिली जात नव्हती.

नंतर भारवि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते...

सभापती महोदय, हायकोर्टामध्ये एक याचिका दाखल झाली होती. या याचिकेचा निकाल दिनांक 15.2.2006 रोजी लागला. आता असा निर्णय देण्यात आला आहे की, केंद्राची प्रकल्पासाठी परवागनी असेल तर राज्य सरकारने परवानगी दिली पाहिजे. त्यामुळे 10 कि.मी.चा कायदा लागू होत नाही. तशा प्रकारची परवानगी दिलेली आहे. कार्बन क्रेडिट सिस्टीम ज्यावेळी आपण सुरू करू त्यावेळी त्याचा विचार करण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हा शासनाच्या कमिटमेंटचा विषय आहे. हा रस्ता करण्यामागची शासनाची भूमिका लक्षात घेतली पाहिजे. केंद्रीय कृषि मंत्री आदरणीय श्री.शरद पवार या मार्गावर अडकून पडले होते. त्यांना एक-दोन कि.मी.चालत जावे लागले म्हणून सदर रस्त्याचे काम हाती घेण्यात आले. मुंबई-पुणे मार्गावर कै.टिळक साहेब अडकून पडले होते. त्या वृत्तास मोठी प्रसिध्दी मिळाल्यानंतर मुंबई-पुणे मार्ग एक दिशा झाला. त्यानंतर माननीय शिवसेनाप्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे यांनी मुंबई-पुणे एक्स्प्रेस-वे करण्याचा निर्धार व्यक्त केला व कुठल्याही परिणामांची तमा न बाळगता हा मार्ग त्यांनी पूर्ण करून दाखविला. माननीय श्री.शरद पवार यांच्याकडे समर्थ नेतृत्त्व आहे. तत्कालीन व आजचे सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी माननीय श्री.शरद पवार रस्त्यात अडकून पडल्यानंतर सदर रस्त्याचे चौपदी करण्याचे काम हाती घेतले. त्यांनी वर्तमानपत्रातून जाहीर केले की, मार्च 2006 रोजी सदर काम पूर्ण होऊन श्री.शरद पवार यांची पहिली गाडी त्यावरून धावेल. या कामाच्या निविदा सन 2004 मध्ये उघडण्यात आल्याचे देखील त्यांनी सांगितले होते. हे सगळे रेकॉर्डवर आहे. पण काय झाले ते देव जाणे. एक भूत असते. ते नाचायला लागले की, काय करायचे. त्याला समुद्राच्या लाटा मोजायला पाठवायचे. त्याप्रमाणे हे काम संबंधित मंत्र्यांना करायला दिले असेल. चार पदरी रस्त्याचे काम करत बस असे त्यांना म्हणावयाचे असेल. असे जरी असले तरी श्री.भुजबळ यांच्यामध्ये निर्धाराने काम करण्याचे सामर्थ्य आहे. ते हट्टी स्वभावाचे आहेत. त्यामुळे श्री.शरद पवार यांची गाडी या मार्गावरून कधी जाईल हे पहावे लागेल. याचे कारण असे की, लेखी उत्तरामध्ये नमूद करण्यात आले आहे की, याबाबतचा प्रकल्प यंत्रणेने सादर केलेला प्रस्ताव अपूर्ण अवस्थेत असल्यामुळे उप वनसंरक्षक

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ MAP/ SBT/ कानडे.. 18:20

श्री.दिवाकर रावते...

शहापूर यांनी दिनांक 26.12.2005 रोजी तो प्रकल्प यंत्रणेस परत केला. प्रकरणी उप वन सरंक्षक,शहापूर यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांची पूर्तता करून प्रकल्प यंत्रणेने दिनांक 25.1.2006 रोजी सदरचा प्रस्ताव पुन्हा उप वन संरक्षक, शहापूर यांचयाकडे सादर केला. उप वन संरक्षक, शहापूर यांनी सदरचा प्रस्ताव दिनांक 31.1.2006 च्या पत्रान्वये मुख्य वन संरक्षक, ठाणे यांना सादर केला. आताच काळी वेळा पूर्वी सभागृहामध्ये माकडांविषयीची लक्षवेधी सूचना आली होती. त्यापैकीच हा एक प्रकार आहे. यात पुढे असेही म्हटले आहे की, मुख्य वन सरंक्षक (प्रादेशिक), ठाणे यांनी प्रस्तावांतर्गत मागणी क्षेत्र 10 हेक्टर पेक्षा जास्त असल्याने प्रस्तावांतर्गत क्षेत्राची उप वन सरंक्षक, शहापूर व प्रकल्प यंत्रणेच्या प्रतिनिधींसमवेत दिनांक 14.2.2006 रोजी तपासणी केली व सदर प्रस्ताव त्यांनी दिनांक 20.2.2006 रोजी मुख्य वन संरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांच्याकडे पाठविला. हे मी मुद्दामहून निदर्शनास आणून देत आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MAP/ SBT/ पूर्वी श्री.भारवि.... 18:25

श्री.दिवाकर रावते....

महोदय, या ठिकाणी उल्हासनगरच्या संदर्भात मोठा निर्णय झाला. हा विषय देखील तितकाच महत्वाचा आहे. त्यामुळे या विषयी आपण निदेश देणे आवश्यक आहे. तसेच निवेदनामध्ये पुढे असेही नमूद केले आहे की, "मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक 13/1/2006 च्या पत्रान्वये काही मुद्दे उपस्थित करुन, त्यांची पूर्तता करण्यास कळविले आहे. सदर त्रुटींची पूर्तता प्रकल्प यंत्रणेने केल्यानंतर त्यावर शिघ्रगतीने कार्यवाही करुन, प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात आल्या आहेत. याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर तो केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयास मान्यतेसाठी पाठविण्यात येईल व अशी केंद्र शासनाची मंजुरी प्राप्त झाल्यानंतरच पुढील कार्यवाही करण्यात येईल." महोदय, अशी कार्यवाही होत असेल तर 2016 सालापर्यंत हे काम होईल असे वाटत नाही. हा प्रस्ताव नागपूर पासून दिल्लीपर्यंत निरनिराळया मार्गाने गेला आहे. हा मार्ग करण्यामध्ये आपली राजकीय इच्छाशक्ती आहे की नाही हे मला माहीत नाही. सन्माननीय शरद पवारसाहेब यांना या रस्त्यावरुन 3 कि.मी. अंतर चालत जावे लागले होते. त्यामुळे हा रस्ता पूर्ण करण्यामध्ये माननीय मंत्री महोदयांनी आपली राजकीय इच्छाशक्ती दाखवून, त्यांचे वजन वाढवावे. त्यामुळे 15 दिवसांत किंवा एका महिन्यात हा प्रस्ताव तयार करुन, लवकरात लवकर मार्ग पूर्ण करणार आहात काय ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, प्रश्न सविस्तरपणे विचारल्यामुळे उत्तरही सविस्तरपणे देणे आवश्यक आहे. महोदय, यासंदर्भातील प्रस्ताव आमच्याकडे दिनांक 26 डिसेंबर, 2005 रोजी आला. सन्माननीय मंत्री श्री.छगन भुजबळ यांच्यासमवेत माझ्या सहा बैठका झाल्या. या विषयी आम्ही गंभीर आहोत. हे खरे आहे की, महाराष्ट्रामध्ये वन कायद्यामुळे 20-22 वर्षांपासून रस्त्यांची वा अन्य प्रकल्पांची कामे थांबलेली होती. पाझर तलाव, नालाबंडींग, मोठे पाटबंधारे प्रकल्प ही कामे या कायद्यामुळे पडून होती. परंतु जी कामे थांबलेली होती, त्यातील 70 ते 80 टक्के कामे आम्ही मार्गी लावलेली आहेत. 20 वर्षातील हे पहिले उदाहरण आहे की, केवळ 3 महिने आणि 3 दिवसांत वृक्षतोडीसाठी परवानगी देत आहोत. वास्तविक पाहता या अभयारण्याच्या आसपास 10 कि.मी. च्या आत झाडे तोडण्यास परवानगी नाही. सन्माननीय विधानसभा सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी या संदर्भात एक याचिका दाखल केली होती. परंतु आपण पुढे जाऊन, केंद्र सरकारचे किंवा राज्य सरकारचे काम असेल, आणि ज्याला केंद्र

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते...

सरकारने मान्यता दिली असेल तर अशा परिस्थितीत वृक्षतोडीची अट शिथील करण्याबाबत पुढाकार घेतला. दिनांक 15 फेब्रुवारी, 2006 रोजी याबाबतचा निर्णय घेतला. हा निर्णय झाला नसता तर, 25 वर्षे हा विषय सुटला नसता.

महोदय, हा मार्ग पूर्ण करण्याची इच्छाशक्ती महाराष्ट्राची आणि महाराष्ट्र शासनाची आहे. त्यामुळे या रस्त्याचे काम जोरात सुरु झाले आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी निरनिराळया तारखा आल्या आणि गेल्या, मात्र हे काम आहे तसेच पडून आहे असे सांगितले. महोदय, नागपूरला 56 टक्के वन आहे. त्यामुळे त्या ठिकाणी मंत्र्यांचे शिबीर कार्यालय आहे. त्या ठिकाणी प्रत्येक महिन्याच्या पहिल्या-दुसऱ्या आठवडया बसून, प्रश्न सोडविले जातात. अडचणींचा बाऊ न करता यातून पध्दतशीरपणे मार्ग काढला गेला आहे. राज्य सरकारने प्रस्ताव चुकीचा पाठविला, नकाशा चुकीचा पाठविला असेही या ठिकाणी सांगण्यात आले. परंतु मी सांगू इच्छितो की, असे काहीही झालेले नाही. हे काम एका गावातील नाही, तर ठाणे, नाशिक आणि धुळे या जिल्हयांशी संबंधीत हे काम आहे. त्यामुळे त्या गावातील जमिनीच्या संदर्भातील 7/12 चे उतारे एका माणसाला उचलता येणार नाहीत एवढे झाले. तरी सुध्दा तीन महिन्यात हे काम पूर्ण करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम मंत्री महोदयांनी पुढाकार घेतला आहे. त्यांनी आम्हालाही कामाला लावले आणि उत्कृष्ट प्रकारचे काम त्या ठिकाणी सुरु करण्यात आले आहे. ज्या कामाला तीन वर्षे लागली असती ते काम, तीन महिन्यात झाले आहे. या प्रकल्पाच्या संदर्भात काय काय झाले त्याबाबत या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी निवेदनातील काही बाबींचे वाचन केले. परंतु मी सांगू इच्छितो की, केंद्र सरकारकडून प्रस्ताव येण्यापूर्वीच हाय कोर्टाची अडचण दूर केली आणि झाडे तोडण्याचे काम सुरु केलेले आहे.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेख**

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी आपली विशेष उल्लेखाची सूचना मांडावी.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, ज्या विशेष उल्लेखासंबंधी आपण मला परवानगी दिली आहे, ती विशेष उल्लेखाची सूचना मी सभागृहात कालच मांडलेली आहे.

**तालिका सभापती** : ठीक आहे. आता सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांची विशेष उल्लेखाची सूचना आहे, ती त्यांनी मांडावी.

----

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : विकासीतकाराने " कन्व्हेअन्स डीड " अभिहस्तांतरण नाकारणे

**मु.शी.**: विकासीतकाराने " कन्व्हेअन्स डीड " अभिहस्तांतरण नाकारणे याबाबत श्री. मधुकर चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्री. मधुकर चव्हाण ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

" मुंबई शहरातील हजारो सहकारी गृहनिर्माण संस्थांची ( सोसायटींची ) दुरुस्ती किंवा पुनर्बांधणी करण्याची नितांत आवश्यकता आहे, अशा इमारतींमध्ये दिनांक 26 जुलै, 2005 च्या प्रलयंकारी पावसानंतर ती आवश्यकता अधिक प्रकर्षाने जाणवते. परंतु सुमारे 27 हजार गृहनिर्माण संस्थांपैकी किमान 60 टक्के संस्थांचे विकासीतकाराने / बिल्डरने " कन्व्हेअन्स डीड " अभिहस्तांतरण नाकारणे, परिणामत: गृहनिर्माण संस्थांना त्यांच्या इमारतीची पुनर्बांधणी / डागडुजी करण्यासाठी वित्तीय संस्थांकडून अर्थसहाय्य उपलब्ध होऊ शकत नाही, प्रशासकीय यंत्रणेबरोबर संगनमत करुन बिल्डर लॉबी अनेक इमारतींच्या अभिहस्तांतरणाच्या प्रक्रियेत अडथळे निर्माण करते, " महाराष्ट्र मालकी हक्क सदनिका " अधिनियम 1963 ( मोफा ) कायद्यानुसार इमारत बांधून झाल्यानंतर चार महिन्यांच्या आत 60 टक्के सदनिका खरेदीधारकासह गृहनिर्माण संस्था स्थापन करुन न देणे, बंधनकाक असून देखील अभिहस्तांतरण केलेले नसल्यामुळे जमीन ( मालमत्ता ) संस्थेच्या नावावर होऊ शकत नाही, इमारत बांधताना बिल्डर / विकासीतकाराने जमीन मालकाकडून "पॉवर ऑफ ॲटर्नी " व डेव्हलपमेंट राईट्स ॲग्रिमेंट करुन घेणे, परिणामत: कागदोपत्री इमारतीचा मालक हा मूळ मालक असला तरी प्रत्यक्षात आर्थिक व कायदेशीर व्यवहाराचे सर्व अधिकार बिल्डरकडे / विकासितकाराकडे असतात, त्यामुळे गैरमार्गाने चटईक्षेत्र निर्देशांक वाढवून घेतो व त्याचा दुरुपयोग करतो, या सर्व अन्यायकारक गोष्टींवर प्रकाश टाकण्यासाठी, नियंत्रण / अंकूश ठेवायला तसेच मोफा कायद्याची अंमलबजावणी करण्याकरिता

..3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ....

शासनाकडे पुरेशी यंत्रणा नाही, शासनाने या सर्व अन्यायक प्रकारांकडे दुर्लक्ष करुन बिल्डर व विकसीत करणाऱ्यांना मदत करण्याची भूमिका घेणे, परिणामत: गृहनिर्माण संकुलातील सदनिका मालकांच्या मनात या अन्यायक प्रकारांमुळे व मानसिक छळामुळे असुरक्षितेची भावना निर्माण झालेली आहे. सभापती महोदय, हे बिल डिसेंबर, 2005 मध्ये विधानसभेने मंजूर केले आहे, परंतु ते अद्यापपर्यंत विधानपरिषदेत का आले नाही, हे मला कळत नाही.

----

..4

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : जंजिरा किल्ल्याची झालेली दुर्दशा

**मु.शी.**: जंजिरा किल्ल्याची झालेली दुर्दशा याबाबत श्रीमती सुधा जोशी, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्रीमती सुधा जोशी ( नामनियुक्त ) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

" जि. रायगड मधील मुरुड जंजिरा येथील जंजिरा किल्ल्याचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेता, शिवछत्रपतींच्या आठवणींशी व शिवछत्रपतींच्या काळाशी जोडला गेलेला असा हा किल्ला आहे. सदर किल्ल्याची पुरातत्व विभागाकडून पाहिजे तशी देखभाल होत नाही. किल्ल्याची दुर्दशा झालेली आहे. किल्ल्याचे बुरुज तसेच किल्ल्याच्या आतमधील ऐतिहासिक वास्तू नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. सदर किल्ल्याचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेता, नवीन पिढीला इतिहासाच्या स्मृती नीट समाजावून सांगण्याच्या दृष्टीने किल्ल्याची व्यवस्थित निगराणी, देखभाल करणे आवश्यक आहे. या कामासाठी लागणारा पैसा शासन आणि रायगड जिल्हा परिषद यांना खर्च करावा लागणार आहे. अशी तरतूद करणे राज्य शासन / जिल्हा परिषद यांना शक्य नसेल तर पब्लिक / प्रायव्हेट पार्टनरशिप करुन " बांधा, वापरा व हस्तांतरित करा " ( बी.ओ.टी. ) तत्वावर एखाद्या संस्थेकडून असा विकास खर्च करण्यावर शासनाने विचार करावा. ऐतिहासिक स्थळे व वास्तू या प्रत्यक्ष पाहिल्यानंतर इतिहास जवळून अभ्यासल्याचा आनंद होत असतो. या बाबी लक्षात घेता, ऐतिहासिक पर्यटन स्थळ म्हणून जंजिरा या किल्ल्याकडे पाहण्याची आवश्यकता आहे. जेणेकरुन या पर्यटन स्थळाचा विकास करीत असताना, ऐतिहासिक वास्तू जतन करण्याचे श्रेय देखील त्यातून मिळणार आहे व भावी पिढीला विशेषत: विद्यार्थ्यांना आणि त्याहीपुढे जाऊन इतिहासाच्या अभ्यासकांना आनंद देणारा हा किला दुर्लक्षित झालेला आहे. त्याकडे शासनाने लक्ष द्यावे म्हणून मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून विनंती करीत आहे. "

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: पर्वती पुणे येथील झोपडयांना धंदेवाल्यांनी लावलेली आग

**मु.शी.**: पर्वती पुणे येथील झोपडयांना धंदेवाल्यांनी लावलेली आग याबाबत डॉ. नीलम गो-हे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे, यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिलेली आहे त्यांनी ती मांडावी.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

" दिनांक 26 मार्च 2006 रोजी शंकर मंदिर जनता वासाहत, पर्वती पुणे येथील झ ोपडयांना काही बेकायदेशीर धंदेवाल्यांनी आग लावण्यात आल्याबाबतची तक्रार स्थानिक नागरिकांनी स्थानिक पोलिस स्थानकांत नोंदवूनही पोलिसांनी त्यावर कोणतीही कारवाई केली नाही. या वसाहतीत बेकायदेशीर धंदे वाढले असून या ठिकाणी पोलीस चौकी बांधण्याबाबत नागरिकांनी वेळोवेळी मागणी करुनही त्याकडे दुर्लक्ष करण्यात येत असल्याने अशा घटनांमध्ये वाढ होत आहे. याबाबत शासनाने ठोस उपाययोजना करण्याची आवश्यकता असल्याने याबाबत शासनाने निवेदन करावे. "

सभापती महोदय, पुणे शहरातील पर्वती भागातील जनता वसाहतीमध्ये आमचे नगरसवेक राहतात त्यामध्ये श्री. गावडे व श्री. रमेश बोरकर, यांनी अशी माहिती दिली की, दिनांक 26 मार्च 2006 रोजी सदर झोपडपट्टीला आग लागून काही झोपडया जळाल्या आहेत. आम्ही भेट दिली तेव्हा आम्हाला ते दिसून आले आहे. दरवर्षी या भागामध्ये अशा घटना घडतात असे तेथील लोकांनी सांगितले आहे. सदर नागरिकांनी पोलिसांमध्ये तक्रार दाखल केलेली आहे, परंतु पोलिसांनी काहीही चौकशी केलेली नाही. जनता वसाहतीमध्ये पोलीस चौकीसाठी जागा आहे. तेथे पोलीस चौकी आहे, आमच्या संटघनेचे नेते श्री. विश्वास गांगुर्डे यांनी सांगितले की, पोलीस चौकीमध्ये काहीही व्यवस्था नाही, तेथे कर्मचारी नाहीत, त्या पोलीस चौकीसाठी शासनाने कर्मचारी नेमलेले नसल्यामुळे रात्री बेरात्री बेकायदेशीर धंदेवाले झोपडपट्टीला आगी लावतात, अशा प्रकारच्या घटना शंकर मंदिर जनता वसाहतीत घडत आहेत. पर्वती पुणे येथील रामकृष्णबाबा नगर या परिसरामध्ये खूप मोठी झोपडपट्टी वाढलेली आहे. त्यामुळे तेथील नागरिकांच्या सुविधांच्या दृष्टीने जनता वसाहतीमध्ये पोलीस चौकीची व्यवस्था ताबडतोबीने व्हावी अशी या विशेष उल्लेखाच्या निमित्ताने मी विनंती करते. ------ ....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: वेतन पथकाचे संगणकीकरण करणे

**मु.शी.**: वेतन पथकाचे संगणकीकरण करणे याबाबत श्रीमती संजीवनी रायकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे ती त्यांनी मांडावी.

श्रीमती संजीवनी रायकर (मुंबई शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

" सन 1977 पासून माध्यमिक व सन 1996 पासून प्राथमिक शाळांसाठी वेतन पथकाची निर्मिती झाली, त्यावेळी कोल्हापूर विभ्ञागात माध्यमिक शाळांची संख्या 150 ते 175 होती, आज 700 च्या वर शाळा व 8 शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, 14000 चे वर सर्व कामे 4 ते 5 लोक करीत आहेत, दोन्ही वेतन पथकाचे संगणकीकरण केल्यास 7 ते 8 लाख खर्च होईल, काम जलद गतीने होईल, ही संगणकाची मागणी पूर्ण करावी, सदर विषय अत्यंत महत्वाचा असल्याने तो मी आज सभागृहात विशेष उल्लेखाद्वाने उपस्थित करते. "

सभापती महोदय, प्राथमिक व माध्यमिक शाळा कर्मचाऱ्यांना वेतन बँकेमार्फत अदा करण्यासाठी शासनाने वेतन पथकाची निर्मिती केली आहे. प्रत्येक जिल्हयात ती केलेली आहे. सन 1977 पासून माध्यमिक व सन 1996 पासून प्राथमिक शाळेसाठी वेतन पथकाची निर्मिती करण्यात आलेली आहे. कोल्हापूर विभागात 150 ते 175 शाळा होत्या. आज तेथील शाळांची संख्या 400 च्या वर गेलेली आहे. शाळांची संख्या विचारात घेऊन वेतन पथक कार्यालयाला त्या प्रमाणात कर्मचारी दिलेले नाहीत.शाळेसाठी वेतन पथक निर्मिती करुन दरमहा प्रत्येक कर्मचाऱ्याची पेमेंट स्लीप चे काम करावे लागत आहे. तसेच त्यांना रेकॉर्ड ठेवण्याचे सुध्दा काम करावे लागत आहे. शाळेसाठी कर्मचाऱ्यांची संख्या कोल्हापूर विभगात 14000 इतकी आहे, एवढया मोठया कर्मचाऱ्यांचे वेतनाचे काम करण्यासाठी 4 ते 5 लोक असतात. वेतन पथकाची निर्मिती केल्यानंतर त्यांचे संगणकीकरण केल्यास त्यासाठी 7 ते 8 लाख रुपये खर्च येऊ शकतो. संगणकीकरण केल्यास वेतन पथकाचे काम खूप जलद गतीने होईल. एकटया कोल्हापूर विभागाचे संगणकीकरण न करता संपूर्ण महाराष्ट्रातील वेतन पथकांचे संगणकीकरण करावे अशी विंनती मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून करीत आहे.

----------------

.....3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कोतवालांना मिळणारे मासिक मानधन

**मु.शी.**: कोतवालांना मिळणारे मासिक मानधन याबाबत प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.स.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

" महाराष्ट्र राज्यातील कोतवालांना अतिअल्प रुपये 2000 मासिक मानधनात 24 तास काम करावे लागते. इतक्या महागाईच्या काळात मिळणाऱ्या अल्प मिळकतीवर संपूर्ण कुटुंबाचे उदरनिर्वाह करणे अत्यंत कठीण असून त्यांना संवानिवृत्तीनंतर उदरनिर्वाहाचे साधन राहत नाही,..

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे...

सेवानिवृत्तीनंतर उदरनिर्वाहाचे दुसरे कोणतेही साधन राहात नाही. त्यांच्या वारसांना कोतवाल पदी सेवानियुक्तीची हमी नसल्यामुळे तसेच अनुकंपा धर्तीवर त्यांची नेमणूक होत नसल्यामुळे शासकीय सेवा करीत असतांना कोतवालांना अत्यंत दयणीय अवस्थेमध्ये जीवन जगावे लागत आहे. महाराष्ट्र सरकारने कोतवालांच्या प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी विधानसभेचे माजी उपाध्यक्ष श्री. अे.जी. पवार यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत केली होती. त्या समितीने आपला अहवाल दिनांक 1 फेब्रुवारी 1980 रोजी शासनाला सादर केला होता. त्या अहवालामध्ये केलेल्या शिफारशींमध्ये कोतवालांना पूर्ण वेळ शासकीय नोकर समजून त्यांना चतुर्थ श्रेणीचा दर्जा देऊन त्यांची वेतन निश्चिती करण्याची शिफारस केली होती. सभापती महोदय, गुजरात आणि त्रिपुरा या राज्यांमध्ये कोतवालांना चतुर्थ श्रेणीचा दर्जा देण्यात आला आहे. त्यामुळे शासकीय सेवा करणाऱ्या कोतवालांना चतुर्थ श्रेणीचा दर्जा देण्याबाबत त्यांची अनेक वर्षापासून मागणी आहे. त्याचप्रमाणे सेवानिवृत्त झ ालेल्या कोतवालांना पेन्शन योजनेचा लाभ मिळावा अशीही त्यांची मागणी आहे. त्याचप्रमाणे ज्या कोतवालांच्या जागा रिकाम्या आहेत त्या त्वरीत भरण्यात याव्यात. रिक्त झालेल्या पदांवर कोतवालांच्या वारसदारांना नेमण्यात यावे, ती पदे त्यांनाच देण्यात यावीत. अशाप्रकारे कोतवालांच्या विविध प्रश्नाच्या संदर्भात शासनाने त्वरीत कारवाई करुन राज्यातील हजारो कोतवालांना न्याय मिळवून द्यावा अशी या विशेष उल्लेखाव्दारे आग्रहाची मागणी करीत आहे.

श्री. रमेश निकोसे : सभापती महोदय, गेल्या अनेक वर्षापासून कोतवालांचा प्रश्न भिजत पडून राहिला आहे. त्यांना वाढीव मानधन दिले पाहिजे, त्यांना शासकीय सेवेमध्ये सामावून घेण्यात आले पाहिजे, त्यांना चतुर्थ श्रेणीच्या दर्जाप्रमाणे वेतन मिळाले पाहिजे. हे प्रश्न शासनाने तात्काळ सोडविले पाहिजेत यासाठी माननीय सदस्य प्रा. कवाडे सरांनी मांडलेल्या विशेष उल्लेखाला मी समर्थन देतो.

**तालिका सभापती (श्री. गुरुनाथ कुलकर्णी)** : विशेष उल्लेखाव्दारे मांडण्यात येणारा विषय हा मर्यादीत स्वरुपामध्ये असतो, तो विषय माननीय सदस्य वाचून दाखवीत असतात. त्यावर इतर माननीय सदस्यांनी भावनावश होऊन समर्थन देण्याची पध्दत नाही. त्यामुळे माननीय सदस्यांचे फक्त विशेष उल्लेखाचे भाषण रेकॉर्ड केले जाईल.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**शासकीय विधेयकांसंबंधी**

**तालिका सभापती** : आता शासकीय विधेयकांवर चर्चा होईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आता संध्याकाळचे पावणे सात वाजले आहेत. कामकाज पत्रिकेमध्ये एकूण 5 विधेयके दाखविण्यात आली आहेत.कामकाज सल्लागार समितीमध्ये ठरल्याप्रमाणे रोज 2 विधेयके चर्चेसाठी घ्यावयाची आहेत. विनियोजन विधेयक चर्चेसाठी आले तर 3 विधेयके होतील. त्यानंतर कोकणच्या प्रश्नासंबंधीच्या प्रस्तावावर चर्चा करावयाची आहे. तेव्हा आपण 2 विधेयके घेऊन त्यानंतर कोकणचा प्रस्ताव चर्चेकरिता घ्यावा. सभागृहामध्ये माननीय सदस्यांची कमी उपस्थिती असल्यामुळे निरोप समारंभाचा कार्यक्रम अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी प्रश्नोत्तरांचा तास संपल्यानंतर लगेच घेण्यात यावा.

**तालिका सभापती** : विनियोजन विधेयक चर्चेशिवाय संमत करण्यात येणार आहे. त्यानंतर दाखविण्यात आलेल्या विधेयकांपैकी दोन विधेयके घेण्यात येतील. मंत्रिमहोदयांनी विधेयक मांडावे अशी मी त्यांना विनंती करतो.

---

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी**: : सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक.

**L.C. BILL NO.XV OF 2006.**

**(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA CO-OPERATIVE SOCIETIES ACT, 1960.)**

श्री.जयप्रकाश दांडेगावकर (सहकार राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी सन 2006 चे वि.प.वि.क्रमांक 15 - महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 (1961 चा महा.24) याच्या कलम 101 मध्ये निबंधकास, सहकारी संस्थेची देय असलेली रक्कम प्रमाणपत्रामध्ये नमूद करुन त्या रकमेच्या वसुलीसाठी एक प्रमाणपत्र देण्याचा अधिकार प्रदान केला आहे. त्यानंतर, अशी प्रमाणित केलेली देय रक्कम जमीन महसुलाच्या वसुलीकरिता त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कायद्यानुसार वसुलीयोग्य असेल. ज्या रीतीने चौकशी करावयाची त्या रीतीसंबंधी अधिनियमामध्ये कोणतीही तरतूद नाही. त्यामुळे, निबंधक कलम 101 अन्वये, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, वसुलीसाठी प्रमाणपत्र देतो. असे प्रमाणपत्र देताना, निबंधकाने अनुसरावयाच्या कार्यपध्दतीमध्ये एकरुपता, पारदर्शकता व सुस्पष्टता आणण्यासाठी तसेच या कार्यपध्दतीमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी, कलम 101 अन्वये, वसुलीसाठी प्रमाणपत्र देण्याकरिता निबंधकाने ज्या रीतीने चौकशी करावयाची ती रीत, असे प्रमाणपत्र देण्याकरिता करावयाच्या अर्जाचा नमुना व कार्यपध्दती, आणि त्यासोबत द्यावयाची फी व जोडावयाचे दस्तऐवज, नियमांद्वारे, विहित करण्याचा अधिकार राज्य शासनाकडे घेण्यासाठी, उक्त अधिनियमात योग्य त्या सुधारणा करणे महाराष्ट्र शासनास इष्ट वाटते. यामध्ये प्रोसिजर ले डाऊन केलेले आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ KGS/

श्री.पांडुरंग फुंडकर (पुढे सुरु......

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेता) : महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 यात आणखी सुधारणा करण्यसाठी विधेयक क्रमांक 15 आणलेले आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 याच्या कलम 101 मध्ये निबंधकास, सहकारी संस्थेची देय असलेली रक्कम प्रमाणपत्रामध्ये नमूद करुन त्या रकमेच्या वसुलीसाठी एक प्रमाणपत्र देण्सयाचा अधिकार प्रदान केला आहे" असे उद्देश व कारणामध्ये निवेदन केलेले आहे.

सभापती महोदय, आता जी प्रचलित पध्दती आहे, त्या प्रचलित पध्दतीमध्येसुध्दा निबंधकास काही अधिकार आहेत. अर्बन बँका, जिल्हा बँका याची वसुलीची पध्दती आहे. त्या वसुलीच्या पध्दतीमध्ये रिकव्हरी ऑफीसरने कोणत्याही प्रकरणामध्ये प्रमाणपत्राविषयी निबंधकास विनंती करण्याबाबत अभिप्रेत आहे. हे कशासाठी हे केलेले आहे? प्रमाणपत्र कोणी कोणाला देणार आहे ? प्रमाणपत्राची मागणी कोण करणार आहे ? संस्था तशी मागणी करणार आहे की, जिल्हा उपनिबंधक त्या संस्थेला देणार आहे. कर्जदार असतील त्यांच्याबाबतीत प्रमाणपत्र दिल्यानंतर तीन महिन्याच्या मुदतीमध्ये रिकव्हरी करावयाची. त्यामध्ये जिल्हा उपनिबंधकाचा अधिकार आहे. वसुली करण्याचा अधिकार हा बँकेच्या रिकव्हरी ऑफीसरकडे आहे.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

कलम 101 च्या माध्यमातून जे अधिकार दिलेले आहेत त्यामध्ये हे प्रमाणपत्र संस्थेला देणार की, रिक्व्हरी ऑफीसरला देणार याबाबत स्पष्टता केली तर अधिक चांगले होईल. एवढे बोलून मी माझे भाषण संपवतो.

-----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. शरद पाटील ( पुणे विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 यात आणखी सुधारणा करण्यासाठी माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी विधेयक मांडलेले आहे. या विधेयकाव्दारे सध्या या अधिनियमातील कलम 101 मध्ये काही सुधारणा करण्याचा प्रस्ताव शासनाने आणलेला आहे. वास्तविक पाहता हे विधेयक मांडण्यासंबंधीच्या उद्देश व कारणामध्ये माननीय मंत्रिमहोदयांनी असे सांगितले आहे की, "त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, वसुलीसाठी प्रमाणपत्र देतो. असे प्रमाणपत्र देताना, निबंधकाने अनुसरावयाच्या कार्यपध्दतीमध्ये एकरुपता, पारदर्शकता व सुस्पष्टता आणण्यासाठी तसेच या कार्यपध्दतीमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी, कलम 101 अन्वये, वसुलीसाठी प्रमाणपत्र देण्याकरिता निबंधकाने ज्या रीतीने चौकशी करावयाची ती रीत, असे प्रमाणपत्र देण्याकरिता करावयाच्या अर्जाचा नमुना व कार्यपध्दती, आणि त्यासोबत द्यावयाची फी व जोडावयाचे दस्तऐवज, नियमांव्दारे, विहित करण्याचा अधिकार राज्य शासनाकडे घेण्यासाठी, उक्त अधिनियमात योग्य त्या सुधारणा करणे महाराष्ट्र शासनास इष्ट वाटले. यासाठी हे विधेयक आणलेले आहे. गेली अनेक वर्षे सहकारी बँका, सहकारी पतसंस्था आणि इतर सहकारी संस्थांना आपल्या येणे असलेल्या रकमेच्या वसुलीसाठी कलम 101 चा चांगला उपयोग झालेला आहे. सहकारी कायद्यामध्ये कलम 101 च्या व्यवस्थेमार्फत या संस्थांची येणे असलेली रक्कम त्वरित आणि जलदगतीने वसूल करण्याची सोय करण्यात आलेली आहे. सध्या ज्या कार्यपध्दतीचा अवलंब निबंधक करतात ती कार्यपध्दती सोपी आणि सुटसुटीत आहे. सहकारी संस्थांना आपल्या कर्जदाराकडून किंवा सभासदाकडून येणे असलेल्या रकमेच्या वसुलीसाठी कलम 101 खाली निबंधकाकडे अर्ज करण्यापूर्वी येणे असलेल्या कर्जदाराला नोटीस देण्याची अट आहे. ही नोटीस दिल्यानंतर त्याला योग्य तो प्रतिसाद मिळाला नही तर त्या संस्थेने आपल्या संचालक मंडळाचा ठराव करुन 101 कलमाखाली सहकारी उपनिबंधकाकडे किंवा निबंधकाकडे दावा दाखल करण्याची तरतूद आहे. हा दावा दाखल करताना कोर्ट फी किती द्यावी ? सुनावणी फी किती द्यावी ? याची तरतूद सध्याच्या व्यवस्थेमध्ये आहे. कोणकोणती कागदपत्रे आपल्या दावा दर्जाबरोबर सादर केली पाहिजेत याचीही तरतूद जिल्हा उपनिबंधकाकडून करण्यात येत असते. या सर्व बाबींची पूर्तता केल्यानंतर उपनिबंधक प्रतिवादीला नोटीस काढतात.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/

प्रा. शरद पाटील .....

त्याचे म्हणणे ऐकून घेतात आणि दोन्ही बाजूचे म्हणणे एकून घेतल्यानंतर पुरावे विचारात घेऊन निर्णय देत असतात. ही जी अवलंबण्यात येणारी कार्यपध्दती आहे ती योग्य असल्यामुळे त्यामध्ये बदल करण्याचा किंवा ते अधिकार शासनाकडे घेण्याची गरज शासनाला का वाटली ? हे कळत नाही. माननीय मंत्रिमहोदयांनी एक जो उद्देश डोळ्यासमोर ठेवला आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. तीन महिन्यामध्ये उपनिबंधकांनी आपला त्यासंबंधीचा निकाल द्यावा ही तरतूद योग्य आहे. परंतु सध्या असलेली कार्यपध्दती ही लवकरात लवकर दावा निकाली काढण्यासाठी योग्य असल्यामुळे त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करु नये. सध्या असलेल्या कार्यपध्दतीनुसार सहकारी संस्थांचे येणे असलेली रक्कम वसूल करण्यासाठी ही व्यवस्था अशीच ठेवावी अशी मी या निमित्ताने मागणी करतो. माननीय मंत्रिमहोदयांनी या विधेयकाच्या माध्यमातून जे अधिकार आपल्याकडे घेण्याचा प्रस्ताव आणलेला आहे त्या प्रस्तावाला मी विरोध करतो आणि माझे भाषण संपवितो.

----

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 18:55

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : मी मध्येच थोडे इंटरप्ट करु इच्छितो. निंबधकाला 101 चे प्रमाणपत्र देण्याचे अधिकार आहेत. न्यायालयमध्ये केसस गेल्यानंतर याबाबतीत प्रोसिजर काय आहे अशी विचार करण्यात आल्यामुळे हे प्रोसिजर लेड डाऊन केलेले आहे. या व्यतिरिक्त या कायद्यामध्ये कोणताही बदल नाही.

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2006 चे वि.प.वि.क्रमांक 15, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 यात आणखी सुधारणा करण्यासाठी जे विधेयक याठिकाणी मांडण्यात आलेले आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. या विधेयकाच्या संपूर्ण विवरणामध्ये असे म्हटलेले आहे की, "पिकांसाठी वित्त व्यवस्था व हंगामी वित्त व्यवस्था करण्याचे काम हाती घेतलेल्या किंवा अठरा महिन्यांपेक्षा कमी नसेल आणि पाच वर्षापेक्षा अधिक नसेल, अशा मुदतीमध्ये परतफेड करण्याजोगी, शेतीच्या इतर प्रयोजनांसाठी कर्जे देणा-या साधन संस्थेने आपल्या सदस्यांना पिकांसाठी केलेली वित्त व्यवस्था किंवा हंगामी वित्त व्यवथा यासाठी किंवा पूर्वोक्तप्रमाणे शेतीच्या इतर प्रयोजनासाठी आगाऊ दिलेल्या कोणत्याही रकमेच्या थकबाकी वसुलीसाठी अर्ज केल्यावर किंवा पीक संरक्षण संस्थेने आपल्या सदस्यांकडून किंवा ज्यांनी सदस्य होण्यास नकार दिला असेल अशा प्रस्तावात समाविष्ट असलेल्या जमिनीच्या मालकांकडून देय असेल अशा प्रारंभिक खर्चाच्या किंवा पीक संरक्षणासाठी आवश्यक असलेल्या सेवा मिळविण्यासाठीच्या कोणत्याही अंशदानाच्या वसुलीसाठी अर्ज केल्यावर किंवा उध्दरण सिंचन सहकारी संस्थेने आपल्या सदस्यांकडून त्यांना पाणी पुरविण्यासाठी आवश्यक असलेल्या सेवा त्यांनी मिळविल्याबद्दल देय असलेल्या कोणत्याही वर्गणीच्या थकबाकीच्या वुसलीसाठी अर्ज केल्यावर, किंवा तालुका किंवा गटपातळीवरील कारागिरांना कर्ज देणा-या किंवा त्यांच्यासाठी रोख पत-पुरवठ्यांची सोय करणा-या ग्रामीण कारागीर बहुउद्देशीय संस्थेने आपल्या येणे रकमांच्या थकबाकीच्या वसुलीसाठी किंवा सहकारी गृहनिर्माण संस्थेने तिच्या येणे असलेल्या रकमांच्या थकबाकीच्या वसुलीसाठी किंवा कर्ज देणा-या एखाद्या सहकारी दुग्ध व्यवसाय संस्थेने तिच्या कोणत्याही सदस्याला दिलेल्या रकमेच्या थकबाकीच्या वसुलीसाठी किंवा एखाद्या नागरी सहकारी बँकेने तिच्या येणे रकमांच्या थकबाकीच्या वुसलींसाठी किंवा एखाद्या वेतनधारीच्या सहकारी संस्थेने तिच्या येणे रकमांच्या थकबाकीच्या वसुलीसाठी किंवा एखाद्या सहकारी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2..

(श्री. दिवाकर रावते पुढे सुरु....)

मत्स्यव्यवसाय संस्थेने तिच्या येणे रकमांच्या वसुलीसाठी किंवा राज्य शासन, वेळोवेळी राजपत्रात अधिसूचित करील अशा कोणत्याही संस्थेने किंवा संस्थावर्गाने अशा प्रकारे अधिसूचीत केलेल्या संस्थेच्या किंवा संस्थावर्गाच्या सदस्यांना दिलेल्या कोणत्याही आगाऊ रकमेच्या, किंवा त्यांच्याकडून येणे असलेल्या कोणे्त्याही वर्गणीच्या किंवा अन्य कोणत्याही रकमेच्या वसुलीसाठी अर्ज केल्यावर आणि संबंधित सहकारी संस्थेने थकबाकीच्या संबंधातील लेख्यांचे विवरणपत्र सादर केल्यावर निबंधकास, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर त्यात थकबाकी म्हणून देय असल्याचे नमूद केलेल्या रकमांच्या वसुलीसाठी एक प्रमाणपत्र देता येईल". अशा प्रकराचा मूळ कायदा आहे. या कायद्यामध्ये आपण बदल करु इच्छित आहात. खंड 2 मध्ये असे म्हटलेले आहे की, "कलम 101 मध्ये सुधारणा करुन, कलम 101 अन्वये वसुलीसाठी प्रमाणपत्र देण्याकरिता निबंधकाने ज्या रीतीने चौकशी करावयाची ती रीत..." याठिकाणी प्रोसिजरचा प्रश्न आला.

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MHM/ श्री. शिगम नंतर 19:00

श्री. दिवाकर रावते....

असे प्रमाणपत्र देण्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना याबाबत श्री.पाटील साहेब सांगत होते की, कोणता पेपर असावा,कोणते कागदपत्र असावेत,स्टॅम्प फी किती असावी हे सर्व ठरलेले आहे. त्यासाठी फी वसूल करण्याचे अधिकार राज्य शासनाकडे घेण्यात आलेले आहेत. निबंधक यांना जे अधिकार आहेत ते राज्य शासन आपल्याकडे घेणार आहे अशा प्रकारचे वर्डींग यामध्ये दिसून येते. निबंधक म्हणजे राज्य शासन होऊ शकत नाही. त्यामुळे आमच्या मनामध्ये शंका उपस्थित होऊ लागली आहे. पुढील खंडामध्ये म्हणजे खंड तीन मध्ये म्हटले आहे की, "महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम,1960 याच्या कलम 165 मध्ये सुधारणा करुन,कलम 101 अन्वये वसूलीसाठी प्रमाणपत्र देण्याकरिता निबंधकाने ज्या रीतीने चौकशी करावयाची ती रीत,असे प्रमाणपत्र देण्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना व त्याची कार्यपध्दती आणि त्यासोबत द्यावयाची फी व जोडावयाचे दस्तऐवज विहित करण्याचा अधिकार राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे". शासनाने हे बिल कशासाठी आणले आहे ते सांगितले आहे. त्यातील उद्दिष्ट आणि कारणे वाचून दाखविण्यात आली. त्यासाठी हे शब्द अंडरलाईन केलेले आहेत. राज्य शासन हे अधिकार घेणार आहे तो माझ्या दृष्टीने महत्वाचा मुद्दा आहे. एकतर राज्यामध्ये कर्जाने शेतकरी पीडला आहे आणि तो आत्महत्या करीत आहे. संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्था शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणामुळे खिळखिळी झाली आहे. शेतमजुरांच्या दुर्देशेमुळे शेती उत्पादन करणाऱ्या मजुरापेक्षाही हलाकीचे जीवन तो जगत आहे. शेतीमालाला देण्यात आलेले भाव हा तर चर्चेचा विषय आहे. नापिकीमुळे उत्पादन मिळत नाही आणि शेतकऱ्याच्या डोक्यावरील कर्ज वाढत आहे. शेतकऱ्याला कर्जाच्या खाईतून बाहेर काढण्याकरिता शासनाचे धोरण काय राहील हे या चर्चेच्या निमित्ताने महत्वाचे आहे. शेतकऱ्यांना 6 टक्के कर्ज देण्याचे तुणतुणे राज्य शासन सतत वाजवीत आहे. ते सुध्दा खरीप हंगामापुरते 6 टक्के दराने कर्ज देणार असे शासन म्हणते आहे. रब्बी हंगामाचे काय करणार त्याबद्दल शासन काही म्हणत नाही. कालच्या चर्चेनंतर असे लक्षात आले की शेतकऱ्याला कर्जातून मुक्त करण्याच्या दृष्टीने कोणतेही ठोस पाऊल शासनाने उचललेले दिसत नाही. माननीय सदस्य श्री. जयंत पाटील या बिलावर बोलणार आहेत. ज्या ज्या वेळी शेतकऱ्यांचे प्रश्न आम्ही उपस्थित करतो त्या त्या वेळी आम्ही मागणी करतो की शेतकऱ्याला कर्जातून रिलीफ द्या. किमान व्याजातून त्याला रिलीफ द्या असे म्हणतो. कालच्या चर्चेच्या निमित्ताने मी माननीय सदस्य श्री. विलासराव शिंदे यांना धन्यवाद

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MHM/ श्री. शिगम नंतर 19:00

श्री. दिवाकर रावते ....

देईन. मूलभूत संकल्पना ठरलेली आहे. मंत्र्यांची भूमिका आणि अधिकाऱ्यांची भूमिका नकारात्मक असते. अधिकाऱ्यांचे हात बांधलेले असतात. कर्जाच्या बाबतीत कोणताही विषय काढला की नाबार्ड आणि रिझर्व्ह बँक यांचा उल्लेख केला जातो. काल देखील काही उदाहरणे आमच्यासमोर आली. माननीय राज्यमंत्र्यांच्या कमिटमेंटबद्दल प्रश्नच नाही. पण आजूबाजूला जी प्रशासकीय बंधने आहेत त्यावर नियंत्रण नसेल तर 100 टक्के वाद निर्माण होतात.

नंतर भारवि

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

काल असे लक्षात आले की, शेतकऱ्याने दहा ते पंधरा हजार रुपये घेतलेले कर्ज तीन लाखापर्यंत गेले. मी आपल्याला 2-3 उदाहरणे द्यायला तयार आहे. नॅशनल बँकेने 1600 कोटी रुपयांचे कर्ज दिले होते. त्यापैकी जवळ जवळ 1000कोटी रुपयाचे कर्ज माफ केले.....

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे बिलावर बोलत आहेत काय ?

श्री.दिवाकर रावते : होय. मी बिलावरच बोलत आहे. कोणाचे कर्ज क्लिअर करायचे हा मुख्य मुद्दा आहे. वसुलीसाठी प्रमाणपत्राचा अधिकार दिल्यानंतर रिकव्हरी सुरू होणार आहे. या बिलामध्ये म्हटले आहे की, राज्य शासनाने अधिकार आता स्वत:कडे घेतले आहेत. अशाने शेतकऱ्यांची सुटका कशी काय होईल ? आज नाबार्डच्या अडचणी आहेत. राष्ट्रीय बँक वन टाईम सेटलमेंट करून कर्ज माफ करते. परंतु, शेतकऱ्यांना पतपुरवठा करणाऱ्या सहकारी बँकांवर एवढी बंधने आहेत की त्याबद्दल काही विचारू नका. मी व्याजाबद्दल तर काहीच बोलणार नाही. कारण व्याज हे नंतर हळूहळू मोठया प्रमाणावर वाढत जाते. वसुलीसाठी प्रमाणपत्र देण्याचा अधिकार दिल्यानंतर वन टाईम सेटलमेंट होणार आहे काय ? श्री.पाटील साहेब आपण ग्रामीण भागात राहणारे आहात. वसुलीसाठी शेतकऱ्यांच्या घरावर जप्ती आल्यानंतर त्याच्या घरातील भांडी-कुंडी बाहेर काढली जातात. तेव्हाची त्याची परिस्थिती अत्यंत बिकट असते. जेव्हा अशी कारवाई थांबविण्यासाठी तुमच्या आमच्या सारखा कार्यकर्ता अधिकाऱ्यांपुढे जातो, तेव्हा शासकीय कामकाजामध्ये अडथळा आणल्याचा खटला भरला जातो. यात अधिकारी चूक करतात असे मी म्हणणार नाही. कारण तो त्यांच्या कामाचा एक भाग असतो. असे जरी असले तरी नापीकीमध्ये सापडलेल्या महाराष्ट्रातील शेतकऱ्याला आधारकसा देता येईल हा सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे. या बिलाच्या माध्यमातून पारदर्शकता येणार आहे असे नमूद करण्यात आले आहे. या बिलाच्या माध्यमातून वसुलीसाठी एक प्रमाणपत्र देण्याचा अधिकार प्रदान करण्यात आला आहे. म्हणजे शेतकऱ्यांकडून वसुली करण्यासाठी त्यांच्या पाठिमागे दंडुका लावण्याचा प्रयत्न या बिलाच्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

माध्यमातून करण्यात आलेला आहे. येथे एक प्रश्न वारंवार मांडला जाते. त्याचे उत्तर माननीय सहकार मंत्र्यांकडून दिले जात नाही. एखादी मोठी गाडी 25 लाखाची गाडी घ्यायची असेल तर त्यासाठी 6 टक्के दराने व्याज महाराष्ट्रात सहज उपलब्ध होते. शेतकऱ्यांना मात्र 15 ते 16 टक्क्यांनी कर्ज घ्यावे लागते. या प्रश्नाचे उत्तर मला आता पर्यंत कधीच मिळू शकलेले नाही. वसुलीसाठी प्रमाणपत्र देण्याचा अधिकार प्रदान करण्यात येणार असल्यामुळे आता शेतकऱ्यांच्या मागे वसुलीचे शुक्लकाष्ट लागणार आहे. वन टाईम सेटलमेंटसंबंधीचे शासनाचे धोरण काय असावे यासंबंधी काल माननीय सभापतींच्या दालनात बैठक झाली होती.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

शेतकऱ्यांच्या कर्जाचे वन टाईम सेटलमेंट होणार आहे की नाही ? महोदय, महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील कास्तकारांच्या अनेक व्यथा आहेत. विदर्भ, मराठवाडा, खानदेश मध्ये देखील शेतकऱ्यांच्या अनेक व्यथा आहेत. कोकणामध्ये आंबा पिकाची नासाडी झाल्यामुळे या व्यथा त्या भागात देखील जाणार आहेत. उध्वस्त झालेल्या शेतीमधून कोणतेही उत्पादन ज्यावेळी येणार नाही, तेव्हा ही व्यथा त्या भागात सुध्दा जाणवणार आहे.

महोदय, या विधेयकाच्या माध्यमातून सरकारने वसुली पत्र देण्याचे अधिकार घेतल्यामुळे, शासन या संदर्भात कोणते धोरण आखणार आहे ? वन टाईम सेटलमेंटसाठी कोणते धोरण सांगणार आहात ? कालच्या बैठकीत याबाबत चर्चा झाली. त्यामध्ये ठरले की, 25-75 टक्के जी काही रक्कम येईल ती घ्यावी. कारण असे झाले तर सरकारचा डुबणारा पैसा वसूल होईल आणि कास्तकारही आपल्या कर्जातून सुटतील. त्यामुळे या वसुली पत्रासंदर्भात शेतकऱ्यांना माहिती होणे आवश्यक आहे. हमीपत्र घेऊन खटले चालतील. परंतु त्यातून शेतकऱ्यांची सुटका कशी होईल हे देखील पाहणे आवश्यक आहे. माझ्यामते असे केल्याने ही सुटका होऊ शकणार नाही. त्यामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी सहकार विभागाच्या माध्यमातून आपण कोणते धोरण देणार आहात ? काल परवा सन्माननीय मंत्री महोदय श्री.अजित पवार यांनी उल्लेख केला होता की... (अडथळा) मंत्री महोदय, आपण माननीय अजितदादांना घाबरता काय ? ते तुम्हाला दम देतात काय ? असो.

महोदय, सरकारच्या माध्यमातून सामान्य कास्तकारांच्या घरादारावर नागर फिरवून, त्यांच्या घरातील सोफे-भांडी बाहेर काढली जाते. परंतु सहकार क्षेत्रातील ज्या मंडळीकडून लाखो-करोडो रुपयांची वसुली होणे बाकी आहे त्यांच्याकडून आपण वसुली करणार आहात काय ? मंत्री महोदय, आपल्याच जिल्हयात 36 कोटी रुपयांची वसुली कोणावर आहे ? हे तुम्हाला-मला माहीत आहे. मी नोटीस दिली नसल्यामुळे त्या नावाबाबत उल्लेख करणार नाही. या संदर्भात दस्ताऐवज पूर्ण झाले आहे. या प्रकरणातील एका व्यक्तीने आत्महत्या सुध्दा केली आहे. महोदय, ही केस पूर्ण झाली आणि संबंधितांनी हायकोर्टामध्ये स्टे घेतला आहे. माननीय मुख्यमंत्र्यांचे आडनाव बंधू असल्यामुळे, त्यातून ते बाहेर निघाले. 5 कोटी 62 लाख रुपये घेतल्याचे सिध्द झाल्यामुळे या प्रकरणी गुन्हा दाखल झाला. परंतु सत्ताबदल झाल्यामुळे गुन्हा कोठे गेला माहीत नाही. परंतु

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

केंद्रीय मंत्री म्हणून बसण्याचा मान मिळाला. औरंगाबाद बेंचने जालन्याच्या महान व्यक्तीच्या संदर्भात निर्णय दिला आहे. त्यामुळे त्याच्याकडील 36 कोटी रुपये वसूल झाले. परंतु माननीय मंत्री महोदय, आपल्या जिल्हयातील वसुली होत नाही. गोरगरीब शेतकऱ्यांचे वसुलीपत्र मिळाल्यानंतर, अशा परिस्थितीत ते हतबल असतात, त्यांच्यामागे पाठबळ नसते.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

सभापती महोदय, आपण अशा माणसांकडून वसुली केव्हा करणार आहात ? शेतकरी उद्ध्वस्त होत असल्याबाबतची मी आपल्याला 2-3 उदाहरणे सांगितली. या ठिकाणी मी कोणाचीही नावे घेत नाही, नागपूरपर्यंत जात नाही. तुम्ही त्यांचे काय केले ? कोणती वसुलीपत्रके काढली ? कायद्याचे नियम बदलत असताना, आपण कायद्याचा विचार केला काय ? किती प्रभावीपणे केला ? सभापती महोदय, सहकारी क्षेत्र बुडवणाऱ्यांची वसुली आपण केव्हा करणार आहात ? याचा लेखाजोखा आपण कधी देणार आहात ? माननीय मंत्रिमहोदय डॉ. सुनील देशमुखसाहेब इकडे कौतुकाने पाहत आहेत. परंतु मी त्यांना सांगेन की, अमरावतीमध्ये देखील हीच परिस्थिती झालेली आहे. तुमच्याशी याचा काहीही संबंध नाही. सभापती महोदय, ही व्यथा आहे. सहकार क्षेत्र प्रगत असले तरी ते देखील फार मोठे आहेत. या गोष्टींचा कधी पंचनामा होणार आहे की नाही ? या कायद्याच्या माध्यमातून गरीब शेतकरी उद्ध्वस्त होत आहेत. त्यांच्या वसुलीचे धोरण काय आहे ? सहा टक्के व्याज दराने शेतकऱ्यांना कर्ज मिळणार आहे का ? त्या कर्जासंदर्भात कोणता निर्णय घेतला जाणार आहे ? सभापती महोदय, मराठवाडा व विदर्भातील शेतकऱ्यांच्या जीवनमरणाचा हा प्रश्न आहे. हा प्रश्न बि-बीयाणे खरेदी करताना निर्माण होणार आहे. सभापती महोदय, यापुढे बँका कर्ज वसुलीचे प्रमाणपत्र घेऊनच कर्ज देणार आहेत. त्याशिवाय बँका कर्ज देणार नसतील तर भीषण आत्महत्यांना समोरे जावे लागेल. सरकारचे धोरण शेतकऱ्यांचे जीवन उद्ध्वस्त करणार आहे. माननीय मंत्रिमहोदय श्री. पतंगराव कदम हिंमतीने बोलत आहेत. क्रांतिकारी निर्णय घेण्याचे स्वप्न आम्हाला दाखवत आहेत. हा निर्णय आपण कधी घेणार आहात ? आम्ही त्या निर्णयाची वाट पाहत आहोत. सभापती महोदय, कोंबड्या मारत आहेत, पक्षी मोजत असहेत आणि अनुदान दिले जात आहे. चांगले चालले आहे. इतक्या झटपट कसा काय घेतला जात आहे ? सहकाराच्या माध्यमातून पोल्ट्री व्यावसायिकांनी घेतलेल्या कर्जाची वसुली आपण कशी करणार आहात ? त्यावेळी हे लोक लाखो-करोडोंनी पैसे कमावित होते, नफा कमावित होते. सभापती महोदय, या ठिकाणी शेतकऱ्यांच्या वसुलीसंदर्भात चर्चा उपस्थित करावी लागते. आता 25 रुपये अनुदान देण्यात येईल, असा निर्णय घेतला जाईल. पोल्ट्रीसंदर्भात झटपट निर्णय

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

घेतले जातात. परंतु इतर बाबतीत अर्थखात्याचा पेन हालत नाही. सभापती महोदय, यामध्ये कोणकोण इन्व्हॉल्व्ह होते, कोणाच्या पोल्ट्री होत्या, त्यामधून कोणाला लाभ झाला हा संशोधनाचा विषय झाला आहे. बर्ड फ्ल्यूवाल्यांना मदत देण्याविषयी आमचे काही दुमत नाही. सभापती महोदय, केंद्रीय कृषीमंत्री श्री. शरद पवार कोंबड्या खाण्याबाबत सांगतात आणि हे कोंबडया मारण्याबाबत सांगतात. या ठिकाणी काय चालले आहे हेच समजत नाही. वसुली प्रमाणपत्र देण्यासंदर्भात आम्ही या ठिकाणी अनेक विषय मांडलेले आहेत. वेगवेगळ्या जिल्ह्याप्रमाणे वेगवेगळे वसुलीचे विषय आहेत.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

तरी सुध्दा या विधेयकातून शेतकऱ्यांना कोणता दिलासा मिळणार आहे असा माझा प्रश्न आहे. या विधेयकाच्या माध्यमातून सरकारकडे आलेले अधिकार त्यांचे स्पष्टीकरण नीट व्हावयास पाहिजे, अन्यथा राज्यमंत्री किंवा मंत्र्यांनी अडथळे आणून आर्थिक वसूलीचे प्रमाणपत्र येथे बसून देणे हे योग्य होणार नाही. असे होता कामा नये, या विधेयकांच्या माध्यमातून अनेक गोष्टी मी येथे मांडलेल्या आहेत, याबाबत मंत्री महोदयांनी निर्णय घ्यावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

----------------

......2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, या विधेयकाच्या उद्देश व कारणामधून असे स्पष्ट झालेले आहे की, खूप मोठा गोंधळ सहकार खात्यामध्ये झालेला आहे. प्रमाणपत्र देण्याचे त्यांनी कबूल केलेले आहे. या विधेयकाच्या पान क्रमांक 3 वरील दुसऱ्या परिच्छेदात असे म्हटलेले आहे की, " ज्या रीतीने चौकशी करावयाची त्या रीतीसंबंधी अधिनियमामध्ये कोणतीही तरतूद नाही. त्यामुळे निबंधक कलम 101 अन्वये, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, वसुलीसाठी प्रमाणपत्र देतो. असे प्रमाणपत्र देतांना निबंधकांने अनुसरावयाच्या कार्यपध्दतीमध्ये एकरुपता, पारदर्शकता व सुस्पष्टता आणण्यासाठी तसेच या कार्यपध्दतीमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी, कलम 101 अन्वये वसुलीसाठी प्रमाणपत्र देण्याकरिता निबंधकाने ज्या रीतीने चौकशी करावयाची ती रीत," यामुळे हा सर्व सावळा गोंधळ झालेला दिसत आहे. अशा प्रकारची कबूली दिलेली आहे. आपणाला सहकार क्षेत्रामध्ये खऱ्या अर्थाने काही बदल करावयाचे असतील तर त्या दृष्टीकोनातून हे विधेयक आणीत असतांना सहकार क्षेत्रामध्ये आलेली मरगळ या विधेयकाचा मानस यातून दिसून येत आहे. सरकारचा हेतू शुध्द दिसत नाही, हे बरोबर नाही, यामध्ये एकूण 4 मुद्दे आहेत, फायनन्स, ग्राहकांना ताबडतोब कर्ज देणे, दुसरे म्हणजे कर्ज घेणारा ग्राहक, जो इनडोअर सभासद असतो त्याचे कर्ज, तसेच छोटया छोटया सदस्यांचे कर्ज, त्यानंतर त्याची थकबाकी राहणे, ती वसूल करण्यासाठी 101 ची कारवाई करणे. नियम 101 चे अधिकार डीडीआर यांना होते ते अधिकार आता शासन काढून घेत आहे. हे अधिकार आता शासन या विधेयकाद्वारे घेत आहे, हा कायदा पास झाल्यानंतर हा नियम नवीन कर्ज घेणाऱ्यास लागू करणार आहात की, पूर्वलक्षी प्रभावाने या कायद्याची अंमजबलावणी करण्यात येणार आहे. अशा प्रकारचा प्रश्न आमच्या मनामध्ये निर्माण होत आहे. सहकार कायद्यामध्ये डीडीआरला जे अधिकार वर्षानुवर्षे देण्यात आले होते, ते आपणास बदल करण्याची गरज का भासत आहे ? डीडीआर आपले ऐकत नव्हते काय ? तो आपल्याच खात्याचा कर्मचारी आहे ना ? डीडीआर मनमानी करीत होते काय ? आपण सांगणार तेच काम डीडीआर करीत होते. लॉ प्रोजिजरमध्ये फरक करणे बरोबर नाही, मला या निमित्ताने दोन-तीन मुद्दे विचारावयाचे आहेत की, हे विधेयक आणण्याची प्रोप्रायटी काय आहे ? डीडीआर हा 100 टक्के चूक होता काय ? अशी जर वस्तुस्थिती असेल तर डीडीआरकडून 101 अन्वये कारवाई कशी काय करण्यात येत होती ?

.......3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VVK/ KGS/ MHM/ प्रथम श्री. कांबळे.. 19:20

श्री. श्रीकांत जोशी...

सहकार खात्यामध्ये रेकॉर्डच्या नोंदीचे पालन डीडीआर करीत नव्हते काय ? आपणाकडे डीडीआरच्या संदर्भात तक्रारी आलेल्या होत्या काय ? हे असे जर नसेल तर मग नियम 101 अन्वये कारवाईची प्रोसिजर बदलण्याची गरज काय ? जर यामध्ये डीडीआर यांची चूक असेल तर आपण किती डीडीआर यांच्यावर कारवाई केली आहे, यासंदर्भातील माहिती माननीय मंत्री महोदयांनी देणे आवश्यक आहे.

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी...

आपल्या लक्षात आले तेव्हा आपण डी.डी.आर. चा परफॉर्मन्स रिपोर्ट घेतला काय? आपल्याला कलम 101 च्या कारवाईमध्ये मूलभूत बदल करावयाचा आहे, तो कां करावासा वाटला? यासंबंधी विधेयकाच्या उद्देश व कारणांमध्ये उल्लेख होणे आवश्यक होते. माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी शेतकऱ्यांचा विषय मांडला. परंतु हा सहकार व पॅरलल अर्थव्यवस्थेशी संबंधित विषय आहे. यापुढील ग्लोबलायझेशनच्या काळात मोठ मोठे भांडवलदार मार्केटमध्ये येणार आहेत. या मोठया ग्लोबलायझेशनच्या सेक्टरमध्ये महाराष्ट्र राज्य त्यांना चॅलेंज करु शकते, किंवा त्यांना आव्हान देऊ शकते, यामध्ये खंबीरपणे को-ऑपरेटिव्ह सेक्टर उभे राहू शकते If we cannot come together, then we are bound to lose at the multi-national level. आपल्या राज्यातील कापूस एकाधिकार योजना म्हणजे एक सुंदर कोऑपरेटीव्ह मुव्हमेंट होती ती आता लॅप्स झाली. म्हणून हा कायदा या ठिकाणी आणीत असतांना त्यामध्ये आपला प्रामाणिकपणा आहे काय? तो प्रामाणिकपणा असेल तर तो या विधेयकात कां दिसला नाही? मला तिसरा लॉ पॉईंट विचारावयाचा आहे की, सरकारने आपल्याकडे अधिकार घेतले. परंतु Can a law be amended or replaced by government circulars? तुम्ही म्हटले आहे की, हे अधिकार ठरविण्याचा अधिकार सरकारला आहे. परंतु हा कायदा करीत असतांना जी रीत ठरेल ती दुसऱ्या कायद्याने एस्टॅब्लिश करावी लागेल, हे मला समजले नाही. आणि त्याचे लॉ पॉईंट म्हणून उत्तर पाहिजे की, हा कायदा करुन सरकारने अधिकार घेतले. परंतु त्या कायद्याची अंमलबजावणी कराल, त्याचे नियम तयार कराल त्यावेळी ते नियम पुन्हा या विधीमंडळासमोर आपण आणणार काय? सद्याचे एमपीएचे परसेंटेज पाहिलेतर थकबाकीचे प्रमाण दिवसें दिवस वाढत चालले आहे. या ग्लोबलायझेशनच्या काळात जे छोटे छोटे उद्योग आहेत ते पटापट मरताहेत. त्यामुळे डिफॉल्टरचे प्रमाण वाढत चालले आहे. या पध्दतीची एक्सपेंडिचर इकॉनॉमी आपल्या भारतात येत असल्यामुळे जो तो आपला खर्च वाढवीत आहे. त्यामुळे छोटया छोटया सेवकांच्या, नोकरदारांच्या, पगारी कर्मचाऱ्यांच्या सहकारी संस्थांमध्ये एमपीएचे परसेंटेज वाढत चालले आहे. त्यामुळे आपण फक्त बँकेचा विचार करु नका. आपण कायद्याने सर्व अधिकार डी.डी.आर. कडे दिले आहेत. आणि डी.डी.आर. चे अधिकार राज्य सरकारने काढून घेतले आहेत. त्यामुळे एखाद्या पतसंस्थेकडून एखाद्या व्यक्तीने कर्ज घेतले व ते 10 वर्षे फेडले नाहीतर पुढील काळात डी.डी.आर. ला

..2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MHM/ SBT/ KGS/ MAP/ 19:25

श्री. श्रीकांत जोशी...

पगारातून, ग्रॅज्युईटीमधून पैसे काढण्याचा अधिकार रहाणार नाही. त्याला राज्य सरकारकडे यावे लागेल. म्हणून या पुढील काळात एखाद्या कर्मचाऱ्यांच्या संघटनेच्या नेत्यांनी राजकीय दबावाचा वापर करुन त्या पतसंस्थेमधून पैसे घेतले तर तो डीडीआर ला सांगेल की, आपण काहीतरी क्लुप्त्या करा व माझे पैसे वसूल होणार नाहीत हे बघा. माझ्या पेन्शनमधून, माझ्या ग्रॅज्युईटीमधून, माझ्या डिपॉझीटमधून एकही पैशाची रिकव्हरी होता कामा नये असे काहीतरी करा. आज नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक बंद पडली तिचे उदाहरण आपल्यासमोर आहे. 12 नागरी सहकारी बँकांचे 68 कोटी रुपये त्या मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये आहेत. ज्या फिक्स डिपॉझीटची 518 कोटी रुपयांची रक्कम सरकारकडे ठेवावी लागते ती रक्कम सुध्दा ते खाऊन बसले आहेत. याचा परिणाम असा झाला की, महाराष्ट्र राज्य सहकारी बॅंकेने नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला पैसे देण्याचे आश्वासन दिले होते. त्यांना सांगण्यात आले की, तुम्ही आम्हाला 200 कोटी रुपये द्यावेत. त्यासाठी राज्य सरकार गॅरंटी देण्यास तयार आहे. परंतु महाराष्ट्र सरकारची गॅरंटी महाराष्ट्र राज्य सहकारी बॅंकेने केराच्या टोपलीत फेकून दिली. आणि त्यांनी सांगितले की, आम्ही तुम्हाला 200 कोटी रुपये देऊ शकत नाही. कारण त्यामधील एकही पैसा परत येण्याची शक्यता नाही. महाराष्ट्र सरकारची ही पत आहे काय? तुमच्या सहकार मंत्र्यांचा, तुमच्या वित्त मंत्र्यांचा कंट्रोल महाराष्ट्र राज्य सहकारी बॅंकेवर आहे काय? याबाबत कुणीही विचारायला तयार नाही. तुम्ही कशासाठी सहकार कायदा करीत आहात? महाराष्ट्रातील सहकारी चळवळ जगविण्याबाबत तुम्ही कां बोलत नाही? नांदेडमधील हजारो शेतकऱ्यांना सहकारी चळवळीच्या माध्यमातून या पुढील काळात पैसे मिळतील की नाही मला माहीत नाही. येत्या दोन महिन्यात खरीप हंगामामध्ये शेतकऱ्यांना पैसे लागणार आहेत.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ SBT/ MHM/ KGS/ पूर्वी श्री.सरफरे..... 19:30

श्री.श्रीकांत जोशी (पुढे सुरु....

512 कोटींनी ती बँक डिफॉल्टमध्ये गेलेली आहे. त्या बँकेची सगळी इस्टेट विकली तरी 100 कोटीच्या वर रक्कम मिळणार नाही. कलम 101 ची कारवाई करण्यासाठी तेथील ॲडमिनिस्ट्रेटर डी.डी.आर.कडून सर्टिफिकेट घेईल. नांदेड जिल्ह्यातील मोठमोठे राजकीय पुढारी ही कलम 101 ची कारवाई कशी चुकीची आहे हे दाखवण्यासाठी या कायद्याचा आधार घेऊन आपल्या समोर येतील आणि म्हणतील की, प्रोसिजरमध्ये चूक झालेली आहे, त्यामुळे ही गडबड झालेली आहे. ही सही बरोबर नाही, बॉन्ड पेपर चुकीचा आहे असे सांगून त्या जिल्ह्याचे मातेरे करतील. खरे म्हणजे माननीय मंत्रिमहोदय, आपण आपल्या मतदार संघापासून थोडे सुटला तर त्या डीसीसी बँकेमध्ये जाल. तुमचे नशीब चांगले की तुमचे बसमत त्या ठिकाणी जोडलेले नाही. नाही तर खाते बदलून घेण्याची तुमच्यावर पाळी आली असती. एवढी भयानक परिस्थिती सहकार क्षेत्रामध्ये वेगवेगळया पध्दतीने चाललेली आहे. म्हणून मला आपण कायदा आणला त्या संदर्भाने तीन गोष्टी समजून सांगा की, निबंधकांवर तुमचा पूर्ण अंकुश असतांना, निबंधकाला प्रोसीजर ले करण्यासाठी वेगळा ॲक्ट करण्याची गरज आहे काय ? शेवटी कलम 101 चा अधिकार देत असतांना त्याचे प्रोसीजर, एक सिस्टीम, त्यामधील डाक्युमेंटेशन हे सगळे कायद्याने बदलण्याची काय गरज होती ? शेवटी निबंधकाला कलम 101 ची कारवाई करण्यापूर्वी जे नियम टाकावयाचे असतील तर, सध्याच्या प्रचलित कायद्याप्रमाणे या सगळ्या बँकांचे, पत संस्थांचे ऑडिट करुन ध्यायची जबाबदारी ही शेवटी सहकार खात्याकडेच आहे. म्हणून डिफॉल्टरच्या प्रोसीजरसाठी आणि कलम कलम 101 च्या कारवाईसाठी डीडीआरकडे जातो. त्यावेळेस प्रोसीजरमध्ये अधिक परफेक्शन आतापर्यन्त का आणले नाही ? डायरेक्ट आपण कायद्यापर्यन्त गेलो. आपण कायद्यापर्यन्त गेलो पण त्यामध्येही सुस्पष्टता नाही. आता ही गोंधळ वाढविणारी सुस्पष्टता का आणली ? राज्य सरकारने आपल्याकडे अधिकार घेतले. राज्य सरकार अधिकार घेऊन पुढे काय करणार ? सभापती महोदय, पुढे मात्र आमच्या डोळ्यासमोर पडदा आहे. त्या पडद्या मागे काळोख आहे. म्हणजे पुढे राज्य सरकार काय करणार ? त्याबाबत मंत्री महोदयांनी आपल्या भाषणात विवेचन केलेले नाही तसेच या विधेयकामध्येही ते दिलेले नाही. पुन्हा सन्माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम जसे सांगतात त्याप्रमाणे जादूची पोतडी आहे. डीडीआरकडून कोठे फाईल गेली हे आम्हाला कळत नाही. ती

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ SBT/ MHM/ KGS

श्री. श्रीकांत जोशी .....

फाईल आम्ही शोधत बसायची. डी.डी.आर. सांगणार की, हे अधिकारी राज्य सरकारकडे आहेत. राज्य सरकारने ती फाईल मागविलेली आहे. माझे असे म्हणणे आहे की, तुमच्यामध्ये जर प्रामाणिकपणा आहे. तुम्हाला जर यामध्ये खरोखरच सुस्पष्टता आणायची आहे, तुम्हाला जर यामध्ये पारदर्शकता आणायची आहे तर याच्या पुढचे प्रोसीजर ले डाऊन का झाले नाही ? एवढ्या लवकर कायदा आणण्याची काय गरज होती ? खरे म्हणजे माझा या बिलाला यासाठी विरोध आहे. तुम्ही पुढचेही गव्हर्नमेंटचे प्रोसीजर क्लिअर करत नाही. त्यामध्ये आपण सांगा की, आम्हाला एवढी स्टॅम्प डयुटी पाहिजे. ती कशासाठी पाहिजे ? थकबाकीमध्ये मेलेल्या माणसाच्या टाळूवरील लोणी खाणारी प्रवृत्ती बरोबर आहे काय ? सरकार एवढा का खर्च भागवू शकत नाही ? स्टॅम्प डयुटी भरण्याची काय गरज आहे ? त्या ठिकाणी बॉन्डही करावा लागेल. 20 रुपयाच्या, 100 रुपयाच्या बॉन्ड पेपरवर लिहून द्यावे लागेल. यामध्ये फी असा शब्द वापरलेला आहे तो काढून टाकावा. आज या महाराष्ट्रामधील सहकारी चळवळीमधील शेतकरी मेले. त्याप्रमाणे वेगवेगळया सेक्टरमधील हजारो छोटे-मोठे उद्योजक, छोटे-मोठे कारखानदार, दुकानदार हे देखील यामध्ये अडचणीत आहेत. ही इकॉनॉमी संक्रमण स्थितीमध्ये चाललेली आहे. त्याचे प्रोसीजर काय असावे ? डाक्युमेंटेशन कशा पध्दतीचे असावे ? त्याबाबतचे जिल्हा स्तरावर कोणते अधिकार असावेत ? याबाबत या कायदामध्ये स्पष्टता यावयास पाहिजे होती. दुर्दैवाने ते यामध्ये आलेले नाही. संदिग्धता वाढविणारे, गोंधळ वाढविणारे, सहकार क्षेत्राची अजून अडचण वाढविणारे आणि खरे म्हणजे दोष काढण्याऐवजी सहकार क्षेत्रावर बर्डन आणणारे हे बील आणलेले आहे. यामध्ये आपला खरा उद्देश असेल तर आपण उत्तराच्या भाषणामध्ये व्हॉट इज गोइंग टू हॅपन आफ्टर डीडीआर टू गव्हर्नमेंट ? शेवटी गव्हर्नमेंट म्हणजे शेवटी काय तर कॅबीनेट मिनिस्टर. गव्हर्नमेंटमध्ये अजून काही सर्क्युलर काढून दुसरा गोंधळ घालणार आहात काय ? ते माहीत नाही. पुन्हा मंत्रिमंडळापर्यंत हे अधिकार नेणार आहेत काय ? डीसीसी बँकेचे 100 कोटीचे डिफॉल्टर असतील तर त्याबाबतीतील निर्णय एकटा कॅबिनेट मंत्री करु शकणार आहे काय ? त्यांच्यामध्ये तेवढे धाडस तरी आहे काय ? हा महत्वाचा प्रश्न यामध्ये निर्माण होतो. म्हणून गव्हर्नमेंट मधील ऑथरटीज, राईट फॉर्म द कॅबिनेट मिनिस्टर, राज्य मंत्री, को-ऑपरेटिव्ह कमिशनर त्यानंतर खालची जी काही लिंक असेल, जॉईन्ट

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ SBT/ MHM/ KGS/

श्री. श्रीकांत जोशी ....

कमिशनर, डीडीआर यांच्यापर्यन्त कोणकोणत्या अधिकारांचे विकेंद्रीकरण करणार आहात ? हे या बिलामध्ये यावयास पाहिजे. प्रोसीजर रिफॉर्म करण्याचा विचार केला ही गोष्ट चांगली आहे. त्याचे मी स्वागत करतो. पण कोणती प्रोसिजर रिफॉर्म ? सिनियॉरिटीप्रमाणे रिकव्हरी करायची काय ? की हायेस्टपासून रिकव्हरी करायची आहे ? ते ले डाऊन करण्याच्या दृष्टीने किमान आपली काय भूमिका आहे ? ती भूमिका देखील सांगितली गेली पाहिजे.

यानंतर श्री.बरवड......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी ....

मला असे वाटते की, यामधील फी हा जो कॉम्पोनंट आहे त्यामध्ये रिकव्हरीचा आग्रह शासनाने धरु नये. सरकारची सहकार क्षेत्राविषयी कमिटमेंट असेल तर पैसे कमविण्याचा हा विचार शासनाने दूर करावा. ज्या बेसिक अडचणी आहेत त्या कशा दूर होतील याबाबतीत शासनाने प्रयत्न करावा. जे लोक पैसे बुडवावयास निघाले आहेत त्यांच्यावर कडक कारवाई करावी. सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेब याबाबत अनेक उदाहरणे देऊ शकतील. मी सुध्दा याबाबत सांगू शकेन. अशा लोकांची टॉपटेन अशी यादी करा. त्यांना काळ्या यादीत घाला. त्यांच्यावर ॲक्शन घ्यावी. याबाबतीत खूप गप्पा होतात पण ॲक्शन होत नाही. सहकाराच्या बाबतीत बेसिक गोष्टीला धक्का बसविणाऱ्या गोष्टी आपण करु नये अशी विनंती करतो. सभापती महोदया, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानतो आणि मी माझे दोन शब्द संपवतो.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP/

**पृ.शी.**: जीवनावश्यक वस्तूंवर कर माफी किंवा कर सवलतीची मुदत वाढवणे.

**मु.शी.**: जीवनावश्यक वस्तूंवर कर माफी किंवा कर सवलतीची मुदत वाढवणे याबाबत माननीय वित्त मंत्र्यांचे निवेदन.

श्री. जयंत पाटील ( वित्त मंत्री ) : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करीत आहे.

सन 2006-07 चा अर्थसंकल्प सादर करताना मी असे नमूद केले होते की, मूल्यवर्धित कर प्रणाली अस्तित्वात आणताना ज्या दैनंदिन जीवनावश्यक वस्तूंवर कर माफी किंवा कर सवलत एक वर्षासाठी म्हणजेच सन 2005-06 साठी दिली होती ती सवलत पुढील 6 महिन्यांकरिता लागू करण्याबाबत राज्य शासन लवकरच निर्णय घेईल.

यासंदर्भात राज्य मंत्रिमंडळाने असा निर्णय घेतला आहे की, ज्या दैनंदिन जीवनावश्यक वस्तूंवर कर माफी किंवा कर सवलत सन 2005-06 मध्ये होती ती सवलत दिनांक 30 सप्टेंबर 2006 अखेर पर्यंत चालू ठेवण्यात येईल. तथापि, वित्त मंत्र्यांच्या शक्तीप्रदान समितीमध्ये राष्ट्रीय स्तरावर जीवनावश्यक वस्तूंवरील करांच्या दरात समानता आणण्याबाबत वेगळा निर्णय झाल्यास आवश्यकतेनुसार राज्य शासन या दरांमध्ये अनुषंगिक बदल करेल

ज्या जीवनावश्यक वस्तूंवर कर सवलत किंवा कर माफी पुढे चालू ठेवण्यात येणार आहे त्याचा तपशिल याप्रमाणे आहे.

| **अ.क्र** | **वस्तूंचे नाव** | **सन 2005-2006 मधील मूल्यवर्धीत कराचे दर** | **सन 2006-2007 सवलत / माफी दिली नसती तर लागू होणारे दर** |
|---|---|---|---|
| 1. | तांदूळ, गहू व डाळी | 0% | 4% |
| 2. | गहू व तांदळाचे पीठ, आटा, मैदा, रवा, सूजी यासह | 0% | 4% |
| 3. | डाळीचे पीठ, बेसन सह ( इतर डाळी किंवा धान्ये यांच्या पीठात न मिसळलेले ) | 0% | 4% |

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP/

श्री. जयंत पाटील ....

| | | | |
|---|---|---|---|
| 4. | गूळ | 0% | 4% |
| 5. | मिरची, हळकुंड आणि चिंच अखंड, भुकटीच्या स्वरुपात | 0% | 4% |
| 6. | धणे, मेथ्या, पास्ली ( सुवा ) अखंड किंवा भुकटीच्या स्वरुपात | 0% | 4% |
| 7. | असोला नारळ व ओले खोबरे | 0% | 4% |
| 8. | सोलापूरी चादर | 0% | 4% |
| 9. | टॉवेल्स | 0% | 4% |
| 10. | पापड | 0% | 4% |
| 11. | बेदाणे व मनुका ( सुका मेवा ) | 4% | 12.5% |
| 12. | सुका मेवा ( इतर सुका मेवा ) | 4% | 12.5% |
| 13. | खजूर ( Wet dates ) | 0% | 12.5% |
| 14. | चहापत्ती किंवा चहा पावडर इन्स्टंट चहासह | 4% | 12.5% |

सभापती महोदय, बऱ्याच राज्यामध्ये समानता आलेली आहे. काही राज्यामध्ये समानता आलेली नाही. गुजरात सारख्या राज्यामध्ये त्यांनी व्हॅट लागू केलेला असतानाही तांदूळ, गहू किंवा पीठ या वस्तू शून्य टक्क्यावर आहेत. राजस्थानमध्ये देखील तसे आहे. कर्नाटक किंवा तामीळनाडूमध्ये अजून व्हॅट लागू केलेला नाही. आपल्या राज्यामध्ये ज्या जीवनावश्यक वस्तू शून्य टक्यावर होत्या त्यामध्ये तांदूळ, गहू , डाळी, आटा, मैदा, रवा, सूजी, डाळीचे पीठ, बेसनसह, गूळ, मिरची, हळकूंड आणि चिंच, धने, मेथी, असोला नारळ व ओले खोबरे, सोलापुरी चादर, टॉवेल्स, पापड, बेदाणे व मनुका, सुका मेवा, खजूर, चहापत्ती किंवा चहा पावडर यांचे जे कराचे दर 31 मार्चपूर्वी होते ते 1 एप्रिल पासून 0 टक्क्याचे 4 टक्के आणि 4 टक्क्याचे 12.5 टक्के करीत आहोत. देशातील अन्य राज्यामध्ये असे आढळून आले की त्यांनी याप्रमाणे दर केलेले नाहीत. जीवनावश्यक वस्तूंच्या बाबतीत दराच्या संदर्भात आपणच ओपनिंग बॅट्समन राहणे योग्य नाही. म्हणून सरकारने असा निर्णय घेतलेला आहे की, या शून्य टक्क्याच्या कमोडिटीज शून्य

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP/

श्री. जयंत पाटील .....

टक्क्यामध्येच ठेवाव्यात आणि 4 टक्क्याच्या कमोडिटीज 4 टक्क्यामध्ये राहतील. शक्तीप्रदान समितीने मधल्या काळात जरी चर्चा केली आणि भविष्य काळात देशातील सर्व राज्यांची सहमती झाली तर, ती होण्याची शक्यता आहे, ते शक्य असल्यास त्यानुसार राज्य सरकार बदल करील.

----

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक.

**L.C. BILL NO.XV OF 2006.**

**(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA CO-OPERATIVE SOCIETIES ACT, 1960.)**

श्री. जयप्रकाश दांडेगावकर ( सहकार राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन 2006 चे वि. प. वि. क्रमांक 15 या विधेयकावर माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर तसेच सन्माननीय सदस्य प्रा. शरद पाटील, श्री. श्रीकांत जोशी, श्री. दिवाकर रावते यांनी चर्चेमध्ये भाग घेऊन आपले विचार मांडले त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. या कायद्यामध्ये फार बदल होत आहे असे नाही. शासन स्वत:कडे कोणतेही अधिकार घेत नाही. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या ठिकाणी उद्देश व कारणामधील एक वाक्य वाचले. त्यामध्ये असे म्हटले आहे की, "निबंधक कलम 101 अन्वये, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, वसुलीसाठी प्रमाणपत्र देतो." यासंदर्भातील प्रोसीजर ले डाऊन करण्याचा प्रयत्न या विधेयकामध्ये केलेला आहे. यापूर्वीची पध्दत पारदर्शक नव्हती काय ? असा मुद्दा सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी मांडला. यापूर्वी वेगवेगळे जी.आर. निबंधकांनी त्यांच्या सहकारी अधिकाऱ्यांना जारी केले होते. त्यासंदर्भात प्रोसीजर नव्हती ती प्रोसीजर यामध्ये आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. फुंडकर यांनी संस्था वसुली प्रमाणपत्राची मागणी करतात असे सांगितले. जुनी जी तरतूद आहे त्यामध्ये काहीही बदल होणार नाही. ओटीएसमध्ये बदल होणार नाही.

श्री. श्रीकांत जोशी : जुन्या कायद्याप्रमाणे ॲग्रीमेंट झालेले आहेत..

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सगळे ॲग्रीमेंट तसेच स्टँड राहणार आहेत. ओटीएस, दामदुप्पट वगैरे तसेच राहणार आहे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जयप्रकाश दांडेगावकर...)

ओटीएस, दामदुप्पट या सर्व योजना तशाच चालू राहाणार आहेत त्यामध्ये काही फरक होणार नाही. हायकोर्टामध्ये 4972/2005 क्रमांकाचे रिट पिटीशन दाखल करण्यात आले होते. त्यानुसार हे प्रोसिजन लेड डाऊन केलेले आहे.

श्री. विलासराव शिंदे : निबंधकाचे अधिकार शासन काढून घेणार काय, असा माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांचा प्रश्न होता.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : निबंधकाचे अधिकार काढून घेतलेले नाहीत. आवश्यक दाखला देण्याचे अधिकार निबंधकाला आहेत.

प्रा. शरद पाटील : या सुधारणेद्वारे कोणती प्रोसिजर अंमलात आणणार आहात ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : अर्ज विहित करण्याची मुदत, अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे, सुनावणीची नोटीस, कागदपत्रे तपासण्याची मुदत नेमून देणे, 3 महिन्याच्या आत दाखला देणे बंधनकारक करणे, तसे केले नाही तर निबंधकाला कारणे द्यावी लागले, दाखल्याचा नमुना विहित करणे अशा प्रकारच्या बाबींचा यामध्ये अंतर्भाव आहे. तेव्हा हे विधेयक सभागृहाने संमत करावे अशी मी सभागृहाला विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : विधेयक विचाराता घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 3 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006चे वि.प.वि.क्रमांक 15 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : सन 2006चे वि.प.वि. क्रमांक 15 संमत झाले आहे.

---





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: विनियोजन विधेयक

**L.A. BILL NO.LII OF 2006.**

**(A BILL TO AUTHORISE PAYMENT AND APPROPRIATION OF CERTAIN SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF THE YEAR ENDING ON THE THIRTY FIRST DAY OF MARCH 2007.)**

डॉ सुनील देशमुख (वित्त व नियोजन राज्यमंत्री) : महोदया, मी महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2006चे वि.स.वि.क्रमांक 52, दिनांक 31 मार्च 2007 रोजी संपणा-या वर्षाच्या कामांसाठी राज्याच्या एकत्रित निधीतून विवक्षित रकमा देणे व त्यांचे विनियोजन करणे यास अधिकृत मंजुरी देण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास असे आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राचे राज्यपाल त्यांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाकराष्ट्र विधानपरिषदेसमोरे मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MAP/ SBT/ श्री.शिगम नंतर 19:45

**तालिका सभापती** (श्रीमती सुधा जोशी) : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडशः सभागृहाला सादर करते. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2 ते 3,खंड 1 संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्याबाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

**तालिका सभापती** : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही,त्याअर्थी परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : आता आपण वि.प.वि.क्रमांक 14 चर्चेला घेऊ या.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदया, आज केवळ दोनच विधेयके पास करावयाची आहेत असे कामकाज सल्लागार समितीमध्ये ठरलेले आहे.

**तालिका सभापती** : याठिकाणी कामकाज पत्रिकेवर चार विधेयके दाखविण्यात आलेली आहेत. परंतु माननीय सदस्य म्हणतात त्याप्रमाणे कामकाज सल्लागार समितीमध्ये दोनच विधेयक चर्चेसाठी घेण्याचे ठरले आहे. त्यामुळे आज दोन विधेयके चर्चेला घ्यावीत किंवा तीन घ्यावीत याबाबत सभागृहाने निर्णय घ्यावयाचा आहे.

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदया, अधिवेशनाचे शेवटचे दोन दिवस शिल्लक आहेत. माझ्या विभागाचे एक महत्वाचे बिल आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, दोन विधेयके ज्यावेळी चर्चेला घ्यावयाची आहेत असे आम्ही मान्य केले त्यावेळी विनियोजन विधेयकावर चर्चा होणार नाही त्यामुळे ते पास करावे असे सांगितल्यावर आम्ही ते मान्य केले. विनियोजन विधेयकावर चर्चा होणार नसल्याने विधेयक क्रमांक 14 अन्न भेसळ प्रतिबंधक विधेयक हे चर्चेला घेण्याचे आम्ही मान्य केले आहे. माननीय मंत्री श्री.हंडोरे यांनी जी विनंती केली आहे ती मान्य करता येण्यासारखी नाही. याचे कारण हे विधेयक एवढया घाईगडबडीने पास करण्याची काय आवश्यकता आहे ? गेल्या नागपूर अधिवेशनात हे बिल पास झाल्यावर या अधिवेशनाच्या पहिल्या आठवडयात ते कामकाज पत्रिकेवर दाखविणे आवश्यक होते. परंतु ते दाखविण्यात आले नाही. दुसऱ्या आठवडयात आणल्यानंतर ती आता सभागृहाची प्रॉपर्टी झालेली आहे.

नंतर भारवि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

आता रात्रीचे 8.00 वाजले आहेत. त्यानंतर अडीच तासाची चर्चा आहे. वि.स.वि.क्रमांक 89 हा बिलावर अनेक सन्माननीय सदस्यांना चर्चा करावयाची आहे. मागे एकदा बनाव करून शासनाने बिल मंजूर करून घेतलेले आहे. माननीय पीठासीन अधिकाऱ्यांबाबत आम्हाला वेगळे वातावरण तयार करावयाचे नाही.

श्री.चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, शासनाने सन्माननीय विरोधी पक्षाने ज्या सूचना केल्या होत्या त्याप्रमाणे या बिलामध्ये बदल केलेला आहे. त्यामुळे हे बिल देखील आज चर्चेसाठी घेण्यास काही हरकत नसावी.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी अंधश्रध्देच्या बिलासंबंधी येथे मत व्यक्त केले आहे. हे बिल शासन सभागृहासमोर उशीराने का आणत आहे ? त्यासंबंधीचा हेतू सांगण्यासाठी मी उभा आहे.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : वि.स.वि.क्रमांक 89 संबंधी आपल्याला काहीही बोलता येणार नाही. सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. आता वि.स.वि.क्रमांक 14 घेण्यात येईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: अन्न भेसळ प्रतिबंध (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO. XIV OF 2006.

(A BILL FURTHER TO AMEND THE PREVENTION OF FOOD ADULTERATION ACT, 1954, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री.बाबा सिद्दीकी (अन्न व औषधिद्रव्ये राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, विधान सभेने संमत केल्याप्रमाणे मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 14 अन्न भेसळ प्रतिबंध अधिनियम, 1954 महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारण करण्यासाठी विधेयक मांडतो.

**तालिका सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.बाबा सिद्दीकी : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 14 - अन्न भेसळ प्रतिबंध अधिनियम, 1954 महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापति महोदय, महाराष्ट्र सरकार ने यह एक ऐतिहासिक विधेयक यहां पेश किया है. दोनों सदनों के सम्माननीय सदस्य तारांकित प्रश्न के माध्यम से, लक्षवेधी सूचना के माध्यम से हमेशा इस प्रकार का विधेयक लाने के लिए आग्रह करते थे ताकि मिलावट को रोका जा सके. हमेशा वे यहां पर प्रश्न उपस्थिति करते थे कि दूध में मिलावट हो रही है और अन्य चीजों में भी मिलावट हो रही है लेकिन कानून में कोई कड़ा प्रावधान न होने के कारण मिलावट करने वाले छूट जाते हैं, उन्हें सजा नहीं हो पाती. तो इसी बात को ध्यान में रखते हुए यह विधेयक पेश किया गया है. अब मिलावट करने वालों के खिलाफ कार्रवाई की जा सकेगी. इस विधेयक के सेक्शन 20 (1) में यह प्रावधान किया गया है कि पुलिस उप निरीक्षक रेंक के पुलिस अधिकारी को मिलावट करने वाले को बिना वॉरंट के गिरफ्तार करने का अधिकार होगा. दूसरी बात यह है कि मिलावट का गुनाह कागनिजिबल और नान-बेलेबल होगा. इस प्रकार की तरतूद की गई है. मैं समझता हूं कि यह एक ऐतिहासिक बिल है इसलिए सारे सम्माननीय सदस्य इस बिल को एकमत से मान्य करें. इतना कह कर मैं अपना भाषण समाप्त करता हूं.

यानंतर श्री बोर्डे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : हा कायदा काय आहे, सुधारणा काय केली, हे स्पष्ट करा.

श्री. बाबा सिद्दीकी :दी प्रिवेंशन ऑफ फुड एडल्टरशन एक्ट, 1954 में कुछ अमेंडमेंट करने के संबंध में यह विधेयक पेश किया गया है. इस एक्ट के अन्तर्गत सेक्शन 20 को डिलीट करके सेक्शन 20(1) का प्रावधान किया गया है. इसके तहत मिलावट का गुनाह काग्निजिबल और नान-बेलेबल होगा.

डॉ.दीपक सावंत : सन्माननीय मंत्री महोदयांनी आताच जे काही सांगितले आहे त्याचे स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे. 1954 चा कायदा काय आहे ? कशा संदर्भात आहे, याबाबत आम्हाला माहिती पाहिजे.

Shri Baba Siddiqui: Sir, Section 20(1) of The Prevention of Food Adulteration Act, 1954 says that "No prosecution for an offence under this Act, not being an ;offence under section 14 or section 14A shall be instituted ....

ॲड.अनिल परब : महोदया, काल-परवाच माननीय सभापतींनी निदेश दिलेत की, सभागृहात शक्यतो मराठी भाषेचा वापर करण्यात यावा.

Shri Baba Siddiqui: Madam Chairman, I am on a Point of Procedure. Rule 22 of Maharashtra Legislative Council Rules says that "The business of the Council shall be transacted in Marathi or in Hindi or in English."

डॉ. बाबा साहेब आंबेडकर द्वारा बनाए गए भारतीय संविधान के अनुसार और विधान परिषद के नियमानुसार मैं इन तीनों भाषाओं में से किसी एक भाषा में बोल सकता हूं.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, सभागृहामध्ये मराठी भाषेचा वापर व्हावा अशी मागणी करणे आमचा अधिकार आहे. माननीय सभापतींनी या संदर्भात दिलेल्या निदेशासंदर्भात बोलावयाचे नाही म्हणून आम्ही गप्प आहोत. माननीय मंत्री महोदयांनी मराठी भाषेत बोलावे असा आमचा आग्रह होता. परंतु त्यांनी आम्हाला "ये हिंदुस्थान है" असे सुनावले होते. महोदय, मग आम्ही काही पाकिस्तानात राहत नाहीत. सन्माननीय सभापतींनी दिलेले निदेश आम्ही मान खाली घालून ऐकले. माननीय मंत्री महोदय ज्या नियमाच्या पुस्तकाचा आधार घेत आहे ते पुस्तक

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ....

आमच्याकडे सुध्दा आहे. सभागृहामध्ये मराठी, इंग्रजी आणि हिंदी या पैकी कोणतीही भाषा वापरता येते हे आम्हाला सुध्दा माहीत आहे. परंतु हे राज्य मराठी राज्य आहे. म्हणूनच आम्ही मराठी भाषेचा आग्रह धरला होता आणि आजही धरत आहोत. आमचे अधिकारी तर फार हुशार आहेत. त्यांनी नियम पुस्तकातील त्या विशिष्ट नियमाला फित लावून ते पुस्तक माननीय मंत्री महोदयांकडे पाठविले. त्यांना हिंदीचा एवढाच अभिमान असेल तर त्यांनी पिवर हिंदी भाषेमध्ये बोलावे. कारण मंत्री महोदय, बोलताना मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तिन्ही भाषेचा वापर करीत आहेत. त्यामुळे कोणत्याही एकाच भाषेमध्ये न बोलणारा मंत्री आम्ही का म्हणून सहन करावा ? त्यांची भाषा प्रत्येक वेळा बदलणार असेल तर आम्ही त्यांना सहन करणार नाही.

ॲड.अनिल परब : सभापती महोदया, आताच माननीय मंत्री महोदयांनी नियमावलीतील नियम वाचून दाखविला. सभागृहात कोणत्याही भाषेचा वापर करु शकतो असे त्यांनी सांगितले. मी सुध्दा या सदनाचा सदस्य आहे. माननीय मंत्री महोदय, इंग्रजीमध्ये जे काही बोलतात ते मला समजत नाहीत. ते जर मला समजणार नसेल तर, जोपर्यंत मला ते जे काही बोलत आहेत त्याचे ट्रान्सलेट मिळत नाही, तोपर्यंत मी त्यांना पुढील प्रश्न विचारु शकत नाही. त्यांनी केलेल्या भाषणाची आम्हाला इंग्रजीत प्रत द्यावी.

Shri Baba Siddiqui: Sub-section (2) of Section 20 provides that"No Court inferior to that of a Metropolitan Magistrate or a Judicial Magistrate of the first class shall try any offence under this Act. Sub-section (3) says "Notwithstanding anything contained in the Coder of Criminal Procedure, 1973 (2 of 1974), an offence punishable underj sub-section (1AA) of section 16 shall be cognizable and non-bailable."

डॉ.दीपक सावंत : महोदया, सन्माननीय मंत्री महोदय, आता जे काही बोलले आहेत त्याचे भाषांतर आम्हाला हवे आहे.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

MSK/ MAP/ SBT यापूर्वी श्री. बोर्डे .. 20.00

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करत असतात. )

**तालिका सभापती** : सभापती उभे असताना सगळ्यांनी खाली बसावे, असा संकेत आहे. मी पुन्हा एकदा सर्वांना सांगते की, सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. कृपा करुन तुम्ही अडवणूकीचे धोरण धरु नका. मला पूर्ण बोलू द्या. ( गोंधळ ) सगळ्यांनी आपापल्या जागेवर बसावे. आपल्याला ट्रान्सलेशनची व्यवस्था करावयाची असेल तर ती व्यवस्थासुध्दा आपण करु शकतो.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करत असतात. )

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी कोणत्या एकाच भाषेमध्ये भाषण करायला पाहिजे याबाबत नियमात काहीही नाही. माननीय मंत्रिमहोदयांना मराठी येत नसेल तर ते इतर भाषेत भाषण करु शकतात. महाराष्ट्रामध्ये मराठी भाषा बोलली पाहिजे हे मला मान्य आहे. परंतु त्या संदर्भात अजून दोन भाषांचा पर्याय उपलब्ध आहे. त्या दोन पर्यायापैकी एक पर्याय माननीय मंत्रिमहोदयांना वापरता येईल. तरी, त्यांना येत असलेल्या भाषेत भाषण करायला परवानगी दिली पाहिजे.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करत असतात. )

**तालिका सभापती** : माझे बोलणे पूर्ण झालेले नाही. आपल्याला ट्रान्सलेशनची आवश्यकता असेल तर आणि ज्यावेळी कुठल्या तरी वेगळ्या भाषेत बोलावयाचे असेल तर अगोदर त्यासंबंधी नोटीस द्यावी लागते. त्यानुसार ट्रान्सलेशनची व्यवस्था केली जाऊ शकते. परंतु आता तशाप्रकारची नोटीस दिलेली नाही.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करत असतात. )

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण वापरलेला " अडवणूक " हा शब्द रेकॉर्डवरुन काढून टाकावा.

**तालिका सभापती** : मी वापरलेला " अडवणूक " हा शब्द जर अयोग्य वाटत असेल तर मी ते तपासून पाहीन आणि त्यातील तो शब्द काढून टाकेन. ( गोंधळ ) सभापतींचे बोलणे पूर्ण झाल्याशिवाय सन्माननीय सदस्यांनी बोलावयाचे नसते, ही सर्वांनी शिस्त पाळावी.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मला असे वाटते की, ज्यावेळी कामकाज सल्लागार समितीची बैठक झाली त्यावेळी एका दिवशी दोन विधेयके घेण्याचे ठरले होते, परंतु माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी परवानगी दिल्यामुळे तिस-या विधेयकावर चर्चा घेण्यास आम्ही तयार झालो, त्यामुळे आम्ही कोणतीही अडवणूकीची भूमिका घेत नाही. या सभागृहामध्ये आपण पाहतच आहात. माननीय मंत्री महोदय बोलत असतांना ते ज्या त्वेषाने बोलले, ते असे म्हटले की, मराठीच का, मी नियमाप्रमाणे हिंदी व इंग्रजीमध्ये बोलू शकतो. त्यांनी आम्हाला नियम दाखविला. महाराष्ट्र राज्यामध्ये मराठी आली पाहिजे, मी मराठी बोलण्याचा प्रयत्न करतो, मला आता माझ्या सोईच्या भाषेत बोलण्यास अनुमती द्यावी, अशी त्यांनी विनंती करावयास पाहिजे, आम्ही त्यांना नेहमीच सहकार्य करीत आलो आहोत. ते बोलत असतांना त्यांची बॉडी लँगवेजवर आमचा आक्षेप आहे, काल आम्ही दोन विधेयके पारीत केली. आमचे सदस्य जास्त असूनही आम्ही ती पारीत केली, अडवणूक केली नाही. ती विधेयके आम्ही अडवू शकलो असतो. आपणास मराठी येत नाही तर त्यांचा थोडा संकोच बाळगला पाहिजे, पण तो व्यक्त न करता, ते आम्हाला नियम दाखवित आहेत.

ॲड अनिल परब : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी भारतीय घटनेचा उल्लेख केलेला आहे. नियमाप्रमाणे ते बरोबर आहे. त्यांनी सांगितले की त्यांना हिंदी व इंग्रजीमध्ये बोलण्याचा अधिकार आहे, तो अधिकार आम्ही मान्य केलेला आहे. त्यांना जसा अधिकार आहे तसा या सदनाचा सदस्य म्हणून माझे सुध्दा काही अधिकार आहेत. जी भाषा मला येत नाही ती भाषा समजून घेण्यासाठी मला त्यांच्या भाषणाचे भाषांतर करुन देणे जरुरीचे आहे. त्यांचे भाषण मला माझ्या या भाषेत समजून घेण्याचा माझा तो अधिकार आहे. आपण ज्या प्रमाणे मंत्री महोदयांच्या अधिकाराचे संरक्षण करीत आहात, त्याप्रमाणे माझ्याही अधिकारचे संरक्षण करणे गरजेचे आहे. आपण येथे नोटीसीचा उल्लेख केलेला आहे, मी नवीन सदस्य आहे नियमाचे सर्व पुस्तक मी वाचलेले आहे, परंतु मला यामध्ये कोठेही नोटीसीबाबत उल्लेख दिसलेला नाही. आपणास जर नोटीसीचा सेक्शन माहिती असेल तर कृपया आपण मला सांगावे, त्यामुळे माझ्या ज्ञानात भर पडून ते अपडेट होईल.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, मी संसदीय कामकाज राज्यमंत्री म्हणून आपणाला विनंती करतो की, माननीय मंत्री महोदयांच्यावतीने मी विनंती करतो, या प्रकरणाला वेगळे स्वरुप न देता, येथे चांगल्या प्रकारे चर्चा चालली होती, त्याप्रमाणे पुढील कामकाज करावे, अशी माझी सभागृहातील सदस्यांना विनंती आहे.

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाबा सिद्दिकी :सभापति महोदय, यह सेंट्रल गवर्नमेंट का एक्ट है. सम्माननीय सदस्य अपने भाषण में जो बता रहे हैं, वह मैं समझ रहा हूं. यह एक्ट वर्ष 1954 में बनाया गया था. दी प्रिवेन्शन ऑफ फुड एडल्टरशन एक्ट, 1954 के नाम से यह एक्ट है. यह एक्ट अंग्रेजी में है.

तालिका सभापती : मघाशी मी जो अडवणूक शब्द वापरला, तो मी तपासून घेऊन अयोग्य वाटला तर कामकाजातून काढून टाकेन, हे मी कबूल केले आहे. परंतु येथे सन्माननीय सदस्य श्री. अनील परब, डॉ. नीलम गोऱ्हे व इतर सदस्यांनी सांगितले की, आम्हाला इंग्रजी भाषा कळत नाही, जर ही भाषा खरोखर कळत नसेल तर भाषांतर करण्याबाबत विचार करण्याची आवश्यकता आहे. जर भाषा समजत नसेल तर तसे करणे योग्य होईल.

श्री. बाबा सिद्दिकी :सभापति महोदय, मैं यह कहना चाहता हूं कि सम्माननीय सदस्यों को हर्ट करने का मेरा कोई इरादा नहीं है. मैं यह बता रहा था कि यह सेंट्रल गवर्नमेंट का एक्ट है और यह एक्ट अंग्रेजी में है. इस एक्ट में जो सेक्शन 20 था, उसे अब डिलीट कर दिया गया है और उसके स्थान पर सेक्शन 20 (1) का प्रावधान किया गया है. इस सेक्शन के तहत मिलावट का गुनाह काग्निजिबल और नान-बेलेबल होगा तथा मिलावट करने वाले अपराधी को गिरफ्तार करने का अधिकार सब इंसपेक्टर रेंक के अधिकारी को होगा. चूंकि केन्द्रीय सरकार " फुड एंड सेफ्टी एक्ट " लाने का विचार कर रही है, लेकिन महाराष्ट्र सरकार ने यह सोचा कि केन्द्रीय सरकार का एक्ट आने में देरी लग सकती है इसलिए महाराष्ट्र सरकार ने यह अमेंडमेंट की है. केन्द्रीय सरकार जो एक्ट बना रही है, वह भिन्न भिन्न प्रकार के 8 एक्ट को मिलाकर एक एक्ट बना रही है. महाराष्ट्र सरकार ने यह सोचा कि यह अमेंडमेंट करके आम जनता को न्याय देंगे और इसलिए आज यह बिल पेश किया गया है. मैं माननीय सदस्यों से विनती करता हूं कि वे इस बिल को एकमत से पारित करें. इतना कह कर मैं अपना भाषण समाप्त करता हूं.

...

इसके बाद श्री दिपक सावंत का भाषण. यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, अन्न भेसळ प्रतिबंधक अधिनियम 1954 मध्ये सुधारणा करणारे 14 क्रमांकाचे विधेयक मंत्रिमहोदयांनी सभागृहापुढे मांडले आहे. या विधेयकाप्रमाणे अशासकीय विधेयक यापूर्वी अनेक माननीय सदस्यांनी या सभगृहामध्ये मांडले होते. त्या विधेयकाची मूळ प्रत आणि हे विधेयक पाहिल्यानंतर त्यामध्ये परिवर्तन करण्यात आले आहे. त्यामध्ये असलेली तफावत मी सदनाच्या निदर्शनास आणून देत आहे. या विधेयकात म्हटले आहे की, "इतर अपराधांसाठी विविध शिक्षांची तरतूद आहे". सभापती महोदया, भेसळ हा विषय घेतला तर अनेक प्रकारचे भेसळीचे प्रकार आहेत. त्यामध्ये बिस्लेरीच्या पाण्यापासून, दूधापासून, दारुपासून औषधांपर्यंत अनेक विषय अंतर्भूत आहेत. ही भेसळ आरोग्याला किती घातक आहे, याबाबत अनेक वेळा लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून हा विषय सभागृहामध्ये मांडण्यात आला. आपण या विधेयकामध्ये "प्रभावीपणे कारवाई करण्यात यावी" असे म्हटले आहे, म्हणजे नेमके काय? एका उपनिरिक्षकाच्या दर्जाच्या अधिकाऱ्याला आपण अधिकार प्रदान करीत आहात. त्याच्याकडून अधिकाराचा जास्तीत जास्त दुरुपयोग होण्याची शक्यता आहे. आपण एखाद्या सब इन्सपेक्टरला अधिकार दिल्यानंतर एखाद्या माणसावर त्याचा रोख असेल तर तो ठरवून त्या माणसावर कारवाई करील. इतकेच नव्हेतर त्या माणसाला अटक करण्यासाठी सुध्दा त्याला मोकळे रान मिळेल याची मला या निमित्ताने भीती वाटते. त्याचप्रमाणे या ठिकाणी अजामिनपात्र गुन्हा दाखल करण्याची तरतूद करण्यात आली आहे. ज्यावेळी एखादा गुन्हा घडल्यानंतर तो अजामिनपात्र ठरवून त्याला स्थगिती दिली जाते. त्यामुळे तो पुराव्याअभावी सुटू शकतो, किंवा त्याच्यावर कारवाई होत नाही. त्यामुळे या शिक्षेच्या तरतुदीमध्ये मोठया प्रमाणात बदल करण्याची आवश्यकता आहे. त्याप्रमाणे या ठिकाणी दंड किंवा तुरुंगवासाची शिक्षा करण्याची आवश्यकता होती, तशी सुधारणा या विधेयकामध्ये करण्यात आलेली नाही.

सभापती महोदया, त्याचप्रमाणे मॅन्युफॅक्चरर्स म्हणजे बनविणारे आणि विकणारे यांचे एक रॅकेट असते. त्यामध्ये त्यांचा प्रमुख सूत्रधार असतो. त्यांच्यामार्फत अन्न भेसळ करणे हा त्यांचा धंदा असल्यामुळे तो सतत चालू रहाणार आणि अन्न भेसळ होत रहाणार. हा मुद्दा ज्यावेळी लोकसभेमध्ये चर्चिला गेला त्यावेळी औषधामध्ये भेसळ करणाऱ्यांना फाशीची शिक्षा देणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन करण्यात आले. आपण ज्या प्रमाणे दारुमध्ये, दूधामध्ये होत असलेली भेसळ या कायद्यात अंतर्भूत केली आहे त्याप्रमाणे औषधामध्ये होत असलेली भेसळ अंतर्भूत केली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

परंतु यामध्ये औषधामधील भेसळीबाबत स्वतंत्र तरतूद करणे आवश्यक होते. ज्यावेळी एखादे औषध ठराविक मात्रेमध्ये किंवा मिलिग्रॅमच्या स्वरुपामध्ये पोटात जाते त्यावेळी ती मात्रा योग्य नसेल किंवा ती कमी मात्रा असेल तर एखाद्या माणसाचा जीव जाऊ शकतो.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (पुढे सुरु...

तसेच दुधामध्येसुध्दा विषारी पदार्थ टाकले जात असतात, रंग टाकला जात असतो. अशा रंगामुळे देखील माणसाचा जीव जाऊ शकतो. अशाप्रकारे लोकांच्या जीवाशी खेळणाऱ्या लोकांच्याबाबतीत विचार केलेला नाही, असे माझे स्पष्ट मत आहे. याबाबतीत जी काही कडक शिक्षा करावयाची आहे त्या संबंधाने नव्याने विधेयक आणावे, असे मला वाटते, एवढे बोलून माझे बोलणे संपवितो.

--

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलास अवचट (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या विधेयकावर मनोगत व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये साखर सम्राट, शिक्षण सम्राट, सहकार सम्राट आहेत. त्याचप्रमाणे भेसळ सम्राटही आपल्याला पहायला मिळतात. यासंबंधात केंद्राचा मूळ अधिनियम 1954 हा दिनांक 29-9-1954 ला अस्तित्वात आला. त्यानंतर आपण 62 वर्षांनी सुधारणा करतो आहोत. असे कोणते कारण घडले की, इतक्या वर्षांनी यामध्ये आमुलाग्र बदल करण्याची आवश्यकता वाटली ? मी मघाशीच सांगितले की या विधेयकाचे मी स्वागत करतो. परंतु आपण ही सुधारणा करत असताना यामागील हेतू स्पष्ट होऊ शकत नाही. अधिनियमाखाली कार्यवाही करता यावी, म्हणून अजामीनपात्र गुन्हा दाखल करण्याची तरतूद केलेली आहे. यामध्ये अटक करण्याचा अधिकार पोलीस उपनिरिक्षक यांना देण्याची तरतूद केलेली आहे. पोलीस अधिकाऱ्यांना आपण कायद्यान्वये इंडियन पीनल कोडच्या माध्यमातून अधिकार देतो आहोत. सध्याच्या परिस्थितीमध्ये याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. सध्या पोलिसांच्या बाबतीत सर्वसामान्य जनमाणसामध्ये आज काय चित्र आहे ? याची आपल्याला कल्पना आहे. महाराष्ट्रामध्ये अनेक भेसळीचे प्रकार होतात. उदाहरण द्यावयाचे झाले तर जीवनावश्यक वस्तूंच्याबाबतीत देता येईल. भेसळ होऊ शकत नाही अशी कोणतीही वस्तू नाही. सध्या आंब्यामध्येही भेसळ होते. आंब्याच्या पेटीमध्ये कारबाईड पावडर टाकली जाते. पाण्यामध्येही भेसळ केली जाते. बिसलरीच्या बाटल्यांबाबत दोन वर्षापूर्वी सभागृहात चर्चा झालेली होती. त्यावेळेस सन्माननीय मंत्री श्री.अनिल देशमुख यांनी सांगतले होते की, महाराष्ट्रामध्ये पाण्याच्या बाटल्यांचे उत्पादन करणाऱ्या 83 कंपन्या आहेत. त्यापैकी 18 कंपन्या या मुंबईतील आहेत. आज बिसलरीमध्ये शुध्द पाणी आहे, म्हणून त्या विकत घेतो. परंतु इंजेक्शनने त्या पाण्यामध्येही भेसळ केल्याची उदाहरणे आहेत. याला आळा घालण्यासाठी काही ठिकाणी अशा बाटल्या पकडण्यात आल्या. तरीही अशाप्रकारचा कायदा आपण करु इच्छिता.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलास अवचट ......

आज आपण या ठिकाणी कायदा आणल्यानंतर गेल्या 62 वर्षामध्ये भेसळीचे जे प्रकार झाले, पोलिसांनी ज्यांना पकडले, संबंधित खात्याने ज्यांना पकडले त्या प्रकरणांमध्ये कोर्टात किती केसेस टिकल्या हे सांगणे आवश्यक आहे. अनुभवाने मनुष्य शहाणा होतो त्याप्रमाणे हे शासन शहाणे झाले आहे असे वाटते. या ठिकाणी भेसळीचे प्रकार सांगितले. हे प्रकार इथपर्यंतच मर्यादित नाहीत. मुलांच्या शाळेच्या बाहेर ज्या वस्तू विकल्या जातात त्या वस्तू बनविण्याच्या प्रक्रियेमध्ये भेसळ करण्याचे प्रकार होतात. दारुच्या संदर्भातील विषय मघाशी काढण्यात आला होता. 1999 मध्ये गावदेवी येथे दारुच्या भेसळीमुळे 35 लोक मृत्यूमुखी पडले होते. ती केस अजूनही कोर्टामध्ये आहे. ते आरोपी जामिनावर सुटलेले आहेत. गेल्या 55 वर्षामध्ये आपल्याला काय अनुभव आला हे या ठिकाणी सांगणे आवश्यक आहे. आपण उपनिरीक्षकाला वॉरंटशिवाय अटक करण्याचा अधिकार दिलेला आहे. ते कायद्यामध्ये बसते की नाही ? हे पाहणे आवश्यक आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी जे विधेयक मांडलेले आहे त्यामध्ये त्यांच्या हेतूबद्दल मला शंका नाही. आपला हेतू चांगला आहे. यामध्ये कोणाला अधिकार द्यावयाचे याबाबत आपण हे विधेयक आलेले आहे. या बिलाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. विलास अवचट यांनी उल्लेख केला की, भेसळ करणाऱ्यावर याचा प्रभावी परिणाम होणार नाही. यासंदर्भात मी तसेच सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे, आम्ही अशासकीय विधेयक मांडले होते. विशेषत: दुधामध्ये इंजेक्शनव्दारे किंवा झाकण उघडून भेसळ होते. या ठिकाणी एक सर्वंकष बिल आणणे आवश्यक होते. आपण यामध्ये अजामीनपात्र गुन्हा केलेला आहे. त्यांना पकडण्याचे अधिकार उपनिरीक्षक दर्जाच्या पोलीस अधिकाऱ्यांना दिलेले आहेत. यामध्ये तेलामधील भेसळ असते, पाण्यामधील भेसळ असते. मुंबई शहरामध्ये माणसाच्या पोटात जाणारे जे जे पदार्थ असतील त्यातील 80 ते 90 टक्के पदार्थांमध्ये भेसळ होत आहे. विशेषत: झोपडपट्टयांमध्ये गरीब लोक राहतात. त्या ठिकाणी मागासवर्गीय लोक राहतात. त्या ठिकाणी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लोक राहतात. अशा ठिकाणी सुध्दा भेसळीचे प्रकार होतात. त्या ठिकाणी भेसळयुक्त दूध दिले जाते. सर्वसामान्य माणसे अतिशय महाग असणारे तेल वापरत नाहीत. तेलामध्ये सुध्दा भेसळ केली जाते. अन्नपदार्थ, भाजी, गाजर यामध्येही भेसळ केली जाते. गाजराला रंग लावून ते विकले जातात. हिरवे वाटाणे रंग लावून विकले जातात. या बिलाच्या माध्यमातून आपण या भेसळीवर नियंत्रण ठेऊ इच्छित आहात.. यासंदर्भात माननीय मंत्रिमहोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये प्रकाश टाकला पाहिजे. दुधामध्ये भेसळ करणारी व्यक्ती असेल त्याला पकडल्यानंतर पंधरा दिवस जामीन मिळणार नाही. तो दखलपात्र गुन्हा आहे. परंतु पंधरा दिवसानंतर जामीन मिळाल्यानंतर आणि त्याची केस उभी राहिल्यानंतर, न्यायालयात योग्य ते पुरावे सादर केल्यानंतर सुध्दा त्याला कठोर शासन होईल अशी कोणत्याही प्रकारची तरतूद आपल्या कायद्यामध्ये नाही. काही लोक चहासाठी दूध वापरतात. मोठी माणसे पिण्यासाठी दूध वापरतात. परंतु सर्वसामान्य लोक आपल्या मुलांना दूध देण्यासाठी दूध वापरतात. मुंबईमध्ये असे दिसून आले की, मुंबई शहरात 35 ते 40 टक्के भेसळीचे दूध मिळते. कृष्णा दूध असेल, गोकूळ दूध असेल, वारणा दूध असेल, या दुधामध्ये मोठ्या प्रमाणावर

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ SBT/

श्री. मधुकर चव्हाण .....

भेसळ होते. याबाबतीत कसे नियंत्रण करणार ? आपण त्यांना पकडणार. या लोकांना दोन आठवड्यानंतर जामीन मिळणार. या ठिकाणी असे लक्षात आले अहे की, या दुधाची भेसळ करण्यामध्ये मोठ्या प्रमाणावर परप्रांतीय लोक आलेले आहेत. त्यांना जामीन मिळाल्यावर ते आपल्या प्रांतात निघून जातील. मग आपण पुढे काय करणार ? त्यांच्या हाताचे ठसे आपल्याकडे नसतात. ते फार मोठे सराईत गुन्हेगार नाहीत. जे खुनी असतात त्यांचा रेकॉर्ड असतो. मोठेमोठे अपराध करण्याची ज्यांची मोडस ऑपरेंडी असते त्यांचा रेकॉर्ड असतो.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 20:25

(श्री. मधुकर चव्हाण...)

पोलीस दुस-या प्रांतामध्ये गेलेल्या गुन्हेगाराला पकडून शिक्षा करु शकणार नाहीत. केवळ पैशासाठी पोटात जाणा-या अन्न पदार्थामध्ये भेसळ करणा-यांवर कठोर कारवाई करण्यासंबंधीची तरतूद या विधेयकामध्ये नाही. या ठिकाणी माननीय सदस्यांनी भेसळीमुळे काय काय होऊ शकते हे सांगितले. अन्न पदार्थातील भेसळीमुळे मृत्यू येऊ शकतो. दुधातील भेसळीमुळे टी.बी. रोग होतो. तेव्हा या कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी शिक्षेमध्ये वाढ केली पाहिजे. अन्न पदार्थामध्ये भेसळ करणा-या गुन्हेगाराला कमीत कमी 5 वर्षाची शिक्षा व्हायला पाहिजे. पोटात जाणा-या घन किंवा द्रव पदार्थामध्ये केलेल्या भेसळीमुळे जर मृत्यू आला तर अशी भेसळ करणा-याला मृत्यूदंडाची शिक्षा दिली पाहिजे. परदेशामध्ये गुड ॲडमिनिस्ट्रेशनच्या दृष्टीने अन्न पदार्थामध्ये भेसळ करणा-यांना 50-60 वर्षाची शिक्षा दिली जाते. परदेशामध्ये असे म्हटले जाते की, एकवेळ क्रिमिनल गुन्हेगाराला शिक्षा देण्यामध्ये विलंब लागला तरी चालेल, परंतु अन्न पदार्थामध्ये भेसळ करणा-याला कठोर शिक्षा झाली पाहिजे. माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी आज सकाळी अशासकीय ठरावाद्वारे विशेष कौटुंबिक न्यायालयांची संख्या वाढविण्याची मागणी केली. समाजामध्ये माणसाच्या जीवनाशी जे खेळणारे लोक आहेत त्यांना कठोर शिक्षा झाल्याचे ऐकीवात नाही. या कायद्यामध्ये केवळ मामुली बदल करुन हा कायदा प्रभावी होणार नाही. गुन्हेगार जामिनावर सुटून पुन्हा गुन्हे करण्यास मोकळा होतो. अशी भेसळ करणारी व्यक्ती सापडली की, त्याबाबतीत समेट किंवा मांडावळी होता कामा नये. उप निरीक्षकाला अशी भेसळ करणारी व्यक्ती सापडल्यानंतर त्या व्यक्ती विरुध्द त्वरित गुन्हा दाखल करुन खटला उभा राहिला पाहिजे. अशा प्रकारची तरतूद या कायद्यामध्ये नाही. उप निरीक्षकाला केवळ पकडण्याचे अधिकार देऊन हा कायदा प्रभावी होणार नाही. हा कायदा केवळ दिखावू ठरेल. गुन्हेगाराला दंडात्मक आणि कठोर अशा प्रकारची शिक्षा करण्यासंबंधीची तरतूद या विधेयकामध्ये नाही. या सभागृहामध्ये विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य अशासकीय ठराव किंवा अशासकीय विधेयकाच्या माध्यमातून विविध विषय पोटतिडिकीने मांडत असतात. परंतु त्यांनी मांडलेला एखादा अशासकीय ठराव किंवा एखादे अशासकीय विधेयक शासनाने स्वीकारलेले असल्याचे उदाहरण अद्याप दिसून आलेले नाही. दैनंदिन भेडसावणा-या प्रश्नावर शासनाने अतिशय गांभीर्याने आणि कठोरपणे विचार करण्याची

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर चव्हाण...)

आवश्यकता आहे. राज्यकर्त्यांना आईच्या भूमिकेतून कारभार करावा लागतो. आई जसे आपल्या मुलाचे संगोपन करते त्याप्रमाणे जनतेच्या जिव्हाळयाच्या प्रश्नावर सर्वंकष विचार करुन, वास्तवतेचे भान ठेवून कायदे करुन त्यांची कठोरपणे अंमलबजावणी करावयास पाहिजे. हे जे विधेयक या ठिकाणी आणलेले आहे त्यामध्ये माननीय सदस्यांनी सुचविलेल्या मुद्यांचा समावेश करता आला तर तो करावा. भेसळ करणा-या गुन्हेगाराला कठोर शिक्षा करण्याची तरतूद या कायद्यामध्ये करावी.

....नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MAP/ MHM/ KGS/ SBT/ श्री.शिगम नंतर 20:30

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदया, शासनाने अन्न भेसळ प्रतिबंधक अधिनियम 1954 मध्ये अंतिम सुधारणा करण्यासाठी जे विधेयक आणलेले आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. हे बिल ऐतिहासिक आहे असे वक्तव्य मंत्रीमहोदयांनी केले. परंतु ऐतिहासिक बिल आहे हे अर्धसत्य आहे असे मला याठिकाणी म्हणावेसे वाटते. सभापती महोदया, अन्न भेसळीच्या संदभ्र्ात अनेक माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत आणि त्यांच्या विचारांशी मी निश्चितपणाने सहमत आहे. खाद्य पदार्थांमध्ये, अन्नपदार्थांमध्ये तसेच जीवनावश्यक वस्तूंमध्ये जी भेसळ केली जाते त्यामुळे आरोग्यावर गंभीर परिणाम होतात हे सांगण्याची गरज नाही. देशामध्ये संपूर्ण समाजव्यवस्थाच भ्रष्टाचाराच्या भेसळीने बरबटलेली आहे. कितीही चांगला कायदा केला तरी त्या कायद्यातून पळवाट काढण्याचा प्रयत्न केला जातो. 1954 च्या अन्न भेसळ प्रतिबंधक कायद्यामध्ये दुरुस्ती करताना अपराध्याला वेगवेगळया शिक्षांची तरतूद करण्यात आलेली आहे. जी सुधारणा शासनाने आणलेली आहे त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याकडून दखलपात्र गुन्हा,वॉरंटशिवाय अटक करण्याचे अधिकार अशा ज्या तरतुदी केलेल्या आहेत त्या पुरेशा नाहीत असे मला वाटते. अलिकडेच भेसळीच्या संदर्भात जे काही गुन्हे दाखल होतात त्यात भेसळ करणाऱ्या व्यापाऱ्यांवर तसेच विक्रेत्यांवर कोणत्याही प्रकारची कठोर कारवाई झाल्याचे आजपर्यंत लक्षात आलेले नाही. मांडवली केली जाते आणि ही खालपासून वरपर्यंत केली जाते." Power makes the man corrupt. Absolute power makes the man more corrupt. " अशी परिस्थिती आज देशात आणि राज्याराज्यात निर्माण झालेली आहे. हा अत्यंत ज्वलंत अशा प्रकारचा सामाजिक आणि नैतिकतेचा प्रश्न आहे. आपल्या समाजामध्ये वावरणारा उत्पादक असेल किंवा व्यापारी असेल अथवा विक्रेता असेल ही समाजातील मंडळी नैतिकता गमावून बसली आहेत काय असे वाटू लागले आहे म्हणून अशा प्रकारचे कायदे करण्याची गरज निर्माण होते. खरे पाहिले तर आमच्या या पवित्र अशा देशाची ही शोकांतिका आहे.

सभापती महोदया, भेसळीचे पदार्थ खाऊन खाऊन आणि त्यांचा वापर करुन करुन आता इतकी सवय झालेली आहे की, शुध्द पदार्थ दिली तरी लोक आजारी पडतील. खाण्याचे पदार्थ उदा.मिरची पावडर,हळदी पावडर,मसल्याचे पदार्थ यामध्ये काय काय भेसळ केली जाते ते सांगता येणार नाही. तांदळामध्ये रेती मिक्स केली जाते. गव्हाच्या पिठामध्ये माती मिक्स केली जाते. दुधामध्ये भेसळ केली जाते. शाळांच्या कंपाऊंडच्या दारामध्ये छोटे छोटे विक्रेते असतात त्यांचा

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MAP/ MHM/ KGS/ SBT/ श्री.शिगम नंतर 20:30

प्रा.जोगेंद्र कवाडे ...

काही दोष नाही. मोठया व्यापाऱ्यांकडून जे पदार्थ ते आणतात ते शाळांच्या बाहेर विकतात. मुंबईतील विषारी दारुमुळे झालेल्या अपघाताचे उदाहरण देण्यात आले. व्यापाऱ्यांनी आणि गुन्हेगारांनी अशा प्रकारची विषारी दारु विकल्यामुळे 35 लोक मृत्यूमुखी पडले आणि दुकानदाराला मात्र कोणत्याही प्रकारची देहदंडाची शिक्षा झाली नाही. अन्नामध्ये आणि औषधामध्ये भेसळ करुन मानवी समाज जीवनाशी खेळ खेळणाऱ्या या मंडळींना मानवद्रोही ठरविले पाहिजे एवढेच नव्हे तर त्यांना राष्ट्रदोही ठरवून त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे अशा प्रकारची माझी शासनाला यानिमित्ताने सूचना आहे.

नंतर भारवि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे...

ही सुधारणा तात्पुरत्या स्वरूपात योग्य असली तरी या कायद्यान्वये जास्तीत जास्त कठोर शिक्षा केली पाहिजे. भेसळी संबंधी अधिकाऱ्याकडे तक्रार केल्यानंतर ते अन्न लॅबमध्ये तपासणीसाठी पाठविले जाते. दरम्यानच्या काळात संबंधित व्यक्ती ही त्यासंबंधीचा अहवाल येईपर्यंत मोकाट सुटलेली असते. तेव्हा आरोपी मोकाट सुटणार नाही म्हणून कायद्यामध्ये कठोरात कठोर शिक्षेची तरतूद केली पाहिजे. ज्या छोटया छोटया लोकशाही राष्ट्रामध्ये देखील कॅपिटल पनिशमेंटची, मृत्युदंडासारखी शिक्षा आहे. आपल्या देशाने त्याचा अवलंब केला तर त्यात वावगे वाटण्यासारखे काही नाही असे मला वाटते. जे अन्नामध्ये भेसळ करून जीवशी खेळ करायला जातात अशांना आळा घालण्यासाठी छोटासा प्रयत्न या विधेयकाच्या माध्यमातून झाल्याबद्दल मी शासनाचे स्वागत करतो. धन्यवाद.

...

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, या बिलामध्ये शिक्षेची तरतूद आहे किंवा नाही हे मला समजलेले नाही. या बिलामध्ये जी तरतूद करण्यात आली आहे, त्यावर मी माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे. या विधेयकाच्या माध्यमातून शासनाने ग्राहकांचे हित लक्षात घेता भेसळीसंबंधीचा अपराध हा दखलपात्र व अजामिनपात्र केल्याबद्दल स्वागत करतो. या विधेयकातील तरतूद ही औषध भेसळीसाठी लागू आहे काय ? असा देखील माझा प्रश्न आहे. तसे नसेल तर हा कायदा औषध भेसळीसाठी लवकरात लवकर लागू करावा अशी देखील मी या निमित्ताने सूचना करीत आहे. या विधेयकामध्ये "पोलीस उप निरीक्षकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेला कोणताही पोलीस अधिकारी, जिच्याविरूध्द ती, या अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेल्या अपराधांपैकी कोणत्याही अपराधांशी संबंधित आहे, अशी संयुक्तिक तक्रार करण्यात आलेली असेल" इथ पर्यंत जी तरतूद केली आहे ती बरोबर आहे. त्याच्या पुढे "किंवा विश्वसनीय माहिती मिळालेली असेल, अशा कोणत्याही व्यक्तीस वॉरंटशिवाय अटक करू शकेल." ही जी तरतूद आहे. ती खटकणारी आहे. Madam, in my opinion, this is a most dangerous weapon the State Government is giving to the Police Officer.विश्वसनीय माहिती मिळाल्यानंतर तो अधिकारी कोणालाही अटक करून आतमध्ये टाकू शकेल. त्यामुळे यासंबंधीचे डॉक्युमेंटेशन केले पाहिजे. Why does not the Government go for the documentation? जर संबंधित अधिकाऱ्याकडे तक्रार असेल तर त्याने स्वत:च्या नावाने तक्रार केली पाहिजे. He may say that this is my own experience and I want to go for the raid for this. पोलीस दलातील सगळेच अधिकारी चांगले आहेत असे नाही. यातून काय होणार आहे. भेसळ करणाऱ्यांचा हप्ता वाढणार आहे. तेव्हा फूड डिपार्टमेंटला सांभाळायचे असेल तर यासंबंधीचे डॉक्युमेंटेशन केले पाहिजे. त्यासाठी procedure ले डाऊन केले पाहिजे. पोलीस अधिकारी हा काही तज्ज्ञ नसतो. त्यामुळे शेवटी तक्रार ही संबंधित विभागाकडे येते. Then from the so called reliable information or from his own source, due to these enormous powers, the Police Officer can arrest anybody or including the Minister also. विश्वसनीय माहिती मिळाली असे समजून एखादा पोलीस अधिकारी व्यापाऱ्याला सांगेल की, पंचवीस हजार दे, नाहीतर तुला तीन दिवसांसाठी आतमध्ये टाकतो.Madam, anybody can make the complaint and he can go for raids.

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी....

असे झाले तर भेसळ करणाऱ्या उद्योगपतींकडे त्या पोलीस अधिका-याने जावयाचे आणि त्यांच्याकडे पैशांची मागणी करावयाची. कारण पुढील तीन दिवस सुटी असल्यामुळे, त्याला आत टाकायचे, असा प्रकार यातून निर्माण होण्याची शक्यता आहे. सुटी असल्यामुळे, त्याला जामीन मिळू शकत नाही. परंतु तो उद्योगपती भेसळ करणारा असल्यामुळे, तो पैसा देऊन तेथल्या तेथे सेटलमेंट करेल आणि प्रकरण दडपून टाकेल. म्हणून या संदर्भात डॉक्युमेंटेशन केले तर त्याला रिव्हर्स येण्याचा वा सेटलमेंट करण्याचा प्रश्न राहणार नाही. रिलायबल इन्फॉर्मेशनवर अटक केली तर ती अटक दाखववयाची की नाही, यासाठी व्यापा-यांकडून पैसे घेतले जातील. या कायद्यानुसार कोठे तरी डॉक्युमेंटेशन केले गेले तर भेसळ करणाऱ्याला अटक करावीच लागेल. असे केले तर अटक केल्यानंतर पैसे खाण्याची संधी मिळणार नाही. त्याला अटकच करावी लागेल, अशी तरतूद केली तरच खऱ्या अर्थाने भेसळ प्रतिबंध होण्यास सुरुवात होईल. अन्न भेसळ प्रतिबंधक कायद्याचा उपयोग करुन, नको त्यांची दुकाने भरावयाची आणि भेसळ मात्र जेथल्या तिथे राहीन, तसे होऊ नये म्हणून मी या विधयकावर माझे विचार मांडण्याकरिता उभा आहे. रिलायबल इन्फॉर्मेशन जर अटक केली तर पैसे देवून तो आरोपी सूटू शकतो म्हणून Madam, Panel Chairman, my sugestion is that document is to be documented somewhere. It can be made in the police station and then he can make the arrest. Otherwise, he can not make the arrest. महोदया, फुड आणि ड्रग्ज्य विभागामध्ये फुडचा टर्न ओव्हर किती आहे ? मिल्क हे फुड मध्ये येते. एखाद्या गवळ्याने दूधात पाणी टाकले तर पोलीस इन्स्पेक्टर त्याला उचलणार आणि आत टाकणार. आज राज्यात अशी परिस्थिती आहे की, कोणतेही दूध विना पाण्याचे नाही. आज राज्यात सर्रास दूधामध्ये पाण्याची भेसळ केली जाते. ही भेसळ थांबवित असताना, या विधेयकामुळे मध्येच पैसे खाऊन, मोकळे व्हावयाचे, अशा प्रकारची परिस्थिती उद्‌भवण्याची शक्यता आहे. त्यामुळे या विधेयकातील "किंवा विश्वसनीय माहिती" या शब्दालाच माझा आक्षेप आहे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी....

Madam, there should be a documentary information and that document can be given by himself. Let him take a risk. Let him say that I have a doubt and I want to go and verify this commodity. And if there is a mixing of non-edible things in that commodity then he should be arrested immediately.याबाबत माझ्या मनात कोणतीच शंका नाही. परंतु इडिबल कमॉडिटीजमध्ये नॉन-इडिबल कमॉडिटीजचे मिक्सिग करणे हे अतिशय घातक आहे. परंतु दोन इडिबल ऑईलमध्ये प्रॉफिट मेकिंगसाठी, एकमेकांचे मिक्सिगकरु द्यावयाचे व तो गुन्हा बेलेबल करावयाचे आहे की, नॉन बेलेबल करावयाचे आहे ? कारण खाद्य तेलाच्या बाबतीत, उच्च प्रतीच्या तेलामध्ये, निम्न प्रतीचे तेल मिसळले जाते. Practically, in India, we have a 20 per cent less production in Oil seeds. खाद्य तेलाच्या बाबतीत ऑल इंडिया लेव्हलला 20 टक्के शॉर्टेज आहे. भारताचा टर्न ओव्हर 10 हजार कोटींपेक्षा जास्त आहे. 2 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त इम्पोर्ट बील्स इडिबल ऑईलचे आहेत. ज्यावेळी इडिबल ऑईलचे इम्पोर्ट कमी व्हायला सुरुवात होते त्यावेळी खऱ्या अर्थाने मिक्सिग वाढण्यास सुरुवात होते. पदार्थामध्ये मिक्सिग इडिबल टू इडिबल असेल तर त्याला तोच कायदा आणि इडिबल टू नॉन इडिबल असेल तरी त्यालाही तोच कायदा लागू होतो आहे. यामुळे मला वाटते की, या कायद्याच्या डिटेल्समध्ये काही गोष्टी करणे आवश्यक आहे. कारण ही प्रत्येक व्यक्तिशी निगडीत दैनंदिन बाब आहे. याचे सुध्दा उत्तर आपण द्यावे की, जे मिक्सिग हेल्थला हजाडर्स असेल, त्यांच्या बाबतीतही सेम कायदा ठेवणार आहात काय ? जे मिक्सिंग नॉन हजार्ड टू लाईफ आहे, अशा वेळी मनी मेकिंगसाठी तुम्ही हाच कायदा ठेवणार आहात काय ? मिक्सिग करणारा इलेंमेट कोण कोणते आहेत? ते तुमच्या डोळयासमोर आले आहेत काय ? जे ठग आहेत, बदमाश आहेत, ते भेसळ करुन, करोडो रुपये कमावतात आणि सगळया सिस्टीमची वाट लावतात, परंतु त्यांनाही तोच कायदा. एखाद्या किराणा दुकानदाराने आपले पोट भरण्यासाठी, थोडया फार प्रमाणात जरी भेसळ केली असली तरी त्याच्यासाठी हाच कायदा आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री.श्रीकांत जोशी....

मला असे वाटते की,यामुळे मोठे ठग सुटून जातात आणि हवालदार गावातील दुकानदारांना घेऊन ठोकत बसतात. मिक्सिंगचा कायदा आणल्यानंतर त्या व्यक्तीला पकडून ठोकण्याचा प्रकार होणार आहे. मला वाटते, असे करुन, आपण केवळ हप्ता मिळविण्याचे साधन पोलिसांना उपलब्ध करुन देणार आहात. विधेयकातील तरतुदींमुळे मिक्सिंग आहे ते त्याच ठिकाणी राहते आणि हप्ता घेण्याचे प्रमाण वाढते. त्यामुळे अन्न भेसळ कायद्यामध्ये रुल फ्रेम करीत असताना ,पोलिसांच्या संदर्भातील नियमांचे रुल सुध्दा नीट करा. इडिबल टू इडिबल, इडिबल टू हजार्डस लाईफ आणि इडीबल टू नॉन इडिबल या तिन्ही गोष्टींचे सेप्रेशन योग्य प्रकारे करा. हे करीत असताना, पहिल्या गुन्हयासाठी काय शिक्षा करावयाची, दुसऱ्या गुन्हयासाठी काय शिक्षा करावयाची हेही ठरविणे आवश्यक आहे. हा कायदा होत असताना, तो लोकांपर्यंत पोहोचण्यास वेळ लागतो. शासन हा कायदा आणत आहे ही चांगली गोष्ट आहे. परंतु हा कायदा करुन, आज जी सिस्टीम आहे, ती बटन दाबून, एकाच मिनिटात पुरिफाय करता येईल काय ? या कायद्याचे काही कॅम्पेन आपण करणार आहात काय ? आपल्याकडे किती कमॉडिटीज आहेत ? कोणकोणत्या वस्तूंमध्ये भेसळ होते ? हेसुध्दा पाहिले पाहिजे. यासाठी आपण अन्न भेसळीबाबत मास कॅम्पेन केले पाहिजे आणि महाराष्ट्रातील किमान 5 हजार ग्रोथ सेंटरपर्यंत आपण इफेक्टीव्हली पोहोचलो तर बरे होईल.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSK/ MHM/ KGS यापूर्वी श्री. बोर्डे .. 20.45

श्री. श्रीकांत जोशी ....

सभापती महोदय, मला एक गोष्ट कळत नाही की, हे कायदे कोणासाठी आहेत ? हे कायदे पोलिसांसाठी आहेत का ? हे कायदे लोकांना त्रास देण्यासाठी आहेत का ? सभापती महोदय, बाधीत असणाऱ्या व्यक्तींना हा कायदा समजून सांगण्याची, त्यांच्यापर्यंत हा कायदा इफेक्टिव्हली पोहोचविण्याची जबाबदारी कोणाची आहे ? आणि ही जबाबदारी जर सरकार म्हणून आपली असेल तर त्या संदर्भात आपण काही प्रभावी यंत्रणा करणार का ? त्या बाबतीत आपण काही पब्लिसिटी कॅम्पेन करणार आहात का ? आणि ते कॅम्पेन करुन, अशा पध्दतीचे मिक्सिंग होत आहे, हे लोकांपर्यंत पोहोचविणार आहात का ? यातून आपण लोकांना सांगितले पाहिजे की, मिक्सिंग आरोग्यासाठी धोकादायक आहे. This mixing is bad for economy. This mixing is dangerous for productivity. आपण एक चांगला कायदा आणण्याचा प्रयत्न करत आहात त्याबद्दल मी आपले स्वागत करतो. सभापती महोदय, या संदर्भात मी आपल्याला सूचना करतो की, या दृष्टीकोनातून आपण एक कॅम्पेन करावे. आपल्या खात्याचे जर कोणी सेक्रेटरी असतील तर त्यांनी पुढील काळामध्ये यासंबंधी कधीतरी डिटेल नोट करुन, कुठल्या पध्दतीची कॅटेगरी करायची हे ठरवावे. सभापती महोदय, जे महाबदमाश आहेत, ठग आहेत, जे करोडोंची भेसळ करतात त्यांच्या संदर्भात श्वेतपत्रिका, ब्लॅक पेपर काढला पाहिजे. रिअल डेन्जरस एलिमेन्टस् कधीच लोकांसमोर येत नाहीत. परंतु किरकोळ माणसे मात्र किड्या-मुंग्यांसारखी यामध्ये भरडली जातात. तरी हा कायदा करत असताना, आपण ब्लॅक पेपर, रुल्स रेग्युलेशन्स आणि पब्लिसिटी कॅम्पेन या तिन्ही गोष्टी कराव्यात. जे कोणी यामध्ये येतील अशा सर्वांना आम्ही आतमध्ये टाकणार आहोत, असे त्यांच्यापर्यंत पोहोचवावे. त्यांना आयडेन्टिफाय करुन, फोकस करुन त्यांच्याविरुध्द या कायद्याचा अंमल करावा. आपण ब्युरोक्रेसीला देखील असे प्रचंड अधिकार ठेवता, त्यामुळे चांगल्या ब्युरोक्रेसींच्या पाठीवर थाप मिळत नाही. पण बदमाश पोलीस अधिकारी एखाद्या ठिकाणी जाऊन आयुष्याची कमाई करतो. सभापती महोदय, लोक आमच्या नावाने शिव्या घालतात आणि आम्हाला विचारतात की, आपण कसे कायदे करता ? हे समजत नाही. म्हणून मी माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, आपण या संदर्भातील रुल्स सायन्टिफिकली फ्रेम करावेत. सभापती महोदय, या तिन्ही गोष्टींसंदर्भात माननीय मंत्रिमहोदयांच्या भाषणात आश्वासक उत्तरे मिळतील अशी अपेक्षा करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

----

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, अन्न भेसळ प्रतिबंधक अधिनियम, 1954 या कायद्यामध्ये थोडासा बदल करण्यासाठी हे विधेयक येथे आणलेले आहे. हे विधेयक अतिशय चांगले आहे असे जरी येथे सांगितले असले तरीही या विधेयकाच्या तरतुदीबाबत आताच सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी ज्या काही हरकती घेतलेल्या आहेत, त्याच हरकतीवर मी बोलणार आहे. भारतीय दंड संहिता, 1860 या कायद्यान्वये आपण लोकांना शिक्षा करतो. या कायद्यामध्ये असा बदल केला आहे की, दखलपात्र गुन्हे अदखलपात्र केले आहेत, अजामीनपात्र गुन्हे जामीनपात्र केले आहेत. सभापती महोदय, " सार्वजनिक आरोग्य सुरक्षितता, योग्य सोय, सभ्यता, नितिमत्ता यांना बाधक असलेले अपाय " असा जो चॅप्टर आहे त्यामध्ये हे कायदे येतात. सभापती महोदय, सर्वसाधारणपणे कलम 272 खाली दोषींना अटक होते. अटक झाल्यावर ताबडतोब जामीन मिळतो. सभापती महोदय, कायद्याचे जे वेगवेगळे नियम बनविले जातात, त्यावेळी पहिल्यांदा त्या कायद्याचे कलम असते, नंतर अपराध असतो, नंतर शिक्षा असते, नंतर कायदा दखलपात्र आहे की अदखलपात्र आहे ते असते, जामीनपात्र आहे की अजामीनपात्र आहे हे असते आणि कोणत्या न्यायालयात समपरीक्षायोग्य आहे हे देखील असते. परंतु सभापती महोदय, या विधेयकामध्ये सर्व गोष्टी दिलेल्या आहेत. परंतु हा कोणत्या न्यायालयात समपरीक्षायोग्य होणार आहे, यासंबंधीचा कोणताही खुलासा माननीय मंत्रिमहोदयांनी केलेला नाही. आज होत असलेल्या भेसळीमध्ये या बदलणाऱ्या कायद्यामुळे कोणताही फरक पडणार नाही. कारण भेसळ करणारे लोक मोठया प्रमाणात पसरले आहे, त्यांचे मोठे रॅकेट आहे. सभापती महोदय, यामध्ये कोण पकडले जाणार आहेत तर त्याच्या दुकानात, गोडाऊनमध्ये काम करणारे लोक. जे कामगार आहेत तेच यामध्ये पकडले जाणार आहेत.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनील परब .....

आजपर्यंत शासनाने अन्नभेसळ करणाऱ्या कोणत्या मालकांना पकडले आहे, व या कायद्यान्वे कोणत्या लोकांना शिक्षा झाली आहे, यासंदर्भात माहिती मंत्री महोदयांनी द्यावी. या विधेयकामध्ये बदल केल्यानंतर अन्नामध्ये भेसळ करणाऱ्यां व्यापाऱ्यांवर काय परिणाम होणार आहे, याची सुध्दा माहिती मंत्री महोदयांनी द्यावी. माझ्या माहिती प्रमाणे व मला जे कळते त्याप्रमाणे हा गुन्हा आता दखलपात्र आणि अजामिनपात्र होणार आहे. ज्यावेळी ही केस न्यायदंडाधिकारी यांच्याकडे जाईल, त्याला अटक केल्यानंतर तो संध्याकाळपर्यंत सुटेल, म्हणजे त्याला जामीन मिळेल, रात्री अटक केली तर त्याला नाईट न्यायदंडाधिकाऱ्यासमोर जावे लागेल, व जास्तीत जास्त या केस मध्ये सदर व्यक्ती 24 तासामध्ये सुटू शकेल, मग याला काय अर्थ राहणार आहे ? ही केस सत्र न्यायालयाकडे वर्ग केल्यानंतर ती केस प्रथमवर्ग न्यायदंडाधिकाऱ्याकडे जावी लागेल व त्यानंतर त्याचा जामीन होऊ शकेल, त्यानंतर त्यास सेशन कोर्टामध्ये जावे लागेल. अन्नात भेसळ करतांना जर ग्राहकांच्या जीवनाला काही धोका झाला तर सबंधीत कायद्यामध्ये काय शिक्षा होईल, याची माहिती नाही. माझी विनंती आहे की, एखादी केस सत्र न्यायालयासमोर गेल्यानंतर अजामिनपात्र गुन्हा दाखल झाल्यावर तो सेशन न्यायदंडाधिकारी यांच्याकडे गेला पाहिजे तरच या लोकांना भीती निर्माण होईल. नाही तर या काद्यामध्ये बदल करुन काहीही फरक होणार नाही. फक्त यामध्ये पोलिसांना दर्जा वाढवून दिला असतांना त्यांना जो अधिकार दिलेला आहे त्यामुळे त्यांचा रेट वाढेल या व्यतिरिक्त काहीही होणार नाही, कायद्यामध्ये बदल करुन जर त्यांचे रेट वाढत असतील तर गुन्हे करणारे घाबरणार नाहीत. हे विधेयक आणून जर पोलिसांना पैसा मिळत असेल तर सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी सांगितल्याप्रमाणे यामध्ये क्लासीफिकेशन असणे अत्यंत आवश्यक आहे. कारण एखाद्या व्यक्तींने जर दुधामध्ये भेसळ केली तरी त्याला तेच कलम लावणार व एखाद्या व्यक्तीने दारुमध्ये विषारी द्रव्य मिसळून जर ग्राहकांच्या जीविताला धोका निर्माण केला तरी त्यास तेच कलम लावणार हे योग्य होणार नाही. म्हणून या दोन्ही गुन्हयाचे स्वरुप हे वेगवेगळे असतांना त्यांना शिक्षा सुध्दा त्याप्रमाणे व्हावयास पाहिजे. कोठल्या गुन्हयातून काय सिध्द होते यासाठी यामध्ये वेगवेगळे सेक्शन ॲड करणे आवश्यक होते. माननीय मंत्री महोदयांनी या सगळया गोष्टींचा विचार करुन याबाबत सविस्तर खुलासा करणे अत्यंत गरजेचे आहे.

......2...

VVK/ KGS/ MHM/ प्रथम श्री. कांबळे.. 20:50

ॲड.अनिल परब...

कायदा बनविणे हा सोपा असतो, परंतु कायद्याची अंमलबजावणी करणे अत्यंत कठीण काम असते. कायदा हा लोकांच्या हितासाठी असला पहिजे, तो जनहिताचा झाला पाहिजे, जनतेचे हित आपणास सांभाळावयचे असेल तर, त्यांना दिलासा द्यावयाचा असेल तर हा कायदा झाला याची माहिती सर्वसामान्य जनतेला मिळाली पाहिजे, याबाबत आपण खबरदारी घेतली पाहिजे. पेट्रोल भेसळीच्या यामध्ये संबंध नसावा कारण हा अन्नभेसळ प्रतिबंधक कायदा आहे, ज्या ज्या गोष्टीयामध्ये मी सांगितल्या आहेत, दुधाची भेसळ, अन्नाची भेसळ यासंदर्भात अत्यंत खबरदारी घेणे आवश्यक आहे. म्हणून या कायद्याची जाहिरात करुन लोकांना माहिती होणे आवश्यक आहे. या कायद्याद्वारे गुन्हेगार हा सत्र न्यायालयापुढे जात असतांना गुन्हेगाराला यातील सर्व पळवाटा माहिती आहेत, त्याला माहिती आहे की, हा गुन्हा केला तरी जामीन मिळतो. यामध्ये भेसळ करणारे रॅकेट खूप मोठे आहे. या कायद्याचा त्यांना जरब बसला पाहिजे अशाप्रकारे कायद्याची अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. म्हणून मी या निमित्ताने ज्या ज्या सूचना केलेल्या आहेत त्यांचा माननीय मंत्री महोदयांनी विचार करावा एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

----------------

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, अन्न भेसळ प्रतिबंधक अधिनियमामध्ये दुरुस्ती करणारे विधेयक मांडण्यात आले आहे.हे विधेयक मांडतांना आपण फार मोठे काहीतरी करावयास जात आहोत अशाप्रकारच्या आविर्भावामध्ये मंत्रिमहोदयांनी हे विधेयक मांडले. परंतु विधेयक पाहिल्यानंतर त्यांनी काहीच केलेले नाही असे दिसून येते. या विधेयकाचे वर्णन एखाद्या घटनेच्या माध्यमातून करावयाचे झाले तर भर दुपारी नवरा बायको एका छत्रीमधून रस्त्याने चालले होते. त्यावेळी रस्त्यावर चार गुंड येतात आणि त्या महिलेची छेडछाड करतात, तिच्या शेळपट असलेल्या नवऱ्याला दम देतात. त्यावेळी महिलेचा नवरा आपली छत्री बाजूला करतो. ते गुंड महिलेची छेडछाड करुन गेल्यानंतर बायको नवऱ्याला म्हणते की, ते गुंड छेडछाड करीत असतांना तुम्ही बघत काय बसला? त्यावेळी नवरा तिला म्हणतो की, मी छत्री बाजूला केल्यामुळे त्याला उन्हामध्ये छेडछाड करावी लागली. अशाप्रकारे शेळपट बदल करणारे हे विधेयक मांडण्यात आले. त्याबाबत अनेक माननीय सदस्यांनी आपली मते मांडली आहेत. या विधेयकामध्ये बदल करण्यापूर्वी आपण जर आसपासच्या राज्यामध्ये असलेल्या कायद्यांची माहिती घेतली असती तर अधिक चांगले झाले असते. या विधीमंडळाच्या अधिवशेनामध्ये दरवर्षी वेगवेगळे विषय चर्चेला घेतले जातात. अन्न भेसळीबाबत अनेक वेळा लक्षवेधी सूचना मांडण्यात आल्या आहेत. मागील अधिवेशनामध्ये कॅडबरीच्या चॉकलेटमध्ये असलेल्या अळयासंबंधी लक्षवेधी सूचना मांडण्यात आली होती. त्या लक्षवेधी सूचनेमध्ये भरपूर चर्चा करण्यात आली. त्यानंतर ते कॅडबरी चॉकलेट मागविण्यात आले, ते तपासण्यात आले व नंतर क्लिअर आहे म्हणून सोडून देण्यात आले. कॅडबरी कंपनीमार्फत जे वेंडर्स नेमण्यात येतात ते कशाप्रकारे प्रोसेसिंग करतात याचाही विचार केला पाहिजे. वेंडर्सकडे तो माल आल्यानंतर उन्हाळयामध्ये किंवा दमट हवामानामध्ये त्याचे योग्य प्रोसेसिंग न केल्यामुळे त्यामध्ये अळया निर्माण होतात. या विषयावर कुणीही प्रकाश टाकलेला नाही.

सभापती महोदया, अशाप्रकारे औषधांच्या भेसळीचे सुध्दा कारखाने आहेत. माननीय सदस्य श्री. अनिल परब यांनी सांगितल्याप्रमाणे या गोष्टी करण्यासाठी ठराविक माणसे नेमलेली असतात. मी एकदा माझ्या मित्राच्या घरी गेलो होतो. त्याच्या शेजारी दारुमध्ये भेसळ करण्याचा व्यवसाय चालायचा. त्याठिकाणी व्यवसाय करणाऱ्याने चार माणसे कायम आणून बसविलेली होती. ज्यावेळी पोलिसांकडून धाड टाकली जाते त्यावेळी त्या माणसांना पकडून नेले जाते. त्यांना नंतर जामिनावर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

सोडण्यात येते. त्या माणसांना सुध्दा बरे वाटते, आपण बाहेर रस्त्यावर उपाशी फिरण्यापेक्षा आत जाऊन चार दिवसांची जेवणाची सोय करुन नंतर बाहेर येतो. तेव्हा भेसळ ही आरोग्यास अपायकारक असेल त्यासाठी आपल्याला कायद्यामध्ये खरेच तरतूद करावयाची आहे काय? आपण त्याकरिता फक्त सब इन्सपेक्टरच्या हातामध्ये दंडुका देऊन दुसरी कोणतीही तरतूद केली नाही. मघाशी आपण ज्या आवेशामध्ये इंग्रजीमध्ये हे विधेयक मांडण्याचा प्रयत्न केला, तशाप्रकारची आवेशपूर्ण तरतूद यामध्ये केलेली नाही. माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी सांगितल्याप्रमाणे मनुष्यवधापर्यंतची शिक्षा लावता येऊ शकेल अशाप्रकारची तरतूद या विधेयकामध्ये आपल्याला करता येऊ शकेल काय? सभापती महोदया, पश्चिम बंगाल आणि उत्तर प्रदेश राज्यामधील कायद्यामध्ये चांगल्या प्रकारचे बदल केले आहेत. त्या राज्यामध्ये भेसळ करणाऱ्याला तात्काळ पकडून शिक्षा करण्यात येते. आपल्या राज्यामध्ये भेसळ करणाऱ्याला पकडल्यानंतर तो भेसळ करीत होता हे आपल्याला सिध्द करुन द्यावे लागते. त्या ठिकाणी ओनस ऑफ प्रुव्हींग आहे, इतके सिरियसली त्यांनी घेतले आहे. आपल्याकडे 500 रुपयांचा दंड आणि सहा महिन्यांचा तुरुंगवास ही शिक्षा आहे. याबाबतीत चक्र चालू असते, ठरलेली माणसे जेलमध्ये जाऊन बाहेर पडतात. त्यामध्ये हप्ते घेण्याचे प्रकार चालू असतात. परंतु उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल सरकारने त्यांच्या अन्न भेसळ प्रतिबंधक कायद्यामध्ये यासंबंधी बदल केला आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे (पुढे सुरु...

ज्या बांगलादेशीयांना पकडल्यानंतर ते बांगला देशी आहेत म्हणून आपण सिध्द करायचे परंतु त्यांनी बांगलादेशी नाहीत भारतीय आहोत, हे सिध्द करायचे नाही. असा उलटा प्रकार आहे. भेसळ करताना सापडले तर त्याच्याबाबतीत गांभीर्याने घेणार नसू आणि त्यांच्याबाबतीत मांडवली केली जाणार असेल तर विधेयकाचा काही उपयोग नाही. यासाठी नैतिक ताकद लागते. नैतिक धैर्य पाहिजे. खात्यातील खालचे लोक खालपासून वरपर्यन्त करु हे शकतात. त्यामुळे इच्छा चांगली आहे. मुंबईमध्ये 26 जुलैला विमानतळावर एक विमान घसरले. मिठी नदीच्या किनाऱ्यावर ऑईलमध्ये भेसळ करणारे कारखाने आहेत. त्या ठिकाणी भंगारवाले आहेत. कोट्यावधी रुपयाचे मालक असणारे लोक आहेत. अशाप्रकारचे राजरोजपणे ते धंदे करतात. या संबंधाने कोणत्या विभागाने त्यांना साधी नोटीस दिलेली आहे काय ? अशाप्रकारचा राजरोज धंदे चालतात. सगळया गोष्टी कोठे तरी थांबल्या पाहिजेत. आपण जी काही मानसिकता दाखवत असतांना या गोष्टींच्याबाबत प्रावधान करताना दिसत नाही. अटक केले जाते आणि त्याला दुसऱ्या दिवशी जामिनावर सोडले जाते. कधी कधी पोलीस हे रात्री 11 वाजता अटक करतात आणि लगेचच सोडून देतात. एक तासाचीही पोलीस कोठडी देत नाही. यासाठी समरी ट्रायल पध्दतीने केसेस चालविण्यासाठी प्रावधान केले तर योग्य होईल. तसे तुमच्या मनात असेल तर तसे करता येईल. मला वाटते की, सुरुवातीला शासनाचा प्रामाणिक हेतू आहे. म्हणून एखाद वेळी आम्ही पाठिंबाही देऊ परंतु हे करताना सरकारने तसे आश्वासित केले पाहिजे. आता सन्माननीय सामाजिक न्याय मंत्री उपस्थित दिसत नहीत. त्यांच्या विभागाचे जादूटोणा विधेयक आता घेण्यात येणार नाही म्हणून ते गेले असावेत. शेवटी जबाबदार विरोधी पक्ष आहे, आपण कायदे करतो. यासाठी थांबले पाहिजे म्हणून आम्ही सदस्य उपस्थित आहोत. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ नाईक हेही या विषयामध्ये गंभीर असतात म्हणून ते थांबतात. त्यांचा बराच विषयामध्ये सहभाग असतो. तरी देखील या बिलावर सूचना केलेल्या आहेत. खरे तर हे बील पास करुन नंतर त्यासंबंधाने डिटेल्स नियम करावयाचे असतील त्या संबंधाने मंत्री महोदयांनी सन्माननीय सदस्यांना बोलावून एक बैठक घ्यावी. असे केले तर आम्हाला वाटेल की सरकारचा यामध्ये प्रामाणिक हेतू आहे. जनतेला आश्वासित करु इच्छिता. जनतेच्या मनामध्येही हे भेसळ बंद व्हावी, अशी इच्छा आहे. सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी म्हणतात, अशाप्रकारे कुरण हे कोणाला निर्माण करुन देत आहात ?

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ...

ते तेवढ्यापुरते न राहता सरकारने असे आश्वस्त करावे की, या पध्दतीने आम्ही पुढे जाण्याचा विचार करीत आहोत. तो विचार शासन करील असा मला विश्वास आहे. त्या दुरुस्त्या माननीय मंत्रिमहोदयांनी कराव्यात अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवतो.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदया, या विधेयकावर बोलण्यासाठी मी उभी आहे. यामध्ये चार वैशिष्ट्ये आहेत. हा दखलपात्र गुन्हा होणार आहे. पोलीस उपनिरीक्षक दर्जापेक्षा कमी दर्जा नसणाऱ्या अधिकाऱ्याला वॉरंटशिवाय त्याना पकडण्याचा अधिकार देण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्याबरोबर यामध्ये संयुक्त तक्रारीचा उल्लेख केला आहे. या देशामध्ये भेसळ करण्याच्या संदर्भात फार मोठे शास्त्र तयार झाले आहे. शासन सारखे सांगत असते की, अमूक वस्तूमध्ये भेसळ केली तर कारवाई करु. काही पदार्थांच्या बाबतीत बारीक अक्षरामध्ये लिहिलेले असते. उदा. शहरामध्ये ब्राऊन ब्रेडचे फॅड मोठ्या प्रमाणावर आलेले आहे. आपण ते ब्राऊन ब्रेड तपासले तर त्यावर बारीक अक्षरामध्ये लिहिलेले असते. मुळात ते व्हाईट ब्रेडच असतात. त्यामध्ये रंग मिसळून त्यांना ब्राऊन बनविलेले असते. ब्राऊन ब्रेड तयार करण्याची वेगळी प्रक्रिया असते. ते ब्रेड मैद्यापासून नव्हे तर गव्हापासून बनविले जातात. भेसळ आणि गुणवत्तेच्या बाबतीत नियंत्रण न ठेवणे याबाबत तपासणी करणे आवश्यक आहे. यापूर्वीचे धान्य कसे होते आणि आताचे धान्य कसे असते हे आपल्याला माहीत असेल. तांदूळ, डाळी, चवळी अशा वेगवेगळ्या धान्यामध्ये वेगवेगळ्या रंगाचे खडे असतात. त्यामध्ये खडेच असतील तर ते सगळे खडे काळे असावयास पाहिजेत. त्यामध्ये माती असेल तर ती चॉकलेटी रंगाची असली पाहिजे. परंतु प्रत्येक धान्यामध्ये त्या त्या रंगाचे खडे असतात. त्या खड्यांचे प्रमाण सुध्दा वाढताना दिसते. घरातील महिला ते धान्य कसे निवडणार ? त्यामध्ये छोट्या आकाराचे खडे असतात. ज्या आकाराचे धान्य असतेच त्याच आकाराचे खडे असतात. ज्या महिलांचा स्वयंपाकाशी संबंध येतो त्यांना हे माहीत असते. ही भेसळ कशी सिध्द करणार ? त्यामध्ये कोणाला शिक्षा करणार ? धान्याचा व्यापार करणारे ते मान्य करीत नाहीत. शेतकऱ्यांकडून धान्य घेतले असे सांगून ते शेतकऱ्यांवर जबाबदारी ढकलतात. महिला संरक्षण कक्ष आणि ग्राहकांच्या हितासाठी काम करणाऱ्या ज्या संघटना आहेत त्यांनी अनेकवेळा स्पॉट चेकींग करुन काही गोष्टी, काही मुद्दे निदर्शनास आणलेले आहेत. त्याची दखल सुध्दा आपला विभाग घेते की, नाही याबद्दल माझ्या मनात शंका आहे. मिठाईच्या दुकानांमध्ये तपासणी केली त्यावेळी असे लक्षात आले की, घसीटाराम हलवाई, चंदू हलवाई यांच्या सारख्या मिठाईवाल्यांकडे जेवणाचे पदार्थ, मिठाई जमिनीवर पडलेली होती.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ KGS/

डॉ. नीलम गोऱ्हे .....

साजूक तुपाची मिठाई म्हणून ग्राहक मिठाई खरेदी करतात परंतु तुपामध्ये डालडा मिळसून त्या तुपामध्ये मिठाई तयार केली जात होती असे वर्तमानपत्रामध्ये आले होते. भेसळ नक्की कशाला म्हणावयाचे, त्यातून पळवाटा कशा काढावयाच्या याचे शास्त्र या लोकांनी विकसित केले आहे. आपण वॉरंट शिवाय त्यांना अटक करण्यासाठी जाणार. दहा बारा केसेसमध्ये जर शासन हरले आणि ते लोक बाहेर आले तर यामध्ये शासनाचे नैतिक खच्चीकरण होईल. फूड आणि ड्रग्सचे एकत्रित खाते आहे. यामध्ये जेवणाच्या वस्तूंच्या बाबतीत क्वॉलिटी कंट्रोलप्रमाणे त्या वस्तू आहेत की, नाही याची तपासणी होण्याची आवश्यकता आहे. खाण्याचा सोडा हा खाण्याच्या कोणत्या गोष्टीमध्ये किती प्रमाणात वापरावयाचा याचे प्रमाण ठरवले नसेल तर त्याचे घातक परिणाम होऊ शकतात. तशीच परिस्थिती अजिनोमोटोची आहे. विदाऊट शुगरची चहा जे लोक पितात त्यांना सॅकरीन लागते. त्याच्याबाबतीतही तशीच परिस्थिती आहे. त्या चहामध्ये किती प्रमाणात सॅकरीन मिसळावी हे ठरले पाहिजे. स्वयंपाकाच्या वस्तूंच्या संदर्भात या कायद्याची अंमलबजावणी करीत असताना त्या वस्तूंच्या गुणवत्तेचे नियंत्रण केले आहे की, नाही हे पाहणे आवश्यक आहे. जे नाव विक्रेते देतात त्याची डेफिनेशन करणे आवश्यक आहे. हे अन्नभेसळ प्रतिबंधक विधेयक आहे. औषधांच्या संदर्भात नेहमी विचार होतो.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ KGS/ पूर्वी श्री. बरवड 21:10

(डॉ. नीलम गो-हे...)

परंतु दागिन्यांच्या संदर्भातील विषय या ठिकाणी मांडला तर तो थोडासा वेगळा वाटेल. सोने आणि चांदीच्या दागिन्यांमध्ये सर्रासपणे भेसळ करुन लोकांची फसवणूक केली जाते. तेव्हा अशा प्रकारच्या भेसळीबाबतही विचार होणे आवश्यक आहे असे मला वाटते. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी या ठिकाणी कॅटबरीचा उल्लेख केला. या कॅटबरीमध्ये सापडलेल्या अळयांच्या बाबतीत जेव्हा आवाज उठविण्यात आला त्यावेळी उत्पादकांनी पळवाट शोधून कॅटबरीचे पूर्वीचे कंपोझिशन बदलून फॉर्म्यालिन कंपोझिशन केले. हे कॅटबरी चॉकलेट फ्रीजमध्ये ठेवले नाही तरी ते वितळणार नाही आणि छोट्या छोट्या दुकानातून त्याची विक्री व्हावी अशा त-हेने त्याचे कंपोझिशन करण्यात आलेले आहे. उत्पादकांचा मार्केटिंग करण्याचा त्यामागे हेतू असतो. अशा प्रकारे जर उत्पादकाने एखाद्या पदार्थाचे कंपोझिशन बदलले तर ते संबंधित विभागाला कळविण्याचे निर्बंध त्याच्यावर असले पाहिजेत जेणेकरुन त्याला पळवाट मिळू शकणार नाही. आईसक्रीम आणि लस्सीसारख्या पदार्थांमध्ये टीप कागदाचा वापर केल्याची उदाहरणे आहेत. सन्माननीय सदस्य ॲड. अनिल परब यांनी असे सांगितले की, उत्पादकाला पकडण्यापेक्षा सूत्रधारालाही गुन्हेगार ठरविले पाहिजे. दुसरे असे की, अनेक पदार्थ हे डयुप्लीकेट नावाने बाजारात आणले जातात. जी मुले चपात्यांचे तुकडे गोळा करतात त्या तुकड्यांचे ते काय करता याबाबतीत त्या मुलांकडून आम्ही माहिती घेतली असता असे समजले की, ह्या गोळा केलेल्या चपात्या उल्हासनगर येथील बिस्किटे बनविणा-या कारखान्यांमध्ये नेऊन तेथे त्यांचा पाणी टाकून लगदा तयार केला जातो आणि त्यापासून मारी, ग्लुकोज अशा प्रकारची बनावट बिस्किटे तयार केली जातात. तेव्हा अशा प्रकाराच्या बाबतीत देखील योग्य ती दखल घेण्याची आवश्यकता आहे. द्रुतगती न्यायालयामध्ये खटला चालविण्याची तरतूद केलेली आहे. तसेच हा अजामीनपात्र गुन्हा केला जात असला तरी गुन्हेगाराला केव्हा ना केव्हा तरी जामीन हा द्यावाच लागतो. त्यामुळे हा कायदा कोर्टामध्ये टिकणार नाही असे वाटते. तेव्हा याबाबतीतही शासनाने विचार करण्याची आवश्यकता आहे. तसेच कोणाला तरी ओलीस धरण्यासाठी या कायद्याचा उपयोग होणार नाही ना, यादृष्टीने देखील विचार होण्याची आवश्यकता आहे. आतर्राष्ट्रीय बाजार पेठेमध्ये भारतीय पदार्थांचे नाव चांगले आहे. मग परदेशात मात्र चांगल्या दर्जाचे पदार्थ पाठवायचे आणि भारतातील लोकांना मात्र कशाही पध्दतीचे,

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. नीलम गो-हे...)

उरलेसुरलेले पदार्थ द्यायचे ही जी उत्पादकांची प्रवृत्ती बनलेली आहे त्याबाबतीत देखील नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता आहे. शेवटी माननीय राज्यमंत्री महोदयांना मला विनंती करावयाची आहे की, अन्य प्रांतातील लोक या महाराष्ट्रात येऊन अस्खलित मराठी बोलायला शिकलेले आहेत. त्याप्रमाणे माननीय राज्यमंत्री महोदय देखील अस्खलित मराठी बोलू शकतील. पुढील विधेयके त्यांनी मराठीत मांडली तर आम्हाला आनंद होईल, एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपविते.

---

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ KGS/ श्री.शिगम नंतर 21:15

श्रीमती कांता नलावडे ( विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदया, अन्न भेसळ प्रतिबंधक अधिनियम 1954 मध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता हे विधेयक सभागृहामध्ये मांडण्यात आले आहे. खरोखरच शासनाचा हा चांगला प्रयत्न आहे. पण या विधेयकामध्ये त्रुटी आहेत. एवढया सगळया गोष्टी सांगितल्यानंतर नेमके काय केले जाणार आहे हे मंत्रीमहोदयांनी उत्तर सांगितले पाहिजे. मी फक्त मुंबई संदर्भात बोलणार आहे. मुंबईमध्ये अनेक झोपडयांमध्ये वस्तूंचे पॅकींग केले जाते. यामध्ये तूरडाळ असेल,हळद पावडर असेल,मिरची पावडर असेल किंवा गरम मसाल्याचे पदार्थ असतील यामध्ये भेसळ केली जाते. हे पदार्थ मोठया प्रमाणावर म्हणजे होलसेलमध्ये आणले जातात आणि झोपडपट्टयांमध्ये त्याचे पॅकींग करताना भेसळ केली जाते. आमच्या एका संस्थेने मूळ मोहरी आणि भेसळ करुन पॅक केलेली मोहरी आम्हांला दाखविली. यामध्ये कोणताही फरक आढळून आला नाही. म्हणजे त्या त्या पदार्थांमध्ये त्या त्या रंगाचे खडे मिक्स केले जातात. मोहरीमध्ये तशा प्रकारचे खडे टाकले जातात. हळदपावडर असेल किंवा गरम मसाला असेल म्हणजे जेवणासाठी जे पदार्थ वापरले जातात त्यामध्ये सुध्दा मोठया प्रमाणावर भेसळ केली जाते. खाण्याच्या तेलामध्ये आणि खोबरेल तेलामध्ये भेसळ केली जाते. तूरडाळीमध्ये पांढऱ्या वाटाण्याची डाळ मिक्स केली जाते. ज्यांना स्वयंपाकाची सवय नाही त्यांना तूरडाळ आणि पांढरे वाटाणे मिक्स केलेली तूरडाळ यामध्ये पुष्कळ साम्य आढळून येईल. तुरीच्या डाळीमध्ये वाटाण्याची डाळ मिसळतात. जे सर्व पॅकींग करतात त्यांना पकडले जात नाही. मोठया चतुराईने ही मंडळी पॅकींगचे काम करतात. केशरमध्ये सुध्दा भेसळ केली जाते. मुंबईमध्ये आजकाल झ
ाोपडपट्टयांमधून दुधाच्या भेसळीचा मोठा प्रकार चालतो. दुधामध्ये पाणी मिसळले जाते. मुंबईत रोज 25 लाख लिटर दूध येते त्यामध्ये 10 लाख लिटर पाणी मिसळले जाते. हे पाणी सुध्दा घाणेरडे असते. या दुधापासून लहान मुलांच्या आरोग्याला धोका निर्माण होतो. यामध्ये मूळ मालक हे बाजूलाच राहणार आहेत. जे लोक अशा मिक्सींगचे काम करतात त्यांना मात्र शिक्षा होणार आहे. अनेक मुद्दे याठिकाणी चर्चेमध्ये येऊन गेलेले आहेत. दुधामध्ये ज्याप्रमाणे भेसळ होते त्याप्रमाणे तूप असेल त्यामध्ये सुध्दा भेसळ केली जाते. मिठाईमध्ये भेसळ केली जाते यासंदर्भात माननीय सदस्या डॉ. गोऱ्हे यांनी माहिती दिलेली आहे. प्रत्येक मिठाईच्या दुकानामध्ये तयार होणारे पदार्थ तपासले तर त्यामध्ये जे जे रंग वापरले जातात त्यात भेसळ केली जाते. अशा प्रकारे आपल्या शरीराला इजा करणारे हे घटक आहेत. औषधांच्या बाबतीत भेसळ केली जाते.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ KGS/    श्री.शिगम नंतर    21:15

श्रीमती कांता नलावडे ....

औषधे शरीरात घेतली जातात. परंतु त्यामध्ये सुध्दा भेसळ केल्याचे आपल्याला दिसून येते. बऱ्याच वेळेला जर काही त्रास झाला तर डॉक्टर फूड पॉयझनींग झाले असे सांगतात. परंतु भेसळयुक्त पदार्थ खाल्ल्यामुळे शरीराला त्रास होतो. या कायद्यामध्ये बदल करण्याचा प्रयत्न शासनाने केला आहे. तरीसुध्दा मला असे सांगावेसे वाटते की, या कायद्यामध्ये गुन्हेगारांना दहशत बसणार नाही. या कायद्याची ते पर्वा करणार नाहीत. भेसळ करणारे उद्योगधंदे आणि व्यापारी आहेत त्यांच्यावर कडक निर्बंध येतील  आणि त्यांना दहशत बसेल अशा प्रकारची शिक्षा झाली पाहिजे असे माझे मत आहे. नाही तर कायदा करुन काहीही उपयोग होणार नाही. भेसळ करणारे कामगार पकडले जातील आणि ते 2/3 दिवसात सुटतील. परंतु मुख्य सूत्रधार मात्र बाजूलाच राहतील. ग्रामीण भागातून जे दूध येते त्यामध्ये झोपडयांमधून मिक्सींग केले जाते. मी कोल्हापूर जिल्हयातील 1/2 तालुक्यांमध्ये असा एक उद्योग पाहिला होता.

नंतर भारवि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे..

तिथल्या महिल्या कार्यकर्त्यांनी दुधात होणाऱ्या भेसळीची तपासणी केली. धारेच्या दुधावर महिला कार्यकर्त्यांनी लक्ष दिले ठेवले होते. पण तरी देखील दुधात कधी भेसळ होते हे त्यांच्या लक्षात आले नाही. बारकाईने लक्ष दिल्यानंतर तेथे असणाऱ्या एका दहावीतील मुलीने सांगितले की, ज्या भांडयात किंवा बादलीमध्ये धारेचे दूध काढले जाते, त्यात आधीच पाणी घातलेले असते. त्यानंतर मग दूध काढले जाते. दहावीमध्ये शिकणाऱ्या मुलीने ही बाब लक्षात आणून दिली. आज बाजारातील प्रत्येक वस्तूमध्ये चतुराईने भेसळ केली जाते. पण ती आपल्या लक्षात येत नाही. झोपडपट्टीतून नामांकित कंपनीची बनावट बिस्कीटे व केक सर्रास तयार केली जातात. त्यामुळे मुलांच्या आरोग्यावर देखील परिणाम होतो. हा कायदा खऱ्या अर्थाने प्रबळ करावयाचा असेल, संबंधित लोकांना धडा शिकवावयाचा असेल तर अत्यंत कडक निर्बंध या विधेयकाच्या माध्यमातून घातले पाहिजेत अशी विनंती मी करते. धन्यवाद.

...

**तालिका सभापती** : या विधेयकावर किती जण बोलणार आहेत ?

श्री.अनंत तरे : विधेयकावर किती वेळ बिलावर बोलावयाचे यासंबधी लोकसभेमध्ये काय प्रथा आहे ? हे मला समजावून घ्यायचे आहे.

**तालिका सभापती** : ते मला आता सांगावयाचे नाही. योग्य वेळ येईल त्यावेळी मी सांगेन.

श्री.गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी भोजनाची व्यवस्था केलेली आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी जरूर या विधेयकावर बोलावे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे यांनी आता भाषणास सुरूवात करावी.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत तरे (रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) :शासनाला महाराष्ट्र भेसळ मुक्त करायचा......

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, या विधेयकावर सन्मानीय सदस्य श्री.अनंत तरे यांना बोलण्याचा अधिकार नाही. कारण ते ओरिजनल सोडे देत नाहीत.

श्री.अनंत तरे : सभापती महोदय, महाराष्ट्र भेसळ मुक्त करण्याची मानसिकता शासनाची असेल तर अशा प्रकारचे बिल आणून चालणार नाही. या सदनामध्ये सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण आणि मी एक अशासकीय विधेयक आणले होते. त्यावेळी शासनाच्या माध्यमातून असे उत्तर देण्यात आले होते की, भेसळ करणे हा मोठा गुन्हा आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, प्रत्येक गोष्टीमध्ये भेसळ होत आहे. बिंदीसुध्दा बनावट येते. खून किंवा खुनाचा प्रयत्न करण्यापेक्षा हा भेसळ करण्याचा गुन्हा हा मोठा आहे,हे मला या निमित्ताने शासनाला सांगावयाचे आहे. जेव्हा आम्ही अशासकीय विधेयक मांडले होते, त्यावेळी भेसळीचा अपराध करणाऱ्याला फाशीची शिक्षा देण्यात यावी अशी सूचना केली होती. तेव्हा हा केंद्र सरकारचा कायदा असल्यामुळे याबाबत केंद्र सरकारचे मार्गदर्शन घ्यावे लागेल असे शासनाच्यावतीने सांगण्यात आले होते.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत तरे....

आणि केंद्रामध्ये अशा प्रकारचा प्रस्ताव आहे आणि त्याला मान्यता मिळेल अशा प्रकारचे उत्तर त्यावेळी दिले होते. या ठिकाणी भेसळीचा गुन्हा अजामिनपात्र केला आहे. सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांनी सांगितले की, कोर्टामध्ये गेल्यानंतर जामीन मिळतो. महोदया, गावठी दारु पिल्याने माणूस मरत नाही. परंतु त्या दारुमध्ये जर भेसळ झाली तर काय प्रकार घडतो हे आपण सर्वजण जाणता. विक्रोळी येथे गावठी दारुमध्ये भेसळ केल्यामुळे ती प्याल्याने 100 पेक्षा अधिक व्यक्ती मृत्युमुखी पडल्या होत्या. त्यामुळे खुनापेक्षा मोठा असा हा भेसळीचा गुन्हा असूनही, या गुन्हेगारांना फार मोठी शिक्षा करण्याची तरतूद विधेयकामध्ये नसल्यामुळे ते यातून सुटणार आहेत.

महोदया, जिलेबीच्या कलरमध्ये सुध्दा भेसळ होताना दिसून येते. सन्माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे यांनी कोणकोणत्या वस्तूंमध्ये भेसळ होते याबाबत उल्लेख केला. भेसळीचे प्रकार होत असल्याने राज्याचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी बऱ्याच ठिकाणी धाडी टाकल्या. अन्न व औषध प्रशासन विभागाच्या सचिवांनीही अनेक धाडी टाकल्या. यामध्ये काही लोकांना पकडले जाते. त्यांना पकडल्यामुळे महाराष्ट्रात कोठेही भेसळ होत नाही काय ? महोदय, भेसळ करणाऱ्यांकडून हप्ते सुरु झाले की, धाडी टाकण्याचा कार्यक्रम बंद केला जातो. गरीब माणसे तेलांपासून ते इतर ज्या जीवनावश्यक वस्तू आहेत त्या खरेदी करतात, त्यामध्ये भेसळ असते. त्यामुळे रोगराई पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शासनाने हे विधेयक मागे घेऊन, भेसळ करण्याऱ्यांना कडक शासन होईल अशा प्रकारची सुधारणा करुन, जर हे विधेयक आणले असते तर ते अधिक संयुक्तिक ठरले असते. हे विधेयक दोन ओळीचे असले तरी ते अतिशय महत्वाचे आहे. परंतु जर आपण या विधेयकात कडक शिक्षेची तरतूद सुचविली असती तर, भेसळीचा गुन्हा करण्यास कोणतीही व्यक्ती धजावली नसती. त्यामुळे या भेसळ करणाऱ्यांवर शासनाचा धाक असणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील लोकांच्या जीवनाशी खेळण्याचाच हा प्रकार आहे. हा गुन्हा केल्यानंतर कठोर कारवाई होईल अशा प्रकारचा बदल कायद्यामध्ये करुन, हे विधेयक आणावे अशी सूचना करतो.

महोदया, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी माझ्याबद्दल भेसळी संदर्भात आरोप केला. परंतु मी त्यांना सांगू इच्छितो की, मी भेसळीचा धंदा करीत नाही.

आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानतो व माझे भाषण पुरे करतो.

---------

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>नियम 260 अन्वयेवरील प्रस्तावाबाबत.</u>**

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदया, या विधेयकानंतर नियम 260 अन्वये वरील प्रस्तावावर चर्चा होणार आहे. कामकाजपत्रिकेवर हा विषय दाखविण्यात आला आहे. कारण आज जर या प्रस्तावावर चर्चा झाली नाही तर, चालू अधिवेशनात चर्चा होणार नाही. त्यामुळे आजच या प्रस्तावावर चर्चा होणे आवश्यक आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदया, या अगोदर सुध्दा हा प्रस्ताव कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात आला होता. परंतु त्यावेळी या प्रस्तावाला माननीय मुख्यमंत्री किंवा उपमुख्यमंत्री महोदयांनी उत्तर द्यावे अशा प्रकारची आम्ही मागणी केली होती. त्यामुळे ही चर्चा त्यावेळी घेण्याचे थांबविले होते. या प्रस्तावाला माननीय मुख्यमंत्री किंवा उपमुख्यमंत्री महोदयांनी उत्तर दिले पाहिजे. परंतु ते या ठिकाणी उपस्थित नाहीत. ते जर या चर्चेला उत्तर देणार असतील तरच या प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात करण्यात यावी, अन्यथा करु नये.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSK/ SBT/ KGS/ MHM/ MAP यापूर्वी श्री. बोर्डे .. 21.30

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदया, काल पीठासीन अधिकाऱ्यांनी निदेश दिले होते की, आज सकाळी 10 ते 12 वाजेपर्यंत कोकणच्या विषयावर चर्चा घेऊ. सभापती महोदय, ही चर्चा एवढ्याच कारणाकरिता पुढे ढकलण्यात आली की, त्या चर्चेच्या वेळेस माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री उपस्थित असावेत. ही चर्चा याच कारणास्तव तीन वेळा पुढे ढकलण्यात आली. या गोष्टीला सभागृह कारणीभूत नाही. माननीय मुख्यमंत्री किंवा माननीय उपमुख्यमंत्री येणार असतील तर आम्ही या चर्चेस तयार आहोत.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी मांडलेला मुद्दा बरोबर आहे. ही चर्चा माननीय मुख्यमंत्री व माननीय उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थित करण्याचे ठरले होते. आम्ही सकाळी 10.30 वाजल्यापासून येथे उपस्थित आहोत. आता 12 तास होऊन गेलेले आहेत. तरी, या संदर्भात विचार करण्यात यावा, अशी विनंती आहे.

**तालिका सभापती** : आपण अगोदर हे विधेयक पूर्ण करु. मग या विषयावर निर्णय घेऊ. मला आपल्याला असे सांगावयाचे आहे की, जर कोकणच्या विषयावर आज चर्चा घेतली नाही तर कदाचित या सेशनमध्ये ही चर्चा होऊ शकणार नाही.

( माननीय वित्तमंत्री श्री. जयंत पाटील यांचे सभागृहात आगमन )

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, कोकणच्या विषयासंदर्भात मी उत्तर देऊ शकतो. माननीय मुख्यमंत्री व माननीय उपमुख्यमंत्री यांनी मला उत्तर देण्याचा अधिकार दिला आहे. म्हणूनच मी या ठिकाणी आलो आहे.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, कोकणावरील चर्चा माननीय मुख्यमंत्री व माननीय उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थित घेण्याचे ठरले आहे.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, अशाप्रकारे आग्रह कसा काय धरता येईल ? शासन म्हणून मी उत्तर देण्यास तयार आहे. माननीय मुख्यमंत्री व माननीय उपमुख्यमंत्री यांच्या भावना एकत्रित करुन मी या ठिकाणी उत्तर द्यायला उभा आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदारजी आपण विधेयकावर बोलण्यास सुरुवात करावी.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मंत्रिमहोदय उपस्थित नाहीत.

..2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

( माननीय कामगार राज्यमंत्री श्री. बाबा सिद्दीकी यांचे सभागृहात आगमन )

**तालिका सभापती** : या ठिकाणी कोकणावरील चर्चेस उत्तर देण्यास माननीय वित्तमंत्री महोदय आलेले आहेत. ते या संदर्भात उत्तर देऊ शकतात. मला या चर्चेसंदर्भात एक धोका दिसत आहे की, जर आज आपण कोकणावरील ही चर्चा घेतली नाही तर कदाचित या सेशनमध्ये यावर चर्चा होईल की नाही याबाबत शंका आहे. ही चर्चा आजच घ्यायची का ? या संदर्भात अगोदर आपल्याला विचार करावा लागेल. ठीक आहे. अगोदर आपण हे विधेयक पूर्ण करु. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार आपण बोलण्यास सुरुवात करावी.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: अन्न भेसळ प्रतिबंध (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO. XIV OF 2006.

(A BILL FURTHER TO AMEND THE PREVENTION OF FOOD ADULTERATION ACT, 1954, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)

( चर्चा पुढे सुरु ....

श्री. मधुकर सरपोतदार ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ): सभापती महोदय, कोकणचा विषय हा निश्चितपणे ज्वलंत विषय आहे. सभापती महोदय, कोणत्याही विषयाला डायमेन्शन्स असतात. आपण ही चर्चा आता रात्रीच्या साडे दहा वाजता सुरु करणार आहोत. अडीच तासाची ही चर्चा आहे. सभापती महोदय, सकाळी 10.30 वाजल्यापासून आम्ही सभागृहात उपस्थित आहोत. तरी, या दृष्टीने देखील विचार होण्याची गरज आहे.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VVK/ SBT/ MAP/ प्रथम श्री. कांबळे... 21:35

श्री. मधुकर सरपोतदार..

सदस्यांच्या भावना येथे लक्षात घेणे आवश्यक आहे, या कोकणातील प्रस्तावाला सन्माननीय अर्थमंत्री निरर्थक उत्तर देतील असे मला म्हणायचे नाही. परंतु ज्या कारणासाठी हा प्रस्ताव पुढे ढकलण्यात आलेला आहे त्यामध्ये सभासदांच्या भावना काय आहेत त्यांचा विचार करुन याबाबतचा निर्णय घ्यावा, असे मला वाटते.

सभापती महोदया, मी आता सन 2006 चे वि.प.वि. क्रमांक 14 अन्न भेसळ प्रतिबंध अधिनियम, 1954 महाराष्ट्र राज्यास लागू असतांना, त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी हे विधेयक आणलेले आहे, यावर मी आता बोलणार आहे. हा कायदा सभागृहात मांडतांना मंत्री महोदयांनी ज्या अविर्भात तो मांडला, व कायदा मांडतांना त्यांनी असा वास आणला की, येथे मोठे गुन्हेगार यातून पकडणार आहोत असे त्यांनी विधेयक माडतांना भासविले आहे. तेव्हा मी सभागृहात नव्हतो, मी माननीय सभापती यांच्याकडे बैठकीसाठी गेलो होतो. मला याबाबत सन्माननीय सदस्यांनी माहिती दिली. हा कायदा होऊन 57 वर्षे झालेली आहेत, आपणाला स्वातंत्र मिळाले 1947 साली व हा कायदा तयार केला 1954 मध्ये. हा कायदा असतांना सुध्दा जे काळेधंदे करणारे लोक आहेत ते ऐशआरामात जीवन जगत आहेत, त्यांच्या 20-20 मजली इमारती त्यांनी बांधलेल्या आहेत. मात्र गरीब आणि मध्यमवर्गीय माणूस भेसळीचे अन्न खाऊन आपले जीवन जगत आहे. या शासनाला यामध्ये काहीही गांभीर्य वाटत नाही असे मला वाटते. कायदा हा परिणामकारक असला पाहिजे, त्यामध्ये सुधारणा करतांना त्यांची अंमलबजावणी करतांना त्याचा दरारा व जरब बसला पाहिजे, अशा प्रकारच्या सुधारणा कायद्यामध्ये होणे गरजेचे असते. अशा प्रकारची भावना शासनाची मला दिसत नाही. सन 1954 नंतर आज 2006 मध्ये या कायद्यामध्ये सुधारणा करण्याची गरज शासनाला भासलेली आहे. यामध्ये बदल काय केला तर एका सब इन्स्पेक्टर दर्जाच्या अधिकाऱ्याला या कायद्यान्वये अधिकार दिलेले आहेत. पोलीस कॉन्स्टेबल, व शिपाई यांना अधिकार नाहीत. या विधेकावर चर्चा करीत असतांना माननीय कॅबिनेट मंत्री श्री. मनोहर नाईक हे हजर असते तर चांगले झाले असते, कारण विधेयकावर त्यांचे नाव आहे, कॅबिनेट मत्र्यांचे हे बिल आहे, हे अधिवेशन सुरु झाल्यापासून माननीय मंत्री श्री. मनोहर नाईक यांचे दर्शन घडलेले नाही.

.....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

कॅबिनेट मंत्री सदनामध्ये उपस्थित राहणे आवश्यक आहे. ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. सन्माननीय राज्यमंत्री यांनी कॅबिनेट मंत्री व्हावे त्यास आमची काही हरकत नाही. राज्यमंत्री महोदय उपस्थित आहेत. हे विधेयक आणून आपण काय साधणार आहात. मला मोठा प्रश्न पडलेला आहे. ज्या अधिकाऱ्यांना हे अधिकार दिलेत ते भ्रष्टाचार करण्यास मोकळे झालेले आहेत. यातून दुसरे काहीही निष्पन्न होणार नाही. मुंबई शहरातील  झोपडपट्टीमध्ये  अनेक ठिकाणी दुधामध्ये भेसळीचे धंदे चालतात, हे भेसळीची दूध संपूर्ण गरीब कुटुंबामध्ये व मध्यमवर्गीय कुटुंबामध्ये विकले जात आहे. या विरोधात आतापर्यंत कोणत्या भेसळ करणाऱ्या मालकास अटक केली व त्यांना सजा झाली असे एक तरी उदाहरण मंत्री महोदयांनी मला दाखवून द्यावे. अन्नामध्ये भेसळ केल्यामुळे कोणत्या व्यापाऱ्याला सजा केली असे आपण या सदनामध्ये सांगावे. आम्ही एवढया एवढया लोकांना सजा केली. या भेसळवाल्या लोकांनी काळा पैसा जमा करुन त्यांना सांभाळण्याचे काम या कायद्यान्वे होत आहे.

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

मग त्याठिकाणी मंत्री असतील, इन्सपेक्टर असतील किंवा आणखी कुणी असतील त्या लोकांची सरबराई केल्यानंतर त्यांची सर्व गुन्हयामधून सुटका झाली अशाप्रकारची परिस्थिती या राज्यामध्ये आहे. आपण राज्य कारभार करीत असतांना त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी हा प्रयत्न करीत आहात. परंतु आज चूक होत असेल तर ती उद्या होणार नाही याची काळजी घेण्याची आवश्यकता आहे. त्यादृष्टीने या प्रश्नाकडे पाहिले पाहिजे. माझा आपल्याला प्रश्न आहे की, हे विधेयक आणून आपण कायद्यामध्ये थोडासा बदल केला आहे. पूर्वीची स्थिती कायम न ठेवता त्यामध्ये थोडासा बदल केला. तो म्हणजे सब इन्सपेक्टरला अधिकार देऊन टाकले. यामुळे जो गुन्हेगार नाही त्याला सजा होणार आणि जो गुन्हेगार आहे तो मोकळा सुटणार आहे. अशाप्रकारचा स्थायिभाव प्रशासनामध्ये असणे ही दुर्दैवी घटना आहे, याचे आपल्याला दु:ख होते. एकदा चर्चिल बोलले होते की, या भारताला स्वातंत्र्य देण्यात अर्थ नाही, कारण स्वातंत्र्याची त्यांना किंमत कळत नाही. स्वातंत्र्य दिल्यानंतर या देशामध्ये स्वैराचार होईल. या देशातील लोक समर्थपणे स्वातंत्र्य संभाळू शकणार नाही. क्लिटनने त्याच्या विरुध्द मत मांडले. आपल्याला स्वातंत्र्य मिळाले, त्यानंतर अनेक गोष्टी आल्या. आगरकर म्हणत होते की, प्रथम आपण सुधारणा करुन घेऊ या आणि नंतर स्वराज्य मागू या. लोकमान्य टिळकांनी प्रश्न उपस्थित केला की, आपापसातील प्रश्न अगोदर मिटवू या नंतर स्वराज्य मिळवू या. आणि त्यानंतर त्यांनी "स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे" अशाप्रकारची सिंहगर्जना केली. त्यावेळी आगरकरांनी म्हटले होते की, स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपण राज्य कारभार करण्यासाठी खरोखरच लायक आहोत काय? तशाप्रकारची परिस्थिती आता निर्माण झाली आहे. आज कित्येक ठिकाणी कायद्याचा भंग होत आहे. प्रत्येक ठिकाणी भ्रष्टाचार सुरु आहे. तांदळामध्ये भेसळ होत आहे, गव्हामध्ये भेसळ होत आहे, पिठामध्ये भेसळ होत आहे, तेलामध्ये भेसळ होत आहे, दूधामध्ये भेसळ होत आहे. आपल्या जीवनामध्ये असे एकही दालन नाही ज्याठिकाणी भेसळ होत नाही. शासनामध्ये सुध्दा भेसळ आहे. याचे कारण हे एका पक्षाचे सरकार नाही. ही भेसळ असल्यामुळे त्याचे परिणाम दिसून येत आहेत. या सदनामध्ये आपण नेहमी पहातो की, कुणीतरी माननीय मुख्यमंत्र्यांना पाठींबा देतो, कुणीतरी माननीय मुख्यमंत्र्यांवर आरोप करतो तर कुणीतरी माननीय उपमुख्यमंत्र्यांच्या विरोधात टीका करतो. अशाप्रकारचे अनेक प्रवाह आहेत, अंडरग्राऊंड प्रवेश आहेत. हे आघाडीचे सरकार आहे, युतीचे सरकार आहे. कोणत्याही एका पक्षाची सत्ता नाही. त्यामुळे हे भेसळ असलेले सरकार आहे हे आपल्याला विसरुन चालणार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

नाही. भेसळ प्रतिबंधक विधेयक आणतांना अशाप्रकारची भेसळ होऊ नये यासाठी आपण काळजी घ्यावी.

सभापती महोदया, आम्हाला मुंबई शहराची काळजी वाटते. या विधेयकाला 50 वर्षानंतर सुधारणा आणली आहे. आणि ती सुधारणा आणीत असतांना भेसळ प्रतिबंधक कारवाईचे अधिकार सब इन्सपेक्टरला दिले आहेत. त्या सब इन्सपेक्टरकडे संयुक्त तक्रार करण्यात आली तर तो ऐकून घेणार. त्याच्याकडे लेखी तक्रार केली जाणार नाही. तक्रार कुणी केली हे पोलिसांनी पहाण्याची गरज नाही. आणि कुणी तक्रार याबाबत इन्सपेक्टरला त्या माणसाचे नाव सांगितले तर तो त्या माणसाला उचलून आणणार. आणि त्याच्यावर नॉन बेलेबल सेक्शन लावून त्याला अटक करणार. त्याकरिता जामीन देण्याची तरतूद स्पेशल मॅजिस्ट्रेटकडे असेल. परंतु पोलीस स्टेशनमधून जामीन मिळण्यासाठी पुढील प्रोसिजर कशी आहे? त्याबाबतची ट्रायल पुढे कशी चालविली जाणार आहे. याबाबत कोणत्याही प्रकारचे दिग्दर्शन किंवा मार्गदर्शन या विधेयकामध्ये केलेले नाही.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे सुरु...

आज नियम नाही परंतु उद्या ते बनवाल. ते कसे नियम बनविणार आहात हे माहीत नाही. नियम कसे असावेत, हे ठरवायचे आहे. या सगळया गोष्टी विचारात घेतल्या तर .. Then make such changes which will be more effective. असे करणे अतिशय महत्वाचे आहे राज्यकर्ते म्हणून तुमचे अस्तित्व आहे. श्री.बाबा सिध्दीकी रस्त्यावरुन चालले तर आमचे मिनिस्टर चालले आहेत, अशी लोकांच्या मनामध्ये भावना असली पाहिजे. कोणी तरी मनुष्य चालला आहे अशी लोकांमध्ये भावना होता कामा नये. लोकांनी मंत्री केलेले आहे म्हणून तुमची दातृत्वाची वागणूक कशी आहे, याचा विचार केला जातो. (interruptions) One should try to give full justice to his own position. तसे घडत नाही. आपण सब इन्स्पेक्टरला अधिकार देत आहात. पैसे खाण्यासाठी मार्ग मोकळा करुन दिलेला आहे, अशी मनामध्ये शंका येते. अनेक पोलीस अधिकारी, पोलीस शिपाई हे अत्यंत चांगले आहेत. परंतु त्याचबरोबर भ्रष्टाचार करणारेही अधिकारी आहेत. आपण गेल्या काही दिवसामध्येच श्री.सुधाकर पुजारी नावाचे असिस्टंट कमिशनरांच्या संबंधाने येथे चर्चा केलेली आहे. आपल्या हातामध्ये अधिकार आल्याबरोबर सुडाचा चाबूक त्यांनी घेतला. तसे यामध्ये पोलीस अधिकारी वागले तर मोठे अडचणीचे होईल. हा अधिकार पोलीस अधिकाऱ्यांकडे दिल्यानंतर त्याची ते कशी अंमलबजावणी करतात, यातून काय निष्पन्न होणार आहे,याची आपण कल्पना केलेली बरी. यामधून गुन्हेगार सुटणार आहेत आणि हम देख लेंगे. असे म्हणणारे दलाल पुढे येणार आहेत. त्याबाबत मंत्री महोदय येथे असतील तर त्यांनी काही सांगितले असते. राज्य मंत्री हे उपस्थित केलेल्या मुद्यांच्याबाबतीत मंत्री महोदयांना काय सांगणार आहेत माहीत नाही. मी या विधेयकातील कारणे आणि उद्देश वाचलेली आहेत. सुरुवातीला या विधेयकाचे स्वागत करतो, परंतु यातून चांगला परिणामकारक कायदा बनवून पुढच्या अधिवेशनामध्ये तो आणावा, म्हणजे यामध्ये गुणवत्ता दिसून येईल. यामध्ये गरीब माणूस भरडला जाणार नाही या दृष्टीने शासनाने काळजी घ्यावी आणि त्याप्रमाणे सुधारणा घडवून आणाव्यात अशी विनंती करुन माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद.

श्री.बाबा सिध्दीकी (बसून) : Thanks, Sir Thanks, Dada.

---

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP/ 21:50

श्री बाबा सिद्दीकी ( अन्न व औषध प्रशासन राज्य मंत्री ): सभापति महोदय, बहुत सारे सम्मानीय सदस्यों ने इस विधेयक की चर्चा में भाग लेकर अपने विचार व्यक्त किए हैं. इस विधेयक पर सर्व सम्माननीय सदस्य श्री दीपक सावंत, श्री अवचट, श्री मधुकर चव्हाण, श्री कवाड़े,श्री श्रीकांत जोशी, श्री परब, श्री तावडे, श्रीमती गो-हे, श्रीमती नलावडे, श्री तरे एवं श्री सरपोतदार ने अपने विचार व्यक्त करते हुए कुछ सुझाव भी दिए हैं.

सभापति महोदय, इस बिल को लाने का उद्देश्य यह है कि महाराष्ट्र सरकार की तरफ से एक अच्छी शुरुआत हो. माननीय सदस्य श्री श्रीकांत जोशी एवं श्री सरपोतदार जी ने अच्छे सुझाव दिए हैं. मैं माननीय सदस्य श्री दीपक सावंत जी को यह बताना चाहता हूं कि यह " दी प्रिवेन्शन ऑफ फुड एडल्टरशन एक्ट, 1954 " जो एक्ट है, यह एक्ट हर चीज़ के मिलावट संबंधी मामलों को कवर करता है. जैंसे कि हल्दी, गाजर, दूध, अनाज इत्यादि. माननीय सदस्य श्री अवचट जी ने कहा कि पहले से इतने केसेस कोर्ट में पेंडिंग हैं. ऐसी स्थिति में निर्णय कब होगा. मैं उनकी इस बात से सहमत हूं और यह वस्तुस्थिति है, इसी लिए तो यह बिल लाया गया है.आई.पी.सी. के सेक्शन 324, 326 के तहत एन.सी. लिखी जाती है और कार्रवाई होती है. मैं यह एक उदाहरण दे रहा हूं. हालांकि इस सेक्शन का इस बिल से कोई संबंध नहीं है. लेकिन हमने मिलावट करने वालों के खिलाफ कार्रवाई करने के लिए सेक्शन 20 को डिलीट करके सेक्शन 20(1) का प्रावधान किया है. माननीय सदस्य श्री परब ने पूछा कि इस प्रकार के मामले किस कोर्ट में पेश किए जाएंगे. मैं इस संबंध में यह बताना चाहूंगा कि दी प्रिवेन्शन ऑफ फुड एडल्टरशन एक्ट में सेक्शन 61 (1) (बी) के तहत इस बात का उल्लेख है. सेशन कोर्ट में भी इस मामले का विचार हो सकता है. इस प्रकार के मामलों में 3 साल से लेकर 14 साल तक की सजा भी हो सकती है इसके अलावा दंड का भी प्रावधान है. इसी प्रकार की यह अमेंडमेंट है. माननीय सदस्या श्रीमती गो-हे जी ने बताया कि दूध में बड़े पैमाने पर मिलावट हो रही है. यह बात सही है. दूध में मिलावट के मामले प्रकाश में आए हैं. लेकिन मैं यह बताना चाहूंगा कि अन्न व औषध प्रशासन विभाग के द्वारा स्पाट पर दूध की जांच की जाती है. ड्रग इंसपेक्टर, फुड इंसपेक्टर नार्मल कोर्स में इस प्रकार की जांच समय समय पर करते हैं. दूध की रेगूलर जांच की जाती है. माननीय सदस्य श्री मधुकर चव्हाण जी और श्री श्रीकांत जोशी जी ने बताया कि मिलावट करने वाले अपराधियों के लिए बहुत कम सजा रखी गई है, सजा बढ़ायी जानी चाहिए. मैं उनकी इस बात

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री बाबा सिद्दीकी....

से सहमत हूं कि इन मामलों में ज्यादा सजा होनी चाहिए. मैं माननीय सदस्यों को यह आश्वासन देना चाहता हूं कि सजा बढ़ाने के बारे में केन्द्रीय सरकार से कहा जाएगा, क्योंकि यह केन्द्रीय सरकार का एक्ट है. आज सरकार ने इस एक्ट में जो अमेंडमेंट लायी है, उसके लिए महाराष्ट्र सरकार ने केन्द्रीय सरकार से अनुमति ली थी. केन्द्रीय सरकार द्वारा अनुमति दिए जाने के बाद यह प्रस्ताव मंत्री मंडल द्वारा मंजूर किया गया और उसके बाद आज यह बिल के रुप में सदन के सम्मुख रखा गया है. इसी प्रकार से सजा बढ़ाने का प्रस्ताव भी केन्द्रीय सरकार के सामने रखा जाएगा. हम इस संबंध में केन्द्रीय सरकार से पत्र व्यवहार करेंगे. केन्द्रीय सरकार से अनुमति मिल जाने के बाद सजा बढ़ाने का प्रावधान किया जा सकता है. सदन में बिल पास करने के बाद माननीय राष्ट्रपति जी की भी सम्मति लेनी पड़ती है. माननीय सदस्य श्री तावडे जी ने कहा कि यह एक्ट बहुत महत्वपूमर्ण है. माननीय सदस्य श्री सरपोतदार जी ने कहा कि मिलावट के संबंध में सम्माननीय सदस्य यहां पर सदन में तारांकित प्रश्न के माध्यम से, लक्षवेधी सूचना के माध्यम से आवाज उठाते हैं. माननीय सदस्य श्री परब ने कहा कि अपराधी को कोर्ट से जमानत मिल जाएगी. उनका कहना ठीक है. लेकिन हम कुछ कार्रवाई के बारे में पहल तो करें.

इसके बाद श्री शर्मा ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्री बाबा सिद्दीकी जारी

इसके लिए एक पॉजिटिव स्टेप के रुप में हम यह बिल आपके सामने लेकर आए हैं. कई माननीय सदस्यों ने कहा कि झोंपड़पट्टी के लोगों को, बाहर के लोगों को पकड़ लिया जाता है और सुबह उनकी जमानत हो जाती है. यह बिल पास होने के बाद पुलिस को इन्वेस्टीगेसन करने का मौका मिलेगा और 2 दिन तक अगर वह बंद रहेगा तो इनके मालिक के बारे में हकीकत सामने आ जाएगी और तब जाकर सही गुनाहगार पकड़ा जाएगा. यह बिल पास होने के बाद इस प्रकार के कार्य की शुरुआत हो सकती है, यह सोचकर महाराष्ट्र सरकार ने यह बिल आपके सामने पेश किया है.

सभापति महोदय, माननीय सदस्य श्री. रावते जी ने मराठी भाषा में बोलने का मुझसे आग्रह किया है. आप लोग कहते हैं कि मैं महाराष्ट्र का मंत्री हूँ और मुझे मराठी भाषा में बोलना चाहिए. आपकी बात मैं समझ रहा हूँ. महाराष्ट्र ने मुझे सब कुछ दिया है और मुझे मराठी भाषा का ज्ञान है. मला मराठी भाषा येते आणि मी मराठीमध्ये बोलू शकतो. लेकिन अगर मैं मराठी भाषा बोलते समय ग्रामर की मिस्टेक करुंगा तो वह ठीक नहीं रहेगा. I feel humiliated. इस वजह से मैं हिन्दी भाषा में बात करना चाहता हूँ.

सभापति महोदय, मैं आपके माध्यम से सभी माननीय सदस्यों से विनंती करता हूँ कि वे इस बिल को एकमत से संमत करें.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

**<u>सन 1954चा अधिनियम क्रमांक 37याच्या कलम 20 ऐवजी नवीन कलम दाखल करणे</u>**

**तालिका सभापती** : खंड 2 ला माननीय सदस्य डॉ. एन.पी. हिराणी यांनी सुधारणा सुचविलेली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. दिवाकर रावते : सुधारणा माननीय सदस्यांना सर्क्युलेट करावी लागते. ती केलेली नाही.

**तालिका सभापती** : सुधारणा काल सर्क्युलेट करण्यात आलेली आहे. माननीय सदस्यांनी आपली सुधारणा मांडावी.

....5Z-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. एन.पी. हिराणी : महोदया, मी आपल्या अनुमतीने पुढील सुधारणा मांडतो.

"खंड 2 पृष्ठ क्रमांक 2 वर, ओळ क्रमांक 5 मधील, "पोलीस उप निरीक्षकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेला" या मजकुराऐवजी "राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील असा पोलीस निरीक्षकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेला" हा मजकूर दाखल करण्यात यावा.

सुधारणा मतास टाकून संमत झाली.

...यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सुधारणा मतास टाकून संमत झाली.

खंड 2 सुधारल्याप्रमाणे, विधेयकाचा भाग झाला.

खंड 2 विधेयकाचा भाग झाला.

खंड 1 संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. बाबा सिद्दीकी (अन्न व औषध प्रशासन राज्यमंत्री ) : महोदया, सन 2006 चे वि.प.वि.क्रमांक 14 "सुधारणा केल्याप्रमाणे" संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मी आपल्या अनुमतीने मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : सन 2006 चे वि.प.वि.क्रमांक 14 " सुधारल्याप्रमाणे " संमत झाले आहे.

------

........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**पृ.शी./मु.शी.**: सभागृहाच्या कामकाजासंबंधी .

अॅड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, नियम 260 अंतर्गत कोकणाच्या निरनिराळया प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी आपल्या मान्यतेने याठिकाणी ठराव स्वीकृत करण्यात आला होता. गेले 2/3 दिवस हा ठराव कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात आला होता. परंतु मुहूर्त न मिळाल्यामुळे या विषयावर चर्चा होऊ शकली नाही. आजही मला असे वाटते की जर या विषयावर चर्चा झाली नाही तर या अधिवेशनात ती होऊ शकणार नाही. त्यामुळे अत्यंत महत्वाच्या आणि दुर्लक्षित अशा प्रश्नावर सभागृहाच्या माध्यमातून चर्चा झाली असती. आता नियम 260 अंतर्गत या ठरावावर चर्चा करावी किंवा कसे याबाबत आपण निर्णय घ्यावा अशी मी आपल्याला विनंती करतो.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, माननीय सदस्य अॅड.गुरुनाथ कुलकर्णी यांनी मांडलेल्या सूचनेला मी अनुमती देत आहे. या सदनाचे काही माननीय सदस्य निवृत्त होणार आहेत.

नंतर भारवि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत तरे..

त्यांच्या प्रस्तावावर बोलण्याची अनेक सन्माननीय सदस्यांची इच्छा होती. पण तो प्रस्ताव घेण्यात आला नाही. कोकणातील प्रस्तावावर चर्चा होण्यासाठी निरोप समारंभाचा कार्यक्रम पुढे ढकलण्यात आला. पण आता कोकणाचा प्रस्तावा देखील पुढे ढकलावा लागेल अशी वेळ आलेली आहे. कारण आता रात्रीचे दहा वाजून गेले आहेत.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्मानीय सदस्य सर्वश्री.गुरूनाथ कुलकर्णी व अनंत तरे यांनी जो मुद्दा मांडला आहे, तो अतिशय महत्त्वाचा आहे. आता अधिवेशनाचे शेवटचे दोन दिवसच शिल्लक राहिले आहेत. परीक्षा जवळ आली की विद्यार्थी अभ्यासाला बसतात, त्याप्रमाणे अधिवेशनाचे शेवटचे 4-5 दिवस राहिलेत की, विधेयके चर्चेसाठी सभागृहासमोर येतात. त्यामुळे अन्य महत्त्वाचे विषय देखील बाजूला पडतात. कोकणच्या विषयावर माननीय मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत सर्वकष चर्चा व्हावी अशी सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांची इच्छा आहे. असे जरी असले तरी आता वेळ खूप झाला आहे. आज सकळी 10.00 वाजल्यापासून सभागृहाचे कामकाज सुरू आहे. कामाच्या ताणामुळे एक पोलीस अधिकारी चक्कर येऊन देखील पडला आहे. त्यामुळे हा जो प्रस्ताव आहे, तो पावसाळी अधिवेशनमध्ये कसा घेता येईल हे कामकाज सल्लागार समितीमध्ये ठरवावे. या चर्चेच्या वेळी माननीय मुख्यमंत्री उपस्थित राहिले तर कोकणाला न्याय दिल्या सारखे होईल.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, गेल्या तीन दिवसांपासून कोकणावरील चर्चा स्थगित केली जात आहे. मूळात कोकणावर सगळयाच बाबतीत अन्याय केला जातो. त्यामुळे सभागृहात माननीय मुख्यमंत्र्यांनी उपस्थित रहावे असा आग्रह सन्मानीय सदस्यांनी धरलेला आहे. सर्व सन्माननीय सदस्यांना माननीय मुख्यमंत्र्यांसमोर आपले विचार मांडावयाचे आहेत. पण आता सभागृहात माननीय मुख्यमंत्री उपस्थित नाहीत. मात्र माननीय वित्त मंत्री उपस्थित आहेत. तसे पाहिले तर हा कोकणावर, विदर्भावर अन्याय आहे. त्यात माननीय वित्त मंत्री व अन्य कोणाचाही भाग असू शकतो. कोकणाच्या विकासासाठी जो निधी मिळायला पाहिजे तो मिळत नाही. यासाठी माननीय वित्त मंत्र्यांना अडचणी असू शकतील. त्याबद्दल मी बोलत नाही. पण या प्रस्तावावर चर्चा झाली नाही तर आम्ही कोकणवासीयांना काय उत्तर द्यायचे ? एवढे दिवस अधिवेशन चालून सुध्दा कोकणासंबंधी काय गेले असा प्रश्न विचारला तर, त्याचे समर्पक उत्तर आम्हाला देता येणार नाही.

..2..

BGO/ SBT/ MAP/ कानडे. 22:05

श्री.मधुकर सरपोतदार ....

आता रात्रीचे दहा वाजले आहेत. आताही चर्चेला सुरूवात करता येईल. पण वेळेचे भान हे ठेवले पाहिजे. अशा पध्दतीने सन्माननीय सदस्यांना तसेच शासकीय कर्मचाऱ्यांना वेठीला धरणे योग्य नाही. निदान आम्ही तरी बोलू शकतो. पण कर्मचारी काहीही बोलू शकत नाही. तेव्हा या प्रश्नाकडे देखील शासनाने पाहिले पाहिजे. तेव्हा माझी सूचना अशी आहे की, आता अधिवेशन संपायला दोन दिवस राहिले आहेत. तेव्हा सदर चर्चा सकाळी कशी बसवावयाची किंवा अन्य काही मार्ग काढता येतो काय याचा आपण विचार करावा. एवढीच या निमित्ताने विनंती करतो.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी, श्री.अनंत तरे, श्री.मधुकर सरपोतदार यांनी कोकणाच्या विषयावर चर्चा घ्यायची किंवा कशी असा मुद्दा उपस्थित केला आहे. ज्याप्रमाणे मुंबईच्या चर्चेला माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले, त्याप्रमाणे कोकणाच्या चर्चेला देखील माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर द्यावे अशी मागणी सन्माननीय सदस्यांकडून करण्यात आली आहे. दोन्ही सभागृहाचे कामकाज सुरू आहे. या प्रस्तावाला माननीय उप मुख्यमंत्री उत्तर देण्यासाठी येणार होते. परंतु, ते काही येऊ शकले नाहीत. तरी सुध्दा सभागृहामध्ये राज्याचे वित्त व नियोजन मंत्री हे सभागृहात उपस्थित आहेत. त्यामुळे राज्याच्या नियोजनबद्ध विकासाची चर्चा करता येऊ शकेल. सन्माननीय सदस्यांच्या ज्या काही सूचना असतील त्या वित्त व नियोजन मंत्री माननीय मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून देतील. कारण माननीय वित्त मंत्री हेच नियोजन मंत्री आहेत.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**....

सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी या बाबतीत ज्या वेदना मांडल्या आहेत, त्यांना सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर सरपोतदार, विनोद तावडे आणि अनंत तरे यांनी पाठिंबा दिला. ती वस्तुस्थिती खरी आहे. वास्तविक पाहता कोकणच्या व्यथा सुटल्या पाहिजेत, त्या पोटतिडकीने मांडता आल्या पाहिजेत, या प्रस्तावावर प्रभावी उत्तर मिळाले पाहिजे, ही आपणा सर्वांची भावना आहे. मी स्वत: कोकणातील जरी नसलो तरी कोकण आणि डोंगराळ विभागातील जे अंतर आहे त्यातील 10 कि.मी. अंतरावरील आहे. संगमेश्वर, देवरुख ही गावे आणि माझे गांव यामधील अंतर 25 कि.मी. अंतराचे आहे. कोकणच्या अडचणी सुटल्या पाहिजेत, अशीच आपणा सर्वांची अपेक्षा आहे. मी वित्त व नियोजन मंत्री महोदयांना सांगेन की, येत्या 15-20 दिवसांत किंवा महिन्याभरात कोकणातील लोकप्रतिनिधींना आपल्या चेंबरमध्ये बोलावून एक-दोन तासामध्ये त्यांच्या कोणकोणत्या अपेक्षा आणि मागण्या आहेत या संदर्भात सविस्तर चर्चा करावी. त्यानंतर आपण या ठिकाणी सुचविल्यानंतर पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या आठवडयात पहिल्या एक-दोन दिवसांत हा प्रस्ताव घेण्याबाबत कामकाज सल्लगार समितीमध्ये चर्चेची वेळ निश्चित करु. अडीच तासाची चर्चा साधकबाधक होण्याच्या दृष्टीने तीन-चार तास चर्चा होण्यासाठी मी स्वत: लक्ष घालेन त्यामुळे आज या प्रस्तावावर चर्चा घेणे थांबवू. त्यामुळे मी सुचविलेल्या मुद्यांसंदर्भात माननीय वित्त व नियोजन मंत्री महोदयांना मी सांगेन की, येत्या 15 दिवसांत कोकणच्या प्रश्नावर बैठक घेण्याच्या संदर्भात त्यांनी आपली भूमिका मांडली तर बरे होईल.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, हे खरे आहे की, कोकणातील विधानपरिषद सदस्यांची फार मोठया प्रमाणावर कोकणच्या प्रश्नांची उकल व्हावी अशी अपेक्षा होती. परंतु वेळे अभावी आपण या चर्चेसंदर्भात निर्णय घेतला आहे. कोकणातील पाचही जिल्हयांच्या बाबतीत, मच्छिमारांपासून ते टुरिझम पर्यंत, सागरी मार्गापासून ते रेल्वे व्यवस्थेपर्यंतच्या मुद्यांबाबत चार-पाच तास खर्च करुन, बरीच माहिती संकलीत करुन, काय करता येईल यासाठी बरीचशी सहमती करुन आलो होतो. परंतु वेळे अभावी ही चर्चा होऊ शकली नाही. कोकण हा मोठा विभाग आहे. राज्याचा टुरिझममधून आर्थिकदृष्टया विकास करण्यासाठी पात्र असलेला हा कोकण प्रदेश आहे. कोकणातील प्रश्न अनेक आहेत. त्यामुळे त्या भागातील सन्माननीय सदस्यांना विश्वासात घेण्यासाठी 15 दिवसांच्या आत बैठक घेण्यात येईल. कोकण विभागातील विधानपरिषद सदस्य,



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील....

कोकणातील पाच जिल्हयांचे पालकमंत्री यांना बैठकीसाठी बोलाविण्यात येईल. त्याच वेळी पर्यटन मंत्री, बांधकाम मंत्री यांना सुध्दा उपस्थित राहण्यास सांगून, चर्चा घडवून आणण्याची व्यवस्था करण्यात येईल. बैठकीमध्ये सर्व सन्माननीय सदस्यांनी आपली मते किंवा अपेक्षा मांडल्यात तर पुढच्या वेळी जेव्हा ही चर्चा होईल तेव्हा ती चर्चा अर्थपूर्ण होण्यासाठी प्रयत्न करु.

महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांना एकच विनंती करावयाची आहे की, कोकणावर अन्याय करण्याची भावना कधीच कोणाची नव्हती. कोणावर बोलता येत नाही, म्हणून वित्त मंत्र्यांवर बोलण्याची आज फॅशन सुरु झाली आहे.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, ज्या सन्माननीय सदस्यांनी कोकणासंदर्भातील प्रस्ताव मांडला आहे, त्यांनाही या चर्चेस बोलाविण्यात यावे.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, विधान परिषदेच्या सर्व सन्माननीय सदस्यांना या चर्चेस बोलाविण्यात येईल. अशाप्रकारे चर्चा करुन कोकणाला न्याय देण्याची सरकारची भूमिका आहे. सरकारीच ही भूमिका सर्वांनी पूर्ण करु. आपले बहुमोल मत व आपण व्यक्त केलेले विचार सर्वांनाच मार्गदर्शक ठरतील. माननीय सभापतींनी दिलेले निदेशाप्रमाणे, कोकणाच्या परिस्थितीमध्ये आमुलाग्र बदल करण्यासाठी मुलभूत असा निर्णय घेऊ. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांनी सांगितले की, पुढील वेळी मी या चर्चेला विधान परिषदेत उपस्थित असेन किंवा नसेन. त्यांनी पुन्हा या सभागृहात यावे अशी माझी देखील इच्छा आहे. त्यांच्या संदर्भात शिवसेनेने कोणताही निर्णय घेतला तरी, आपण त्यांना विश्वासात घेऊनच या कोकणासंदर्भातील निर्णय घेऊ.

**सभापती** : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक गुरुवार, दिनांक 20 एप्रिल, 2006 रोजी दुपारी 12.00 वाजता पुन्हा भरेल. सदर बैठकीत प्रश्नोत्तराचा तास व इतर कामकाजांव्यतिरिक्त शासकीय विधेयकेही घेण्यात येतील. त्याचप्रमाणे निवृत्त होणाऱ्या सन्माननीय सदस्यांचा निरोप कार्यक्रम शुक्रवार, दिनांक 21 एप्रिल, 2006 रोजी घेण्यात येईल.

( सभागृहाची बैठक रात्री 10 वाजून 17 मिनिटांनी, गुरुवार, दिनांक 20 एप्रिल, 2006 रोजीच्या दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही